



शब्द

# रुची

४०

भाषा आणि साहित्य विशेषांक

जानेवारी २०१५ | मूल्य१०रुपये



# वाचकदिन क्षणचित्रे

**वाचनसंस्कृती**
**व**
**प्रकाशन व्यवसायासमोरील आव्हाने**
**सहभाग – अरुण जाखडे, अरुण साधू, श्रीधर पाटील**




प्रकाशन हस्ते
रामदास भटकळ





रूपारेल कॉलेजचे
प्राचार्य
डॉ. तुषार देसाई



डॉ. दाऊद दळवी यांच्या 'माझं अंतरंग' आणि
'भारतातील मुस्लिम स्थापत्यकला' या दोन पुस्तकांचे प्रकाशन







म.सु. पाटील यांच्या
'लांबा उगवे आगरीं' पुस्तकाचे प्रकाशन





डॉ. पी.एस. रामाणी यांच्या
'चाला, धावा, पळा' पुस्तकाचे प्रकाशन





सुधीर थत्ते–नंदिनी थत्ते यांच्या
'नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१४' पुस्तकाचे प्रकाशन





मूळ कन्नड लेखक रहमत तरीकेरे लिखित आणि
प्रशांत कुलकर्णी अनुवादित 'आमीरबाई कर्नाटकी'
पुस्तकाचे प्रकाशन



ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

**जानेवारी २०१५, वर्ष दुसरे**
**अंक नववा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
अतिथी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
मुखपृष्ठ : **पुंडलिक वझे**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**शब्द रुची/पुस्तक वितरण – महेश गोरेगांवकर**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.**

घराघरातील भाषा...
आणि भाषेची घरघर!




## संपादकीय...

जागतिकीकरणाने आपले एकूणच सामाजिक, सांस्कृतिक जीवन ढवळून काढले आहे. नव्वदोत्तर कालखंडात समाजवास्तव अधिकाधिक गुंतागुंतीचे आणि बहुपदरी होत जाते आहे. या टप्प्यावर अनेक प्रादेशिक भाषा मृत्युपंथाला लागत असल्याचे भेदक चित्र आपल्यासमोर येते आहे. या पार्श्वभूमीवर मराठीची स्थिती-गती काय आहे, हा शोध महत्त्वाचा ठरतो. आजच्या काळाने आपल्या पारंपरिक साहित्यप्रकारांसमोर आणि लेखकांसमोर कोणती आव्हाने निर्माण केली आहेत, सर्जनशील लेखक याकडे कसे पाहतात, 'मराठी'विषयी त्यांची भूमिका काय आहे, हे तपासणेही या संदर्भात महत्त्वाचे आहे, म्हणूनच ग्रंथालीने 'नव्वदोत्तर काळातील मराठी भाषा व साहित्यासमोरील आव्हाने' हे सूत्र घेऊन एक विशेषांक प्रकाशित करण्याचे योजले. निमित्त आहे ग्रंथालीच्या चाळिशीचे! महाराष्ट्र व बृहन्महाराष्ट्रात रुजलेले ग्रंथाली वाचक चळवळीचे काम वाचनसंस्कृतीच्या निरंतर प्रवासाला बळकटी देत आले आहे. यानिमित्ताने या वर्षभरात विविध उपक्रम 'ग्रंथाली'ने हाती घेतले आहेत. निवडक विशेषांकांचे प्रकाशन हा यातील एक ठळक उपक्रम. प्रस्तुत अंक हा या मालिकेतील पाचवा अंक. या विशेषांकाचे संपादन करण्यासाठी 'ग्रंथाली'ने माझ्यावर जो विश्वास टाकला, त्याबद्दल प्रारंभीच स्नेह व्यक्त करते. 'अतिथी संपादक' या नात्याने ग्रंथालीने दिलेल्या स्वातंत्र्यामुळेच वेगवेगळ्या लेखकांशी मी संवाद साधू शकले. या अंकात समाविष्ट झालेले काही लेखक रुढार्थाने लेखक नाहीत. ते आपल्या कामांमधून मराठीशी जोडले गेले आहेत. विशेषतः ते ज्या क्षेत्राशी जोडले गेले आहेत त्या क्षेत्रातील अनुभवांनी त्यांची भाषा संस्कारित झाली आहे. यामुळे या अंकाच्या संरचनेस एक वेगळे परिमाण प्राप्त झाले आहे.

एका अर्थी प्रत्येकच कालखंड नवी आव्हाने आणि प्रश्न घेऊन जन्माला येत असतो. काळाच्या पोटात काय आहे, भोवतालाशी त्याचा काय अनुबंध आहे, आणि हे सर्व आपण भाषेतून कसे पकडणार आहोत हे तपासण्याचा, शोधण्याचा प्रयत्न लेखक करत राहतात. आजचा काळ तर अनेक अर्थांनी लेखकाची जीवतोड-दमछाक करणारा काळ आहे. एकीकडे लेखकाला शतखंडित वास्तवाची गोधडी दिसते आहे तर दुसरीकडे एकात्मता, सेंद्रिय रूपबंध इत्यादी शब्द त्याची पाठ सोडत नाहीत. अशावेळी कोणते सत्त्व घेऊन भिडतो तो या सर्वाला? या दृष्टीनेच 'जागतिकीकरण आणि सर्जनशील लेखक' असा एक स्वतंत्र विभाग या अंकात असावा असे वाटले. वसंत आबाजी डहाके, जी.के. ऐनापुरे, उर्मिला पवार, मिलिंद बोकील, संजय

पवार, बाळ फोंडके, नामदेव माळी, अशोक कौतिक कोळी, ऐश्वर्य पाटेकर आणि मनस्विनी लता रवींद्र असे वेगवेगळ्या पिढ्यांचे लेखक या अंकात एकत्र आले आहेत.

वसंत आबाजी डहाके, मिलिंद बोकील आणि संजय पवार यांनी त्यांच्या लेखांतून मराठी भाषेच्या स्थिती-गतीवर लक्ष केंद्रित केले आहे. अस्तित्ववाद, आधुनिकतावाद ते उत्तर आधुनिकतावादापर्यंत मराठी साहित्यातील विविध स्थित्यंतरे अनुभवलेल्या, पाहिलेल्या वसंत आबाजी डहाके यांनी 'मराठी ही ज्ञानभाषा आणि उपजीविकेची भाषा होऊ शकेल का?' हा कळीचा प्रश्न उपस्थित केला आहे. या प्रश्नामागची त्यांची कळकळ स्पष्टपणे जाणवते, पण सध्या हाच प्रश्न विचारून मराठीची खिल्ली उडवण्याचा प्रकार वाढतो आहे. याबाबतीतला माझा एक अनुभव तर अत्यंत दाहक आहे. मराठीचीच भाकरी खाणारे माध्यमकर्मी, प्रथितयश संपादक कोणत्या पातळीवर येऊन मराठीची रेवडी उडवतात हे जवळून पाहणे क्लेशकारक तर आहेच, पण उद्‌वेगजनकही आहे. देवभाषा म्हणून संस्कृतच्या बडिवाराच्या काळात लोकभाषा आणि मायभाषेतून अभिव्यक्ती करण्याची असोशी जाणवल्यामुळे ज्यांनी मराठीचा आत्मसन्मान 'अमृतातेहि पैजा जिंके' म्हणत जागृत ठेवला त्यांचा वारसा जपता येत नसेल तर त्यांच्या शब्दांना हिणवण्याचा करंटेपणाही आपण करू नये इतका शुद्ध विवेकही आज उरलेला नाही. (दुर्दैवाने मराठीच्या आंदोलनांशी एकेकाळी जोडले गेलेले मराठीतील 'टॉक शोज'चे प्रसिद्ध सूत्रसंचालक देखील या प्रवृत्तींना खतपाणी घालतात तेव्हा मराठीसमोरचा प्रश्न हा केवळ 'आजचा' नाही तर 'उद्याचाही' 'सवाल' बनतो.)

ज्ञानभाषा म्हणून मराठीचा विकास हा मिलिंद बोकील यांच्याही आस्थेचा मुद्दा आहे. 'भाषा, साहित्य आणि समाज' या त्यांच्या आगामी पुस्तकातला अंश त्यांनी या अंकाकरता उपलब्ध करून दिला. त्यातून भाषिक व सांस्कृतिक सपाटीकरणाचा जागतिकीकरणानंतर निर्माण झालेला धोका अधोरेखित होतो.

मराठी ही ज्ञानभाषा आणि उपजीविकेची भाषा व्हावी म्हणून मराठी भाषक समाजाची आणि राज्यशासनाची इच्छाशक्ती किती प्रबळ आहे याच्या कसोटीचीच वेळ आज आली आहे. या संदर्भात संजय पवार यांनी त्यांच्या लेखात योजलेले मांजराचे रूपक अनेक अर्थांनी प्रसरणशील आहे. आपल्या उत्सवी, ब्राह्मणी संस्कृतीचा त्यांनी तिरकस शैलीत केलेला दंभस्फोट अंतर्मुख करणारा आहे.

जी.के. ऐनापुरे यांनी 'यंत्र' होत चाललेला माणूस आणि माणूसपण संपवणाऱ्या व्यवस्था हे विषय सातत्याने आपल्या लेखनाच्या परिघात आणले. जागतिकीकरणासोबतच; विशेषतः साहित्य आणि कलांच्या संदर्भात उत्तर-आधुनिकतावाद हा शब्दही आपल्याकडे आला. उत्तर-आधुनिकतावादाची आपल्याकडची मांडणी किती गंभीर आहे? आपल्या मातीच्या संदर्भात उत्तर-आधुनिकतावाद कसा पाहायचा? मराठी साहित्य जागतिकीकरणाला सामोरे गेले आहे का? आवाक्यात नसलेल्या विषयाची परीक्षा घेण्याची लेखकाची सवय साहित्यव्यवहाराला खरोखर काही देते का? अशा विविध प्रश्नांची चर्चा ऐनापुरे त्यांच्या लेखात करतात. वरपांगी प्रयोगशीलतेच्या नादाने लेखकाला आपला भूप्रदेश आणि भाषा गमवावी लागण्याचा धोका हा आजच्या काळातला फार मोठा धोका आहे, या गाभ्याच्या मुद्यावर त्यांनी क्ष-किरण टाकला आहे.

एका बाजूला सबंध जगातली विविधता नष्ट होऊन वाढत जाणारा सपाटीकरणाचा धोका तर दुसऱ्या बाजूला जात, धर्म, वर्ग यांच्या नावावर वाढत जाणारी विषमता अशा कात्रीत सापडलेल्या आजच्या समाजाचे विस्कळीत जगणे उर्मिला पवार यांच्या 'जागतिकीकरण व्हाया जातजाणीव' या लेखाच्या केंद्रस्थानी आहे. साहित्यिकांनी आसपास घडणाऱ्या गोष्टींबाबत भूमिका घेतली पाहिजे हे त्या या लेखातून ठामपणे व्यक्त करतात.

सर्जनशील लेखकांच्या या विभागात विविध साहित्यप्रकारांतील, विविध प्रवाहांतील लेखकांनी लिहावे अशी अपेक्षा होती. तसा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. साहित्यप्रकारांच्या संदर्भात आपल्याकडे कप्पेबंद दृष्टिकोन स्वीकारलेला दिसतो. म्हणजे कविता, कादंबरी हे मुख्य प्रकार. कथा हा त्यामानाने पुन्हा दुय्यम प्रकार. ललितलेखन, प्रवासवर्णने हे गौण साहित्यप्रकार इत्यादी. आजच्या काळात वर्गीकरणाच्या रूढ भिंती किती सैल, किती लवचीक होणार हाही एक मुद्दा आहेच.

विज्ञानकथा हा वैज्ञानिक सत्य आणि कल्पित यांच्या सीमारेषेवरचा प्रकार. मराठीतील विज्ञानकथा इतर भाषांतील विज्ञानकथांपेक्षा किती वेगळी आहे, हे जाणून घेण्यासाठी तत्संबंधी विषय निश्चित केला.

सशक्त विज्ञानकथा लिहिणाऱ्या, सध्या मेलबर्न (ऑस्ट्रेलिया) येथे असलेल्या, बाळ फोंडके यांनी या अंकाकरता आपला लेख आवर्जून पाठवला. विज्ञान-तंत्रज्ञानाने जग खरोखर किती जवळ आले आहे, पण विज्ञान-तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबरच पूर्वी कधीही ज्ञात नसलेल्या भावनिक, सामाजिक, आर्थिक आणि नैतिक समस्या उभ्या राहिल्या आहेत. मराठी विज्ञानकथा या नव्या समस्यांना भिडण्याचे काम करते आहे, हा विश्वास बाळ फोंडके यांचा 'मराठी विज्ञानकथा : आज आणि उद्या' हा लेख व्यक्त करतो.

नामदेव माळी, ऐश्वर्य पाटेकर आणि अशोक कौतिक कोळी यांचे लेख गावगाड्यातील पडझडीची कथा सांगतात. 'सगळेच राजरोस गावात शिरले, त्यांनी गावाला घेरले' अशा जागतिकीकरणाच्या 'बुलडोझर'मुळे भरडून निघालेल्या गावगाड्याचे विषण्ण करणारे चित्र नामदेव माळी यांच्या लेखातून उभे राहते. नव्वदोत्तर काळातील गोंधळ मांडणारा त्यांचा लेख 'जगाच्या पोशिंद्याची' म्हणजे शेतकऱ्याची वेदना ठळकपणाने व्यक्त करतो.

ऐश्वर्य पाटेकरचा लेख त्याच्या कवितेतून बोलतो. धरणीचे सृजनत्व संपवून टाकणाऱ्या माणसाला 'भुईशास्त्र' उमगलेलेच नाही, ही त्याची खंत आहे. 'ग्लोबल मार्केट' झालेल्या या समाजात नदीकाठचा गाव जपण्याची आस तो व्यक्त करतो. अशीच तीव्र ओढ अशोक कौतिक कोळी यांच्या लेखातून व्यक्त झाली आहे. नव्वदोत्तर काळात मराठी साहित्यातून घडलेल्या नानाविध बोलींच्या

आविष्कारांचे पोत त्यांच्या लेखातून दृष्टिक्षेपास पडतात. जागतिकीकरणाच्या परिणामांच्या तिठ्यावर उभे राहून कष्टकरी समाज आपल्या बोलींना सांभाळण्याचे फार मोठे काम करतो हा सार्थ अभिमान त्यांच्या लेखातून प्रखर होतो.

मनस्विनी लता रवींद्र ही नव्या पिढीची संवेदनशील नाटककार. तिच्या मनात सतत धुमसणारे काहीतरी आणि ते व्यक्त करताना लेखक म्हणून घालावे लागणारे 'भाषेचे शीर्षासन', व्यवस्थेला भिडताना येत गेलेले आत्मभान असा नेणिवेचा प्रवास तिच्या लेखातून साकारतो.

लेखक बाहेरच्या जगातले सारे पुन्हा आत वळून पाहत असतो. (लेखक हा शब्द इथे लिंगभावनिरपेक्ष आहे.) आज बाहेरच्या जगात सारे उलट-पुलट झाले आहे. हिडीस उपयुक्ततावाद, हितसंबंधांचे राजकारण, सत्ताकेंद्रांचे रणकंदन, मुखवट्यांआडचे भोंदूपण, घोषित-अघोषित सेन्सॉरशिप, परस्परविरोधी विचारव्यूहांची गर्दी, बाजाराला शरण जाण्याचा मोह, जातवाद-दहशतवादाचे, मूलतत्त्ववादाचे न सुटणारे ग्रहण अशा सर्वात आज लेखकाला पाय घट्ट रोवून उभे राहायचे आहे. बाहेरच्या जगाचे प्रतिरूपण, कथन आपल्या भाषेतून करायचे आहे. आतले वळणे जोवर प्रामाणिक तोवर चराचरातून पुन्हा उगवण्याची ताकद असणारे शब्द सापडत राहतील. अस्सल माणूसपणासह माणसाला भिडण्यातूनच लोखकाला सत्त्व सापडत राहील.

अनेक शब्दही जे व्यक्त करू शकत नाहीत ते एखादे व्यंगचित्र समर्थपणे पोचवू शकते. मराठीबाबतच्या विविध प्रश्नांना स्पर्श करणारे एक व्यंगचित्रप्रदर्शन मराठी अभ्यास केंद्राने नुकतेच आयोजित केले होते. त्या प्रदर्शनातील प्रशांत कुलकर्णी, गजू तायडे, प्रभाकर भाटलेकर, महेंद्र भावसार, प्रदीप म्हापसेकर आणि प्रभाकर वाईरकर या व्यंगचित्रकरांची निवडक व्यंगचित्रे या अंकात समाविष्ट केली आहेत.

या अंकाच्या निमित्ताने अखिल भारतीय मराठी साहित्य समेलनाचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांची भाषाविषयक भूमिका जाणून घेणे आवश्यक वाटले. शेवटच्या टप्प्यावर ती अंकात समाविष्ट करता आली हेही अंकाचे वैशिष्ट्य ठरावे

'भाषाभान आणि मराठी' हा अंकातील दुसरा विभाग.

'चौकटीबाहेरचे चिंतन' हे ज्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य राहिले त्या डॉ. भा.ल. भोळे यांचा 'लोकभाषा आणि लोकशाही' हा दुर्मिळ लेख या विभागात समाविष्ट केलेला आहे. लोकभाषेतून व्यवहार झाल्याशिवाय देशात लोकशाही निर्माण होऊच शकत नाही हे या लेखाचे मुख्य सूत्र आहे. लोकभाषेचा प्रश्न त्यांनी सर्वसामान्यांच्या मुक्तीशी जोडला आहे. या अर्थाने १९८० साली त्यांनी लिहिलेला हा लेख आज तीस वर्षांनंतरही तितकाच महत्त्वाचा आहे.

भाषा मरता देशही मरतो संस्कृतीचाही दिवा विझे।<br>
गुलामभाषिक होऊनि अपुल्या प्रगतीचे शिर कापू नका।।

या कवी कुसुमाग्रजांच्या ओळी. इंग्रजांची गुलामगिरी संपली तरी इंग्रजीच्या गुलामगिरीचे जोखड मात्र कायम आहे. भारतीय लोकशाहीत आमच्या प्रादेशिक भाषांची स्थिती काय आहे? हा खरोखर कळीचाच मुद्दा आहे. 'भाऊसाहेब बांदोडकर ट्रस्ट' अंतर्गत गोव्याच्या माजी मुख्यमंत्री शशिकलाताई काकोडकर यांच्या सौजन्याने मिळालेला पाठ्यवृत्तीच्या आधारे तुषार पवार या तरुणाने सबंध भारतातील वेगवेगळ्या राज्यांना वर्षभर भेटी दिल्या. या भेटींमधून एकूणच भारतीय भाषांची स्थिती-गती जाणून घेणे हा या प्रकल्पामागचा उद्देश होता. वास्तविक हा अनुभव एखाद्या लेखात शब्दबद्ध करता येणे कठीण आहे. भाषेच्या परिप्रेक्ष्यातून त्याने केलेल्या प्रवासाचे अनुभव, त्यावरील त्याच्या प्रतिक्रिया-निरीक्षणे पुस्तकरूपाने येणे म्हणूनच मला महत्त्वाचे वाटते. त्याकरता अशा प्रकल्पांच्या मागे उभे राहणारे हात वाढले पाहिजेत. बहुराष्ट्रीय कंपनीतील सुस्थिर नोकरी सोडून तुषार पवारसारखा तरुण भाषेच्या चळवळीत आला. 'मराठी अभ्यासकेंद्रा'चा पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून काम करू लागला. भाषेसाठी काम करणाऱ्या अशा पूर्णवेळ कार्यकर्त्यांची गरज या गोष्टीची परंपरा आपल्या समाजात जवळजवळ नाहीच. तुषारसारख्या तरुणाने तो पायंडा घातला.

तरुणांप्रमाणेच शाळेत शिकणारी मुले हाही समाजाचा अतिशय महत्त्वाचा घटक. हीच पिढी उद्या भाषेच्या विकासात फार मोठी भूमिका बजावणार आहे. या पिढीला मराठीशी कसे जोडून ठेवता येईल हे उलगडणारे दोन लेख या अंकात आहेत. एक, 'मराठी शाळा आणि भाषाविकास' हा विनोदिनी काळगी यांचा; तर दुसरा, 'बालनाट्यातून भाषासमृद्धी' हा राजू तुलालवार यांचा. लहान मुलांच्या जगाशी दोघांचेही जवळचे नाते आहे. 'आनंदनिकेतन शाळा' ही नाशिकमधील 'सहज शिक्षणाची प्रयोगशाळा' उभारण्यात विनोदिनीताईंचे योगदान मोठे आहे तर राजू तुलालवार गेली २५ पेक्षा जास्त वर्षे चिल्ड्रन थिएटरच्या माध्यमातून बालनाट्याच्या चळवळीत कार्यरत आहेत. भाषेशी खेळणे थांबते तेव्हा भाषेतला आनंद घेणे हरवते, म्हणून लहानपणापासूनच भाषेशी खेळण्याच्या अनेक वाटा आपण मुलांकरता खुल्या करून दिल्या पाहिजेत, ही जाणीव हे दोन्ही लेख करून देतात.

वकील शांताराम दातार हे 'मराठी भाषा संरक्षण व विकास संस्थे'चे संस्थापक, अध्यक्ष आणि विधी तसेच न्यायव्यवहारात मराठीचा वापर होण्यासाठीच्या चळवळीचे प्रणेते आहेत. 'मराठीला न्याय केव्हा मिळणार?' या लेखात त्यांनी शासनव्यवहार आणि न्यायव्यवहारातील मराठीच्या स्थितीवर प्रकाश टाकला आहे. मराठीसाठी सक्षम भाषा विभागाची गरज, त्यासाठी आवश्यक शासनाची जबाबदारी, मा. यशवंतराव चव्हाणांनंतर भरकटलेले राज्याचे भाषिक धोरण, त्यामुळे अपुरा राहिलेला मराठीचा विकास हे पैलू त्यांच्या लेखातून अधोरेखित होतात. खेरीज न्यायालयीन मराठीच्या क्षेत्रात दीर्घकाळ काम करणाऱ्या एका कार्यकर्त्याची तळमळ या लेखाला एक वेगळे परिमाण मिळवून देते.

प्रकाशनव्यवहार हा एक गंभीर सांस्कृतिक व्यवहार आहे ही दृष्टी घेऊन काम करणाऱ्या प्रकाशकांमध्ये 'पद्मगंधा'च्या अरुण जाखडे यांचे नाव ठळकपणे घ्यावे लागते. आमच्या साहित्यिकांची

नाळ समाजाशी किती जोडलेली आहे? वाचकशरणता, त्यातून उद्‌भवलेली स्पर्धा, समाजाची उदासीनता, शिक्षण क्षेत्रातील पोकळपणा आणि मरगळ या सर्व वातावरणात मराठी प्रकाशनव्यवहाराचे भवितव्य काय? या प्रश्नांची चर्चा आणि चिकित्सा जाखडे मोकळेपणाने करतात.

प्रसारमाध्यमातील मराठी, माहितीतंत्रज्ञान आणि मराठी, सोशल मीडिया आणि मराठी, बोलक्या पुस्तकांची (ऑडिओ बुक्स) संकल्पना या पैलूंचा विचार करणारे विजय चोरमारे, विवेक सावंत, अविनाश वीर आणि विशाखा टिकले-पंडित यांचे लेख या अंकात आहेत. हे चारही लेखक त्या त्या क्षेत्राशी थेटपणे जोडलेले असल्यामुळे लेखांतील चर्चा केवळ तात्त्विक राहत नाही. ती अधिक वास्तवाभिमुख होते.

'भाषा हा प्रसारमाध्यमांचा आत्मा आहे, त्यामुळे माध्यमकर्मींनी भाषेच्या बाबतीत उदासीन राहून चालणार नाही', हा विजय चोरमारे यांच्या लेखाचा केंद्रबिंदू आहे. पत्रकारितेच्या कारकिर्दीचा प्रदीर्घ अनुभव गाठीशी असलेल्या विजय चोरमारे यांनी त्यांच्या लेखात 'सांस्कृतिक मरणाबाबत' दिलेला इशारा दुर्लक्ष करण्याजोगा नाही.

'मराठीच्या अस्तित्वाचा प्रश्न तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेपेक्षा आपल्या मानसिकतेवर जास्त अवलंबून आहे.' या सूत्राच्या आधारे मांडणी करणारा विवेक सावंत यांचा लेख माहिती तंत्रज्ञान व मराठीच्या संबंधावर नवा प्रकाश टाकतो. एका समताधिष्ठित ज्ञानक्रांतीचे चित्र तो आपल्यासमोर ठेवतो. महाराष्ट्र ज्ञानमहामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक असलेल्या सावंत यांनी आपल्या प्रत्यक्ष अनुभवातून दिलेली जागतिक स्तरावरील उदाहरणे पाहता आम्ही आमच्या भाषेला ज्ञानभाषा बनवण्यात किती कमी पडलो आहोत याची तीव्र जाणीव होते.

परदेशातील शिक्षणाबाबत मार्गदर्शक म्हणून कार्यरत असलेले फेसबुक-ट्विटरचे 'टेहळणीवीर' हा अविनाश वीर यांचा सोशल मीडियावरचा लेख भाषेचे एक नवे आकलन मांडतो. अभिव्यक्तीला मुक्त व्यासपीठ मिळाल्याने सोशल मीडियावर प्रमाणभाषेपेक्षा बोली अधिक लोकप्रिय होत आहेत. नव्या शब्दांची जडणघडण होत आहे. हे शब्द स्वीकारायची मानसिक तयारी भाषाधुरिणांनी ठेवली पाहिजे ही त्यांची भूमिका मराठीच्या नव्या जगाशी जोडून घेण्याचे आवाहन करते.

'ऑडिओ बुक्स' ही जागतिक स्तरावर सध्या लोकप्रिय ठरत असलेली संकल्पना आहे. मराठीच्या प्रसारासाठी ती कशी राबवता येईल याची चर्चा विशाखा टिकले-पंडित यांचा 'आणि पुस्तके बोलू लागली' हा लेख करतो. नव्या पिढीपर्यंत मराठी पोचवण्यासाठी पारंपरिक माध्यमे आणि मार्गांपेक्षा वेगळे मार्ग आपल्याला शोधावे लागतील. त्यातून अर्थार्जनाच्या संधी मराठीशी जोडण्याचे नवे मार्गही दिसू शकतील, याकडे हा लेख लक्ष वेधतो.

'अनेक भाषा आज मरत आहेत कारण त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक संचित व्यापक संदर्भांशी जोडण्याची क्षमता त्यांना कालपरत्वे गमवावी लागत आहे' या मुद्याभोवती गुंफत नेलेला वंदना भागवत यांचा लेख भाषांतराशी निगडित अत्यंत मार्मिक पैलू उलगडतो. मात्र तो तेवढ्यापुरता मर्यादित राहत नाही; तर बदललेल्या बाजारपेठेचे आणि आपल्या भाषेच्या सक्षमीकरण प्रकल्पाचे विस्कटणेही अधोरेखित करतो. स्त्रीवादाच्या अभ्यासक, लेखिका, 'अक्षरनंदन' या मराठीतील प्रयोगशील शाळेच्या संस्थापक-सदस्य या विविधांगी अनुभवांतून त्या हे वास्तव तपासत जातात.

भाषांतराची प्रक्रिया एका अर्थी एका भाषेतील सबंध सांस्कृतिक संचित दुसऱ्या भाषेत पोचवत असते. भारतासारख्या बहुभाषक देशात या प्रक्रियेचे महत्त्व निर्विवाद आहेच, त्याचबरोबर अन्य भाषकांनी आपली भाषा शिकावी म्हणून स्वतंत्रपणे प्रयत्न करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. गतवर्षी 'लार्सन अॅन्ड टुब्रो' या मुंबईतील कंपनीच्या निवडक अन्य भाषक अधिकाऱ्यांना मराठी शिकवण्याची संधी मला मिळाली. आपल्या कामगारांशी सुसंवाद करण्यासाठी त्यांना हे गरजेचे वाटत होते आणि याचा लाभ अंतिमतः गुणवत्तापूर्ण उत्पादनाकरता, कामाचा दर्जा वाढवण्याकरता होणार आहे अशी त्यांची धारणा होती. मराठी व्याकरण, शुद्धलेखन या अंगाने त्यांना शिकण्यात रस नव्हता तर त्यांना 'संभाषणात्मक मराठी' हवे होते. मराठी भाषेची अर्थार्जनाशी नाळ जोडण्याचे हे एक नवे क्षेत्र तेव्हा प्रकर्षाने लक्षात आले. या अंकात 'अन्य भाषकांसाठी मराठी' हा विषय म्हणूनच समाविष्ट करावासा वाटला. मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागात आकाराला येत असलेल्या 'माय मराठी' या प्रकल्पाच्या संपादक मंडळाशी जोडले गेलेले प्र.ना. परांजपे हे नाव मग आपोआपच समोर आले. 'अन्य भाषकांसाठी मराठी'च्या आजवर झालेल्या प्रयत्नांचा आढावा तर त्यांनी आपल्या लेखात घेतलाच आहे, शिवाय भाषा शिकवण्याच्या विविध पद्धतींमध्ये संभाषणात्मक पद्धतीचे (कम्युनिकेटिव्ह मेथड) वेगळेपण, 'माय मराठी' प्रकल्पाची रचना व मांडणी, परदेशातील मराठी शिक्षण या मुद्यांचीही चर्चा केली आहे.

जागतिकीकरणानंतर निर्माण झालेली परिस्थिती हे मराठीच्या दुरवस्थेचे एक ठळक कारण आहे; याकडे आपल्या लेखनातून वेळोवेळी डॉ. प्रकाश परब यांच्यासारख्या भाषातज्ज्ञाने लक्ष वेधले आहे. 'भाषेविषयीच्या अज्ञानमूलक आकलनातून भाषेसंदर्भातील प्रश्न हाताळण्यास मर्यादा पडतात त्यामुळेच भाषेच्या जतन-संवर्धनासाठी भाषिक नियोजनाचा मार्ग अपरिहार्य आहे'- हा केंद्रबिंदू असलेला डॉ. प्रकाश परब यांचा लेख मराठीच्या विकासासाठी दिशादर्शक ठरेल, यात शंका नाही.

बहुविध अंगांनी मराठीच्या विकासाच्या वाटा धुंडाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या या अंकात कलामाध्यमातील मराठीचे आविष्कार शोधण्याचाही प्रयत्न केला आहे. बालनाट्यातून भाषासमृद्धी, संगीतक्षेत्रातील मराठी आणि नव्या वळणावरील मराठी चित्रपट या विषयावरील तीन लेख या अंकात आहेत. 'बालनाट्य' या माध्यमाचा प्रभावी उपयोग जर शालेय अभ्यासक्रमात झाला तर मुलांच्या भाषिक विकासास व सर्वांगीण विकासास मोठा हातभार लागू शकेल. मराठी कवितेचा, 'अमृताचा वसा' रसिकांपर्यंत

पोचवणारे आणि मराठी अभिमानगीताचे स्वप्न साकारणारे तरुण संगीतकार कौशल इनामदारदेखील या अंकात सहभागी झाले आहेत. आपल्या भाषेतले संगीत ही आपली आणि आपल्या समाजाची गरज आहे हे रसिकांनी ओळखायला हवे आणि त्याकरता गीतकार-संगीतकारांनी सजग राहून प्रयत्न करायला हवेत ही जाणीव त्यांचा लेख करून देतो.

संतोष पाठारे मुळात विज्ञान विषयाचे प्राध्यापक. 'आकाश विंदांच्या शब्दांचे' या माझ्या कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांच्या महाविद्यालयात जाण्याचा योग आला. तोवर अन्य भाषक रसिकांपर्यंत मराठी कविता पोचवण्याचा प्रयत्न माझ्याकडून कधी झाला नव्हता; पण कार्यक्रम संपल्यावर एका मुलाने उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिली, 'विंदा इज ग्रेट'. मला जाणवले, की आपली कविता अन्य भाषकांपर्यंत पोचवण्याचे प्रयत्न वाढायला हवेत. त्याकरता जाणीवपूर्वक व्यासपीठे निर्माण करायला हवीत.

संतोष पाठारे प्रभात चित्रमंडळाच्या चिटणीस पदावर देखील कार्यरत आहेत. समर नखाते, गणेश मतकरी, अभिजित देशपांडे, संतोष पाठारे ही माणसे 'चित्रपटसाक्षरता-चित्रपटरसास्वाद' यासंबंधी गंभीरपणे काम करत आहेत. मराठी चित्रपट आज भारतीय प्रादेशिक चित्रपटसृष्टीतल्या प्रमुख स्थानावर आला आहे हे पाठारे यांचे निरीक्षण मराठीच्या दृष्टीने नक्कीच आश्वासक आहे.

भाषेची लढाई लढण्यापूर्वीच हरू नये याकरता भाषेचा आवाज सर्व संवेदनांसकट ऐकायला हवा ही जाणीव व्यक्त करणाऱ्या हिंदीतील रघुवीर सहाय, राजेश जोशी, विश्वनाथप्रसाद तिवारी, केदारनाथ सिंह, कुँवर नारायण, भगवत रावत यांच्या कवितांचे भावानुवाद हाही अंकाचा एक महत्त्वाचा भाग आहे. त्यांनी भाषाविषयक विचार किती सजगपणे केला आहे हे यातून दिसते.

२००२ साली महाविद्यालयांमध्ये अकरावी-बारावीच्या अभ्यासक्रमात मराठीपुढे माहिती-तंत्रज्ञानाचा पर्याय उभा केला गेला तेव्हा आझाद मैदानात मराठी प्राध्यापक-विद्यार्थी एकत्र आले. आंदोलनाच्या त्या वातावरणात तेव्हा मराठीच्या प्राध्यापकवर्गाला नि विद्यार्थ्यांना समान धाग्याने जोडून ठेवले होते. त्यानंतरच्या पुढल्या ४-५ वर्षांत जो समविचारी मित्रांचा गट एकत्र आला त्यातून अनेक अंगांनी भाषेचा विचार करणे सुरू झाले. महाविद्यालयातच मला दीपक पवारसारखा झपाटून भाषेचा विचार करणारा मित्र भेटला. त्याच्या ध्यासातून 'मराठी अभ्यास केंद्र' उभे राहिले.

मराठीकरता माहितीच्या अधिकाराचा वापर, न्यायालयीन मराठीचे काम, मराठी भाषा व वाङ्मय मंडळांचे मेळावे, युनिकोडच्या कार्यशाळा, सीमाभागातील मराठी भाषकांच्या प्रश्नांचा अभ्यास, मुख्य म्हणजे मराठी शाळांच्या अस्तित्वासंबंधीचे काम, अशाप्रकारे मराठी अभ्यास केंद्राचे काम विस्तारत गेले. रस्त्यावरची आंदोलने आणि संशोधन-अभ्यास या दोन्ही स्तरांवर काम करतानाचे अनुभव शिकवून तर गेलेच पण सर्व प्रकारच्या भंपकपणाविरुद्ध उभे राहाण्याचे बळही त्यांनी दिले.

१९ जून २०१०च्या शासकीय परिपत्रकाचे निर्दयी वार मराठी शाळांवर बसणे सुरू झाले तेव्हा महाराष्ट्रभर या मुस्कटदाबीविरुद्ध मराठी शाळांचा लढा उभा राहिला. या लढ्याने एकीकडे बहुजनांच्या शिक्षणाचा प्रश्न मनात धगधगता ठेवला तर दुसरीकडे शिक्षणाच्या मराठी माध्यमाच्या अस्वस्थ वर्तमानाचा आम्हा कार्यकर्त्यांना शोध घ्यायला लावला. या विषयाशी निगडित 'लढा मराठी शाळांचा', 'शिक्षणाचे मराठी माध्यम : अनुभव आणि अस्वस्थ वर्तमान' यासारखी मराठी शाळांसाठीच्या चळवळीची पुस्तके जन्माला आली.

१९९२ पासून खरे तर मराठी शाळांसमोरील भविष्यातील प्रश्नांची झळ मी जवळून अनुभवली होती. विक्रोळीतील गोदरेज वसाहतीतील उदयाचल शाळेच्या नोकरीत असताना तिथले मराठी माध्यम काही वर्षांतच बंद होणार आहे हे ढळढळीतपणे दिसले. ती माझी शाळा असल्यामुळे हे वास्तव तीव्रतेने भिडले. विक्रोळीतील गोदरेज वसाहतीचा फार मोठा भाग मराठी भाषक कामगारांनी व्यापलेला. एकत्रित आवाज उठवला गेला असता तर कदाचित चित्र वेगळे असते, पण ते घडले नाही. त्याचवेळी जाणवले की भाषेशी निगडित कोणतेही मरण आपला समाज गंभीरपणे घेत नाही. ते थोपवण्याकरता एकत्रपणे लढण्याची मानसिक तयारी आपल्या समाजात नाही. १९९३ पासून महाविद्यालयीन विश्वात वावरताना जाणवत गेले की शालेय स्तरावरचे मराठीचे शिक्षण, महाविद्यालयातील मराठीचे शिक्षण आणि विद्यापीठांतले मराठीचे शिक्षण यांच्यात आदानप्रदान घडण्याच्या वाटा आपल्याकडे फारशा खुल्या नाहीत. त्यामुळे कोणत्याही पातळीवरचे आंदोलन उभे राहिले की त्याला बळ देण्याकरता एकत्र येण्याची फारशी मानसिकता नाही (मराठी शाळांच्या मान्यतांकरता उभ्या राहिलेल्या चळवळीला मराठीच्या प्राध्यापकांना पाठिंबा द्यावासा वाटला नाही आणि 'माहिती-तंत्रज्ञान व मराठी' बाबतच्या आंदोलनात मराठी शाळांमधल्या लोकांना सामील व्हावेसे वाटले नाही).

केवळ शिक्षणाच्याच क्षेत्रात असे साचेबंद वातावरण आहे असे नव्हे तर एकमेकांच्या लढ्यांमागे उभे राहण्याची सवय एकूणच आपण स्वतःला लावून घेतलेली नाही. एकमेकांचे प्रश्न काठावर राहून पाहणे आपल्याकडे अधिक पसंत केले जाते.

मराठी शाळांच्या मान्यतांच्या आंदोलनादरम्यान ठाण्यातल्या साहित्यसंमेलनात मुख्य मंडपाबाहेर इवली इवली मुले ''मराठी शाळा टिकू द्या, मराठीतून शिकू द्या'' म्हणत नाटुकले सादर करत होती पण साहित्योत्सवात रममाण झालेल्या किती साहित्यिकांना याची दखल घ्यावीशी वाटली? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थी द्यावे लागेल. आझाद मैदानात २०११ साली मराठी शाळांच्या मान्यतांसंदर्भात 'शिक्षण हक्क समन्वय समिती' व 'मराठी अभ्यास केंद्र' यांच्या संयुक्त विद्यमाने आंदोलन सुरू होते. गुढीपाडव्या निमित्ताने होणाऱ्या कलावंतांच्या एका मोठ्या कार्यक्रमात आंदोलनाचा विषय रसिकांपर्यंत पोचवता यावा म्हणून पाच मिनिटांचा वेळ मागितला होता. आधी संपर्क साधून, खूप वेळ ताटकळत राहूनही मराठी संस्कृती-अस्मिता इत्यादी इत्यादींच्या या जल्लोषात मराठी शाळांच्या आझाद मैदानातील उपोषणाचा

साधा उल्लेख करण्यासाठीही संयोजकांना दोन मिनिटेही द्यावीशी वाटली नाहीत कारण अंतिमतः हा मुद्दा म्हणे त्यांच्या 'थीम'मध्ये बसत नाही असा साक्षात्कार त्यांना झाला!

मराठीसाठीच्या कामांच्या आघाडीवर समाजाच्या बाजूने सामसूमच आहे. समाजाच्या परिवर्तनाच्या चळवळींमध्ये भाषेच्या चळवळीचे स्थान दिसेल न दिसेल असेच आहे. तर दुसरीकडे वॉट्सॲप-फेसबुकच्या माध्यमातून मराठीच्या मुद्द्यांवर अटीतटीच्या चर्चा झडतात. मात्र अनेकदा त्या तिथेच विरतातही! मराठीवरील भावनिक प्रेमाकडून कृतिशील प्रेमाकडे आपली वाटचाल केव्हा होणार? भाषेविषयीची अस्मिता बाळगणे हे आज एक तर संकुचितपणाचे ठरवले जाते वा तटस्थपणे भाषानिरपेक्ष दृष्टी बाळगली जाते. वास्तविक मातृभाषेविषयी प्रेम ही राष्ट्रप्रेमाविरोधातली गोष्ट वा संकुचित वृत्ती असूच शकत नाही. आज मायभाषा, परकी भाषा वा दुय्यम भाषा म्हणून शिकण्याची वेळ आली आहे. मराठीच्या वापराची क्षेत्रे आक्रसत चालली आहेत. इंग्रजीतून शिकलेले मराठी भाषक आपले ज्ञान इंग्रजीतच फिरत ठेवत आहेत. शासनाच्या पातळीवर मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून जोरदार प्रयत्न सुरू आहेत. पण मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने तिचा लगेचच विकास घडून येणार आहे अशी समजूत करून घेऊन उपयोग नाही. बहुजनांची भाषा ही समाजाची खरी शक्ती आहे या विश्वासातून भाषेच्या विकासाकडे पाहायला हवे. कारण भाषा ही एका विशिष्ट वर्गाची मक्तेदारी असू शकत नाही. ती श्वासाप्रमाणे समाजात स्पंदत असते.

गेल्या ५४ वर्षांच्या भाषेच्या कामांचा अनुशेष भरून काढण्याकरता भाषाविभागाला गती देण्याची गरज आहे. महाराष्ट्र शासनाने पुढील पंचवीस वर्षांसाठीचे आपले भाषाधोरण जाहीर केले आहे आणि त्यावर आपल्या सूचना मागवल्या आहेत. भाषेचे बांधकाम ही केवळ शासनाची जबाबदारी नाही. ती त्या सबंध भाषक समाजाची सामूहिक जबाबदारी असते. म्हणूनच भाषाधोरणासंबंधातील आपल्या सूचना, प्रतिक्रिया शासनापर्यंत पोचवणे आवश्यक आहे. पर्यावरण, न्याय, तंत्रज्ञान, शिक्षण, वैद्यकशास्त्र, वाणिज्य, उद्योग अशा वेगवेगळ्या क्षेत्रांशी संबंधित माणसे जेव्हा मराठीबद्दलचा आपला आवाज व्यक्त करतील तेव्हा भाषेच्या प्रश्नाबाबतची एक व्यापक बैठक तयार होण्यास मदत होईल.

आता शेवटी स्नेहाचे शब्द!

अंकाच्या यशस्वी परिपूर्णतेत 'ग्रंथाली' परिवाराचे सुदेश हिंगलासपूरकर आणि अरुण जोशी यांचे प्रेमळ पाठबळ अत्यंत महत्त्वाचे! या सृजनप्रवासात जे समस्त लेखक सहभागी झाले, त्या सर्वांसोबतचा सुसंवाद कायम उत्साह वाढवत राहिला. डॉ. सदानंद मोरे यांनी दिलेल्या मुलाखतीमुळे शेवटच्या टप्प्यावर या अंकाला एक अधिकचा पैलू लाभला याचा आनंद आहे. विजयाताई भोळे यांनी डॉ. भा.ल. भोळे यांचा दुर्मिळ लेख आनंदाने उपलब्ध करून दिला. दीपक पवार आणि किशोर बेडकिहाळ या सुहृदांसोबतच्या प्रारंभिक चर्चांमुळे विषयाची पार्श्वभूमी तयार होण्यास मोलाची मदत झाली.

चित्रकार पुंडलिक वझे यांच्या समर्पक मुखपृष्ठाने अंक देखणा केला. 'ग्रंथाली'च्या योगिता मोरे तसेच संजय-स्मिता कुलकर्णी यांनी अंक निर्दोष व्हावा म्हणून मनापासून परिश्रम घेतले. माझी विद्यार्थिनी साधना गोरे हिची प्रत्येक टप्प्यावर सोबत राहिली. उर्मिला पवार आणि डॉ. सदानंद मोरे यांच्याबरोबरच्या बैठकांमधून उत्तम लेख साकार झाले. त्या शब्दांकनांचे श्रेय तिचे! व्यंगचित्र विभागाचे संयोजन आनंद भंडारे या कार्यकर्त्या मित्राने मनापासून केले. माझ्या दहावीतल्या मुलीने तिचा अभ्यास सांभाळत अंकासाठी इ-मेल संपर्कांची जबाबदारी छान निभावली. या सर्वातून सिद्ध झालेला हा विशेषांक मराठीच्या उज्ज्वल भवितव्याशी जोडले गेलेले एक आश्वासक पाऊल ठरो ही शुभकामना!

**– डॉ. वीणा सानेकर**
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar1966gmail.com

ग्रंथाली




**स्क्रीन इज द वर्ल्ड**

**दिनकर गांगल**

**मूल्य १५० रु.**

**सवलतीत ९० रु.**

बदलते तंत्रज्ञान, उपलब्ध होत असलेली नवनवी माध्यमे आणि क्रांतिसदृश स्थित्यंतराच्या वातावरणातील मराठी भाषा-संस्कृतीचे स्थान यांचा उहापोह करणारे हे लेखन. ते लोकल आणि ग्लोबल या वास्तवाचा 'ग्लोकल' स्वरूपात यथार्थ वेध घेते आणि तंत्रज्ञानामुळे व्यक्ती-व्यक्तीला लाभलेल्या स्वातंत्र्याची व सामर्थ्याची रास्त जाणीव करून देते.

# अनुक्रमणिका

**संपादकीय** - डॉ. वीणा सानेकर / ३

विशेष मुलाखत
**डॉ. सदानंद मोरे** नवनिर्वाचित संमेलनाध्यक्ष / ११

## जागतिकीकरण आणि सर्जनशील लेखक



**जागतिकीकरण आणि सर्जनशील लेखक**
नव्वदोत्तर काळातील भाषा व साहित्य यांच्यासमोरची आव्हाने - वसंत आबाजी डहाके / १३
जागतिकीकरण आणि उत्तर-आधुनिकतावाद - जी.के. ऐनापुरे / १७
जागतिकीकरण व्हाया जातजाणीव - उर्मिला पवार / २१
मराठी विज्ञान कथा : आज आणि उद्या - डॉ. बाळ फोंडके / २५
मराठीच्या विकासाच्या दिशा : काही विचार - मिलिंद बोकील / २९
मांजर आणि मराठी - संजय पवार / ३१
असा एकूण सारा गोंधळ आहे - नामदेव माळी / ३३
जागतिकीकरणात बोलींचा नवा सर्जनाविष्कार - अशोक कौतिक कोळी / ३५
ग्लोबल वास्तवाची पोतडी ओढत ओढत माझ्यातला कवी निघाला आहे...! - ऐश्वर्य पाटेकर / ३९
आत काहीतरी धुमसतं...- मनस्विनी लता रवींद्र / ४३

## व्यंगचित्रे



**व्यंगचित्रे** / ४७
प्रभाकर वाईरकर, प्रशांत कुलकर्णी, प्रदीप म्हापसेकर, प्रभाकर भाटलेकर, महेंद्र भावसार, गजू तायडे

## भाषाभान आणि मराठी



**भाषाभान आणि मराठी**
लोकभाषा आणि लोकशाही - डॉ. भा.ल. भोळे / ५३
भारतीय भाषांची स्थिती-गती - तुषार पवार / ५६
मराठी शाळा आणि भाषाविकास - विनोदिनी पिटके-काळगी / ६२
केव्हा मिळणार मराठीला न्याय? - शांताराम दातार / ६४
प्रकाशन व्यवसायाचे भवितव्य - अरुण जाखडे / ६८
सांस्कृतिक मरणाकडे नेणारी प्रसारमाध्यमांतील मराठी - विजय चोरमारे / ७१
माहिती-तंत्रज्ञान आणि मराठी मानसिकता - विवेक सावंत / ७४
सोशलमीडिया आणि मराठी माणसे - अविनाश वीर / ८२
पुस्तके बोलू लागली - विशाखा टिकले-पंडित / ८५
भाषांतरांचे सांस्कृतिक संचित - वंदना भागवत / ८७
अन्य भाषकांची माय मराठीकडे वाटचाल - प्र.ना. परांजपे / ९०
मराठीसाठी भाषानियोजनाची गरज - डॉ. प्रकाश परब / ९२

## कलामाध्यमे आणि मराठी



**कलामाध्यमे आणि मराठी**
बालनाट्यातून भाषासमृद्धी- राजू तुलालवार / ९६
संगीतक्षेत्रातील मराठी - कौशल इनामदार / ९८
मराठी सिनेमा नव्या वळणावर - संतोष पाठारे / १०३




**भाषेच्या कविता**
(मूळ हिंदी) भावानुवाद - वीणा सानेकर / १०५

**ग्रंथपान** - चांगदेव काळे / १११

या पुस्तकांचे प्रकाशन

**वाचकदिन**

**नाशिक**

शनिवार
१० जानेवारी
२०१५


**कथा युगभानाची –**
अरुण साधू यांच्या निवडक कथा
संपादन : मीना गोखले
मूल्य २५० रु.
सवलतीत १५० रु.



**बॉम्बे स्कूल आठवणीतले, अनुभवलेले**
सुहास बहुळकर
मूल्य ६०० रु.
सवलतीत ३०० रु.



**काळा तुकतुकीत उजेड**
किशोर पाठक
मूल्य १२० रु.
सवलतीत ७५ रु.



**थांबवू शकत नाही कविता लिहिणं**
सायनम मार्टिन
मूल्य १५० रु.
सवलतीत ९० रु.



**भाषाग्रहण आणि भाषाशिक्षण**
रमेश पानसे
मूल्य २०० रु.
सवलतीत १२० रु.

५ पुस्तकांचा संच केवळ ७५० रुपयांत!
मूळ किंमत १२२० रु.

---

प्रसिद्ध झालेली पुस्तके

## वाचकदिन – सोलापूर, २१ डिसेंबर २०१४

फडकुले सभागृह, सिद्धेश्वर मंदिरासमोर, सोलापूर



**दीपदान**
चंद्रशेखर सानेकर
मूळ किंमत २०० रुपये
सवलतीत १२० रुपये



**चंदेरी सृष्टी, सोनेरी गोष्टी**
प्रकाश चांदे
मूळ किंमत ३०० रुपये
सवलतीत १८० रुपये

**वांझुठाव**
भाऊ गावंडे
मूळ किंमत ५०० रुपये
सवलतीत ३०० रुपये



**आनंदनक्षत्र**
प्रल्हाद जाधव
मूळ किंमत २०० रुपये
सवलतीत १२० रुपये



संच मूळ किंमत १२०० रुपये सवलतीत ६५० रुपये

## वाचकदिन – मुंबई, २५ डिसेंबर २०१४

रुपारेल महाविद्यालय पटांगण, माटुंगा स्टेशनसमोर (प), मुंबई १६.

| | | |
|---|---|---|
| लांबा उगवे आगरीं | म.सु. पाटील | मूल्य ३५० रु. सवलतीत २०० रु. |
| अमीरबाई कर्नाटकी | प्रशांत कुलकर्णी | मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु. |
| चाला पळा धावा | डॉ. पी.एस. रामाणी | मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु. |
| नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१४ | नंदिनी/सुधीर थत्ते | मूल्य ८० रु. सवलतीत ५० रु. |
| भारतातील मुस्लिम स्थापत्यकला | डॉ. दाऊद दळवी | मूल्य ६०० रु. सवलतीत ४०० रु. |
| माझे अंतरंग | डॉ. दाऊद दळवी | मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु. |

संच मूळ किंमत १६३० रुपये सवलतीत १००० रुपये

३० जानेवारी २०१५ पर्यंत १५ पुस्तकांचा संच फक्त २००० रुपयात मिळेल अधिक टपाल खर्च १५० रुपये.

# मराठीबाबत प्रश्न विचारण्याची वेळ आता राहिलेली नाही

**डॉ. सदानंद मोरे**



*'जागतिकीकरणानंतरच्या काळात आपापल्या भाषा सांभाळायला हव्यात' असा इशारा जगभरातले भाषातज्ज्ञ देत आहेत, यावर आपले मत काय?*

हे तर सर्वांनाच मान्य आहे. याबाबत वाद असण्याचं काहीच कारण नाही. भाषेबाबतची ही भीती सगळ्यांना जाणवली आहे अन् त्याबद्दल अस्वस्थताही आहे.

*अशावेळी मराठी टिकवण्यासाठी अन् ती ज्ञानभाषा होण्यासाठी काय प्रयत्न केले गेले पाहिजेत?*

आपण यावर विचार करताना नेहमी शासनाला मध्यवर्ती ठेवतो अन् शासनाने हे करायला हवं, ते करायला हवं असं म्हणतो. उदा. न्यायालयाची भाषा मराठी करण्याची जबाबदारी अर्थात शासनाची आहे, पण प्रत्येक गोष्ट शासनाने करायला हवी असं आपण म्हणतो, तेव्हा आपण आपल्यावरची जबाबदारी टाळत असतो. समाजानेही काही गोष्टी करायच्या असतात, परंतु समाज ही अमूर्त गोष्ट आहे. समाज नावाचं असं काही नसतं. समाज म्हणजे कोण? तर अशावेळी द्वितीय पुरुषी, तृतीय पुरूषी न म्हणता स्वतःकडे बोट केलं पाहिजे. तुम्ही मला किंवा मी तुम्हाला प्रश्न विचारण्यापेक्षा स्वतःच काही कृती करायला सुरुवात केली तर यातून काही मार्ग निघू शकेल. साठच्या किंवा ऐंशींच्या दशकात मराठीबाबत आपण जे प्रश्न विचारत होतो ती वेळ आता राहिलेली नाही. आता प्रत्येकाने स्वतःच काहीतरी करायला हवं, कारण शासनाने एकूणच सगळ्याच क्षेत्रांतील आपली जबाबदारी आणि बांधिलकी काढून घेतलेली आहे.

*महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर इतक्या वर्षात आपण मराठीचा संबंध अर्थार्जनाच्या संधींशी जोडू शकलो नाही, असे तुम्हास वाटते का? त्यासाठी काय करता येईल?*

मी भाषेबाबत असं सांगत आलेलो आहे की, भाषेसंदर्भात दोन प्रश्न असतात. एक अस्तित्वाचा प्रश्न असतो अन् दुसरा प्रश्न अस्मितेचा असतो. आपल्याला आपली भाषा – संस्कृती यांच्याबद्दल प्रेम असतं, अभिमान असतो, आत्मीयता असते. या भावनेतून आपण आपली भाषा, संस्कृती टिकविण्याचा प्रयत्न करतो. उदा. महाराष्ट्रातून अमेरिकेत गेलेले इथले लोक तिथे मंगळागौर करतात किंवा इथल्या दुय्यम लेखकांना बोलावून त्यांचे कार्यक्रम करतात. हे सगळं अस्मितेतून होतं; पण त्याचवेळी आपण दुसरा प्रश्न दुर्लक्षित करतो. मुळात हे लोक तिकडे गेले कशाला? तर स्वतःच्या अस्तित्वासाठी. म्हणजे मराठीतून शिकून आपल्या अस्तित्वाचे प्रश्न सुटणार नाहीत असे लोकांना वाटते.

प्राचीन काळातले एक कवी दासोपंत, पंडित परंपरेतले, पण मराठी भाषेवर त्यांचे फार प्रेम होते. त्यांची एक कथा आहे. त्या कथेत एक संस्कृत पंडित संस्कृतशिवाय दुसरी प्राकृत भाषा बोलणार नाही अशी शपथ घेतो. एकदा हा पंडित प्रवासात असताना दरोडेखोर त्याला अडवतात. तेव्हा पंडित त्यांना समजावून सांगतो की, मी गरीब ब्राह्मण आहे, माझ्याकडे लुटण्यासारखे काही नाही, परंतु पंडित हे सगळं संस्कृतमधून सांगत होता. त्याने हा आपल्या अस्मितेचा प्रश्न केला. तर सांगायचा मुद्दा हा की अस्मितेचा प्रश्न हा अस्मितेच्या जागी असतो अन् अस्तित्वाचा प्रश्न अस्तित्वाच्या जागी. आपण मराठी भाषेचे सगळे प्रश्न हे जणू काही अस्मितेचे

प्रश्न आहेत असं समजतो, अन् मग अस्तित्वाचे प्रश्न सोडवण्यासाठी मराठी कशी उपयुक्त ठरेल यासाठी काहीच करत नाही.

मराठी न्यायालयाची भाषा होईल तेव्हा होईल, ती ज्ञानभाषा व्हायची तेव्हा होईल, पण आपण रोजच्या व्यवहारात ती जास्तीत जास्त वापरली पाहिजे. आपण हिंदी बोललं पाहिजे असं तर शासन सांगत नाही किंवा इंग्रजी बोललं पाहिजे असंही सांगत नाही.

अर्थार्जनाशी संबंधित दुसरा मुद्दा शाळांचाही आहे. जे पालक मुलांना इंग्रजी शाळेत घालतात त्यांचं मराठीवर प्रेम नसतं, असा आरोप करण्यात काही अर्थ नाही. या पालकांच्या मनात अशी भीती असते की मराठी माध्यमात मुलाला घातलं तर मुलाचं नुकसान होईल. यावर असं करता येईल की या पालकांची जी भीती आहे ती खरी आहे का? हे तपासलं पाहिजे. ती खरी नसली तर त्यांना पटवून दिलं पाहिजे, अन् भीती खरी असेल तर आपल्याला मराठी शाळा सक्षम केल्या पाहिजेत. आज शासन मराठी शाळा बंद करण्याची हिंमत करते, कारण शासनाला कळून चुकलंय की लोकांना मराठी शाळा नकोच आहेत. हे थांबवण्यासाठी लोकांनीच पुढाकार घेतला पाहिजे.

*उच्चशिक्षणातले अभ्यासक्रम जर मराठीत आले तर यादृष्टीने सकारात्मक पाऊल ठरेल असे वाटते का?*

सुरुवातीला आपण असं ठरवलं की शालेय शिक्षण मातृभाषेतून अन् उच्च शिक्षण इंग्रजीतून द्यायचे. आपली भाषा सक्षम झाल्यानंतर मग त्यातून उच्च शिक्षण द्यायचे. इथं खरंतर आपली भाषा सक्षम नाही म्हणण्यापेक्षा आपणच कमी पडलो असं म्हटलं पाहिजे. आज लोक प्राथमिक शिक्षण मराठीतून घ्यायला तयार नाहीत तर उच्च शिक्षण कोण घेणार? असा प्रश्न आहे.

*नुकताच डॉ. कोत्तापल्ले समितीने शासनाकडे भाषाविषयक अहवाल सादर केला आहे, हा अहवाल आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात मराठीचा विकास करण्यासाठी परिपूर्ण आहे असं आपणास वाटतं का?*

परिपूर्ण तशी कोणतीच गोष्ट नसते. मी देखील त्या समितीचा सदस्य आहे. मलाही समितीच्या काही गोष्टी पटल्या नाहीत. भाषाविषयक समिती असूनही समितीत एकही भाषाशास्त्रज्ञ नव्हता. सगळे मराठीचे प्राध्यापक होते, पण कोणत्याही गोष्टीला मर्यादा असतात तशा या समितीलाही त्या असणारच. समितीतील सदस्यांनी त्यांच्या त्यांच्या कुवतीनुसार त्यांची मते मांडली. समितीने केलेल्या सूचना हा एक टेक ऑफ आहे, पण या एकाच पद्धतीने जायला हवं असं नाही.

*आपल्याकडे दलित, ग्रामीण, स्त्रीवादी चळवळी त्या त्या प्रश्नांतून उभ्या राहिल्या, पण मराठी भाषेच्या विकासासाठी साहित्यिकांकडून अशी काही भाषिक चळवळ उभारून शासनावर दबाव आणण्याचा कधी प्रयत्न झाला नाही. यामुळे मराठी भाषेचे काही नुकसान झाले का?*


आता जे झालं ते झालं. आपले साहित्यिक आपल्याच कोशात मग्न होते. आपलं साहित्य वाचलं जातंय, वाचकांची पत्रं येतायंत तर सगळं उत्तम चाललंय असा आपल्या साहित्यिकांचा समज झालेला असू शकतो. त्यामुळे भाषेचं हे गांभीर्य त्यांच्या लक्षात आलं नसेल. खरं तर मराठी भाषेचा प्रश्न हा मराठी माणसाचा इतिहास, त्याच्या आकंक्षा, अपेक्षा, क्षमता या साऱ्याशी जोडलेला आहे. त्यामुळे फक्त भाषेचा विकास होत नसतो. मराठी माणूस पूर्वीसारखा कर्तबगार होईल तर मराठी भाषेला चांगले दिवस येतील. मराठी माणूस आज सगळीकडे दिसतो, पण तो दुय्यम दर्जाच्या स्थानावर असतो. तो तंत्रज्ञ होतो, शास्त्रज्ञ नाही होत.

*साहित्य संमेलने मराठी भाषेच्या विकासात कोणती भूमिका बजावतात असे आपणास वाटते?*

हो. निश्चितपणे भूमिका बजावतात. अशी संमेलने म्हणजे आपल्या भाषेचा, साहित्याचा उत्सव असतो. अन् असे उत्सव करणे काही गैरही नाही. दुसरं म्हणजे आपल्याला त्यातून प्रेरणा मिळते. तिसरं म्हणजे अशा संमेलनातून काही वाङ्मयीन प्रश्नांची गंभीर चर्चाही होत असते.


**– मुलाखतकार – साधना गोरे**
भ्रमणध्वनी : ८६५२५०८६६६
Sadhanagore82gmail.com

ग्रंथाली



**थांबवू शकत नाही कविता लिहिणं**
**सायमन मार्टिन**
**मूल्य १५० रु.**
**सवलतीत ९० रु.**

या संग्रहातील कविता अधिकांशपणे व्यापक मानवी संदर्भ व त्यांच्या सामाजिक आणि नैतिक स्वरूपाच्या समस्या यांच्याशी अधिक जोडल्या गेलेल्या आहेत. त्यातून त्या संवादलयीतून उतरलेल्या आहेत. शिवाय विचारांचे झटके व प्रश्नांची आवेगी मांडणी अशा साऱ्यांतून प्रत्येक कविता ताकदीने उभी राहिली आहे. कवीला माणसाच्या स्खलनशीलतेबद्दल अमाप चीड असूनही मानवी स्वभावातली विसंगती, माणसामाणसातील, व्यवहारातील गुंतागुंत यांकडे तो जाणीवपूर्वक पाहतो व शब्दातून ती तितक्याच परिणामकारकरीतीने मांडतो.




# नव्वदोत्तर काळातील भाषा व साहित्य यांच्यासमोरची आव्हाने

**वसंत आबाजी डहाके**

भारतातील विविध भाषकांना आपापल्या भाषा संकटात सापडलेल्या आहेत असे वाटते आणि तसे ते निरनिराळ्या प्रसंगी बोलून दाखवतात, लिहितात. मराठीच्या बाबतीतही गेल्या वीसेक वर्षांमध्ये हीच भावना आहे असे आपल्याला दिसून आले आहे. भाषा आणि साहित्य यांच्या संदर्भात काम करणाऱ्या विविध संस्था आज देशात आहेत, मराठीसाठी महाराष्ट्रात आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात नसलेली साहित्य अकादेमी ही संस्था भारतीय भाषांतील साहित्याच्या संवर्धनासाठी उदयाला आलेली आहे. दरवर्षी ही संस्था चोवीस भारतीय भाषांतील साहित्यकृतींना पुरस्कृत करीत असते. त्यांत मराठी भाषेतील साहित्यकृतींचा समावेश आहे. सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन लँग्वेजेस आणि तिच्याशी संलग्न सात प्रादेशिक संस्था भारतीय भाषांच्या विकसनासाठी निर्माण झालेल्या आहेत. त्यांत मराठी भाषा आहे. नॅशनल बुक ट्रस्ट ही संस्था अन्य भारतीय भाषांप्रमाणे मराठीतूनही पुस्तके प्रकाशित करते. महाराष्ट्रात मराठी भाषा व साहित्य यांच्या संदर्भात काम करणाऱ्या विविध संस्था आहेत. शासनाचे भाषा संचालनालय, विश्वकोश निर्मितिमंडळ, साहित्य संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था आहेतच, याशिवाय मुंबई मराठी साहित्य संघ, महाराष्ट्र साहित्य परिषद, मराठवाडा साहित्य परिषद, विदर्भ साहित्य संघ या संस्था आहेत. बालभारती आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ या संस्था शालेय विद्यार्थ्यांसाठी मराठीतून पाठ्यपुस्तके तयार करतात. मराठी माध्यमाच्या शाळा आहेत. महाराष्ट्रातल्या असंख्य महाविद्यालयांतून मराठी साहित्य हा विषय शिकवला जातो. आपल्या विविध विद्यापीठांमध्ये मराठी विभाग आहेत आणि त्यांतून पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. शासकीय कार्यालयांतून मराठीचा वापर होत असतो. संघ लोकसेवा आयोग आणि राज्य लोकसेवा आयोग यांच्या परीक्षा मराठीतून होतात, मराठी साहित्य हा विषयही घेता येतो. महाराष्ट्रव्यापी मराठी वृत्तपत्रे आहेत, त्याचप्रमाणे विशिष्ट विभागापुरती अशीही आहेत, आणि त्यांत सारखी भर पडते आहे. नभोवाणीवरून मराठीतून कार्यक्रम होत असतात. दूरचित्रवाणीच्या वृत्तवाहिन्या आणि मनोरंजनपर कार्यक्रम देणाऱ्या वाहिन्या आहेत. रंगभूमीवरून सातत्याने मराठी नाटके सादर केली जातात. नित्य नवे मराठी चित्रपट निघत आहेत. त्यातल्या काही चित्रपटांना आंतरराष्ट्रीय मान्यता मिळते आहे. मराठी गाणी गायिली जात आहेत. गेल्या पन्नास वर्षांत मराठी लेखकांनी महाराष्ट्रातल्या विविध भागांतल्या बोलींचा उपयोग आपल्या साहित्यातून केलेला आहे. ज्या सामाजिक गटांमध्ये लिहिणे–वाचणे नव्हते, त्या सामाजिक गटांमधून अनेक लेखक आलेले आहेत. दलित, ग्रामीण, आदिवासी साहित्याचे प्रवाह मराठी साहित्य समृद्ध करीत आहेत. या प्रवाहांतली पुस्तके विद्यापीठांच्या अभ्यासक्रमातही समाविष्ट झालेली दिसतात. त्याचप्रमाणे शासनाकडून दरवर्षी उत्कृष्ट साहित्यकृतींना पारितोषिके दिली जात आहेत. नवनवी मराठी पुस्तके प्रकाशित होत आहेत. दिवाळी अंकांच्या संख्येत घट झालेली नाही. साहित्य संमेलनाच्या कालावधीत काही कोटींची पुस्तके विकली जात आहेत. मराठी माध्यम घेणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वाणिज्य आणि सामाजिक शास्त्रांवरची पाठ्यपुस्तके मराठीतून लिहिली जात आहेत. शेती, बागकाम, व्यक्तिमत्त्व विकास या विषयांवरची पुस्तके मराठीतून लिहिली जात आहेत. मनोरंजक आणि काही गंभीर पुस्तकांच्या अनुवादांची लाट आलेली आहे. संगणकावर देवनागरीचा वापर शक्य झाला आहे. गावोगाव नेत्यांचे, जाहिरातींचे अवाढव्य फलक लागतात, ते मराठीतून लिहिलेले असतात. वर्तमानपत्रांतून, नभोवाणीवरून, दूरचित्रवाणीवरून प्रसारित होणाऱ्या जाहिराती मराठीतून असतात.

**भाषांतराचे प्रचंड काम करायचे बाकी आहे. सामाजिक शास्त्रे हा जरी विषय घेतला तरी आपल्याकडच्या आणि बाहेरच्या कितीतरी महत्त्वाच्या ग्रंथांची भाषांतरे मराठीत व्हायला पाहिजेत. मराठी ही ज्ञानभाषा आणि उपजीविकेची भाषा होऊ शकेल का हाच खरा प्रश्न आहे.**

ही वस्तुस्थिती आहे, तरीही मराठीविषयी, तिच्या अस्तित्वाविषयी चिंता करणारे मराठीभाषक साशंक आहेत, भाषेविषयी साशंक असल्याने मराठी साहित्याच्या अस्तित्वाविषयी, भवितव्याविषयी साशंक आहेत. त्याचे एक महत्त्वाचे कारण सांगितले जाते ते म्हणजे मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत आहेत आणि

इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये वाढ होते आहे. महानगरांमध्ये, मोठ्या शहरांमध्ये, इतकेच नव्हे तर जिल्हा-तालुक्याच्या गावांमध्ये, ग्रामीण भागात साखर कारखान्यांच्या परिसरात, औद्योगिक वसाहतींमध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळांची संख्या वाढते आहे. ठिकठिकाणी इंटरनॅशनल स्कूल्स निघत आहेत. महाराष्ट्रातील गुजराती, उत्तरप्रदेशी, बिहारी, बंगाली, सिंधी, पंजाबी, दाक्षिणात्य पालकांप्रमाणे मराठी पालकांचाही आपापल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या या शाळांमध्ये टाकण्याकडचा कल वाढतो आहे. सीबीएसई, आयसीएसई, आयबी असे अभ्यासक्रम असलेल्या शाळांकडे पालकांचा विशेष ओढा आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधून शिकणाऱ्या मराठी मुलांचा मराठी भाषेशी असलेला संबंध हळूहळू तुटत जाणार, ती आपले सगळे व्यवहार इंग्रजीतूनच करणार, परिणामी मराठी भाषेला आणि साहित्याला काही महत्त्व राहणार नाही अशी भीती मराठी भाषेविषयीची चिंता व्यक्त करणाऱ्यांना वाटते. आजच्या जगात इंग्रजी भाषेला अतिशय महत्त्व आलेले आहे यात शंका नाही. इंग्रजी ही उपजीविकेची आणि ज्ञानाची भाषा आहे. आजच्या जगात उच्च समजले जाणारे शिक्षण (शुद्ध विज्ञान, अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, वैद्यकीय, व्यवस्थापन, खगोलविज्ञान, समुद्रविज्ञान, इत्यादी अनेक विद्याशाखांमधले शिक्षण) इंग्रजी माध्यमातून दिले जाते. अधिक उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांना इंग्लंड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये जायचे असते. तेथे इंग्रजी हेच माध्यम आहे. त्यामुळे मराठी पालक आपल्या मुलांच्या भवितव्याचा विचार करून त्यांना इंग्रजी माध्यमांच्या शाळेत घालतात. या शाळांमधले शिक्षण खर्चिक असले तरी उच्चवर्गीय, उच्च-मध्यमवर्गीय, मध्यमवर्गीय पालकांप्रमाणेच आर्थिक दृष्टीने कनिष्ठ वर्गीय पालकांनाही आपल्या पाल्यांनी उज्ज्वल भविष्याची प्रवेशद्वारे असलेल्या या शाळांमधून शिक्षण घ्यावे असे वाटते. गेल्या पन्नास वर्षांत शिक्षणाचे दृश्य परिणाम लोकांनी पाहिलेले आहेत. मागासलेले समजल्या जाणाऱ्या समाजगटातून, बहुजनसमाजातून, ब्राह्मणेतरातून असंख्य व्यक्तींनी शिक्षण घेतले आणि आपले व काही अंशाने आपल्या समाजगटाचे आयुष्य बदलून टाकले. शिक्षणाचा वारसा असलेल्या, उच्च समजल्या जाणाऱ्या समाजगटातील व्यक्तींना नव्या, अति उच्च शिक्षणाचे महत्त्व वेळीच समजले व ते घेऊन त्यांनी भौतिक प्रगतीचे नवे टप्पे गाठले. महाराष्ट्राच्या, जातीला महत्त्व देणाऱ्या, राजकारणात आपल्याला स्थान नाही, व्यापार-उद्योगासाठी लागणारे भांडवल नाही, त्यामुळे उच्च शिक्षण घेऊन मानाची व आर्थिक दृष्टीने संपन्नतेची पदे प्राप्त करणे एवढेच शक्य आहे याची जाणीव त्यांना इतरांच्या आधी झाली. कालांतराने इतर वर्गांमध्ये ही जाणीव झिरपली आणि त्यातून छोटी-मोठी शैक्षणिक साम्राज्ये उभी राहिली. तेथे इंग्रजी या भाषेलाच प्राधान्य आहे असे दिसून येईल. महाराष्ट्रातील राजकारणाशी निगडित काही व्यक्तींनीही भव्य शैक्षीणक संकुले उभी केली आहेत, परंतु तेथे मराठी भाषेला, मराठी माध्यमाला प्राधान्य दिलेले आहे असे दिसत नाही. कारण हा काळ इंग्रजीला महत्त्व देणारा आहे हे त्यांना समजले होते. तात्पर्य हे की भाषेचे नाते ज्ञानाशी आहे, त्याहून ते उपजीविकेशी अधिक आहे. गेल्या काही वर्षांत आपण काही लाटा पाहिलेल्या आहेत. उदाहरणार्थ, निलगिरीची लागवड करा, सुबाभूळची लागवड करा, बीटी कापूस घ्या. त्याप्रमाणे मेडिकल, इंजिनिअरिंग, आयटी, बीएड अशा शिक्षणक्षेत्रात आलेल्या लाटा आहेत. इंग्रजी माध्यमांच्या शाळा ही मोठी लाट आहे. त्याखाली मराठी माध्यमाच्या शाळा कशाबशा तग धरून आहेत. इंग्रजीचे महत्त्व ध्यानात घेऊन मराठी माध्यम टिकवणे हे सध्या आपल्यापुढचे महत्त्वाचे आव्हान आहे.

काही लोक शालेय शिक्षणातील भाषेचा प्रश्न पुढील प्रमाणे सोडवू इच्छितात : मराठी माध्यमाच्या शाळेत इंग्रजीचे चांगले शिक्षण द्यावे, त्याचप्रमाणे विज्ञानाचे विषय इंग्रजीतून शिकवावेत. विज्ञानविषयातून पुढे जाऊ इच्छिणाऱ्यांना याचा फायदा होईलच. इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान झाले तर मानव्य आणि सामाजिक शास्त्रांमधले जे ज्ञानभांडार इंग्रजीत उपलब्ध आहे, तेही आपल्या विद्यार्थ्यांना उपलब्ध होईल. मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांवर त्यांची हुकूमत असेल तर आपल्या महाराष्ट्रात आणि बाहेरच्या जगातही हे विद्यार्थी ठामपणे उभे राहू शकतील. त्यांचा आपल्या संस्कृतीशी संबंध असेल आणि बाहेरच्या संस्कृतीचीही ओळख ते करून घेऊ शकतील. काही लोक संस्कृत या भाषेचा आग्रह धरतात. संस्कृतने देशी भाषा संपन्न केलेल्या आहेत, संस्कृतमध्ये अद्यापही विचारात घ्यावे असे साहित्य (उदाहरणार्थ काव्यशास्त्र, भाषाविज्ञान, व्याकरण इत्यादी) आहे हे खरेच आहे. तथापि आधुनिक ज्ञान-विज्ञान संस्कृतमध्ये नाही. देशी भाषा संपन्न करण्यात संस्कृतचा मोठा वाटा आहे, तसाच लोकभाषांचा, बोलींचाही आहे. महाराष्ट्र विविध लोकभाषांनी संपन्न असा प्रदेश आहे. त्यांतले भाषाधन आणि विचारधन नागर मराठीने स्वीकारावे आणि संस्कृतमधील आज उपयुक्त ठरतील अशा ग्रंथांची मराठीत भाषांतरे करावी. भाषांतराचे प्रचंड काम करायचे बाकी आहे. सामाजिक शास्त्रे हा जरी विषय घेतला तरी आपल्याकडच्या आणि बाहेरच्या कितीतरी महत्त्वाच्या ग्रंथांची भाषांतरे मराठीत व्हायला पाहिजेत. मराठी ही ज्ञानभाषा आणि उपजीविकेची भाषा होऊ शकेल का हाच खरा प्रश्न आहे. सध्याच्या जगात ती उपजीविकेची होऊ शकेल अशी काही क्षेत्रे आहेत. ज्ञानभाषा होण्यासाठी निरंतर काम करावे लागणार हेही उघड आहे. शाळांमधून इंग्रजी-मराठीची योग्य ती सांगड घातली तर, आणि पुढल्या शिक्षणासाठी आवश्यक अशा महत्त्वाच्या ग्रंथांची मराठीत भाषांतरे उपलब्ध असली तर माध्यमाचा अवघड बनलेला प्रश्न सुटू शकेल. कळीचा मुद्दा असा आहे की तुम्ही कोणतेही शिक्षण घेतले, कोणत्याही भाषेमधून घेतले तरी तुमचा उपजीविकेचा प्रश्न चांगल्या रीतीने सुटू शकेल अशी व्यवस्था आपल्याकडे आहे का ? म्हणजे महाराष्ट्रात मराठी भाषेच्या, साहित्याच्या शिक्षणाला, मराठी माध्यमातून घेतलेल्या शिक्षणाला प्राधान्य दिले जाते का ? असे प्राधान्य दिले जात असेल तर कोणताच प्रश्न उपस्थित होणार नाही.


भाषेसमोरचे आव्हान हे तिच्या अस्तित्वाशी निगडित आहे. साहित्यासमोर कोणते आव्हान आहे ? आज असे कोणतेही आव्हान दिसत नाही. कवी-लेखक कविता, कथा, कादंबरी, ललितलेख, एकांकिका, नाटक, चरित्र, आत्मचरित्र लिहिताहेत. वाचक कमी होत चाललेले आहेत असे बोलले जात असले तरी प्रकाशक पुस्तके प्रकाशित करीत आहेत. त्या पुस्तकांचा कमीअधिक खपही होतो आहे. काही पुस्तकांच्या पंचवीसच्या वर आवृत्त्या निघत आहेत. मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, कोल्हापूर या शहरांतून पुस्तके प्रकाशित होत आहेतच, त्या पलीकडे श्रीरामपूर, सांगली, सातारा, जालना, नांदेड, धुळे, अमरावती, चंद्रपूर इत्यादी तुलनेने लहान शहरांतूनही पुस्तके प्रकाशित होत आहेत. ललित आणि वैचारिक साहित्याखेरीज इतरही वाचन-मजकूर भरपूर प्रकाशित हाताना दिसतो. डिलक्स आवृत्त्या, काही मोठे प्रकल्पही दिसतात. तात्पर्य, आज तरी लिहिण्यावर आणि छापण्यावर अस्ताची छाया पसरलेली दिसत नाही.

काळ बदललेला आहे. शाळेतल्या आणि महाविद्यालयातल्या मुलांना नेमलेल्या अभ्यासक्रमात पुढे व्यवसायाच्या दृष्टीने उपयुक्त ठरू शकेल असे पाठ लिहिणे आणि त्यांच्या भाषेच्या अभिवृद्धीसाठी व मनोरंजनासाठी निवडक लेखनाची योजना करणे हा एक भाग, दुसरा भाग म्हणजे बाल-कुमारांचे संस्कारक्षम वय लक्षात घेऊन, त्यांचे मन गुंतून जाईल असे लेखन करणे. इंग्रजीतून शिकलेला नवयुयकवर्ग इंग्रजीतील ज्या खपाऊ पुस्तकांकडे वळतो, तितकी आकर्षक पुस्तके मराठीत लिहिली गेली तर हे युवक तिकडेही वळतील.

बाकी मराठी साहित्याच्या प्रदीर्घ वाटचालीत जे काही गंभीर लेखन झाले आहे तसे यापुढेही होत राहील. महाराष्ट्राहून लहान असलेल्या, कमी लोकसंख्या असलेल्या देशांमध्ये विविध बोलीभाषा असताना प्रमुख भाषेत लेखन केले जाते आणि ते त्याच्या गुणवत्तेमुळे जगासमोर येते. तसे मराठीतल्या लेखनालाही जागतिक पातळीवर स्थान प्राप्त होईल. नव्वदोत्तर साहित्यासमोरचे खरे आव्हान आजचा आपला काळ हेच आहे. या काळाचा अर्थ उलगडणे, या काळातली मानवाची स्थिति-गती जाणून घेणे आणि ती प्रभावीपणे व्यक्त करणे हेच आहे. त्यासाठी लेखकांनी आपला समाज समजून घेणे आवश्यक आहेच, त्याचबरोबर जगातल्या विविध भाषांतले (इंग्रजीत भाषांतरित झालेले) साहित्य वाचणेही आवश्यक आहे. गेल्या वीस-पंचवीस वर्षांतल्या उत्तमोत्तम साहित्यकृती मराठीत आल्या असत्या/आल्या तर लेखकांना स्वत:च्या जाणिवा समृद्ध करता येतील.

**– वसंत आबाजी डहाके**
भ्रमणध्वनी : ९८९०३६२७०३
vasantdahake@gmail.com

ग्रंथाली



**थोडी ओली पाने**
**हेमंत टकले**
**मूल्य १२५ रु.**
**सवलतीत ७५ रु.**

माझे स्नेही हेमन्त टकले हे आमदार आहेत, उत्तम साहित्यिक आहेत. राजकारणी माणसाला लेखनासाठी केव्हा वेळ मिळतो? हा प्रश्न अनेकांच्या मनात येतो पण त्यांचा पिंड हाच मुळात लेखकाचा आहे. कला, साहित्य, संस्कृती, नाट्य या सर्वच क्षेत्रात त्याचं मन रमतं. गोदावरी नदीकाठच्या संस्काराने आणि कुसुमाग्रजांच्या सहवासाने त्यांचे व्यक्तिमत्त्व संपन्न झालेले आहे. त्याचा प्रत्यय त्यांच्या लेखनातून येतो. 'थोडी ओली पाने' या पुस्तकाच्या शीर्षकापासून पानापानात त्याचं सुसंस्कृत मन दिसते कधी हळवेपणा, कधी त्यांचं अस्वस्थ मन, कधी निरागसता, उत्कटता प्रत्ययाला येते. पानावरल्या दवबिंदूसारख्या क्षणालाही त्यांचा अक्षरस्पर्श लाभतो.
सर्वसामान्य माणसाच्या सुखदु:खाने व्याकुळ झालेला त्यांच्यातला कलावंत आपल्याला दिसतो. वाचकांशी मैत्रीचे नाते जोडणारा हा कलावंत लेखक आहे.


**– अरुण शेवते**

आपल्याशिवाय हे जग
चालू शकत नाही; या भ्रमातून
आपण जसजसे बाहेर येऊ
तसतसे ते अधिक सुंदर होत जाईल...

**आनंद नक्षत्र**
**प्रल्हाद जाधव**
**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**



# मौज प्रकाशनाची नवीन प्रकाशने





भूतकाळातल्या आठवणी आणि संवेदना (नॉस्टॅल्जिया) जाग्या करणारा एक खजिना. नर्मविनोदाची झालर असलेले हे लेखन, वाचायला हलकेफुलके पण अतिशय प्रामाणिक आणि परखड आहे. यात विचारलेले गहन प्रश्न कुठल्याही वयाच्या वाचकाला विचार करायला लावतील.

## पन्नाशीचा भोज्या

रवी अभ्यंकर

किंमत ३०० रुपये





आर्थिक, राजकीय, सामाजिक प्रश्नांना सखोलपणे भिडणारं हे पुस्तक भारतातील दुष्काळाच्या इतिहासाचा सर्वांगीण वेध घेतंच; परंतु चीन, दक्षिण कोरिया, इथियोपिया या देशांनी आर्थिक प्रगती साधून सुकाळ कसा निर्माण केला याचंही तुलनात्मक विवेचन करतं. निळू दामले यांच्या खास शैलीत टिपलेली ही बोलकी नि जिवंत चित्रं.

जत, चीन, दक्षिण कोरिया, ईथियोपिया

## दुष्काळ-सुकाळ

निळू दामले

किंमत २०० रुपये




'आनंदमेवा' शिबिरात सहभागी झालेले पालक, त्यांची मुलं यांनी करायचा आपापल्या संगोपनाचा गिरवलेला आदर्श वस्तुपाठ, शिबिरातील विविध उपक्रमांच्या माध्यमातून हळूहळू कसा साकारत गेला त्याचं हे पुस्तक. मुलांच्या जडणघडणीत निकोप समाजाचे महत्त्व अधोरेखित करणारं पुस्तक.

## आनंदमेवा

डॉ. लता काटदरे

किंमत २०० रुपये



जमिनीच्या व्यवहारात जमीनमालकाकडून विश्वासघाताने होरपळल्या गेलेल्या कष्टकरी कुळाची–त्याच्या मनस्वी कुटुंबाची हेलावून टाकणारी कादंबरी

## धूळमाती

कृष्णात खोत

किंमत १२५ रुपये

मौज प्रकाशन गृह, गोरेगांवकर लेन, मुंबई ४००००४ दूरध्वनी २३८७ १०५० इमेल: moujprakashan@gmail.com



# जागतिकीकरण आणि उत्तर-आधुनिकतावाद

## जी.के. ऐनापुरे

> **आपल्याकडील उत्तर-आधुनिकतावाद (म्हणजे मराठी) हा अधिक आशयाभिमुख, त्यानुसार प्रयोगाला वाव देणारा, स्पष्ट, सुटसुटीत, भाषेच्या अंगाने साध्या आणि सोप्या मार्गाने जाणारा असावा. तो हिंदुत्ववादी मुस्लिम अतिरेकाला विरोध करणारा असावा. धर्मनिरपेक्षता हे त्याचे प्रमुख अस्त्र असायला हवे. धर्मशास्त्रातून निर्माण होणारी वर्ण व्यवस्था** (Castesystem) **आणि अंधश्रद्धा ह्याला कडाडून विरोध करणाऱ्या आशयाचे त्यातून मध्यवर्ती उपयोजन त्यातून व्हायला हवे.**

।।१।।

भारतीय तत्त्ववेत्ता गौतम बुद्ध, त्याच्या तत्त्वज्ञानामुळे जगभर पोचला. हा त्या काळातल्या राजकारणाचा भाग नव्हता, पण त्याच्या वरची वेगवान प्रतिक्रिया म्हणून बायबल, शेक्सपिअर, मिशनरी मेथड इ. गोष्टी आपल्याकडे आल्या; स्थिरावल्या. आपली सगळी शिक्षण व्यवस्थाच ह्या संक्रमणाच्या ताब्यात गेली. हे समतोल दर्शवणारं जागतिकीकरणाचं उत्तम उदाहरण आहे. त्याच्याही पुढे जाऊन सिनेमाला तत्त्वज्ञान समजणारा क्रायझोस्तॉप केस्लोव्हस्की आपल्या रंगत्रयी (ब्ल्यू-रेड-व्हाईट) मुळे जगभरात प्रसिद्ध झाला आणि पराभूत झाला (ऑस्कर न मिळाल्यामुळे) हे त्यानं इतकं मनाला लावून घेतलं की त्यातच त्याचा अंत झाला. हा दुसऱ्या महायुद्धातून निर्माण झालेल्या नव्या सांस्कृतिकीकरणाचा (New culturalization) मोठा बळी मानायला हवा. तर ह्याच्या उलट देशाची कोणतीही बाजार-भूमिका (Market-strategy) नसताना माजिद माजीदी सारखा निर्माता-दिग्दर्शक अमेरिकेच्या भयंकर सांस्कृतिक धोरणांना गुंडाळून, आपल्या स्थानिक आशयाच्या जोरावर जगभर पसरतो; ह्या जागतिकीकरणाची प्रक्रिया समजून घेण्यात उपयुक्त ठरणाऱ्या दोन महत्त्वाच्या घटना आहेत. अरब संस्कृतीचा मोठा भाग असलेली बगदाद संस्कृती (इराक) नष्ट होण्याच्या मार्गावर येऊन ठेपलेली असताना अमेरिकास्थित भारतीय वंशाची लेखिका झुम्पा लाहिरी 'लो लॅण्ड' सारखी, कादंबरी लिहून भारतातील माओवादी समस्या समजून घेण्याचा प्रयत्न करते; जागतिकीकरण कसे वर्चस्ववादी बनत जाते त्याचा हा पुरावाच. ही सर्व उदाहरणे वास्तव घटना अशा अर्थाने पाहिल्यास जागतिकीकरण ही अव्याहतपणे चालणारी अस्थिर प्रक्रिया आहे; हे ध्यानात येते. अलीकडच्या काळात जागतिकीकरणाने बाजार मूल्य (Market value) आणि धर्मविस्तार (Religious Dominancy) असे द्विदल स्वरूप धारण केले आहे. भारतात सुद्धा ह्या द्विदल प्रक्रियेची लागण मोठ्या प्रमाणात झालेली आहे. भारतातील ह्या प्रक्रियेचं स्वरूप अतिशय भयावह, निर्बुद्धीकरणाकडे घेऊन जाणारे, माणूसपणा संपवणारे असे आहे. एका ओळीत ह्या प्रक्रियेचं वर्णन बाहेरचं आक्रमण अधिक भारतीय वर्णव्यवस्थेचं वर्चस्ववादी आक्रमण असे करता येईल. भारतीय समाजाच्या दृष्टीने जागतिकीकरण हे एकेरी आहे. त्याचा बाहेरून येण्याचा मार्ग 'हवा हवाई' असा आहे. तर आतून बाहेर जाण्यासाठी आणि प्रस्थापित होण्यासाठी छोटी, जपून पावलं टाकण्यासारखी पायवाट सुद्धा नाही. भारतातील, बौद्ध धर्माच्या ऱ्हासानंतर ती कायमचीच बंद झाली. मार्क्सवादी इतिहासकार डॉ. दामोदर धर्मानंद कोसंबी बौद्ध धर्माच्या ऱ्हासाची कारणे सांगताना वाढलेला आर्थिक बोजा हे सुद्धा एक कारण सांगतात ह्यावरून त्या काळातील जागतिकीकरणाची प्रक्रिया नीटपणे समजून घेता येते.

।।२।।

भारतीय जगतात आयात-निर्यात असेच जागतिकीकरणाचे एक ढोबळ स्वरूप समजले गेले आहे. आंतरराष्ट्रीय नीती ठरवताना क्रीडा-साहित्य-संस्कृती-विज्ञान ह्या गोष्टींना दुय्यम महत्त्व देण्यात आलेले आहे. अशा वेळी संपूर्ण देश धार्मिक आणि धर्मगुरूंच्या वर्चस्वानुसार चालत राहतो. अशा प्रकारात भारत आणि फ्रान्स एकमेकाची दोन टोकेच मानता येतील. (सरकोजी आणि कार्लाब्रुना यांचा भारत दौरा) जागतिकीकरणाच्या आडून भारतात ज्या ज्या गोष्टी आल्या त्यातून भारताचं जास्तीत जास्त नुकसानच होताना दिसत आहे. बाहेरून आलेल्या कोणत्याही गोष्टीला आपण आहे त्या स्थितीतच स्वीकारतो. कालांतराने तो आपल्या जगण्याचा भागच बनतो. अर्थात हे आपलं बाह्यरूप असतं. आतल्या बाजूने आपण आदिम आणि सनातनीच असतो. ह्या दुहेरी जगण्याचे परिणाम आपल्याला दिसायला लागले आहे. ह्या दुहेरीपणातून

भारताला विज्ञाननिष्ठ, सभ्य समाज नष्ट होईल की काय अशी भीती वाटायला लागली आहे. अशा संक्रमणकालीन आदिम स्थितीत साहित्य आणि संस्कृती (आपली) जगभर जाईल; असं म्हणणं खोट्या देशप्रेमाचं प्रतीक ठरेल.

।।३।।

मराठी साहित्य जागतिकीकरणाला थेट सामोरे गेले आहे; असे म्हणण्याचे धाडस होत नाही. तरीपण जागतिकीकरणाच्या आडून आलेल्या अस्तित्ववाद, आधुनिकता, उत्तर-आधुनिकता ह्या संज्ञाना मराठी साहित्य सामोरे जाताना दिसत आहे. मागचे अर्धशतक अस्तित्ववादाच्या छायेत घालविल्यानंतर मराठीतील प्रशिक्षित समीक्षक थेट उत्तर-आधुनिकतेकडे वळलेले दिसतात. त्यांच्या ह्या समीक्षा फॅशनचे - पॅशनचे कौतुकच वाटते. मुळात उत्तर-आधुनिकवाद हा शब्द १९७९ साली फ्रेंचमध्ये पहिल्यांदा वापरला गेला. आपल्याकडे तो वीस-पंचवीस वर्षांनी प्रवाही झाल्यासारखा दिसतो आहे. हा शब्द प्रवाही करण्यामागचे राजकारण म्हणजे सुधारणावादाला म्हणजेच आधुनिकतेला शह देणे अशा अर्थाचे आहे. डेव्हिड लिऑन याने Post-Modernity ह्या पुस्तकात Post modernity आणि Post modernism ह्या दोन शब्दातील भेद स्पष्ट केला आहे. पहिल्या शब्दाला सामाजिक संदर्भ आहे. तर दुसरा शब्द विचारसंस्कृतीशी, बौद्धिक दृष्टिकोणाशी निगडित आहे. उत्तर आधुनिकतेच्या संदर्भातील अनेक परदेशी अभ्यासकांची मते अवलोकनार्थ पाहिल्यास उत्तर-आधुनिकता ही संज्ञा किंवा विचार आधुनिकतेचा विस्तार म्हणून समोर येताना दिसत नाही तर एकमेकाच्या विरोधात वर्तन करताना दिसतात. एकोणिसाव्या शतकातील शेवटचे पर्व आणि विसाव्या शतकातील सुरुवातीचा काळ 'सामाजिक बदल' अशा अर्थाने 'उत्तर-आधुनिक' म्हणून पाहता येईल. याचा अर्थ आपल्याकडे उत्तर-आधुनिकता 'सुधारणावादी पर्व' अशा अर्थाने जतन करण्यात आली. ह्या सुधारणा पर्वाचे विरूपीकरण म्हणजे आधुनिकता हा समज आपल्याकडे रूढ होताना दिसत आहे. उत्तर-आधुनिकता आणि आधुनिकता तिकडची वेगळी आणि आपल्याकडची वेगळी. तिकडची आधुनिकता म्हणजे आपल्याकडील उत्तर-आधुनिकता किंवा ह्याच्या उलटही म्हणता येईल. आपल्याकडे आधुनिकता नीट रुजू देण्यात आली नाही. सुधारणापर्वाला इतिहासाच्या अंगाने नेहमीच वगळण्याचा प्रयत्न झालेला आहे. म्हणजेच आपल्याकडे चांगल्या आणि वाईट अर्थाने उत्तर-आधुनिकताच अस्तित्वात आहे; असे म्हणता येते. 'उत्तर-आधुनिकता' ही कालवाचक संज्ञा असली तरी कालक्रमण चालू आहे. पण वर्चस्ववादी लोक आणि त्यांचे गुरू-शिष्य तेच आहेत. त्यामुळे आपल्याकडे आधुनिकता आणि उत्तर आधुनिकता कशी बघायची? हा प्रश्नच आहे. ती सुधारणावादी दृष्टिकोणातून बघायची की सनातनी दृष्टिकोणातून? जीवनशैलीच्या अंगाने की फक्त साहित्यमूल्य अशा अर्थाने बघायची? धर्म स्वीकारून बघायची की नाकारून बघायची? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. सगळा समाज वेगवेगळ्या काळात जगत असल्यामुळे आपल्याला कोणत्याही ठोस निर्णयाप्रत येता येत नाही. जागतिकीकरणामुळे हा एक गंभीर सांस्कृतिक पेच निर्माण झाला आहे. आणि त्याचे उत्तर अर्थशास्त्रीय कृतीतच शक्य आहे; असे वाटते.

।।४।।

उत्तर-आधुनिकवादाचा प्रसिद्ध भाष्यकार झीगमंट बॉमन म्हणतो;

Post-modernism debunks established ideas, discredits old modes of thinking; post-modernism is all-deriding, all-dissolving destructiveness; It does not seek to substitute one truth for another. It embraces it self for a life without truths, standards and ideals.

बॉमनचं हे म्हणणं वाचल्यावर बुद्ध-मार्क्स-फुले-आंबेडकर-गोपाळ गणेश आगरकर-राजारामशास्त्री भागवत ह्यांच्या विचारातून आणि कृतीतून अस्तित्वात आलेले 'सुधारणावादी पर्व' ध्यानात घ्यावे लागते. पण ह्या उद्धृताच्या शेवटच्या ओळी वाचल्यावर ह्या सुधारणावादी पर्वाला आपोआपच छेद जातो. उत्तर-आधुनिकवाद धर्मशास्त्र, वेद, पुराणे, उपनिषदे, मनुस्मृती अशा धार्मिक ग्रंथाना का लागू होत नाही? असा प्रश्न उरतोच. आणि त्याची गरज उत्तर आधुनिकतेची मांडणी करणाऱ्या आधुनिक लोकांना वाटत नाही. उत्तर-आधुनिकतेचा असाच विचार केला तर, ह्या प्रकारच्या उत्तर-आधुनिकतेचा जनक, दुसऱ्या महायुद्धात कार्यरत असलेला जर्मनीचा प्रपोगंडा मंत्री जोसेफ गोबेल्स ह्यालाच म्हणता येईल. नाहीतरी आपल्याकडे स्वास्तिक हे शुभचिन्ह हिंदू लोक वापरतातच. जे ज्यू च्या कपाळावर, त्याच्याच रक्ताने जर्मन सैनिकांनी उठवलेले दिसते. उत्तर-आधुनिकतेच्या विचार मंथनातून येणारे क्रौर्य फारच कमी लोकांच्या ध्यानात येत असावे. म्हणून तर भारतातले माओवादी 'उत्तर-आधुनिकता' पराभूत झाली पाहिजे ह्या विचारापर्यंत आले आहेत. डॉ. रणधीर सिंग ह्यांनी लिहिलेल्या Post Modernism- A Marxist comment ह्या लेखात (मेनास्ट्रिम १९९८) उत्तर आधुनिकवादाचा उगम, रशियातील कम्युनिझमच्या पतनानंतर निर्माण झालेल्या वैचारिक भ्रमनिराशेच्या वातावरणात झाला; असे म्हटले आहे. उत्तर-आधुनिकवाद कोणत्याही समस्येचं निराकरण करण्याचा प्रयत्न करत नाही. तो निष्क्रिय स्वरूपाचा, विध्वंसक आहे; अशी त्याच्यावर टीकाही केली आहे. ह्याच लेखात पुढे ते म्हणतात,

Post-modern view of life looks very much like what shakespeare put in mouth of Macbeth - a tale told by an idiot full of sound and fury signifying nothing.

डॉ. रणधीर सिंग ह्यांचे हे भाष्य उत्तर-आधुनिकवादाची उथळ आणि पोकळ चर्चा करणाऱ्या प्रशिक्षित मराठी समीक्षकांना तंतोतंत लागू पडते. पी. ॲण्डरसन ह्यांनी आपल्या 'The origin of Post-Modern' ह्या ग्रंथात उत्तर-आधुनिकवादाचा तीव्र निषेध,

The cultural logic of multinational capitalism. complacent beyond precedent अशा शब्दात केला आहे.

।।५।।

आपल्याकडे जीवन मूल्ये, साहित्य मूल्ये, राजकीय मूल्ये (भूमिका अशा अर्थाने) एकाच व्यक्तीमध्ये वेगवेगळ्या स्वरूपात दिसतात. यातला एकजिनसीपणा अभावानेच आढळतो. त्यामुळे अभिरुची विकृत बनते. साहित्याचा परिणाम मायनसमध्ये जातो. ह्या विकृत अभिरुचीचा परिणाम आपल्या मराठी साहित्यावर खूप खोलवर असा झालेला आहे. त्याची विस्तृत चर्चा होऊ शकते. खरं तर हा परिणाम गांधीवाद, आंबेडकरवाद मराठी साहित्यात का रुजला नाही?... अशा अर्थाने पाहता येईल. ह्या दोन्हींना बगल देणारे मार्क्सवादाकडे वळले. पण त्यातही वर सांगितलेल्या अभिरुचीचा मुद्दा आलाच. ह्याची मुख्य कारणे मध्यमवर्गीय जाच, एकाच विचाराचे प्रकाशक, मनुवादी समूहनिष्ठा, भूमिका आणि परंपरेचं भान नसलेले लेखक अशी देता येतील. आपली साहित्यसंस्कृती आणि समाजसंस्कृती एकमेकाच्या विरुद्ध बाजूला त्यामुळे तर आहे.

।।६।।

जागतिकीकरणाच्या आडून आलेली, आयात झालेली (आपोआप) उत्तर-आधुनिकता (वाद सुद्धा) आणि आपल्याकडील उत्तर-आधुनिकता ह्यात मोठा फरक संभवतो. त्याचे मूळ भूप्रदेश देश नावाच्या शब्दात कधीपासून बदलला आणि सांस्कृतिक इतिहासात, त्यातून निर्माण झालेल्या राजकारणात कधीपासून कालक्रमित झाला इथपर्यंत शोधता येते. भारतात ही सतर्कता खूप उशिरा ध्यानात आली असावी; असे म्हणता येते. आपल्याकडे उत्तर आधुनिकता हा आधुनिकतेचा विस्तार असायला हवा. तिकडे आधुनिकता आणि उत्तर-आधुनिकता एकमेकाच्या विरोधात कार्यरत असल्याचे स्पष्ट दिसते. निवेदनाचे वेगवेगळे प्रयोग, वास्तवाची खंडित मांडणी, प्रत्येक शब्दाचे गणितीकरणानुसार उपयोजन (मिलान कुंदेरा), आशयाची पूर्ण काटछाट, विषयाची संदिग्धता आणि जडपणा, आशयाची आवक आणि विन्यासाबद्दलचे (Crafting) कादंबरीच्या पानापानात सांगितलेले रटाळ वर्णन, शैलीचे भयंकर अवडंबर, इतिहास आणि परंपरेचे वर्चस्व गोचर करण्याचा प्रयत्न अशा अनेक गोष्टी चरित्र अशा अर्थाने आयात झालेल्या उत्तर-आधुनिकतावादाबद्दल सांगून येतील. आपल्याकडील उत्तर-आधुनिकतावाद (म्हणजे मराठी) हा अधिक आशयाभिमुख, त्यानुसार प्रयोगाला वाव देणारा, स्पष्ट, सुटसुटीत, भाषेच्या अंगाने साध्या आणि सोप्या मार्गाने जाणारा असावा. तो हिंदुत्ववादी मुस्लिम अतिरेकाला विरोध करणारा असावा. धर्मनिरपेक्षता हे त्याचे प्रमुख अस्त्र असायला हवे. धर्मशास्त्रातून निर्माण होणारी वर्ण व्यवस्था (Castesystem) आणि अंधश्रद्धा ह्याला कडाडून विरोध करणाऱ्या आशयाचे त्यातून मध्यवर्ती उपयोजन त्यातून व्हायला हवे. बुद्ध-फुले-मार्क्स-आंबेडकर-आगरकर-राजारामशास्त्री भागवत-वि.रा. शिंदे ह्यांनी प्रस्थापित केलेल्या सुधारणावादी पर्वाच्या दृष्टीने हा उत्तर-आधुनिकवाद मराठीत विकसित व्हायला हवा पण तो तसा होताना दिसत नाही. उलट त्याच्या आडून सुधारणावादी पर्वाला जोडून येणारा आशय, क्रिया-प्रतिक्रिया, टीका, समीक्षा मारून टाकण्याचे काम करताना तो दिसतो. ह्या अर्थाने श्याम मनोहर, मकरंद साठे व त्यांच्यासारखं लिहून सॅक्शन मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या इतर अनेक उत्तर-आधुनिक कादंबरीकरांनी खरं तर इंग्रजीतच आपल्या कादंबऱ्या लिहायला पाहिजे होत्या. म्हणजे त्यांना प्रतिसादापेक्षा त्यातला फोलपणाच अधिक ध्यानात आला असता. संस्कृतीचं दुसऱ्या भाषेत विस्तारणं, अर्थ आणि आशयासह किती महत्त्वाचं असतं हे सुद्धा ध्यानात आलं असतं.

।।८।।

जग हे अनित्य आहे; हे गौतम बुद्धाचं विधान अध्यात्म किंवा धर्म प्रसारासाठी वापरण्यात आलेल्या प्रवचनाचा भाग नाही. मग ह्या विधानाला आणि ते करणाऱ्या बुद्धाला विद्रोही, पुरोगामी, आधुनिक, उत्तर-आधुनिक, धर्म-संस्थापक अशा कोणत्या वर्गीकरणात ढकलायचे?... हे विधान तर विज्ञान आहे. आणि गौतम बुद्ध हा विज्ञाननिष्ठ आहे. जागतिकीकरणातून आलेल्या आक्रमणाला थोपविण्यासाठी आणि संस्कृती विस्तारासाठी सत्याला थेट सामोरे जाताना विज्ञाननिष्ठेची आणि त्यातून निर्माण झालेल्या तत्त्वज्ञानाची गरज आहे.

।।९।।

सर्जनशील लेखकाला हा भारतीय, त्यातल्या त्यात मराठी व्यवहारातला 'सांस्कृतिक गुंता' पाठीवर घेऊन लिहिण्याला तोंड द्यायला हवं. त्याच्या लेखनकामाठीला त्यातूनच 'ग्लोबल' अर्थ आणि सम्यक दृष्टी प्राप्त होईल. एक लेखक म्हणून असाच विचार केल्यावर 'सांस्कृतिक पालकत्व' आणि 'सॅक्शन' ह्या दोन गोष्टींची भीती बाळगण्याचे कारणच उरणार नाही.

**– जी.के. ऐनापुरे**
भ्रमणध्वनी : ९४२३०१७८३६
ainapure62@yahoo.com



।।ग्रंथाली।।

**तीव्र एकांतातल्या जीर्ण काळोखात**

**मनोहर जाधव**

**मूल्य १२० रु.** **सवलतीत ७५ रु.**

मनोहर जाधवांच्या या संग्रहातील कवितांमधून व्यक्तिच्या सामाजिक आणि भावजीवनातील कल्लोळ रसरशीतपणे प्रकट झाला आहे. वेगवेगळ्या अनुभवांच्या बाह्य आणि अंत:स्तरावर व्यक्ती ज्या पद्धतीने प्रतिक्रिया देत असते ते पाहता या संग्रहातील कवितांचा पोत हा अनेकपदरी आहे. मानवी जीवनात एकच एक अनुभव प्रत्ययाला येत नसतो तर तो संमिश्र, विरोधाभासी तर कधी तर्कविरोधीही असतो. या अनुभवांचे आकलन आणि विश्लेषण हे देखील म्हणूनच व्यामिश्र स्वरूपाचे असते. या सगळ्या संवेदनांचे चित्रण या कवितेतून अनुभवता येते.

# लोकवाङ्मय गृह — नवी पुस्तके

## निवडक ऋतुरंग

संपादक : अरुण शेवते



गुलजार, भीमसेन जोशी, सलील चौधरी, सुंदरलाल बहुगुणा, मेहमूद, भालजी पेंढारकर, बिमल रॉय, व्ही. शांताराम, मोहन गोखले, बी. विठ्ठल, ए. पी. जे. अब्दुल कलाम, कैफी आझमी अशा मोठ्या व्यक्तिमत्त्वांना माणूस म्हणून समजून घ्यायचे असेल तर हा ग्रंथ संग्रही हवा. पानोपानी माणसाच्या अंतरंगाचे दर्शन घडवणारा ग्रंथ.

पाने : ६४८
किंमत : ₹ ७५०
पुठ्ठाबांधणी

## निसर्गाच्या छायेत

संपादक : अरुण शेवते

माणूस आणि निसर्ग जगला पाहिजे. पाऊस, झाड, पक्षी, नदी, समुद्र, आकाश यांची ओढ मनाला वाटते. आपण एकटे नाही असे जाणवते. निसर्गाच्या आणि माणसाच्या जन्मापासून निर्माण झालेला हा नात्याचा प्रवास विलक्षण आहे. तो समजून घेऊन हा नातेसंबंध उत्कट होणे गरजेचे आहे. पर्यावरणाकडे दुर्लक्ष होऊन चालणार नाही. हाच या पुस्तकाचा मुख्य गाभा आहे.



पाने : ४१४
किंमत : ₹ ४५०
पुठ्ठाबांधणी

## मार्खेजची गोष्ट

सुनील तांबे




अद्‌भुतता, कल्पनाशक्ती यांची वास्तवाशी सांगड घालण्याचं मार्खेजचं तंत्र उलगडण्यासाठी त्याचं जीवन, त्याच्या परिसराचं सामाजिक-राजकीय वास्तव यांचा शोध घ्यावा लागतो. मार्खेजच्या जादूई वास्तववादाचं तंत्र आणि मंत्र उलगडलं तर मराठी कथात्म साहित्यातील घाट आणि कला यांचं आकलन अधिक समृद्ध होईल.

**- सुनील तांबे**

पाने : १०४
किंमत : ₹ १२०

## वाचताना पाहताना जगताना

नंदा खरे

एकारलेल्या शहाणपणापेक्षा जगण्याच्या विविध अंगांना स्पर्श करत त्यातले परस्परसंबंध तपासणारे नंदा खरे यांचे 'कुतूहलमिश्रितभान' मला महत्त्वाचे वाटत आले आहे. आपल्या अभ्यासविषयाच्या पलीकडे जाऊन तो विषय समग्र जगण्याच्या पार्श्वभूमीवर पाहता येणे ही मला त्यांच्याबाबतीतली महत्त्वाची गोष्ट वाटते.

**- सतीश काळसेकर**




पाने : १४८
किंमत : ₹ २००

BookGanga.com येथेही उपलब्ध newshunt.com

पिपल्स बुक हाऊस : १५, मेहेर हाऊस, कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. ✆ : ०२२-२२८७ ३७६८.
लोकवाङ्मय गृह : भूपेश गुप्ता भवन, ८५, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५. ✆ : ०२२-२४३६ २४७४.
फॅक्स : २४३१ ३२२०. E-mail : lokvangmayagriha@gmail.com
लोकवाङ्मय गृह प्रा. लि. : ५६२, सदाशिव पेठ, पुणे -४११ ०३० ✆ : ०२०-२४४७ ८२६३

Website : www.lokvangmaygriha.com




# जागतिकीकरण व्हाया जातजाणीव

**उर्मिला पवार**

**समाजातल्या जिवंत जाणिवांशी तुमचा काहीच संबंध नसेल तर मग तुमच्या साहित्याला, साहित्यिक भूमिकेला काय अर्थ उरतो? ते सगळंच स्वप्नरंजन म्हणायला हवं. समाजातील नेतृत्व करणाऱ्या माणसाने आपल्या आजूबाजूच्या घडणाऱ्या गोष्टींवर काहीएक भूमिका घेतली पाहिजे, जे आज होताना दिसत नाही. खैरलांजी, खर्डा, सोनई, जवखेडा अशी नगरमध्ये जी दलित हत्याकांडे झाली, त्याचा एका तरी साहित्यिकाने निषेध केला का? अन् त्यांचं हे मौन म्हणजे त्यांचा या गोष्टीला छुपा पाठिंबा आहे असंच गृहित धरायचं का?**

ऐंशीच्या दशकात स्त्रीवादी चळवळ, दलित चळवळ यांच्याशी माझी ओळख झाली. स्त्री असल्यामुळे स्त्रियांचे प्रश्नही अपील होत होते. ते लिहायला कधी लागले हे सांगता येणे कठीण आहे. पण जे वाटलं ते लिहित गेले. शरीरच बाईचं असल्याने त्या जाणिवा आधी कळल्या. नंतर मग मनाच्या जाणिवा कळल्या. जातिव्यवस्था, स्त्री – पुरुषप्रधानता कळत गेली.

माझं बालपण खेड्यात गेलं. नात्यातल्या, गावातल्या अनेक बायकांची सुख – दुःख पाहिली होती. कथा कहाण्या ऐकल्या होत्या. तेव्हा ते ऐकलेलं सारं मनात रुजलं असावं. त्यातून माझ्या लेखनात कथेचं अंग आलं. १९७६–७७ दरम्यान मी कथा लिहायला लागले. लिहायला लागल्यावर मग बाई म्हणून बाईच्या अन् जातीच्या अशा दोन्ही जाणिवा यायला लागल्या. पाहिलेलं, ऐकलेलं मनात साचलेलं लिहिताना हा दलित, ही स्त्री असं होत नाही. तेव्हा ते एकरूप होऊन येतं.

८० च्या दशकातच जागतिकीकरणाची मुळं भारतात हळूहळू रुजू लागली होती. प्रथम त्याची सुरुवात अशी झाली की एखाद्या कंपनीचे मेंबर व्हा, मग तुम्ही आणखी तीन मेंबर केल्यावर तुम्हाला त्याचं कमिशन मिळणार असं हे ग्राहकांच्या साखळ्या विणणं, चक्रवाढ व्याजासारखं वाढत वाढत ग्राहकांना जाळ्यात ओढणं त्या काळापासून सुरू झालेलं होतं. पण तेव्हा ते लक्षात आलेलं नव्हतं. भांड्यांपासून कपड्यापर्यंत ते रेशनपर्यंत अशा सगळ्या गोष्टींसाठी अशी जाळी विणणं चालू झालेलं होतं. हे मार्केटिंगचं एक नवं रूप होतं. हळूहळू विचारवंताच्या बोलण्यातून, लोकांसमोर उभ्या राहिलेल्या नव्या नव्या प्रश्नांतून ९० च्या दशकात हे पूर्णपणे लक्षात आलं की आता अर्थव्यवस्थेत जागतिकीकरण आपले हातपाय पसरून उभे राहिले आहे आणि त्याला तोंड हे दिलंच पाहिजे.

जागतिकीकरणाची तीव्रतेने जाणीव झाली ती बाबरी मशीद पाडल्यानंतर. त्याच्याआधी अडवाणींची रथयात्रा निघाली, तेव्हा उघडच झालं की हा हिंदू धर्माचा प्रचार आणि प्रसार आहे. हिंदू धर्माचा प्रचार म्हणजे विषमतेचा प्रचार. अन् हा प्रचार म्हणजे भांडवलशाहीचा प्रचार होता, कारण भांडवलशाही ही मुळात विषमताधारित असते. तळागाळातल्या लोकांनी रॉ मटेरिअल म्हणून आहे तिथेच राहावं आणि ज्यांच्या हातात सत्ता आहे, पैसा आहे त्यांनी आपला अधिकाधिक उत्कर्ष करावा, हा संदेश त्यातून नकळत जात होता. (देव, दैव, भुतं–खेतं या संकल्पनांनी माणसाचा मेंदू गारद करून ठेवायचा. अन् त्यातच तुझं कल्याण आहे, गरिबांचं, दलितांचं जगणं हे त्यांचं पूर्वजन्मीचं पाप आहे, असं एकदा त्याला सांगितलं की त्यालाही ते खरंच वाटायला लागतं.याच दरम्यान गिरण्या, खासगी कंपन्या मोठ्या प्रमाणात बंद पडायला लागल्या. बेकारी वाढायला लागली. नव्या कंपन्यात नोकऱ्या निर्माणही झाल्या पण पूर्वीसारखी तिथे नोकरीची शाश्वती राहिली नाही. त्याचा परिणाम असा झाला की विकासाची प्रक्रिया सुरू असताना लोकांच्या मनातली अस्थिरता वाढली.चळवळीही थंडावल्या.माणूस जी माणुसकीची मूलभूत तत्त्व घेऊन जगत होता की, मी कफल्लक राहिलो तरी गरिबाला मदत करेन' इ. बाबा आमटे टाइपची जी भावना होती, ती संपली. माणूस जागतिकीकरणाला तोंड देण्यासाठी आत्मकेंद्रित होऊ लागला. चढाओढीने कोणत्याही मार्गाने अधिकाधिक पैशाच्या मागे लागला.

सध्या जगण्याला इतका वेग आलाय की, माणसाला जरासुद्धा थांबायला वेळ नाही. यामध्ये कथा, कविता ठीक, पण कादंबऱ्यांसारख्या मोठ्या वाचनाकडे तरुण पिढी वळेनाशी झालीय. त्यामुळे आता साहित्याचं स्वरूपही बदलायला हवं असं वाटायला

लागलं. अलीकडे एकाच विषयावर अनेकांच्या प्रतिक्रिया मागवून लेखन करण्याचा ट्रेंड रुजतोय, तो ठीक आहे.त्यातून थोरामोठ्यांची मतं कळतात, पण अशा वाचनातून काही वाढ होत नाही. ते फक्त त्या माणसाचे व्यक्तिगत मत असते. त्यातून वाचकांच्या हाती काही लागत नाही.

आताही वेगवेगळ्या साहित्यसंमेलनातून नवे कवी दर्जेदार कविता वाचतात. कथा, लेख येतात. समाजाबद्दल जाणीव असणारं साहित्यही येतं, नाही असं नाही. पण त्यात संविधानिक तत्त्वनिष्ठा दिसत नाही. मागच्या पिढीने पुढच्या पिढीला नावं ठेवायची म्हणून नाही, पण आता बदलाचा काळही कमी होतोय. तो वेग माणसाला भेलकांडून टाकतोय. हे जागतिकीकरणाचंच वारं आहे आणि त्यातून आपल्या कुणाचीच सुटका नाही. अजूनही जी माणसं मोबाईल, कॉम्प्यूटरसारखं तंत्रज्ञान वापरत नाहीत त्यांची गोची होते.अशी साधनं न वापरणारी माणसं मग गतिहीन होतात, जगण्यापासून फेकली जातात. या साधनांच्या वापराने जशी कित्येकदा गोची होते, तशी ती न वापरणाऱ्यांचीही  होत असेलच की!

बऱ्याचदा इंटरनेटसारखं माध्यम विचार खुंटवतं. नवी पिढी मोठ्या प्रमाणात नवनवीन बातम्यांसाठी चमकोगिरी करताना ही सगळी साधनं वापरताना दिसते. ही चमकोगिरी फक्त इथेच नाही तर सर्वच क्षेत्रात दिसते. चमकोगिरी हा जागतिकीकरणाचाच एक पैलू आहे. या सगळ्या माध्यमांत माणूस इतका गुरफटून गेलाय की आपण कोण? आपले अस्तित्व काय? इ. प्रश्नांचा विचार करायला त्याच्याकडे जरासुद्धा अवधी नाही. जागतिकीकरणात एकीकडे माणसं आधुनिकतावादी, टेक्नोसॅव्ही होत असताना दुसरीकडे विरेचनासाठी देव – देवळे – बुवा – बाबा यांचंही स्तोम माजलेलं दिसतं. सगळं झटपट होण्यासाठी, चुका, अपयश, नवनवीन आजारांचं भय इत्यादी विसरण्यासाठी  त्याला असा काहीतरी आधार बरा वाटतो. देव – धर्म आपल्या नेणिवेत इतका असतो की, या केवळ संकल्पना आहेत हे विसरले जाते. म्हणून तर गणपतीची मूर्ती आपल्याला साधी मातीची मूर्ती नाही वाटत. ती आणल्यावर तिला मंत्राने सचेत आणि पोहचवताना अचेत करणारा पुरोहित श्रेष्ठ की देव हा प्रश्न पडत नाही.माणसाची जाणीव – नेणीव एकाच दिशेला वळवण्याचं काम हे देव – धर्म करताना दिसतात. त्यामुळे हे काहीही संपणार नाही असं वाटतं.

जागतिकीकरण येऊ घातलं तेव्हा सुरुवातीला आम्हाला आनंद झाला होता. जगातल्या आपल्यासारख्या इतरांची परिस्थिती काय आहे ती कळेल, आदान – प्रदान सोपं होईल. जातिव्यवस्थेच्या सीमारेषा धूसर होत जातजाणीव संपेल. पण हे सगळं बाजूलाच राहिलं. उलट घुसमट आणखी वाढली. नवे पंतप्रधान – मोदी झाडू घेऊन कचरा काढतायत. पण जातीची घाण कुणी साफ करायची? ज्यांनी जाती निर्माण केल्या त्यांनीच त्या तोडायलाही हव्यात. तळागाळातल्यांनी कितीही प्रयत्न केले तरी त्या संपणार नाहीत.

तुम्ही जेव्हा विषमतेने माणसाकडे बघायला लागता तिथेच माणूस दुभंगून जातो. त्याचं अस्तित्व आणि व्यक्तिमत्त्व दुभंगतं. ज्याला त्याची जाणीव होते त्याला वाटायला लागतं की  हे बदललं पाहिजे. पण ज्यांना याची जाणीव होत नाही तो मात्र अशा बदलू पाहणाऱ्यांना गप्प बसवण्याचा प्रयत्न करतो. यातले काही हे जाणीवपूर्वक करतात तर काही अज्ञानामुळे करतात. बहुजन समाजातल्या बऱ्याच मोठ्या वर्गाला आपले मागासलेपण का आहे याची जाणीवच नसल्याने तेही अशा बदलाला विरोध करतात. म. फुले –  डॉ. आंबेडकरांनी दलितांनाच नव्हे तर सर्व भारतीयांनाच जातिव्यवस्थेतील उतरंडीची, त्यातील भेदाची जाणीव करून दिली. जात भेदून माणसाचं व्यक्तिमत्त्व, आत्मविश्वास विकसित करण्याची जाणीव त्यांनीच दिली. एकूणच सामाजिक परिवर्तनाची दिशा दाखवली. पण जातीवाद्यांनी फुले – आंबेडकरांची वाटणी त्यांच्या जातीपुरतीच मर्यादित करून टाकली. खरंतर ही फार मोठी शोकांतिका आहे. देशातील संपूर्ण संपत्ती, संसाधनांवर, निसर्ग आणि पर्यावरणावर सर्वांचाच समान हक्क आणि अधिकार असल्याची जाणीवही त्यांनीच दिली. या जागतिकीकरणाच्या काळात दलित चळवळीचंही चित्र धूसरच दिसत आहे. तथाकथित नेत्यांना  आपलं अस्तित्व सिद्ध टिकवण्यासाठी कोलांट्या उड्या माराव्या लागत आहेत. आता जातिभेदाचं स्वरूपही बदललेलं दिसतं. पूर्वी स्पर्शही खपायचा नाही. आता शिक्षणात रिझर्वेशनच्या स्वरूपात हा प्रश्न उग्र रूपात दिसतो. तुम्हाला कमी गुण असतानाही पुढे जाऊ देतायत याबद्दल प्रचंड चीड दिसते. ही चीड मग सगळीकडे पसरते. पण ती अनाठायी असते. मार्कांमधली शिथिलता पुढच्या अभ्यासक्रमात नसते, ती प्रवेशापुरतीच असते हे समजून घेतलं जात नाही. मग अशा उमेदवाराचा मानसिक छळ केला जातो. तुमच्या जेवणाखाण्याच्या पद्धतीत, वागण्याच्या पद्धतीत, नोकरभरतीच्या वेळी आपल्या नेणिवेत जात इतकी असते की नकळतपणे तो माणूस झिडकारला जातो. त्याच्यावर हल्ला करण्याइतकी विकृती तयार होते.नगरच्या हत्याकांडातलं कृत्य तर हिटलरच्या विकृतीलाही लाजवेल असं आहे. माणसांच्या शरीराचे बारीक बारीक तुकडे करणे, त्यांची डोकी बोअरवेलमध्ये जात नाहीत म्हणून ती चेचणे, सोनईतील तीन सफाई कामगारांना संडासाच्या टाकीत घालून ऊस तोडणी मशीनमध्ये घालून त्यांचे तुकडे करणं ही कसली विकृती म्हणायची? आजही आपल्याकडे नितिन आगेसारख्या मुलाला निर्घृण शारीरिक छळ करून मारले जाते. खैरलांजीसारख्या प्रकरणात शारीरिक, लैंगिक अत्याचार होताना दिसतात.माणसांच्या मनात जोपर्यंत विषमतावादी जात, धर्म, देव या संकल्पना आहेत तोवर अशा अत्याचारांना खतपाणी मिळत जाणार.

राजकारणी तर जातिव्यवस्था जाणीवपूर्वक जोपासताना दिसतात. आता आलेल्या नवीन सरकारच्या संस्कृतमधून शपथा घेणे, गीतेचे तत्त्वज्ञान अभ्यासक्रमात लावणे हा जात – धर्म जोपासण्याचाच प्रकार आहे. महाभारतात फक्त गीताच आहे का? इतरही पर्वे आहेत. स्त्रीपर्व आहे, मुसळपर्व आहे, आरोहण पर्व

आहे. युद्धात पुत्रपौत्रांना मुकलेल्या कौरव आणि पांडव अशा दोन्हीकडच्या स्त्रियांनी कृष्णाचा आणि अर्जुनाचाही धिक्कार केलेला आहे. त्यांना नाना तऱ्हेची दूषणे दिली आहेत. स्वर्गारोहणात पाच पतींकडून द्रौपतीची उपेक्षा झालेली आहे. युद्धाने कोणाचेही भले होत नाही. नाश होतो हे दाखवणारी पुढची पर्वेही गीतेसोबतच अभ्यासक्रमात लावा.जातिभेदाचे स्वरूप आपल्या रोजच्या करमणुकीच्या गोष्टीतही दिसते. मागे 'अवंतिका' नावाच्या टिव्ही मालिकेत कोर्टातल्या दृश्यात, वाईट कृत्य करणाऱ्या माणसाच्या पार्शवभूमीला आंबेडकरांचे फोटो दाखवले जात तर चांगले वागणाऱ्या पुरुषाच्या मागे विवेकानंद, टिळक यांचे फोटो असत. 'बालिकावधू' या हिंदी मालिकेतही अशी दृश्ये दाखवली गेली आहेत. यातूनही लोकांचा बुद्धिभेद केला जातो. डॉ. आंबेडकरांकडे चुकीच्या दृष्टिकोनातून पाहिलं जातं. मनुस्मृतीने स्त्रियांना नाकारलेले सर्व अधिकार हिंदू कोड बिलातून दिले, ते धाब्यावर बसवले जातात. आजही शिकलेल्या बायका पोथ्या वाचतात, हजारो वेळा 'श्रीराम' लिहितात, घरात क्लेश झाले की ब्राह्मणभोजन घालतात. हे बुद्धीचं कंडिशनिंगच आहे. जातपंचायतीत आपल्या मुलांचे तुकडे केलेले स्वतःच्या डोळ्याने आईवडील बघतात. हे कुठून येतं?

दलित साहित्यात दलितांचे प्रश्न आजही मांडले जातात. पण ते छापणार कुठे तर 'अस्मितादर्श'सारख्या त्रैमासिकात! पुन्हा ते वाचणारेही दलितच.सम्राट, महानायक, लोकनायक तसेच रमाई हे दलित स्त्रीचे प्रश्न मांडणारे मासिक यांचे वाचकही दलित समाजातील आहेत. असं हे सगळं एकांगी झालेलं आहे. अपेक्षित असं कसलंच आदान – प्रदान नाही. मेघना पेठे, सानिया, नीरजा या लेखिका फार थेटपणे लिहितात. त्यामुळे त्यांच्याकडून फार आशा वाटत होत्या. पण त्यांच्या लेखनात तळागाळातल्या लोकांशी कसलीही बांधिलकी दिसत नाही. सर्वसमावेशकता नाही. उलट त्या या वर्गापासून फटकून राहिलेल्या दिसतात.

दलित माणसांबद्दल तर समाज संवेदनाशून्य, भावनाशून्य आहे असंच म्हणायला हवं. समाजातल्या जिवंत जाणिवांशी तुमचा काहीच संबंध नसेल तर मग तुमच्या साहित्याला, साहित्यिक भूमिकेला काय अर्थ उरतो? ते सगळंच स्वप्नरंजन म्हणायला हवं. समाजातील नेतृत्व करणाऱ्या माणसाने आपल्या आजूबाजूच्या घडणाऱ्या गोष्टींवर काहीएक भूमिका घेतली पाहिजे, जे आज होताना दिसत नाही. खैरलांजी, खर्डा, सोनई, जवखेडा अशी नगरमध्ये जी दलित हत्याकांडे झाली, त्याचा एका तरी साहित्यिकाने निषेध केला का? अन् त्यांचं हे मौन म्हणजे त्यांचा या गोष्टीला छुपा पाठिंबा आहे असंच गृहित धरायचं का?


या काळात खेडीही भौतिक दृष्ट्या बदलली – सुधारली. पण मानसिकता बदलली नाही, जी खरं तर बदलायला हवी होती. खेड्यात आजही जातीचं केंद्रीकरण झालेलं दिसतं, ज्याचा प्रत्यय निवडणुकांच्यावेळी मोठ्या प्रमाणात येतो. खेड्यातल्या बोली जाऊन प्रमाण मराठी बोलण्याकडे लोकांचा कल वाढू लागला. आता तर खेड्यातही कंम्प्यूटर आले, मागोमाग इंग्रजी भाषाही आली. पुन्हा फक्त इंग्रजी येऊन चालत नाही. परदेशी जायची संधी हवी तर फ्रेंच, जर्मन इ. भाषाही शिकल्या जाऊ लागल्या. हे सर्व उच्चवर्गीय म्हणजे पैसेवाल्यांच्या मुलांना नजरेसमोर ठेवून केलं गेलं. नव्या उद्योगधंद्यांसाठी खेड्यातली माणसे विस्थापित झाली. त्यांच्या जमिनी गेल्या. पूर्वी संथपणे का होईना माणसं एका दिशेने जगत होती. पण आता सगळंच विस्कळीत झालेलं दिसतं.

संपूर्ण कोकणातल्या म्हणजे ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या दलित समाजातल्या – चर्मकार, महार, मातंग यांच्यात जन्मापासून मृत्यूपर्यंत जे विधी आहेत यावर मी काम करायचं ठरवलं. तेव्हा त्यांच्या बोलींचाही अभ्यास केला. हे सर्वेक्षण करताना असं लक्षात आलं की बायका त्यांच्या भाषेत बोलायला लाजत होत्या. 'आता कुणी तशी भाषा बोलत नाही, आम्ही आता मराठीच बोलतो', असं म्हणत होत्या, याचा एक अभिमान त्यांच्यात दिसून येत होता.या बोली संपतायत याची त्यांना जाणीव नव्हती. या दृष्टीने बघितलं तर असंही वाटतं की बदल हा होणारच आहे. बदल हा जीवनाचा स्थायी भाव आहे. जागतिकीकरणात सगळ्या जगातली विविधता नष्ट होऊन त्याचं 'सपाटीकरण' होऊ घातलेलं असताना जात, धर्म, वर्ग या विषमतेचं काय होणार? ती सपाट होणार की नाही? याचे उत्तर या यंत्रणेकडे नाही.

**– उर्मिला पवार**

भ्रमणध्वनी : ९८६९८३०४०२

**॥ग्रंथाली॥**



**अनाहत**


**ॲड. मंदाकिनी पाटील**

**मूल्य १०० रु.**

**सवलतीत ६० रु.**

गेल्या दोन दशकात लिहिणाऱ्या कवयित्री त्यांच्या पूर्वासुरींच्या पावलावर पाऊल टाकून लिहित आहेत. मंदाकिनी पाटीलही या वाटेवर चालत आहेत. स्त्रीच्या जगण्याला समर्थपणे भिडताहेत. आणखी नवी आशयसुत्रे, नवी प्रतिमासृष्टी घेऊन त्या वाचकांपुढे पुढील काळात येतील अशी अपेक्षा करण्याइतकी त्यांची कविता परिपक्व होत आहे हे नमूद करायला हवे.

**– नीरजा**




मराठी रंगभूमी तसेच
हिंदी आणि मराठी सिनेजगतात
स्वत:च्या वेगळ्या शैलीने
आपल्या अभिनयाचा ठसा
उमटविणारे विख्यात अभिनेते
श्री. मोहन जोशी यांचे आत्मचरित्र

# नटखट... नट-खट

**मोहन जोशी ✧ शब्दांकन - जयंत बेंद्रे**

**पृष्ठे ६१८ + ३२ रंगीत पाने**

**मूल्य : ₹ ५००**
**सवलत-मूल्य : ₹ ४००**

**प्रमुख विक्रेते :**
**मॅजेस्टिक बुक स्टॉल**, गिरगाव, पुणे मो. ९९२२३४४०८१
**मॅजेस्टिक ग्रंथदालन**, शिवाजी मंदिर, तळमजला, दादर (प.)
मो. ९८९२२२०२३९
**मॅजेस्टिक बुक डेपो**, ठाणे (प.) दूरध्वनी (०२२)२५३७६८६५


मॅजेस्टिक
पब्लिशिंग हाऊस

**www.majesticprakashan.com ❖ email : majesticph@gmail.com**



आपली आवडती पुस्तके
मागविण्यासाठी
**www.majesticonthenet.com**

**फोनवरून ऑर्डर देण्यासाठी संपर्क करा - (022) 65666755**




# मराठी विज्ञानकथा आज आणि उद्या

**डॉ. बाळ फोंडके**

**पाश्चात्त्य विज्ञानकथांच्या तुलनेत मराठी विज्ञानकथांची उत्क्रांती वेगवान राहिली आहे. म्हणूनच गेल्या सत्तर वर्षांमध्येच मराठी विज्ञानकथा अद्भुतरसयुक्त साहसवादाकडून वास्तववादापर्यंत पोचली आहे. आजची मराठी विज्ञानकथा ही मुख्यत्वे माणसाची, किमानपक्षी मानवकेंद्रित, राहिली आहे. विज्ञानतंत्रज्ञानापायी बदललेली जीवनशैली अपरिहार्यपणे अंगिकारताना माणसाच्या भावविश्वांमध्ये उठणाऱ्या आवर्तांभवती आजची मराठी विज्ञानकथा परिभ्रमण करते आहे.**

कोणताही साहित्य प्रकार शाश्वत राहायचा असेल तर तो स्थितिशील नसून गतिशील असावा लागतो. तो सतत उत्क्रांत होत असतो. विज्ञानकथाही याला अपवाद नाहीत. 'फ्रॅन्केन्स्टाईन' ही आद्य विज्ञानकथा सादर झाल्यापासून आजवर विज्ञानकथेनं उत्क्रांतीच्या किमान चार पायऱ्या पार केल्या आहेत. पहिल्या पायरीवरील विज्ञानकथा ही जवळजवळ परीकथाच होती. साहस हा तिचा प्राण होता आणि अद्भुतरस तिचा स्थायीभाव होता. ज्यूल व्हर्न, एच.जी. वेल्स यांच्या काळातील विज्ञानकथा याच धाटणीच्या होत्या. परंतु त्यात त्या काळातील वैज्ञानिक संशोधनातून उगम पावलेल्या काही संकल्पनांचा कल्पक वापर केला गेल्यामुळं पुढची पायरी गाठण्याची भूमिका तयार झाली होती. या दुसऱ्या पायरीवरील विज्ञानकथा विज्ञानप्रचुर होत्या. त्या कथांचा नवनवीन विज्ञानसंकल्पना स्पष्ट करण्यावर आणि त्यांच्या संभाव्य विस्तारावर भर होता. त्यातील कथात्मकतेला दुय्यम स्थान दिलं गेलं होतं. ललितसाहित्याच्या निकषांकडे तसं दुर्लक्षच झालं होतं. परंतु हळूहळू वैज्ञानिक संकल्पनांचा साहित्यिक विस्तार करताना या कथा आहेत, असाव्यात याचं भान येऊ लागलं होतं. त्यामुळं कथासाहित्याच्या वातावरणनिर्मिती, व्यक्तिरेखाटन, सशक्त कथाबीज, भाषाशैली, संवाद यासारख्या वैशिष्ट्यांकडे अधिकाधिक लक्ष पुरवण्यात येऊ लागलं. यातूनच ललितप्रचुर आणि आज ज्याला पाश्चात्त्य विज्ञानकथांचं सुवर्णयुग मानलं जातं त्या ॲसिमॉव्ह, हाईनलाईन, क्लार्क, वगैरेंच्या कथा सादर होऊ लागल्या. या पुढच्या पायरीवरच्या कथा मानवकेंद्रित झाल्या. विज्ञानाच्या नित्यनूतन आविष्कारांपायी माणसाच्या वैयक्तिक, सामाजिक, भावनिक आयुष्यावर होऊ शकणाऱ्या संभाव्य परिणामांचं चित्रण कथात्मकतेच्या सर्व निकषांचं पालन करत होऊ लागलं.

मराठी विज्ञानकथाही उत्क्रांतीचे हे टप्पे पार करतच विकसित झाली आहे. मात्र पाश्चात्त्य विज्ञानकथांच्या तुलनेत मराठी विज्ञानकथांची उत्क्रांती वेगवान राहिली आहे. म्हणूनच गेल्या सत्तर वर्षांमध्येच मराठी विज्ञानकथा अद्भुतरसयुक्त साहसवादाकडून वास्तववादापर्यंत पोचली आहे. आजची मराठी विज्ञानकथा ही मुख्यत्वे माणसाची, किमानपक्षी मानवकेंद्रित, राहिली आहे. विज्ञानतंत्रज्ञानापायी बदललेली जीवनशैली अपरिहार्यपणे अंगिकारताना माणसाच्या भावविश्वांमध्ये उठणाऱ्या आवर्तांभवती आजची मराठी विज्ञानकथा परिभ्रमण करते आहे.

विज्ञान जर वैश्विक आहे, इंग्रजी विज्ञान वेगळं, जर्मन वेगळं, मराठी त्याहूनही वेगळं अशी स्थिती नाही, तर मग विज्ञानकथांच्या बाबतीतच आपण इंग्रजी, फ्रेन्च, रशियन, भारतीय किंवा मराठी असा भेदभाव कसा करू शकतो, असा एक प्रश्न इथं उपस्थित होऊ शकतो. त्याचं उत्तर तसं सोपं आहे. विज्ञान जरी वैश्विक असलं तरी माणसाची जडणघडण त्याच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीनुसार होत असते. साहजिकच विज्ञानाच्या आविष्कारापायी उभ्या राहिलेल्या त्याच्या वैयक्तिक किंवा सामाजिक समस्येला त्याच्याकडून मिळणारा प्रतिसाद वेगवेगळाच राहण्याची शक्यता अधिक आहे. जर कथा मानवकेंद्रित असेल, माणसाच्या भावजीवनातील तरंगांचं चित्रण करणारी असेल, तर मग मराठी माणसाची विज्ञानकथा इतर विज्ञानकथांपेक्षा वेगळी असणं स्वाभाविकच आहे.

असं असलं तरी विज्ञानकथेची मूलभूत व्याख्या सर्वांनाच समान असणं आवश्यक आहे. विज्ञानकथा ही मुळात कथा असणं आवश्यक आहे. त्या कथेचा आत्मा विज्ञानसंकल्पनेचा असणं जसं आवश्यक आहे तसंच तिचं शरीर कथेचंच असायला हवं. जर ती चांगली कथा नसेल किंवा मुळात कथाच नसेल तर केवळ विज्ञानाच्या परिसस्पर्शापायी तिचा उद्धार होऊ शकणार नाही.

त्या शिळेची अहिल्या होऊ शकणार नाही. म्हणूनच आधुनिक मराठी विज्ञानकथेचेही तीन प्रकार संभवतात.

विज्ञानकथेतील वैज्ञानिक संकल्पना प्रस्थापित विज्ञानाशी फारकत घेणारी नसावी हे अभिप्रेत आहे. कारण जर त्या संकल्पनेला विज्ञानाची मान्यता नसेल तर त्या कथेचा केंद्रबिंदूच कमकुवत झालेला असेल. जी संकल्पना मिथ्यविज्ञानात मोडते त्या संकल्पनेवरची कथा कितीही सशक्त असली तरी तिची गणना विज्ञानकथेत न होता फॅन्टसीमध्येच करावी लागेल.

जयवंत दळवींनी अनेक उत्तमोत्तम फॅन्टसी लिहिल्या आहेत. परंतु त्या विज्ञानकथा असल्याचा दावा ना त्यांनी केला ना इतरांनी. परंतु हॅरी पॉटर आणि स्टार ट्रेक यांच्या प्रभावापायी आज फॅन्टसींनाच विज्ञानकथा मानण्यात येत आहे. ही गफलत जाणूनबुजून केली जात नाही, हे खरं आहे. विज्ञानकथांची स्पष्टशी ओळखच न झाल्यामुळं ही विसंगती निर्माण झाली आहे. त्यात समीक्षकांची अनास्था आणि प्रसंगी विज्ञानकथांची अवहेलनाही याला कारणीभूत आहे. हॅरी पॉटरमध्ये तर उघडउघड जादूटोण्याचा, ब्लॅक मॅजिकचा वापर केला आहे. तरीही पाश्चात्त्य समीक्षक, संपादक, प्रकाशक त्याची गणना विज्ञानकथांमध्ये करतात. त्या समाजात कदाचित हे क्षम्य असेल. परंतु आधीच दैववादी असलेल्या आणि अंधश्रद्धेनं पछाडलेल्या आपल्या समाजात विज्ञानाविषयीचा हा विपर्यस्त दृष्टिकोन परवडण्यासारखा नाही. विज्ञानकथालेखकांनी हे सामाजिक भान पाळण्याची नितांत आवश्यकता आहे.

या आधुनिक फॅन्टसी आणि अरबी भाषेतील सुरस कथा किंवा गुलबकावली वगैरेसारख्या परीकथा यांच्यामध्ये तसं फारसं अंतर नाही. अर्थात त्या परीकथांमध्ये परीच्या हातात जादूची कांडी असे आणि तिचा परिणाम कसा होतो असा प्रश्नही विचारला जात नसे. त्या जादूचा विज्ञानाशी संबंध लावण्याचा बादरायणी उद्योगही त्यामुळं केला जात नसे आणि आजही तो केला जात नाही. त्या केवळ कल्पनारम्य आणि मनाला रिझवणाऱ्या आसपासच्या वास्तवापासून दूर नेणाऱ्या, एक प्रकारच्या पलायनवादी कथा आहेत याचं भानही सुटलेलं नसे. तेव्हा फॅन्टसी हा कथाप्रकार माणसाच्या भावनिक गरजा भागवण्यासाठी आवश्यक आहे यात वाद नाही, परंतु त्यांची गणना विज्ञानकथांमध्ये केल्यानं एक चुकीचा संदेश दिला जाण्याची शक्यता आहे.

विज्ञानकथांमधील मध्यवर्ती संकल्पना प्रस्थापित विज्ञानाशी सुसंगत असावी ही अपेक्षा म्हणूनच रास्त ठरते. परंतु यातही दोन गट करावे लागतील. काही विज्ञानसंकल्पना प्रस्थापित विज्ञानातील प्रमेयांनुसार उद्भवणाऱ्या संभाव्यतेवर आधारित असल्या तरी त्या अजूनही प्रत्यक्षात उतरलेल्या नाहीत. त्या संभाव्यतांचं प्रत्यक्षात रूपांतर होण्याची शक्यताही सध्यातरी धूसरच आहे. सैद्धान्तिक स्तरावर त्यांचा विचार केला जातो. त्यानुसार अधिकाधिक सैद्धान्तिक संशोधनही होत राहतं. आजही ते होत आहे. तरीही त्या संशोधनांचे निष्कर्षही अमूर्त स्वरुपाचेच राहिले आहेत. कालप्रवास, परग्रहवासी, समांतर विश्व, भावविश्व असलेले यंत्रमानव, त्यांचा मानवाशी संघर्ष, टेलिपोर्टेशन यासारख्या संकल्पनांवर उत्तम विज्ञानकथा लिहिल्या जात आहेत. किंबहुना त्या संकल्पनांचा आधार असलेलं विज्ञान कळावयास अतिशय अवघड असलं तरी ते विषद करण्याची गरजच भासत नसल्यानं आणि वाचकांनाही ते अभिप्रेत नसल्यानं त्या कथांमधील कथात्मकतेकडे अधिक लक्ष पुरवणं शक्य होतं, परंतु तसं करताना त्या वैज्ञानिक संकल्पनांचा जो विस्तार करावा लागतो तो त्या वैज्ञानिक सूत्राशी सर्वस्वी इमान राखणारा असतोच असं नाही. त्या संकल्पनेवर जी कल्पनेची भरारी घ्यायची त्याचा धागा तर्कसुसंगत असतोच असं नाही. त्यामुळंच या प्रकारच्या बहुतेक विज्ञानकथांशी वाचक आपलं नातं जोमानं रुजवू शकत नाही. एक थरारक कल्पनारम्य कथा या दृष्टिकोणातूनच बहुतांश वाचक तिचा आस्वाद घेतात.

वास्तविक ज्या विज्ञानसंशोधनावर या संकल्पना आधारित आहेत त्यातच त्यांच्या संभाव्यतेची चिकित्सा केलेली आहे. आईन्स्टाईनच्या ज्या सापेक्षतावादावर कालप्रवास ही संकल्पना आधारित आहे त्यातच त्या प्रवासातील अडथळे स्पष्ट केले आहेत. तसा प्रवास करण्यासाठी विश्वातील कमाल वेगमर्यादा गाठण्याची आवश्यकता आहे. परंतु त्या वेगानं प्रवास करणाऱ्या वस्तूचं वस्तुमान अतिशय जास्ती आणि आकारमान अतिशय कमी होत असल्यामुळं त्या प्रवाशाची अवस्था अमूर्त स्वरुपाचीच होणार आहे, परंतु ती तशी होत नाही आणि वास्तवातील देहानंच तो प्रवासी निरनिराळ्या कालखंडात भ्रमण करतो अशी कल्पना लढवली जाते. ती अतिशय आकर्षक वाटली तरी तर्कसंगत नाही हे ध्यानात घ्यायला हवं.

या संभाव्य किंवा स्पेक्युलेटिव्ह स्वरुपाच्या विज्ञानसंकल्पनांचा सढळ वापर विज्ञानकथांमध्ये, पाश्चात्त्य आणि मराठीतही, केलेला दिसून येतो. यातील बहुतांश संकल्पना भौतिकशास्त्रातील संशोधनातून स्फुरलेल्या आहेत. अठराशे पंचाहत्तर ते एकोणीसशे चाळीस–पन्नासपर्यंतच्या कालखंडावर भौतिकशास्त्राचा फार मोठा प्रभाव होता. या विश्वाच्या बहुविध स्वरूपाची प्रथमच ओळख पटत होती. ज्या नियमांनुसार विश्वाचा गाडा सुरळीत चालत आहे त्यांचा उलगडा होत होता. विश्वाची उत्पत्ती कशी झाली याचीही समज अधिक दृढ होत होती. आपल्या डोळ्यांना दिसणाऱ्या पट्ट्यापलीकडेही विशाल विश्व पसरलेलं आहे याची जाणीव होऊ लागली होती. हे विश्व आजही वेगानं प्रसरण पावत आहे हे समजून आलं होतं. तरीही या विश्वाविषयीचं ज्ञान तुटपुंजच होतं. साहजिकच या अज्ञात प्रदेशाचं गूढ आवाहन करत असतानाच त्या विषयीच्या एका अनामिक भीतीचा पगडा जनमानसावर होता. लेखकांच्या प्रतिभेला स्फुरण देण्यासाठी हे रसायन परिपूर्ण होतं. त्यापायी या संकल्पनांची परिणती ज्या अनेक संभाव्यतांमध्ये होऊ शकत होती त्यापैकी कोणत्याही एका संभाव्यतेचा धागा पकडून कथा विणली जात होती. ती कितीही चित्ताकर्षक असली तरी ती वास्तव जीवनाला छेद देण्याची शक्यता नगण्य असल्याचं भान लेखक आणि वाचक दोघांनाही होतं. म्हणूनच कदाचित विज्ञानाची

फारशी ओळख नसलेल्या समीक्षकांनी विज्ञानकथांची गणना अद्भुतसाहित्य किंवा बालसाहित्यात केली असावी. या कथा प्रकाशित करण्याचं धाडसही त्यामुळं मोजक्या संपादकांनी दाखवलं. त्या नियतकालिकांना वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळाला तरी ती उपेक्षितच राहिली. त्या कथांचे संग्रह किंवा कादंबऱ्या प्रकाशित करण्यात प्रकाशकांनीही फारसा उत्साह दाखवला नाही.

याला अपवाद जरूर आहेत. ज्या विज्ञानकथेनं जयंत नारळीकरांनी मराठी वाचकांची नस पकडली ती 'उजव्या सोंडेचा गणपती' ही कथा अशाच संभाव्य वैज्ञानिक कल्पनेवर आधारित आहे, परंतु तिचा कथात्मक विस्तार करताना त्यांनी तर्कसंगतीचा धागा घट्ट पकडून धरल्यामुळं ती विश्वासार्ह आणि तरीही उत्कंठावर्धक झाली आहे. तीच बाब त्यांच्या गंगाधरपंतांचं पानिपत या कथेत अधोरेखित झाली आहे. या विज्ञानकथांनीच नारळीकरांनी स्वतःला तर विज्ञानकथालेखक म्हणून प्रस्थापित केलंच पण मराठी विज्ञानकथेच्या नवीन युगाची नांदीही म्हटली. मराठी विज्ञानकथेला प्रतिष्ठा मिळाली. सर्व भारतीय भाषांमध्ये आज मराठीतच विज्ञानकथांचा प्रवाह अधिक जोमदार राहिला आहे, संख्यात्मक तसंच गुणात्मक स्तरांवर अव्वल क्रमांकावर रुजला आहे.

एकोणीसशे पन्नासनंतर जीवशास्त्रातील संशोधनानं कात टाकली. अधिक वेग घेतला आणि आज तर तो वेग भोवंडून टाकणारा झाला आहे. या संशोधनातून ज्या नवीन संकल्पनांचा उगम झाला त्यांची कोणत्याही सजीवाच्या, अर्थातच माणसाच्याही, वास्तव जीवनाशी नाळ भक्कमरित्या जोडलेली आहे. त्या संकल्पनांचा तर्कसंगत विस्तार करताना अनेकानेक आकर्षक, थरारक, प्रसंगी स्फोटक संभाव्यता सामोऱ्या येत आहेत आणि त्या विश्वासार्हही वाटणाऱ्या आहेत. त्या संगमातून लिहिल्या गेलेल्या विज्ञानकथा साहजिकच वाचकाला अधिक जवळच्या वाटतात. त्यात चित्रण केलेल्या घटना, व्यक्तिरेखा आणि त्यांच्या भावविश्वातील आवर्त आज प्रत्यक्षात दिसत नसले तरी ते उद्या परवा आपल्याला अनुभवायला मिळू शकतात असा ठाम विश्वास या कथा निर्माण करतात. त्या पायीच या विज्ञानकथा कथासाहित्याच्या मूळ प्रवाहाशी अधिक जवळीक बाळगून आहेत.

मानवी पुनरुत्पादन केवळ नैसर्गिक प्रक्रियांपुरतंच मर्यादित न राहता त्यात बाह्य मदत मिळणं आज सहज शक्य झालं आहे. अवयवारोपणाच्या शस्त्रक्रिया आज आपल्या आसपासही पार पडत आहेत. त्यापायी दुर्दैवी जीवांना दिलासा मिळत असला तरी पूर्वी या तंत्रज्ञानाच्या वापरापायी कधीही न कल्पिलेल्या अनेक भावनिक, सामाजिक, आर्थिक आणि नैतिक समस्या उभ्या राहत आहेत. त्या वास्तवही आहेत. त्यांची उकल करण्याचे अनेक मार्ग सुचू शकतात. त्या समस्यांचं चित्रण तसंच निराकरण यांचा विचार करणाऱ्या अनेक विज्ञानकथा आज लिहिल्या जात आहेत. बाळ फोंडके यांचा 'गर्भार्थ' हा कथासंग्रह या विषयाच्या विविध पैलूंना गवसणी घालणारा आहे.

माहिती तंत्रज्ञानानं तर आज जीवनाच्या सर्वच अंगांमध्ये प्रवेश केला आहे. या तंत्रज्ञानानं संपर्कसाधनांमध्ये क्रांती घडवून आणली आहे. भौगोलिक अंतरामुळे येणाऱ्या दुराव्यावर मात करणं त्यामुळं शक्य झालं असलं तरी प्रत्यक्ष भेटींमध्ये मात्र खंड पडला आहे. स्पर्शाचा ओलावा त्यापायी दुस्तर झाला आहे, गळामिठी तर दूरच राहिली. या परिस्थितीचं प्रतिबिंब माणसाच्या जीवनात पडलं नसतं तरच नवल! त्यातच या तंत्रज्ञानापोटी ज्यांना प्रोत्साहन मिळालं आहे अशा हॅकिंगसारख्या अपप्रवृत्तीही जीवनकलह ढवळून काढत आहेत. त्यांचा प्रभाव वैयक्तिक जीवनापुरताच मर्यादित राहिलेला नसून सामाजिक जीवनाचा अवकाशही त्यानं व्यापून टाकला आहे. या संभाव्यतांचं चित्रण करणाऱ्या विज्ञानकथाही वास्तववादी ठरत आहेत. वाचकांचं लक्ष वेधून घेत आहेत.

मराठी विज्ञानकथा अशी सर्वच अंगांनी समृद्ध होत आहे. वाचक, प्रकाशक, संपादक या सशक्त प्रवाहात आपोआप ओढले जात आहेत. मराठी विज्ञानकथाकारांची आद्य पिढी आज वृद्धावस्थेकडे झुकलेली असली तरी त्यांची जागा घेऊ शकणारी नवीन पिढीही दृष्टिपथात आहे. उमेद वाढवणारी आहे. म्हणूनच मराठी विज्ञानकथांचा भविष्यकाळ आशादायी असल्याचंच आज दिसून येत आहे.


**– डॉ. बाळ फोंडके**

भ्रमणध्वनी : ९८९२२२८१९६

balphondke@gmail.com



**ग्रंथाली**




## X-Files...

**केईएमच्या**

**डॉ. मालिनी नाडकर्णी**

**मूल्य १५० रु.**

**सवलतीत ९० रु.**

केईएम हॉस्पिटलसारख्या महाकाय संस्थेतलं सध्याचं अद्ययावत रेडिऑलॉजी डिपार्टमेंट पाहतानाही तसंच होतं. तो विभाग घडवणाऱ्यांची दृष्टी, जिद्द आणि श्रम यांची जाणीव होत नाही. अंधाऱ्या खोलीतल्या पुरातन मशीनपासून सीटी, एमआरआय वगैरे आधुनिक यंत्रांपर्यंतचं आणि 'पाना आणि पाईप' या आयुधांपासून चुंबकी-संगणकी तंत्रांपर्यंतचं त्या विभागाचं स्थित्यंतर डॉ.मालिनी नाडकर्णींनी स्वतःच्या मेहनतीनं सुरू केलं आणि त्यांच्या शिष्यांनी ते पूर्णत्वाला नेलं. त्या धडपडीचा इतिहास 'एक्स-फाइल्स'मध्ये, त्यांच्याच शब्दांत वाचायला मिळतो

**– डॉ. उज्ज्वला दळवी**


विकास आनंदवनाचा
- चित्रलेखा पुरंदरे
‘जगातील सर्वात जास्त कुष्ठरोगी भारतात असून हा देशावरील कलंक आहे.
कुष्ठरोग्यांची सेवा केल्याबद्दल बाबा आमटेंना ट्रकभर पुरस्कार दिले जाणं
हा समाजाचा खऱ्या अर्थाने पराभव आहे.’
कोणत्याही पुस्तकासाठी संपर्क ‘साधा’
प्रमुख विक्रेते :
रसिक साहित्य प्रा. लि.
अप्पा बळवंत चौक, पुणे २. ☎ : ०२०२४४५११२९
ONLINE PURCHASE : www.erasik.com



# मराठीच्या विकासाच्या दिशा - काही विचार

**मिलिंद बोकील**

**माणूस, माणसाचा समाज आणि त्याचा कारभार चालवणारी समूहव्यवस्था या गोष्टी युरोपियन लोकांच्या आधीपासून आपल्याकडे होत्या. त्यामुळे ह्या विषयांमधले ज्ञान आपण स्वतंत्रपणे निर्माण करू शकतो. ते ज्ञान युरोपियनांपेक्षा कितीतरी उजवे राहील, कारण आपल्याकडे सामाजिक-सांस्कृतिक विविधता आश्चर्यकारक आहे, आपला इतिहास अधिक गुंतागुंतीचा आहे आणि आपल्याकडे सत्याचा शोध घेण्याची फार जुनी परंपरा आहे.**

साहित्य-संस्कृतीच्या क्षेत्रात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने काही पेच किंवा आव्हाने उभी केलेली आहेत. त्यातले सर्वात मोठे आव्हान सांस्कृतिक सपाटीकरणाचे आहे. जागतिकीकरणाने जे भौतिक बदल होत आहेत त्यांना त्या त्या क्षेत्रातल्या जबाबदार लोकांनी प्रतिसाद द्यायचा आहे. म्हणजे परक्या देशांतून जो शेतमाल येईल त्याचा मुकाबला कसा करायचा ते इथल्या शेतकऱ्यांनी आणि त्यांच्या संघटनांनी ठरवायचे आहे. मॅकडॉनल्डसारख्या हॉटेलांच्या साखळ्या जर आल्या तर काय करायचे ते इथल्या उडिपी, शेट्टी आणि कामतांनी पाहायचे आहे.' अशाच प्रकारे सांस्कृतिक सपाटीकरणाच्या आव्हानाला साहित्य-संस्कृतीच्या क्षेत्रातील लोकांनी प्रतिसाद द्यायला पाहिजे. हे काम करण्यासाठी आपल्याकडे असलेले सगळ्यात प्रभावी साधन म्हणजे आपली भाषा. कारण कोणत्याही साहित्य-संस्कृतीचा भाषा हा कणा असतो. साहित्य तर त्या त्या भाषेतूनच व्यक्त होत असते पण त्या त्या समाजाचा सगळा सांस्कृतिक साठा हा त्या भाषेत सामावलेला असतो. किंबहुना कोणताही समाज आणि त्याची संस्कृती म्हणजे त्याची भाषाच असते. भाषा हेच त्याचे अंग, भाषा हाच चेहरा आणि भाषा हाच त्याचा सांस्कृतिक आत्मा.

आर्थिक विकासाच्या आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या वापराच्या बाबतीत वाढती लोकसंख्या हा अडथळा ठरू शकतो (ठरेलच असे नाही), पण भाषिक विकासाच्या बाबतीत मात्र तसे नाही. जास्तीत जास्त लोकांनी, जास्तीत जास्त ठिकाणी ती भाषा बोलणे हा कुठल्याही भाषेच्या विकासाचा पहिला टप्पा आहे. याचे कारण भाषा बोलणारे लोक वाढले, की ते ती भाषा निरनिराळ्या ठिकाणी, निरनिराळ्या प्रकारे आणि निरनिराळ्या कारणांनी बोलत असतात. जेव्हा एखादी भाषा व्यापक भूभागावर पसरलेली असते तेव्हा त्या भाषकांना साहजिकच मोठा अवकाश मिळतो. मग ती भाषा बोलणारे लोक आपापल्या परीने त्या भाषेचा विकास करत असतात. कधी ते ती भाषा घासून घासून गुळगुळीत करतात, कधी तिची रचना सोयीसाठी बदलून घेतात, कधी पूर्णपणे नवीन रचना करतात. भाषेच्या विकासासाठी संख्यात्मक वाढ आणि वर्चस्व आवश्यक आहे. हिंदी व बंगालीच्या उदाहरणावरून ते आपल्याला स्पष्ट दिसते. या बाबतीत मराठीची परिस्थिती आशादायक आहे. यासाठी अर्थात मराठी लोकांनी आपली भाषा हिरिरीने बोलली पाहिजे; हे ओघानेच आले.

भाषा ही एक बोली असते, पण ती काही एकसंध बोली नाही. कुठल्याही भाषेत अनेक बोलीभाषांचा समावेश असतो. मराठीत तर तसे आहेच. महाराष्ट्र हा एक प्राचीन आणि भव्य प्रदेश असल्याने आणि उत्तर व दक्षिण भारताच्या मध्यात वसला असल्याने त्यात मराठीच्या अनेक बोलीभाषा आहेत. त्यातील वऱ्हाडी, खानदेशी, दख्खनी, कोकणी असे ठळक वर्ग आपल्याला माहीत आहेत, पण त्या वर्गांमध्येही पोटवर्ग आहेत. उदाहरणार्थ, कोकणी प्रदेशामध्ये वारली, ठाकरी, कातकरी, आगरी, कुणबी, मालवणी असे अनेक पोटप्रकार आहेत. मराठीचा विकास व्हायचा असेल तर ह्या प्रत्येक बोलीभाषेचा विकास व्हायला हवा. सध्या या बोलीभाषांवर आधुनिकीकरणाची मोठी संक्रांत आलेली आहे. ह्या बोलीभाषा बोलणारे लोक शिक्षित झाले, की आपली बोली टाकून देऊन प्रथम प्रमाण-मराठी स्वीकारतात आणि नंतर तीही सोडून देऊन हिंदी व इंग्रजीचा आश्रय घेतात. प्रशासकीय वा ग्रांथिक व्यवहारात प्रमाण मराठीचा वापर जरुरीपुरता करावा, पण त्या त्या भागात दैनंदिन व कौटुंबिक व्यवहारांत बोलीभाषेलाच उत्तेजन द्यायला पाहिजे. त्या त्या भाषेतील सुशिक्षितांवर ही मोठी जबाबदारी आहे. त्यांनी आपल्या बोलीभाषांची लाज न बाळगता आपापल्या समूहात व प्रदेशात ती धडाक्याने बोलली पाहिजे. त्या भाषेतल्या गाण्यांचे सूर त्या त्या आकाशात गुंजत राहिले पाहिजेत. तिथे एखादा समारंभ असेल तर अहिराणीच्या, कोळीगीतांच्या, वारली किंवा गोंडी लोकगीतांच्या

कॅसेट्स, सीडीज निनादत राहायला हव्यात. या जोडीलाच बोलीभाषांचे व्याकरण अद्ययावत करणे, त्यांच्यात साहित्य निर्माण करणे, त्या साहित्याचा गावोगाव प्रसार करणे याही गोष्टी अग्रक्रमाने कराव्या लागतील. मराठीचा विकास हा बोलीभाषांच्या विविधतेत आणि त्यांच्या समृद्धीत सामावलेला आहे.

भाषेच्या विकासामध्ये ती भाषा निरनिराळी कामे करण्यासाठी भक्कम आणि लवचीक करणे हेही महत्त्वाचे अंग आहे. माणसे भाषेचा उपयोग फक्त एकमेकांशी बोलण्यासाठीच करतात असे नाही तर स्वत:च्या मनात विचार करण्यासाठी आणि तो विचार दुसऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठीसुद्धा भाषेची आवश्यकता असते. नवनवा विचार करण्यासाठी नवनवीन संकल्पना लागतात तर तो वाहून नेण्यासाठी भाषेची नव्या तऱ्हेने मांडणी करावी लागते. कुठलीही भाषा हे काम कशा तऱ्हेने करू देते, यावर त्या भाषेचा विकास अवलंबून असतो.

खरा प्रश्न नवीन ज्ञान निर्माण करण्याचा आहे. भौतिक विज्ञानाच्या आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आपण ते कितपत करतो किंवा करू शकू ही शंका आहे. कारण महाराष्ट्र म्हणूनच नव्हे तर भारत म्हणूनही आपण विज्ञान-तंत्रज्ञातल्या संशोधनाला पुरेशी साधन-संपत्ती बहाल केलेली नाही. विज्ञानातील संशोधनासाठी आपण प्रामुख्याने पाश्चात्त्य देशांवर अवलंबून आहोत. त्यामुळे ह्या क्षेत्रातील ज्ञान व माहिती मुळात मराठीत तयार होण्यास मर्यादा आहेत. मात्र सामाजिक विज्ञानाच्या क्षेत्रात ही मर्यादा आपण ओलांडू शकतो. अर्थात त्याही क्षेत्रातल्या संशोधनाला आपण काही खास मदत करतो आहोत असे नव्हे. या क्षेत्रातली आपली गरिबी अधिकच दारुण आहे. पण तिथे निदान आपल्याकडे संशोधनाच्या विषयांची तरी वानवा नाही. केवळ सामाजिक समस्या जास्त व कठीण आहेत म्हणून नव्हे तर आपला सामाजिक-सांस्कृतिक इतिहास शेकडो वर्षांचा आहे म्हणून. समाजशास्त्र, मानवशास्त्र, राज्यशास्त्र हे विषय आपल्याकडे वसाहतवादी पार्श्वभूमीतून आले खरे, पण आता ते आपले झालेले आहेत. माणूस, माणसाचा समाज आणि त्याचा कारभार चालवणारी समूहव्यवस्था या गोष्टी युरोपियन लोकांच्या आधीपासून आपल्याकडे होत्या. त्यामुळे ह्या विषयांमधले ज्ञान आपण स्वतंत्रपणे निर्माण करू शकतो. ते ज्ञान युरोपियनांपेक्षा कितीतरी उजवे राहील, कारण आपल्याकडे सामाजिक-सांस्कृतिक विविधता आश्चर्यकारक आहे, आपला इतिहास अधिक गुंतागुंतीचा आहे आणि आपल्याकडे सत्याचा शोध घेण्याची फार जुनी परंपरा आहे.

हाच मुद्दा आपल्याला विकासाच्या तिसऱ्या अंगाशी जोडून घेता येईल. तो म्हणजे मराठीत सखोल आणि उत्तुंग वाङ्मय निर्माण करण्याचा. असं काम आपण जोपर्यंत करत नाही तोपर्यंत आपली भाषा उंच चढणार नाही. हे काम होण्यासाठी वाचनाची भरघोस परंपरा जशी हवी तसेच उत्साहवर्धक वाङ्मयीन वातावरण हवे. सध्या दिखाऊपणा, कंपूशाही, साहित्यिकांचे क्षुद्र अहंकार आणि विचारवंतांमधला तुच्छतावाद यामुळे मराठीचा शक्तिपात होतो आहे. तो थांबवून एकदिलाने आपली सगळी ताकद मराठीच्या उत्कर्षाकरता लावली पाहिजे.

सामाजिक, सुधारकी विचाराची मराठीतली परंपरा जुनी आणि भारतीय भाषांमध्ये अग्रगण्य स्वरूपाची आहे. लोकहितवादी, रानडे, फुले, आगरकर, महर्षी शिंदे, आंबेडकर, सावरकर, र. धों. कर्वे, विनोबा भावे अशी सामाजिक विचारांची प्रभावळ मराठीत खडी आहे. अशा विचारांमुळेच विसाव्या शतकाच्या सुरुवातीस महाराष्ट्र सबंध देशात अग्रेसर होता. आजही मराठीत सामाजिक विचाराची जी पातळी आहे ती देशामध्ये अग्रगण्य स्वरूपाची आहे. सामाजिक समता, स्त्री मुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, आदिवासींचे हक्क, पर्यावरणवाद, विकासाच्या प्रश्नांची चर्चा या बाबतीत मराठीत जे विचारमंथन चालते ते लक्षणीय आहे. असा सामाजिक विचार ही मराठीची ताकद आहे. पुढच्या काळात ती अधिक वाढवली पाहिजे. मात्र मराठीतल्या सामाजिक विचाराला अनेकदा पूर्वग्रहांचे ग्रहण लागते आणि तो विचार पठडीबाज आणि झापडबंद होतो. त्याऐवजी तो निकोप, मोकळा आणि सुसंवादी झाला तर त्या विचाराची शक्ती तर वाढेलच पण त्याचा जनसामान्यांतही चांगला प्रसार होईल.'

मराठीच्या विकासातली मुख्य अडचण म्हणजे सध्या मराठी माणसांना आलेले हृदयदौर्बल्य. शहरातला मराठी माणूस संभ्रमाने ग्रासला आहे, भांबावल्यासारखा झाला आहे. जागतिकीकरणात मराठीचे काय होणार, अशी भीती त्याला वाटते. ही भीती निराधार नाही, पण जागतिकीकरणाचा खरा फटका दांभिक राष्ट्रीयतेला बसणार आहे. जागतिकीकरणात बहुराष्ट्रीय कंपन्यांचे हितसंबंध जरी प्रभावी असले तरी त्यांना वेसण घालण्याचे प्रयत्न सर्वत्र होत आहेत. मुख्य म्हणजे जागतिकीकरणामुळे स्थानिक संस्कृती नष्ट होण्याऐवजी त्यांची स्वयंपूर्णता टिकून राहून त्यांचे एकमेकांशी जोडलेले वैश्विक महाजाल तयार व्हावे असेही प्रयत्न जगभर चालू आहेत. मराठी माणसांचे संख्याबळ इतके आहे, की त्यांनी केवळ आपापसातच मराठी बोलणे, वाचणे, लिहिणे चालू ठेवले तरी तिला धक्का लागू शकत नाही.

मात्र संख्याबळ असले, अस्तित्वाची जाणीव असली आणि वाढीची गती असली तरी भाषिक पराक्रम हा करावाच लागतो. मराठीच्या विकासासाठी आज त्याचीच आवश्यकता आहे. हे काम हिंमतीने, नेटाने आणि एकदिलाने करण्याचे आहे. भाषिक अस्मितेचे लबाड राजकारण करून किंवा नुसते शड्डू ठोकून करायचे हे काम नाही. त्यासाठी भाषेवर खरे प्रेम पाहिजे आणि आपली भाषा केवळ टिकवायचीच नाही तर वाढवायची आहे असा दुर्दम्य निश्चयसुद्धा! सध्याचा काळ हा त्यासाठी अत्यंत उपयुक्त काळ आहे.

(भाषा, साहित्य आणि समाज' या आगामी पुस्तकामधून)


**- मिलिंद बोकील**

भ्रमणध्वनी : ९४२२५१३८१६

msbokil@gmail.com



# मांजर आणि मराठी

**संजय पवार**

स्वतंत्र भारतात भाषावर प्रांतरचना झाल्यानंतर द्विभाषिकातून स्वतंत्र महाराष्ट्रासाठीच्या आंदोलनापासून, ६० साली मुंबईसह महाराष्ट्र होऊन आता ६० वर्षे होऊन गेली तरी 'मराठी भाषा' आणि 'मराठी माणूस' त्याची अस्मिता, साहित्य, संस्कृती, कला या कायम चर्चेच्या गोष्टी आजही आहेत.

भाषावर प्रांत रचनेत एकूण २८-२९ राज्यांची निर्मिती आजवर झालीय पण स्वतःच्याच राज्यात स्वभाषक राज्यकर्त्यांपुढे स्वभाषेसाठी आंदोलन करावी लागणारी मराठी ही भारतातील (आणि कदाचित जगातील) एकमेव भाषा असावी. या पराक्रम, विक्रमाची नोंद गिनीज बुकात व्हायला हरकत नाही.

'भाषा आणि साहित्य' या विषयावर चर्चा करणाऱ्या या अंकात मी हा विषय माझ्यापुरता माध्यमातील (मराठी) भाषा इतकाच मर्यादित ठेवतो. अर्थात मला जाणीव आहे 'नाटक' वगळता इतर प्रसिद्धी माध्यमात, कला माध्यमात होणारे लिखाण हे 'साहित्य' म्हणून कोणी मोजत नाही.

यात पुन्हा फरक आहे. वर्तमानपत्रातला, साप्ताहिकातला (काही) मजकूर साहित्य म्हणून पाहिला जात नाही. 'संपादकीयांची' पुस्तके निघतात पण त्यातल्या मजकुराची चर्चा, संदर्भ, राजकीय, सामाजिक नोंदी अथवा कुठल्याही क्षेत्रामधले/वरले भाष्य असेच धरले जाते. फार फार तर ओघवती, लालित्यपूर्ण किंवा सडेतोड भाषा इ. विशेषणे लावली जातात. आजही कथा, कविता, कादंबरी समीक्षा म्हणजेच साहित्य असं अभ्यासक्रमात तरी मानलं जाते. विद्यापीठही साहित्य विषयावरच्या पदव्या देताना जो अभ्यासक्रम तयार करते त्यातही वरील गोष्टींचाच अंतर्भाव असतो. नाटक अभ्यासले जाते. पण चित्रपट, पटकथा, संवाद, जाहिरातीतील शब्दयोजना, मालिका लेखन यांना 'साहित्याच्या' फुटपट्ट्या लावल्या जात नाही. त्याला साहित्य समजले जात नाही. ज्या 'कथे'वर चित्रपट बनतो, ती प्रकाशित, अप्रकाशित पण रूढार्थाने कुणा साहित्यिकाने लिहिली असेल तर ती साहित्य म्हणून गणली जाते. पण त्याच कथेवरची पटकथा, संवाद साहित्य ठरत नाही. चित्रपटासाठी स्वतंत्रपणे लिहिलेली कथा ही साहित्य म्हणून धरली जात नाही. पण हे सर्व प्रकार भाषेशी निगडित असल्यामुळे आणि ते एकाचवेळी अनेकांशी संवाद साधणाऱ्या माध्यमातून प्रसारित, वितरित होत असल्याने, प्रत्यक्ष साहित्यातील भाषेपेक्षा या माध्यमातील भाषा अधिक परिचित वापराची, ओळखीची आणि त्यामुळेच आजच्या भाषेत 'ट्रेंडी' होते. भाषेच्या या ट्रेंडीपणाला अनेकांचा आक्षेप असतो कारण हा ट्रेंडीपणा भाषा हवी तशी वाकवतो, मिसळतो, व्याकरण इत्यादीचे नियम टांगणीला लावतो. हे भाषिक प्रदूषण, भाषिक भेसळ भाषेच्या खऱ्या अभ्यासकांना क्लेशदायी होते.

मराठीबद्दल बोलायचे तर सत्त्वशीला सामंतांच्या आग्रहापासून आजची मराठी कोसों दूर आलेली आहे. मोरोपंत किंवा रविकिरण मंडळाच्या काळातील व्याकरण कधीच गुंडाळले गेले आहे. त्यात 'राजभाषा' मिरवणाऱ्या शासनाच्या क्लिष्ट मराठीने इंग्रजी सोपे केले. दरम्यान साहित्यात आलेल्या साठोत्तरी, ग्रामीण, दलित, आदिवासी, भटके, स्त्रियांच्या लेखनाने साहित्याची भाषा, मापदंड मोडल्याने विस्मृतीत गेलेल्या किंवा छापल्या न गेलेल्या बोलीभाषा प्रचलित झाल्या आणि 'ण'च्या ऐवजी 'न' हे न्यूनगंडा ऐवजी सहज किंवा प्रसंगी अहंगंडाने म्हटले जाऊ लागले. भाषेच्या (प्रथम) सादशिवपेठी नंतर (उघड) ब्राह्मणी वर्चस्वाविरुद्ध जवळपास युद्धच पुकारले गेले. कारण या वर्चस्वाला नाकारणाऱ्यांचे साहित्यविषयक तत्त्वज्ञान 'जगणं आणि लिहिणं' यातलं अंतर पुसणारं होतं. त्यामुळे भाषेचा प्रश्न प्रथमच पुस्तकी छापीलपणातून जीवन, संस्कृती, राजकारण, समाजकारण या सगळ्याशी भिडला. मराठी साहित्याला बहुविध आयाम मिळाले. हे सकारात्मक बदल ज्यांना पचवता आले नाही त्या आधुनिक वाल्मिकींना 'आता रसाळ नामदेवाचा काळ गेला आणि ढसाळ नामदेवाचा काळ आला' अशी उपरोधिक सल व्यक्त करावीशी वाटली.

जातिव्यवस्थेच्या विरोधातील लढ्याने आणि त्यातील कणखर नेतृत्वाने शिक्षणाची दारे दलित, स्त्रिया यांसाठी खुली केली गेली. याचप्रमाणे सत्तेवर असलेल्या मध्यम जातींनी शिक्षणाचं महत्त्व जाणून सरकारच्या माध्यमातून 'शाळा' सर्वदूर नेल्या आणि शेतकऱ्याची, बलुतेदारांची मुलेही शिकू लागली.

शिक्षणाचं हे सार्वत्रिकरण जातीसंस्थेतल्या वरच्या वर्गातल्या काहींना फारसे रुचले नाही. 'व्यवस्थेने' म्हणजे धर्मव्यवस्थेने दिलेला शिक्षणाचा एकाधिकार लोकशाही व्यवस्थेत वाटला गेला तेव्हा आपल्या जातिधिष्ठित वर्चस्वासाठी मग, देश सोडून गेलेल्या ब्रिटिशांच्या इंग्रजीला वाघिणीचे दूध म्हणून या भाषेचे वर्चस्व प्रस्थापित करत नेले. त्यासाठी प्रसंगी चर्च नियंत्रित कॉन्व्हेंट शाळा ते देशी 'इंग्रजी माध्यमाच्या शाळा' यामध्ये मुलांना शिकवून उद्याच्या

जगासाठी तयार केले गेले.

भाषावार प्रांतरचना असली, मराठी राजभाषा असली तरी प्रशासन, न्यायालय आदी मुख्य संस्थांचा कारभार ब्रिटिश इंग्रजी व त्यातल्या आदर्शानुसारच चालत होता. इंग्रजीचा हा वाढता प्रभाव लक्षात घेऊन मग सत्ताधारी मध्यमजातींनी, सहकाराच्या माध्यमातून आलेल्या समृद्धीमुळे जिल्हा, तालुका स्तरावरही इंग्रजी माध्यमाच्या शाळा घाऊक पद्धतीनं उघडल्या. विनाअनुदान धोरणाने तर रात्रीत शिक्षणमहर्षी, शिक्षणसम्राट तयार झाले. जात्यावरच्या ओव्यांचं जिथे गुणगान होई तिथे 'ट्विंकल ट्विंकल लिटील स्टार' ऐकू येऊ लागले. अशा या अनियंत्रित परिस्थितीमुळे सर्वप्रथम उच्चभ्रू, सवर्ण घरात पप्पा, मम्मी, डॅडी अवतरले. न्याहारी जाऊन ब्रेकफास्ट झाला. पाट जाऊन डायनिंग टेबल आले, तूप पोळी जाऊन ब्रेड बटर आले आणि जे अधिक धीट झाले त्यांनी थालीपिठाऐवजी 'ऑम्लेट' जवळ केले.

आपल्या समाजात बदल वरून खाली झिरपत असल्याने हा भाषिक संकर सदाशिव पेठेतून, पार तासगाव, माणगाव व्हाया शिवाजी पार्कला गेला, रुजला. ज्यांच्या घरात मराठी बाराखडीही नीट शिकली गेली नव्हती, त्यांच्या दुसऱ्या तिसऱ्या पिढीतली मुलं मुली थेट इंग्रजी माध्यमात शिरल्या. त्याचा अतिरेक विसावे शतक संपतानाच सुरू झाला. इंग्रजी माध्यमातल्या 'बालवाडी' नव्या भाषेत केजी, प्रीकेजी प्रवेशासाठी आदल्या दिवशी रात्रीपासून पालक रांगा लावू लागले. प्रचंड शुल्क, जाचक अटी या सगळ्याचा त्रास सहन करत 'इंग्रजी यायला पाहिजे' या हट्टापायी, गैरसमजुतीने उच्चशिक्षित पालकांपासून निरक्षर पालकांनीही या साथीच्या रोगाची वाढ करण्यास मदत केली. याचा परिणाम असा झाला इंग्रजी माध्यमाने मुले स्मार्ट झाली. त्यांना चांगल्या नोकऱ्या, चारचौघात सन्मान, सार्वजनिक आत्मविश्वास आणि जागतिकीकरणामुळे जगभरातल्या संधी दारी चालून आल्या. संगणक क्रांतीत 'चीन'सारखा स्वभाषा, लिपीचा आग्रह न धरल्याने आज्ञाप्रणाली इंग्रजीतच राहिल्याने आता जर इंग्रजी येत नसेल तर तुम्ही 'भंगारात' अशी स्थिती तयार झाली. मराठी विषयाचे विद्यार्थी कमी झाल्याने विद्यापीठीय चिंता वाढली, कॉलेजांमध्ये मराठीच्या प्राध्यापकांची अवस्था शाळेतल्या पीटी अथवा ड्रॉइंग टिचर सारखी झाली. मराठी वर्तमानपत्र, वृत्तवाहिन्या, नाटक, चित्रपट यासाठी इंग्रजी माध्यमातले मराठी शिरले आणि अमृताच्या पैजा जिंकणाऱ्या भाषेच्या प्रदेशात घराघरातल्या मुलांना 'मराठी डिफिकल्ट' जाऊ लागली.

यातला पुढचा भाग गंभीर आणि गंमतीशीर होत गेला. भाषा बदलल्याने मूळ भाषिक संस्कार, रीतीरिवाज, मूल्य यांनाही तिलांजली देऊन नवी पिढी मोकाट सुटली तेव्हा पुन्हा भाषिक चिंता, संस्कृती यांच भवितव्य सतावू लागलं.

दरम्यान मुंबई टाइम्स, ईव्हनिंग न्यूज, ग्रेट भेट, शो टाईम, चॅनेल सर्फिंग, रिमोट माझा, थँक्यू, लव यू, सेक्सी, ऑसम, माईंडब्लोईंग, टचवूड, स्वेअर, फक्, एलओएल, लाईक, किस, हग, स्वीट, क्यूट अशा संकरित शब्दांनी माध्यमं आणि नवीन जग व्यापलं. पूर्वी इंग्रजी शब्दार्थ शोधायला डिक्शनरी लागे. आता मराठी शब्दकोश पहावा लागतो.


आज मराठी पुस्तकं खपतात, पण त्यात 'साहित्य' कमी खपतं, रेसिपी, व्यायाम, धार्मिक, कलाकुसर यांचा आकडा जास्त. मराठी नाटक व चित्रपटाला मुंबई पुण्याबाहेर प्रेक्षक नाही. चोवीस तास चालणाऱ्या वाहिन्या महिना शे-दिडशे रुपयात बघायला मिळत असल्याने ब्रेकिंग न्यूजचा तडका आणि निर्बुद्ध मालिका, सुमार विनोद, जेमतेम अभिनय येणाऱ्या पण अंगप्रत्यंग चांगले असणाऱ्या तथाकथित अभिनेत्री, अभिनेते यांना सुगीचा काळ आलाय. या सर्व माध्यमातलं मराठी हे रनिंग मराठी असते. म्हणजे शब्द वाक्य हे कुठेही कसंही वापरलेलं असतं. 'अर्थ' कळला ना एवढीच माफक नाही तर कमाल अपेक्षा असते. जाहिरातीतील भाषा तर जगभरातच नवे शब्द, वाक्प्रचार, भाषिक संकर करण्यात पहिल्यापासून आघाडीवर आहे. त्यामुळे दाताची सुरक्षा, माझी फॅमिली, माझी मम्मी बेस्ट, स्कीनची काळजी अशा शब्दांना सरावलोय आपण. हिंदी व मिंग्लीश आता पॉप्युलर आहे. इंग्रजीत लिहिणारे तरुण मराठी लेखक लोकप्रिय, अधिक मानधन घेणारे सेलेब्रिटिज झालेत.

हे सगळं कुणी आपल्यावर लादलं का? नाही. आपणच ते पुढे होऊन स्वीकारलय. मराठी संस्कृती म्हणजे गणपती उत्सव, पाडवा, दिवाळी अशी धार्मिक व शिवजयंती, भीमजयंती अशी राजकीय एवढंच उरलंय. साहित्य संमेलने, पुरस्कार वगैरे म्हणजे आपलेच हार आपल्या गळ्यात.

या धेडगुजरी (फ्यूजनचा ग्राम्य अवतार) जगण्यात मग तरुण मुलींनी नऊवारी नेसून, नाकात नथ घालून भगवा झेंडा घेऊन घोड्यावर बसणे, वाघ मागे लागल्यासारख्या भर रस्त्यात काही मिनिटात भव्य रांगोळ्या काढणे, फुगड्या खेळणे, तुताऱ्या फुंकणे आणि (आपले आपणच) ढोल बडवणे. यातून मराठी संस्कृती म्हणून पुन्हा ब्राह्मणी संस्कृतीचं पुनरुज्जीवन करणे. शिवरायांच्या नावाने मुस्लिम द्वेष वाढवणे, इतर प्रांतीयांना टारगेट करून राजकीय मतलब साधणे आणि मराठी माणूस, मराठी भाषा, साहित्य, संस्कृती यांच्या नावाने 'रुदाली रुदन' करणे. एवढं आणि एवढंच आम्ही करतो किंवा करू शकतो. कारण मांजर जसं नवजात पिल्लांपैकी कमजोर असतं त्याला स्वतःच खाऊन टाकते तशी आम्ही मराठी लोकांनीच मराठी उपयोगाची, रोजगाराची, साहित्यनिर्मितीची, दळणवळणाची व्यवहारोपयोगी म्हणून कंडम ठरवून तिला अशक्त, कमजोर केलेय आणि मांजरीसारखीच आपण ती खाऊन टाकलीय.

आता मांजरासारखेच डोळे मिटून युगे लोटल्यावर पुन्हा जाग येऊन मांजरासारख्याच आम्ही मिशा चाटू लागलोय. मराठी अभिमान, स्वाभिमान आता मार्जार मिशांपुरता व तितकाच उरलाय. मांजरासारखेच पायात घुटमळत अथवा मांडीवरची सुरक्षित जागा शोधावी तशी मराठीची आंदोलने! त्यात स्थळ, काळ बदल आहे पण डोळे मिटून डुलकी घ्यायची सवय थेट मांजराची.

**– संजय पवार**
भ्रमणध्वनी : ९८९२५२१२५१
writingwala@gmail.com




# असा एकूण सारा गोंधळ आहे

**नामदेव माळी**

**खुजेपणा डोळ्यांनी दिसत असतो. धरलं तर चावतं सोडलं तर पळतंय अशी अवस्था. काय चूक काय बरोबर? कोणाच्या बाजूनं उभं रहायचं? समूहजाणीव कमी झालीय. यातही समृद्धीची बेटं दिसतात. आशा करावी अशा गोष्टी घडतात. चांगल्याच्या, सत्याच्या बाजूनं उभं राहणं लेखकाचं काम आहे.**

मी खेड्यात जन्मलो, खेड्यात वाढलो. खेड्यातली माणसं, जाती-पाती, त्यांच्या रूढी, परंपरा, रिती, सण, उत्सव रसरसून अनुभवलं. रात्ररात्र शाहिरी ऐकली, धनगरी ओव्या ऐकल्या. पारावरचा तमाशा बघितला.

पूर्वीचं खेडं सुखी नसेल पण समाधानी होतं. भांडण करून का होईना मोकळी व्हायची माणसं. शिव्या देऊन निचरा व्हायचा मनाचा. पुन्हा सारं विसरून एकमेकांबरोबर व्यवहार सुरू. सकाळी भांडणारी माणसं संध्याकाळी एकमेकांच्या मदतीला धावून जायची. डूख धरून राहणारी, सूड उगवणारी माणसं कमी. खितपत पडणं नाही. इथली शिवी सुद्धा अलंकारिक होती. करमणूक दुसऱ्यानं करावी आणि आपण आनंद घ्यावा येवढं मर्यादित नव्हतं. लहान मुलं-मुली ते वृद्धांपर्यंत प्रत्येकाला व्यक्त व्हायला संधी होती. बेंदराला चिखलाची बैलं करायची असोत, दिवाळीला गायी बैलांना पहाटे ओवाळून म्हणायची गाणी असोत, लेझीम, दांडपट्टा अशी कितीतरी गोष्टी. मुलींची हदग्याची, पंचमीची गाणी, झिम्मा-फुगड्या, लग्नातील रुखवत अशा स्त्रियांच्या कला आणि साहित्य हे भव्य भांडार होतं. माणसं रसरसून जगायची.

प्रत्येकाच्या हाताला आणि मनाला काम होतं. वृद्ध स्त्रिया-पुरुष नातवंडाना गाणी-गोष्टी, गंमती सांगायचे. नकला करायचे. वृद्ध स्त्रिया वाकळ शिवण्याचं, भुईमुगाच्या शेंगा फोडून बिया काढण्याचं काम करायच्या. काम करता करता गाणी, गोष्टी, गप्पा, कोडी सुरू असायची.

सोंगी भजन, होळीची-मोहरमची सोंगे, गावागावात गावातल्या माणसांनीच लिहिलेली नाटकं बसवली जायची. शाळेतल्या सांस्कृतिक कार्यक्रमात नट तयार व्हायचे.

जागतिकीकरणाचं, शहरीकरणाचं खेड्यावर आक्रमण झालं. एक एक गोष्ट ढासळू लागली. आता या संक्रमणाच्या अवस्थेत रूढीपरंपरांचे अवशेष दिसतात. मोडतोड केलेली रंगवलेली बेगडी संस्कृती 'इव्हेंट' करून दूरदर्शनच्या पडद्यावर दाखवली जाते. बांधून ठेवल्यासारखे रतिबाचे कार्यक्रम बघितले जातात. आपली ऐपत आणि गरज नसताना तिथं केलेल्या जाहिरातींचा माल घेतला जातो. मी एकदा सांगोला तालुक्यात गेलो होतो. हा दुष्काळी तालुका. कडक उन्हाळा. रापलेले चेहरे. ठिबक सिंचनावर लावलेल्या डाळिंबाच्या बागा. वाळलेल्या. वाळलेल्या बागेत मला फेअर ॲण्ड लव्हलीच्या क्रीमची रिकामी ट्यूब सापडली. उन्हात मला घाम आला होता. मी विचार करू लागलो. ही क्रीम काय उपयोगाची इथं. कोण गोरं होणार? कसं गोरं होणार? सौंदर्याच्या कल्पना बदलल्या. लग्न करताना पूर्वी मुलगीचे-मुलग्याचे आई-वडील, आजोबा, त्यांचं आरोग्य, मुलामुलीचं आरोग्य, त्यांची शेतात काम करण्याची क्षमता आणि कौशल्य अशा बाबीही बघितल्या जायच्या. आता खेड्यातल्या मुलालाही 'झिरो फिगरची' बायको हवी.

मूल्ये बदलली. पैशामध्ये किंमत केली जातेय. एकमेकांच्या मदतीला धावून जाऊन शेतीतली कामं करून देणं. सर्वांनी मिळून मागे पडलेल्याला बरोबर घेणं. पावनेर, इर्जिक सारख्या प्रथा क्वचित दिसतात. मजूरही घड्याळाच्या काट्याबरोबर काम करतो आणि तोही वेळेला मिळत नाही. खेड्याची घडी विस्कटलीय. सरमिसळ होतेय. हे सगळं टिपताना कसरत करावी लागतेय. आजची गोष्ट उद्या असत नाही. मग राजकारणातील गोष्ट असो नाहीतर शेतातील. माझी 'खरडछाटणी' ही कादंबरी द्राक्षपीक मध्यवर्ती ठेवून लिहिली आहे. दहावर्षांपूर्वीचा काळ कादंबरीमध्ये आहे. द्राक्षाचे दर जवळपास आजचेच वाटतात. रोग रोज बदलतोय. औषधं रोज बदलताहेत. जाहिराती आणि तज्ज्ञ सांगतात हे नको ते औषध वापरा. कित्येक वर्षे चांगले म्हणून वापरलेल्या किटकनाशकावर बंदी. किटकनाशकाचा दोष की धोरण ठरविणाऱ्यांच्या फायद्या-तोट्याचा. कालची सावकारीची पद्धती आज नाही. शिक्षक,

प्राध्यापक, डॉक्टर यासारखे लोक छुप्या पद्धतीनं सावकारी करतात. काळाच्या ओघात झटपट होणारे बदल आणि लेखकानं अनुभवलेलं विश्व याचा ताळमेळ घालतांना कसरत होते.

कोणताही लेखक असो त्यानं बालपणात, कुमारवयात अनुभवलेलं विश्व त्याच्या स्मरणात राहतं. अभिव्यक्त होताना अधिक उतरतं. नंतरचे अनुभव कमी प्रमाणात उतरत असावेत असं वाटतं. मी बालवयात ऐकलेल्या म्हणी, वाक्प्रचार माझ्या लेखनात येतात. हे अस्सल लेणं आहे असं मला वाटतं परंतु हे भाषेचं सौंदर्य आज खेड्यात दिसत नाही. भाषा बदललीय. ती धड खेड्याची भाषा नाही धड शहराची भाषा नाही. एफ.एम. रेडिओच्या जॉकीची भाषा, दूरदर्शनी भाषा, हिंदी सिनेमातून येणारी भाषा खेड्यात घुसलीय.


संगणक, नेटचं जाळं, मोबाईल, फेसबुक, वॉटस् अॅप हे खेड्यात आलंय. जागतिकीकरणानं सगळं घराघरात पोहोचवलंय. परंतु जाती अधिक घट्ट होत आहेत. दलितांच्यावरचे अत्याचार वाढत आहेत. स्त्रियांवरचे अत्याचार वाढत आहेत. अंधश्रद्धा स्वतःला एकविसाव्या शतकातील विद्वान समजणारांमध्येच जास्त वाढत आहेत. अशा ढोंग करणाऱ्यांना प्रतिष्ठा मिळतेय. दारू पिणंही प्रतिष्ठेचं झालंय. नेमकं काय आणि कसं पकडायचं या गोंधळातलं. प्रत्येकजण स्वतःचं जग संकुचित करू लागलाय. शहाण्यालाही पैसाकिड्यासारखं आकसून, गुंडाळून घ्यावं लागतंय. तरीही नफा-फायदा या मूल्यावर डोळा ठेवावा लागतोय. नोकरी करणारी बायको हवी पण मला हवी ती संस्कृती तिनं जपायला पाहिजे. वटपौर्णिमेला वडाच्या झाडाला फेऱ्या मारल्या पाहिजेत. नवरात्रीतले उपवास केले पाहिजेत. तिनं मुलीला जन्माला न घालता मुलगा जन्माला घातला पाहिजे. या ढोंगाला सन्मान दिला पाहिजे. या ढोंगाची, संकुचित वृत्तीची भव्य कलाकृती कशी निर्माण करायची. हे अधःपतन आणि एकसंध नसलेली, आकारहीन व्यवस्था कशी पकडायची हा प्रश्न आहे. दाखवायची मूल्ये वेगळी आणि बाळगायची मूल्ये वेगळी. स्वातंत्र्य, समता, बंधुता घटनेत आणि शाळेत. शाळेतही ढोंगच. वैज्ञानिक दृष्टिकोन हे मूल्य आणि संस्कृतीच्या नावावर कर्मकांड, देवदेवतांची पूजा आणि प्रार्थना.

माझा जन्म खेड्यातला. वाढ खेड्यात झाली. पोषण खेड्यातल्या वातावरणात झालं. त्या अनुभवावर 'खरडछाटणी' आणि 'छावणी' या कादंबऱ्या लिहिल्या. सध्याचं कार्यक्षेत्र शिक्षणाचं. सर्वत्र सारखीच परिस्थिती. मीसुद्धा या समाजाचा घटक. संवेदनशील मनाला हे सगळं दिसतं. पैशाला महत्त्व आलं. भावनांना स्थान नाही. जात-धर्म-खोटी प्रतिष्ठा यावरून मात्र भावना टोकदार होतात. दहशत माजते. खुजेपणा डोळ्यांनी दिसत असतो. धरलं तर चावतं सोडलं तर पळतंय अशी अवस्था. काय चूक काय बरोबर? कोणाच्या बाजूनं उभं रहायचं? समूहजाणीव कमी झालीय. यातही समृद्धीची बेटं दिसतात. आशा करावी अशा गोष्टी घडतात. चांगल्याच्या, सत्याच्या बाजूनं उभं राहणं लेखकाचं काम आहे.

शिक्षण क्षेत्रातले आम्ही. जगातल्या सगळ्या नवीन गोष्टी आमच्या वैयक्तिक आयुष्यात स्वीकारतो. स्वतःच्या मुलांना देतो. समतेचं तत्त्व शिकवतो. समता पुस्तकातून बाहेर येत नाही. शिक्षणातल्या नव्या संकल्पना आम्ही स्वीकारत नाही. उलट त्याला विरोध करू. अशांची संख्या जास्त. मांडायचं काय? द्विधा अवस्था. यातूनच 'शाळाभेट' या पुस्तकाचा जन्म झाला. जीव ओतून काम करणाऱ्या शाळा, असे शिक्षक आहेत काय? भ्रष्टाचार न करणारे अधिकारी आहेत काय? असे प्रश्न समोर आले. या प्रश्नांमध्ये वावगं काही नाही. दोन्ही बाजू खऱ्या वाटतात. मग पुढं आणायचं काय? भूमिका काय घ्यायची? सरकारी शाळांत ही स्थिती. खेड्यातल्या खाजगी शाळातही काही वेगळी परिस्थिती नाही. दुसऱ्या बाजूने उद्योगपती या क्षेत्रात येत आहेत. इंटरनॅशनल स्कूल्स नावाच्या शाळा निघत आहेत. ही सुद्धा एक 'शाळा'च आहे. या स्कूल पॉश, चकचकीत स्वप्न दाखविणाऱ्या, भूलभुलैया! प्रगती करण्यासाठी, दर्जा उंचावण्यासाठी, गुणवत्ता वाढीसाठी ही आवश्यक गोष्ट आहे असं म्हटलं तर त्यांना उभा करणाऱ्यांना नको म्हणायचं कां? सरकारीची पडझड सुरू आहे आणि खाजगी गरिबाला परवडणार नाही. सरकारीमध्ये वीज बील भरायला पैसे नाहीत आणि स्कूलमध्ये प्रत्येकाला टॅब आहे. सरकारीमध्ये सर्व यावं असं वाटलं तरी तिकडे गोंधळ धोरण ठरविणाऱ्यांचा आणि धोरण राबविणाऱ्यांचा. आजचे धोरण ठरविणारे आणि धोरण दोन्हीही उद्या नसते. गोंधळात गोंधळ. तिसरी एक बाजू आहे, शाळाच नको म्हणणारी. No schoolingची संकल्पना मूळ धरतेय. मूल शाळेतच पाठवायचं नाही. पुन्हा गोंधळ.

शेतीचंही तसंच आहे. रासायनिक खते, औषधांचा मारा, संकरित बियाणे याचा वापर करून भरमसाट उत्पादन घेतलं जातंय. प्रत्येकाला आपला माल खपवायचा आहे. खतं, औषधं धोकादायक आहेत. या बियाणांपासून दुसरे बियाणे तयार होत नाही. रोग आवरत नाही. जमीन नापिक होतेय. हे नाही करावं तर शेतकरी मरतोय. केलं तरी मरतोय. शेतकऱ्याचे राजा म्हणून उदात्तीकरण केले. जगाचा पोशिंदा अशी भाबडी समजूत त्याने करून घेतली. हा पोशिंदा आत्महत्या करतोय. शेताचे प्लॉट पाडून विकतोय. कशाचाच भरवसा नाही. असा एकूण सारा गोंधळ आहे.

**– नामदेव माळी**
भ्रमणध्वनी : ८६५७२५२९६२
namdeosmali@gmail.com



# जागतिकीकरणात बोलींचा नवा सर्जनाविष्कार

## अशोक कौतिक कोळी

साहित्य म्हणजे समाजमनाचा आरसा! त्यात त्या त्या काळातील समाजाचं भलेबुरे प्रतिबिंब पडलेले असते. या विधानाच्या पार्श्वभूमीवर आजच्या मराठी साहित्याचे स्वरूप पाहणे औत्सुक्याचे ठरते. त्यासाठी वर्तमान समाजवास्तवाचा कानोसा घेणे क्रमप्राप्त ठरते.

**बालकवींच्या कवितेतील मखमली गालिच्याची हिरवळ येथून केव्हाच दुरापास्त झाली आहे. तिची जागा अस्मानी, सुलतानी दुष्काळाने होरपळून निघणाऱ्या जमिनीने घेतली आहे. आजमितीला येथला कलाकार कर्जाचा डोंगर उपसता उपसता मातीत गाडला जात आहे. त्याच्या शेतात पीक कमी अन् 'कुंधा' जास्त झाला आहे.**

स्वातंत्र्योत्तर काळातील बदलती जीवनमूल्ये कवटाळल्याने नीतिमूल्यांची होणारी घसरण, त्यातून आलेली पडझड-फरफट असे आजच्या समाजाचे स्वरूप आहे. आजचे मराठी समाजाचे विशेषतः महाराष्ट्राचे यासंदर्भातील चित्र भयावह आहे.

वीज नाही, पाणी नाही, शेतमालाला भाव नाही. शेतकऱ्यांची अवहेलना, निसर्गाची अवकृपा, अंधश्रद्धा-भोंदूबाबांची चलती यामुळे येथील कास्तकार समाज खचलेल्या हतबल मानसिकतेत जगत आहे. परिणामी दिवसेंदिवस दारिद्र्याच्या खाईत ढकलला जात आहे. शासनाचे धोरण याला प्रामुख्याने जबाबदार आहे.

आश्रयदाताच आजचा शोषणकर्ता ठरला आहे. ज्याच्याकडे अपेक्षेने पाहावे त्या निसर्गाकडूनही तो वारंवार नागवला जात आहे. राजकीय नेतृत्वाकडून फसवला जात आहे. अशा दुष्टचक्रात आजचा शेतकरी समाज सापडला आहे. त्याच्या भोवतीचे वास्तव अकल्पित, भयावह व चक्रावून टाकणारे आहे. प्रचंड कोलाहल, ताणतणाव, अंतर्विरोध, जीवघेणी स्पर्धा त्यात आहे.

परस्परांविषयी वाढीस लागलेला अविश्वास, लोप पावत चाललेली आस्था, सहृदयता, स्वार्थलोलुपता, आत्मसंकुचितता यात वेगाने वाढ होत आहे. भौतिक सुखासाठी चटावलेला, प्रसंगी मूल्ये पायदळी तुडवणारा असाहाय्य, हतबल माणूस हे आजचे वास्तव आहे. त्याच्या प्रत्येक कृतीकडे आर्थिक कंगोऱ्यातून पाहण्याची वृत्ती बोकाळलीय.

सत्ता हे सेवेचे माध्यम उरले नसून पैसे कमवण्याचे साधन बनले आहे. त्यातून राजकारणी-दलाल-गुंडगिरी यांची साखळी निर्माण झाली आहे. सत्तेतून पैसा, पैशांतून सत्ता, असे दुष्टचक्र तयार होत आहे, ज्याला भेदण्याची ताकद अर्थातच सामान्य माणसात उरलेली नाही.

या वास्तवाच्या तळाशी बदलत चाललेली सामाजिक, आर्थिक पृष्ठभूमी जरूर आहे. ही पृष्ठभूमी उभी आहे मुळातच जागतिकीकरणाच्या पायावर. १९९१ मध्ये स्वीकारलेल्या खुल्या आर्थिक धोरणाचे परिणाम एकत्रितपणे आपल्या अर्थव्यवस्थेवर दिसू लागले आहेत. असेही दिसून आले आहे की, कुठल्याही समाजव्यवस्थेत हे जाणवते की ज्या ज्या वेळी अर्थव्यवस्थेमध्ये लक्षणीय बदल घडून येतात त्या त्या वेळी त्या बदलांना चिकटून मूल्यव्यवस्थाही बदलत जाते. त्यासोबतच त्या समाजाची मानसिकताही आपोआप बदलते. जागतिकीकरणाच्या अनुषंगाने येणारी सत्ताकांक्षा, विधिनिषेधशून्यता, न-नैतिक राजकारण, त्यातून येणारे अराजक, मूलतत्त्ववाद, भाषा-संस्कृतीसह एकूणच क्षेत्रीय अस्तित्वासाठीची लढाई, अनिश्चितता समोर येतांना दिसते.

आज संपूर्णपणे मूल्यांपासून फारकत घेतलेला नवश्रीमंतांचा एक वर्ग पुढे आलेला दिसतो. या वर्गाने आजवरच्या दारिद्र्यावर सूड उगवत असल्याप्रमाणे चंगळवादी वृत्तीने सगळ्याच गोष्टी ओरबाडायला सुरुवात केलेली आहे. जागतिकीकरणामुळे सगळ्या व्यवस्थांची, विचारसरणींची, तत्त्वज्ञानाची, ज्ञानशाखांची, मानसिकतेच्या मूल्यांची, नात्यांची छिन्नविछिन्न अवस्था झालेली आहे.

अनेक घटना बाहेरून दिसतात तशा आणि तितक्या सरळसोट नसतात. एखाद्या वरकरणी क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टीलाही राजकीय, धार्मिक, आर्थिक कंगोरे असू शकतात. आजचे वास्तव इतके आभासी बनले आहे, की त्यात तुकड्या तुकड्याने समोर येणाऱ्या वास्तवाची सुसंगत मांडणी कशी करावी हा प्रश्न पडतो. या वर्तमानाचे भान राखून आजच्या गोंधळाच्या, विस्कळीत झालेल्या नव्या वास्तवाची मांडणी करू पाहणारी लेखकांची एक पिढी या दीड दोन दशकात पुढे आलेली दिसते.

नव्या शतकात साहित्याला एक नवी दिशा आणि साहित्य

निर्मात्यांना आत्मभान दिल्याने आज २१ व्या शतकाच्या प्रारंभी नवे आकलन आणि कालबाह्य होऊ पाहणारी गावगाड्याची संस्कृती यांचा बोलीभाषेतून घेतलेला वेध दृष्टीस येतो.

अशा कितीतरी परिणामांनी, परिप्रेक्ष्यांनी व्यापलेले ग्रामजीवन नव्वदोत्तर दशकातील, उगवत्या शतकातील साहित्याचा वर्ण्यविषय बनला आहे. समकालीन जाणिवांना आपल्या कवेत घेत नव्या पिढीतील साहित्यकार मराठीच्या क्षेत्रात वऱ्हाडी, मालवणी, अहिराणी, मराठवाडी, तावडी, कोकणी, कोल्हापुरी, झाडीबोली अशा सर्वच प्रादेशिक जाणिवांना, बोलींना आणि जीवनचिंतनाला खऱ्याखुऱ्या अर्थाने साहित्यरूप देत आहेत.

यात प्रामुख्याने सदानंद देशमुख (तहान, बारोमास), भारत काळे (ऐसे कुणबी भुपाळ), रमेश इंगळे-उत्रादकर (निशाणी डावा अंगठा, सर्व प्रश्न अनिवार्य), गणेश आवटे (कागूद, भिरूड), कृष्णात खोत (गावठाण, रौंदाळा), महेंद्र कदम (धुळपावलं, आगळ), प्रवीण बांदेकर (चाळेगत), आसाराम लोमटे (आलोक), जयंत पवार (काय डेंजर वारा सुटलाय), समर खडस (बकऱ्याची बॉडी), किरण गुरव (राखीव सावल्यांचा खेळ), अशोक पवार (इळनमाळ), कैलास दौंड (कापूसकाळ), बालाजी इंगळे (झिम पोरी झिम), सरदार जाधव (दात), आनंद विंगकर (अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट), विजय जावळे (रयणी), रफिक सूरज (रहबर) इत्यादी साहित्यकारांचा समावेश होतो.

आजच्या मराठी भाषेची ही कितीतरी रूपं आहेत. बोली ही त्या त्या देशाची ओळख असते. वरील लेखकांचे लेखन साहजिकच वास्तवाचे चित्रण करतांना बोलीभाषेचा सर्जक सहानुभव निर्माण करते. ही साहित्यातील लिखित रूपं आहेत. या व्यतिरिक्तही अनेक बोलीभाषा त्या त्या प्रदेशात, समाजसमूहात आपापला संसार थाटून आहेत. ह्या बोली प्रमाण मराठीची फारमोठी ताकद आहेत.

बोली प्रमाण भाषेला एकप्रकारची संजीवनी प्राप्त करून देते. बोलीतील विविध शब्द, वाक्प्रचार, म्हणी, संकेत यांचा वापर साहित्यातून व्हायला लागल्यावर त्यांना एकप्रकारची प्रतिष्ठा लाभते. नंतर हेच शब्द समाजात रूढ होतात व त्यातून भाषा विकसित पावते. या हेतूनेच नव्वदोत्तरी साहित्यिकांनी बोलींच्या माध्यमांतून मोठ्या प्रमाणावर साहित्य निर्मिती केली.

या परिप्रेक्ष्यातून माझा भोवताल माझ्या लेखनातून आकळण्याचा एक लेखक म्हणून माझाही प्रयत्न राहिला आहे. कोणताही लेखक हा साहित्यकृतीचा निर्माता असला तरी तो एक लोकसमूहाचा घटक असतो. या पार्श्वभूमीवर माझा भवताल जाणून घेणे गरजेचे ठरते. मी ज्या लोकसमूहाचा, भूप्रदेशाचा प्रतिनिधी आहे, तो खानदेशही जागतिकीकरणाने वाढून ठेवलेल्या भल्याबुऱ्या परिणामांच्या तिठ्यावर उभा आहे.

भ्रष्ट प्रशासन, कापूस-केळीच्या भावाचा प्रश्न, कर्जदार सावकार, व्यापारी, पतपेढ्यांनी-सोसायट्यांनी आवळलेला फास यांच्या चक्रव्यूहात येथला शेतकरी समाज अडकून पडला आहे. निसर्गासह सर्वच स्तरांवरील शोषणकर्त्यांनी त्याला पुरेपूर नागवून टाकले आहे. परिणामी येथील शेतीव्यवसाय आतबट्ट्याचा ठरला आहे.

बालकवींच्या कवितेतील मखमली गालिच्याची हिरवळ येथून केव्हाच दुरापास्त झाली आहे. तिची जागा अस्मानी, सुलतानी दुष्काळाने होरपळून निघणाऱ्या जमिनीने घेतली आहे. आजमितीला येथला कलाकार कर्जाचा डोंगर उपसता उपसता मातीत गाडला जात आहे. त्याच्या शेतात पीक कमी अन् 'कुंधा' जास्त झाला आहे.

परिणामी शेती मरणपंथाला लागली असून एकेकाळी सुखी, संपन्न असलेल्या खानदेशात शेतकरी आत्महत्यांची मालिका उभी ठाकली आहे. या आत्महत्यांचा संदर्भ घेऊन एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात माझ्याकडून 'कुंधा'सारखी कादंबरी लिहून होते, ही माझ्यासाठी निश्चितच समाधानाची बाब ठरते.

याच दशकात 'कूड', 'असूड', 'पाडा' यासारख्या लेखनकृतींद्वारे माझ्या निर्मितीप्रदेशातील भवतालाला आकळण्याचे काम काही प्रमाणात माझ्याकडून झाले. हे सगळे प्रयत्न खास खानदेशी 'तावडी' बोलीतून झाल्याने खानदेशी तावडी बोलीला वाङ्मयीन प्रतिष्ठा आणि ती बोली बोलणाऱ्या समूहाच्या जगण्याला साहित्याची आशयवस्तू होण्याची संधी यानिमित्ताने प्राप्त झाली.

तावडी बोलीतील लिखित साहित्यात तावडी बोली भाषिक परिसरातील इतरही लेखकांनी ग्रामीणता, शेतीच्या समस्या, निसर्ग, देवदेवता, सणउत्सव, स्त्रीजीवन, गावगाडा, संस्कृतीचे दर्शन घडवले आहे. या सर्वांच्या साहित्यातून अनेक नव्या शब्दांची भर मराठी साहित्यात पडली आहे. जसे की -

आठी (येथे), आडोंगी (च्या मागे), आखर (शेवट), आधोडा (भुकेला), आभूट (ढग), आब (प्रतिष्ठा), इधन (संकट), इधोय (संकट), इझान (शांतता), इखार (मत्सर), इल्हागत (विरळ), इय्या (विळा), उगा (गप्प), उडतन (उतरंड), उरक (घाई), उपात (आफत), कटाया (कंटाळा), कयवार (अनुकंप), कऱ्हय (आढी न सोडणारा), करोटं (दाळधान्य), कानोडा (दबलेला), कायपता (प्रयत्न), कुपाट (कुंपण), कुकडे (कुणीकडे), कावड (दरवाजा), खयमाना (नासधूस), खयस (प्रयत्न) इत्यादी.

उखारी करणे (वाईट गोष्ट करणे), उधई लागणे (कीड लागणे), कयवार घेणे (बाजू घेणे), गवांदी होणे (भागीदार होणे), गुयचटपणा करणे (लाचारी पत्करणे), घोरपड आनने (संकट आनने), घोर घालने (अडून बसणे), चरचर करने (मध्ये-मध्ये बोलणे), चिवत्या बनाडने (लबाडीने फसवणे), झक मारने (नाईलाजाने), झुरणी लागणे (अपेक्षा बाळगणे), झोकार सोडने (संधी सोडणे), टेंभा मिरवणे (शेखी मिरवणे), ठसन मारने (वट करणे), उफडे वाजने (शेवट होणे) इत्यादी.

डोख्यात खवडे गुलालाची हावूस (ऐपत नसताना जबाबदारी उचलणे), नंग भाई नंग बोखारा तंग (निर्लज्ज सदा सुखी), नितातेल रांडले बुरायेल दाल्ला (उत्साहाच्या भरात अपयश पदरी येणे),

चांगल्याची माती बांदराची ललोपती (चांगल्या माणसाला किंमत नसणे), घरचं झालं थोडं अन् याहीबानं धाडलं घोडं (टाळता न येण्यासारखं संकट येणे), गाव जये हानुमान बोंबी चोये (प्रचंड संकटातही मदत न करणे), आट्टक मट्टक घोंगडी झटक (स्वतःच्या कोशात असणे), आयजीच्या जीवावर बायजी उदार (दुसऱ्यावर अवलंबून असणे) इत्यादी.

अशाप्रकारे अनेकानेक शब्द, वाक्प्रचार, म्हणी, लोकसंकेत यांची मराठी साहित्याला नव्याने ओळख झालेली आहे. ह्या सगळ्यांमुळे मराठीची श्रीमंती वाढणारच आहे. त्यांचे खुल्या मनाने स्वागत करण्याची गरज आहे. अशाच प्रकारचा बोलीतील खजिना लोकसाहित्यात व लोकव्यवहारात आढळून येतो. लोकजीवनात प्रचलित असलेल्या लोककथा, लोकगीते, उत्सवगीते, रुढी-परंपरा, भजन, किर्तन, पोवाडे-लावण्या यांतून त्या त्या भूप्रदेशातील बोली रसरशीतपणे वावरतांना दिसते. त्या त्या बोलीत म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, अल्हाणे, विधिगीते मोठ्या प्रमाणावर प्रचलित आहेत. यासर्वांमधून लोकांच्या रुढी-परंपरा, चालीरिती, समूहजीवनाचे दर्शन घडते. हे समूहजीवन एकसंध ठेवण्याचे, चैतन्यशील ठेवण्याचे कार्य अर्थातच बोली करत असतात. या बोलींना गावठी म्हणून हिणवण्यात काहीही अर्थ नाही.

भाषा ही परिवर्तनशील असते. काही भाषिक बदल काळानुरूप तिच्यात होतात. काही शब्द लोप पावतात तर काही नव्याने दाखल होतात. जागतिकीकरणाच्या तडाख्यात बोलींचेही असेच काहीसे होईल. त्या दबून जातील किंवा नष्ट होतील, अशी भीतीयुक्त शंका उपस्थित केली जात होती, पण तसे काहीही होतांना दिसत नाही. उलट नव्या उमेदीने त्या जगासमोर येताहेत. किंबहुना कात टाकून नवी आव्हाने पेलण्यासाठी सिद्ध झाल्या आहेत.

जागतिकीकरणाने दिलेल्या किंवा लादलेल्या अनेक आव्हानांना येथील समाजाने समर्थपणे पेलल्याचे दिसते. ह्या सगळ्या गोष्टींकडे लोक संधी म्हणून पाहतात. आधुनिकीकरणातून जी नवी उपकरणे, दैनंदिन चीजवस्तू, यंत्रे थेट बांदापर्यंत नव्हे शेतकरी, कष्टकऱ्यांचा उंबरा ओलांडून विनाअडथळा झोपडीपर्यंत पोचली आहेत. त्यांच्या नामाभिधानास समाजाने स्वीकारल्याचे दिसते.

वेल्डींग, कटर, बोरीग, हावरेस्टर, कल्टीव्हेटर, पोलो, राऊंडअप, होल्टेमॅझीक, चार्जिंग, मिसकॉल, वॉशिंग, मिक्सर, यू-ट्यूब, ब्ल्यू-टूथ, अॅक्वा, पोकलँड, फिव्हर, रोलर, कंटेनर, कुट्टी मशीन, शेवायाची चक्की यासारखे परकीय शब्द ग्रामीण लोक सहज उच्चारतांना, बोलीत सामावून घेतांना दिसतात. ते सहज म्हणतात, 'येचं डोखं 'कॉम्प्युटरच्या' पुढी चालतं', कोणी गचकल्यावर त्येच 'बॅलन्स' खल्लास झाला आशिन', जांभई आल्यास कोन 'मिसकॉल' दयून राहाला', 'त्येल्हे चार्जिंग केल्ह्याशिवाय होतं' नि 'त्येची 'मेमरी' फूल झाली' इत्यादी.

जनमानसात प्रतिभेची कमी नाही. नव्या तंत्रज्ञानाला बोलीभाषेत सामावून घेण्याची सहजता त्यांच्यात पुरेपुर आहे. अशाप्रकारे ते बोलींना पर्यायाने मराठीला समृद्ध करण्याचे काम करीत आहेत. त्यांना ह्या कामी कोणीही प्रेरित केलेले नाही. लेखक म्हणा का लोककलावंत, सामान्य कष्टकरी समाज आईला सांभाळावे इतक्या सहजतेने हे सर्जक काम करत आहेत. शासनाकडून किंवा पांढरपेशा, ओरडकर्त्या धुरिणांकडून ह्या कामी कुठलीही प्रेरक कृती होतांना दिसत नाही.



**– अशोक कौतिक कोळी**

भ्रमणध्वनी : ९७६५३९०२९७

ashokkautikkoli@gmail.com



ग्रंथाली




**माझे अंतरंग**

**डॉ. दाऊद दळवी**


**मूल्य १५० रु.**

**सवलतीत ९० रु.**

आत्मकथन म्हणजे लेखकाचा कोश. अनुभव, कल्पना, वास्तवाचे खेळ यासोबत जडणघडणीच्या मुशीतून साकारलेला...
डॉ. दाऊद दळवी यांचे 'माझे अंतरंग' हे आत्मकथन म्हणजे असाच एक कोश. इतिहासाचा व्यासंग असलेला, त्याच विषयात संशोधनाची वृत्ती जोपासलेला, स्थापत्य, शिल्प, लेणी यांचा एकेक प्रस्तर उलगडून त्यातले सौंदर्य टिपणारा, आपल्या भोवतालातील फुलत जाणाऱ्या एकेका पाकळीच्या स्थित्यंतराची नोंद करणारा, अनेक संस्थांना आपल्या पंखांत सामावू पाहणारा, आपल्याकडे आहे ते इतरांना वाटू पाहणारा, शक्य त्यांना आपल्या पंखांवर बसवून साथ देणारा, कठोर वास्तवावर मृदुत्वाचा शिडकावा करणारा...
डॉ. दाऊद दळवी यांनी केलेले संशोधन हे तर आधीच संदर्भाच्या पंक्तीत स्थानापन्न झालेले आहे. अनेक पिढ्यांचे संचित ठरावे अशी त्यांची उपक्रमशीलता आणि लेखन आहे. जे सांगायचे ते नीट आणि नेमकेपणाने, इतिहासासारखे, हा त्यांचा निश्चय. त्यामुळे एका बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा मोठा कर्तृत्वशाली कालखंड नेमकेपणाने वाचकांच्या समोर सादर झाला आहे. तोही घट्ट विणीत, फुलपाखराच्या कोशासारखा...

# आमची आगळी-वेगळी, संग्राह्य पुस्तके !

## नवी प्रकाशने



### बखर गीतकारांची

**-विजय पाडळकर**

आपल्या सदाबहार गीतरत्नांनी हिंदी सिनेसंगीताला अमरत्व देणाऱ्या जवळजवळ शंभर दिग्गज गीतकारांच्या प्रतिभेचा, त्यांच्या अनोख्या कारकीर्दीचा मागोवा घेणारी ही बखर.

(पृष्ठे- ३२८) (₹ ४००)

### थँक्स फॉर रुजुला

**-माधव जोशी**

**अनुवाद - सुहास अंजनकर**

'ती'च्या इवल्याशा पावलांची चाहूल लागली आणि त्याच्यातला 'पुरुष' बदलत गेला. एका पुरुषाने कथन केलेली ही पित्याच्या जन्माची कथा!



(पृष्ठे- २०८) (₹ २२०)




### फुले वेचिता...

**-लता मंगेशकर**


स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या लेखणीतून शब्दरूप ल्यायलेली ही त्यांच्या आठवणींची सुंदर फुले... लतादीदींच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त नव्या सुधारित रूपात रसिकांच्या भेटीला.

(पृष्ठे- १५२) (₹ १६०)

### मांसाहारी मेन्यू डायरी


**-प्रख्यात शेफ विष्णू मनोहर**

शाकाहारी मेन्यू डायरीनंतर लोकाग्रहास्तव मांसाहारींच्या जिभेचे चोचले पुरविणारी ही मांसाहारी मेन्यू डायरी!




(पृष्ठे- ३४४) (₹ ३००)

## आगामी



### सहज स्वरांतून मनातलं

**-पं. उल्हास बापट**

संतूरवादनाची नवी पद्धत शोधून संगीत विश्वात आपलं वेगळं स्थान निर्माण करणाऱ्या एका अवलियाने उलगडलेला संगीतमय प्रवास आणि मार्मिक अनुभवकथन.


### खेळिया

कथा नरेंद्र मोदी नामक झंझावाताची!

**लेखक - सुदेश वर्मा**

**अनुवाद- सुधीर जोगळेकर**

दुष्काळ-दंगलग्रस्त गुजरातला नवसंजीवनी देणारे नरेंद्र मोदी साऱ्या देशाचं आशास्थान कसं बनले याचं साधार, सुंदर विवेचन.




**आमची वैशिष्ट्यपूर्ण निर्मिती, वाचनसंस्कृतीला देते दर्जेदार मिती**

मैत्रेय प्रकाशन

पारधी हाऊस, ३ रा मजला, एम.जी. रोड, विलेपार्ले (पू.), मुंबई- ४०० ०५७.

फोन- (०२२) २६१०१०१६, २६१५०३५८.

चेतन मोहकर (अमरावती) - ८३९०३३८६०८

टोल फ्री क्र.: १८०० २२२ ६१३

E-mail : prakashanmkg@maitreyagroup.com | Website : www.maitreyaprakashan.com

**एम.ओ. करा / डी.डी. पाठवा. पुस्तकं आमच्या खर्चाने घरपोच मिळवा**

ऑन लाईन खरेदीसाठी:- www.granthdwar.com / www.majesticonthenet.com / www.infibeam.com



# ग्लोबल वास्तवाची पोतडी ओढत ओढत माझ्यातला कवी निघाला आहे...!

**ऐश्वर्य पाटेकर**

*शेळी खातेय गवताची काडी*
*कुत्रं हुंगतंय उकीरड्यावर शिळपाकं*
*बैलाच्या तोंडी हिरवा चारा*
*कावळयाच्या चोचीत मांसाच्या तुकड्याऐवजी*
*उष्टं खरकटं अन्न*

*अन् हे काय?*
*माणसाच्या महाकाय तोंडाला*
*माखलंय रक्त...*

*–म्हणूनच सर्वच भाकरी नेस्तनाबूत होत जाणाऱ्या दिवसांत*
*भुकेची 'दंतकथा' जन्म घेते आहे...*

**इथं काय विकायचं अन काय**
**खरेदी करायचं**
**याचा बिलकूलही विचार करू नका**
**बाजार ही काय विचार करायची**
**गोष्ट आहे?**

**तुम्ही तुमचं यकृत, जठार, उदर, किडनी,**
**हृदय, हात, पाय, डोळे, मेंदू**
**काहीही विकू शकता**
**घेणारे चिक्कारेत**
**विकणारे हवे आहेत!**

सदर कविता लेखाच्या शिरावर ठेवण्याचं एकमात्र प्रयोजन हेच की घरभर भाजीभाकरीचा वास सुटायचा अन् भुकेची संवेदना जाणवायची. आज भुकेचं काय झालं आहे? भुकेची चव बदललीय की तऱ्हा बदललीय? बकासुरी खाल्लं तरी भूक भागवली जात नाहीये. हे कोणी केलं आहे? त्याचं एकमेव कारण जागतिकीकरण. तेच वास्तव समोर ठेवण्यासाठी; ग्लोबल वास्तवाची पोतडी ओढत ओढत माझ्यातला कवी निघाला आहे. दुनियेच्या जगड्व्याळ बाजारात. या काळात झालेले बदल टिपायचं काम कवी करतो. आधुनिकता केशवसुतांनी टिपली. यंत्रयुगाचा उच्चार कवी मर्ढेकरांनी केला. तसा आजचा जागतिकीकरणाचा उच्चार माझी समकालीन पिढी करते आहे. त्यांच्यातलाच मी एक म्हणून टिपत चाललोय.

जागतिकीकरणाचं सरळ सरळ रूप माणसाच्या बोकांडी बसलं ते 'बाजारीकरणाचं'; ते इतकं की त्यानं माणसाचं दैनंदिन जगणं, तेही माणसाच्याच मर्जीने हिसकावून घेतलं. विश्वातल्या सजीव निर्जीव अशा प्रत्येक गोष्टीचं रूपांतर 'वस्तूत' करून टाकलं. म्हणून माणूस ज्या कुटुंबात राहतो; ते कुटुंबही वस्तू. ज्या समाजात राहतो; तो समाजही वस्तू. ज्या संस्कृतीत वाढतो; ती संस्कृतीही वस्तू. त्याची नातीगोती; तीही वस्तूत परावर्तित झाली. प्रत्येक गोष्टीतलं निखळ विशुद्ध रूप माणूस गमावून बसला आहे. नव्या वस्तूसंस्कृतीच्या पसाऱ्यात माणूस हरवला आहे. म्हणूनच झालं काय! माणसाचा पाय मूळ मातीपासून निसटला. माणूस अधांतरी लटकतो आहे. तो असंख्य प्लॉट्स घेतो आहे. असंख्य फ्लॅटस् घेतो आहे. जमीन घेतो आहे. एवढं सारं खरेदून सुद्धा यात कुठेच माणूस नसतो. मग तो असतो कुठे? तो असतो जागतिकीकरणाच्या अजस्र पंजात! आत्मा गहाळून. हिंस्र अन् खदाखदा हसत. यात माझ्यातल्या कवीची काय भूमिका असणार? मी जर समाजाचा भाग आहे; तर यातून माझीही कशी सुटका होईल? माझं चरित्रच माझ्यापासून हिरावलं गेलं आहे. माणूस म्हणून जगता जगता ज्या काळावर मला ठसा उमटवयाचा आहे, तो ठसा उमटंतंच नाही. साऱ्याच गोष्टी पैशात तोलायला लागल्यावर माझ्यापास असे काय असणार आहे? माझ्यातल्या माणसाची अवस्था स्पष्ट करायला ही एवढी कविता.

*आई येते गावावरून*
*ह्या वयातही डोक्यावर भलं मोठं गाठोडं*
*पायात नाहीये काही; अनवाणी तुडवत आलीय लांबसडक वाट*
*ग्लोबल व्हिलेजच्या या अमदानीच्या काळातही नाही आईला*
*आपण साधी चप्पल सेंड करू शकलो*
*मी तिला काय द्यावं?*
*तिनंच आणलंय गाव गाठोड्यातून बांधून*
*तेच सोडून मीच वाटत बसतो शेजारपाजारच्यांना मूठमूठ गाव*

*मला सांभाळण्यासाठी जिला सोडावी लागली होती*
*अर्ध्यावर शाळा*
*अशी मोठी बहीण येते चाळीस मैलाचं अंतर पार करून*
*रित्या हाती येईलच कशी तीही काहीबाही घेवूनच आली*
*विसावा घेत म्हणाली, 'भाऊ मला माझ्या मालकीचं शेत घ्यायचं आहे. लोकांच्या मजुऱ्या करून थकले मी!'*

*आपण इथे घेत बसलो फ्लॅट, फिरायला गाडी*
*भविष्याची तरतूद म्हणून गुंतवले कशाकशात पैसे*
*मात्र बहिणीच्या मजुरीचं जू तिच्या खांद्यावरून*
*नाही उतरवून ठेवू शकलो खाली...*

*निळखेड्याची मावशी येते*
*तीही दाळीसाळी, वडेखडे, कुरड्या, पापड्या असलं काही*
*घेवूनच आलेली*
*'कशाला आणलं मावशी? इथं तयार मिळतं मॉलमध्ये!'*
*मावशी म्हणाली, 'तुमचं शहर मोठं चमत्कारिक बाबा! आता पोरं*
*सुद्धा तयार मिळतील तुझ्या त्या मॉल का फॉल मध्ये!'*
*चहा घेतल्यावर म्हणाली, 'अरे माझ्या हनुमंताला नौकरी लागली*
*आश्रमशाळेत. घोडं पैश्यामुळं अडलं होतं; लहानपोरांच्या तोंडचं*
*हासडलं दूध; विकल्या गायी*
*भागवली नड! पेढा खावा. तुजा भाऊ मास्तर झाला!'*

*पेढ्याचा घास तोंडात कडूकडूच होत गेला*
*वाटलं की आपणच हिसकावून घेतलं लहानपोरांच्या*
*तोंडचं दूध...*

*खूप दिवसांनंतर गावावरून चुलता येतो*
*शर्ट कळकटलेला; धोतर सतरा ठिकाणी फाटलेले*
*त्याने आणल्यात लोणच्याचा कैऱ्या अन हरभऱ्याचा हुळा*
*सोपा टाळून भिंतीला टेकून बसतो*
*विढी ओढता ओढता म्हणतो, 'शेतीत काही राम राह्यला नाही;*
*पण वाडवडिलांनी नेमून दिलेला गाडा लोटत न्यायचा.*
*एक खड्डं बुजवलं की दुसरं तयारंच*
*मागच्या दुष्काळात बैलजोडी विकली शेतीचा कणाच मोडून*
*गेल्यासारखा झाला*
*यंदाच्या साली घेवू म्हटलं बरीमाठी बैलजोडी काही पैसे जमवलेत*
*धान्य इकूनटिकून थोडी मदत तू करशील!'*

*मी वाचा गेल्यासारखा...!*

*सगळ्यांनाच दाखवलेत आपण आपले रिकामे हात*
*कुणालाच काही मदत नाही करू शकलो*
*वरनं माझ्याच समस्यांचं ग्लोबल गाठोडं मी ठेवून देतो त्यांच्या*
*मानगुटीवर*

*भारानं पाठीत वाकत ते निघून जातात...*

*ह्या ग्लोबल व्हिलेजचा मी ग्लोबल सिटीझन ठरलोय*
*मात्र खरोखरच्या खेडुताला या व्हिलेजमध्ये स्थान नाही...!*

थोडक्यात काय तर नवी अर्थव्यवस्था माणसाला दिवाळखोरीत काढत आहे. माणूस आपल्याभोवती समृद्धीचे पोकळ डोंगर रचित चालला आहे. त्याखाली मूल्यव्यवस्था बिनदिक्कत गाडत निघाला आहे. संवेदना संपली आहे. मानवता संपली आहे. संगणक आणि मोबाईल युगात माणसाला भ्रम झाला की माणूस माणसाच्या जवळ येऊन पोचलाय. याउलट झालं काय की माणसामाणसात अनंत मैलांच अंतर पडलंय. ते सांधायचं कशाच्या बळावर? सत्तासंपत्तीचे, दोन माणसांच्या दरम्यान अभेद्य बांध उभे राहिलेत. अशा या अवघड काळात मी कविता लिहिण्याची कृती करतोय. ती आनंददायी कशी असू शकेल? म्हणून कविता लिहिण्यातली अतीव पीडा मी भोगतो आहे. हे क्लेशदायक आहे. पण त्यापासून माझी सुटका नाही.

मी भवताल निरखतो; तेव्हा लक्षात येतंय की खूप पैसा माणसाच्या हातात आलाय. माणसाची जाम गोची झालीय. अन चंगळही. म्हणून हे जग दोन हिश्यात वाटलं गेलंय. ते म्हणजे 'संवेदनशील माणूस' अन् 'असंवेदनशील माणूस'. कला, संस्कृती, भावना जपण्याचा जिमा संवेदनशील माणसाकडे. सत्ता, संपत्ती, अराजक वाढवायचं काम; असंवेदनशील माणसाकडे. दोघंही जाम कामाला लागलेत. आपापलं जग निर्माण करण्यासाठी. जास्त कोंडी झालीय ती संवेदनशील माणसाची. जगाविषयीचं असं दु:स्वप्न बिलकूलही त्यानं पाहिलेलं नव्हतं. म्हणून तो अस्वस्थ आहे.

मोजून शंभर वर्षांचं आयुष्य माणसाच्या वाट्याला आलं आहे. तरी तो एकटाच अप्पलपोट्या होऊन दोनचारशे वर्षांचं चारापाणी जमवून ठेवतोय म्हटल्यावर अनेकांना उपाशी राहावंच लागणार. ही काय अद्‌भूत गोष्ट झालीय? माणसाचा हव्यास इतका वाढला की त्याला आता कुणाचंच काही घेणंदेणं नाही. त्याचा आत्मा सपशेल कोरडा झाला. त्याला कसं कळावं की भर उन्हाळ्यातही खापर ओलावा धरून असते. ह्या संवेदनेच्या पलीकडे तो निघून गेला आहे. तो काही शेळीबकरी नाही की त्याच्या गळ्यात दावं अडकवून त्याला जागेवर घेऊन येता येईल. पैशाच्या जोरावर त्याला सारं खरेदी करण्याची धमक आहे. तो चंद्राला चंद्र, सूर्याला सूर्य, नदीला नदी, नाही राहू देतंय. त्याच्यासाठी ह्या साऱ्याच वस्तू आहेत. त्यांचं मूल्य पैशात तोलायचं आहे. म्हणून तर हे लोक डोंगरच्या डोंगर खरेदी करून जागा सपाट करत सुटलेत. त्याला शेती करायची नाहीय; तरी शेती खरेदी करून तिचं सृजनत्त्व संपून टाकतो आहे. सारीच संवेदनशीलता त्याच्यासाठी भाकडकथाच जर होणार असेल; तर या माणसाच्या आयुष्यात सुख कसं यावं? याने जर आपल्यापास साऱ्या वस्तूच गोळा करून ठेवल्या तर यांच्या मरणावर रडायला तरी माणसानं असावं नं तर तसेही होणार नाही.

लोक मंगळावर चाललेत. चंद्रावर तर आधीच जाऊन पोचलेत; पण खंत हीच की माणूस माणसापर्यंत पोचू शकत नाही. माणसाला मंगळावरची जीवसृष्टी शोधायचीय. पण इथल्या जीवाचं काय? माणूस जोराच्या गतीनं अडकतोय जागतिकीकरणाच्या दातऱ्यांमध्ये. हे जगच बाजारात बदलतंय. माणूस खरेदी करतोय. एवढं सारं खरेदी करून माणसाला स्वास्थ

नाही याला काय म्हणावं? शुद्धाच्या नावाखाली सारंच अशुद्ध आपल्यासमोर आणून ठेवलं जातंय. ग्रामीण भागात तहान लागल्यावर माणूस दांडातलं नदीतलं पाणी तळहातावर घेऊन प्यायचा. तेव्हा रोग होऊन माणूस दगावल्याची एखादी घटना ऐकिवात नव्हती. आज तर अगदी अवघड नाव धारण केलेले रोगच रोग पाण्यामुळे निर्माण झाले. डॉक्टरचं सांगणं की शुद्ध पाणी प्या. कुठेय शुद्ध पाणी? पण माझ्यातला कवी तरी कसा शांत राहील? तो त्याच्या लिपीतनं उच्चार करीलच. जगाचं झालेलं ग्लोबल मार्केट समोर ठेविलंच.

*१*

*त्यानं भरून घेतलेत पॅन्टचे दोन्ही खिसे*
*भरपूर साऱ्या पैशांनी*
*एटी एम कार्ड, क्रेडीट कार्ड*
*होतंच शर्टच्या खिशात*
*भटकला मॉलदर मॉल; बाजार दर बाजार*

*अन् हताश परतला*
*म्हणाला 'खूप काही मिळतं रे बाजारात*
*पण आई कुठेय? मुलगा कुठेय? मित्र कुठेय?*
*आजी, आजोबा, काका, मावशी, आत्या कुठेय?*
*माणसाची ज्याम गोची झालीय*
*बाजारातून काय विकत घ्यावं? अशा लाख प्रश्नांच्या कोसल्यात गुरफटलाय...*

*२*

*या बाजारात तुम्ही काहीही विकू शकता*
*आणि खरेदीही करू शकता*
*उदाहरणार्थ, संवेदनशीलता, भावना, इमान, आत्मा आणि इभ्रतही*
*तुम्ही इथं सहजी विका*
*अन त्या बदल्यात तुम्ही घेवून जाऊ शकता*
*घरेलू चीजवस्तू*
*एका वर्षाच्या गॅरेन्टीवर*
*तुटली फुटली पुन्हा बदलून नवीन...*

*फरक इतकाच की हीच गॅरेन्टी*
*तुम्ही संवेदनशीलता, भावना, इमान, आत्मा, इभ्रत*
*या संदर्भात देऊ शकत नाही!*

*३*

*या बाजारात, बंदूक मिळते, पिस्तूल मिळतं, चाकू मिळतो, सुरी मिळते, गुप्ती मिळते*
*कोयता मिळतो, तलवार मिळते, बॉम्ब मिळतो, कुऱ्हाड मिळते*
*या वस्तू सोबत अगदी फ्री मिळते*
*हिंस्रता, क्रूरता, निर्घृणता, भिषणता*

*४*

*विकायच्च्यात का तुम्हाला तुमच्या भल्याबुऱ्या आठवणी*
*छोटीमोठी स्वप्ने; ताजेशिळे अनुभव*
*अजून काय काय...*

*साऱ्याचीच किंमत ठरलीय*

*मोठीचमोठी रांग लागलीय विकणाऱ्यांची...*

*५*

*इथं काय विकायचं अन काय*
*खरेदी करायचं*
*याचा बिलकूलही विचार करू नका*
*बाजार ही काय विचार करायची*
*गोष्ट आहे?*

*तुम्ही तुमचं यकृत, जठार, उदर, किडनी, हृदय, हात, पाय, डोळे, मेंदू*
*काहीही विकू शकता*
*घेणारे चिक्कारेत*
*विकणारे हवे आहेत!*

*६*

*महादेव २५ रु., गणपती १५ रु., महालक्ष्मी १२ रु.,*
*सरस्वती १० रु., ब्रह्मदेव १३ रु.*
*नारायण १० रु., राम ०५ रु., विठ्ठल ०८ रु.*
*इत्यादी किंमती ठरल्यात देवांच्या; कृष्ण वगैरे*
*मोफत मिळतात एखाददुसऱ्या देवाबरोबर*

*शिवाय म्हसोबा, पिरोबा, जोखाई*
*असली व्हरायटीही आहेच*

*७*

*पावशेर दाळ खरेदी करा*
*त्याबरोबर अर्धाकिलो आजार मुफ्त*
*आता किलो पावशेरात*
*जर घेतंच आहात तुम्ही खाण्याच्या चीजवस्तू*
*तर, कॅन्सर, मधुमेह, सांधेवात, आमवात, क्षयरोग*
*असले आजार खरेदी करण्यास तुम्हास*
*छदामही खर्च करावा लागणार नाही*

*आहे की नाही तुमच्या फायद्याची गोष्ट!*

*८*

*इथं बाजारात तुंबळ गर्दी; मुंगीला वाव नाही*

*मग माझ्या गावाला का मिळत नाही*
*कपडे...*
*हा बाजार देऊ शकेल काय*
*माझ्या नागड्या गावास इजार सदरा*
*गावाच्या विहीरीना पाणी*
*शेतीमातीसाठी हिर्वी पिके*
*किलबिलीसाठी पक्षी*
*श्वासासाठी वारा*

*कसा काय देऊ शकेल बाजार*
*याच बाजारानं*
*हिसकावून घेतलंय गाव*

ज्या कृषिजन संस्कृतीच्या परिक्षेत्रात माझ्यातला कवी वाढला. त्या कृषिजन संस्कृतीला पहिल्या प्रथम जागतिकीकरणानं ध्वस्त केलं. आधी माझ्या माणसांमधली संवेदनशीलता संपवली. हळूहळू ते साऱ्याच गोष्टींना बिलगलं आहे. गाव संपवलं तिथ शहर उभं राहिलं. वाऱ्याला कोंडलं. नदीचं वाहतं पाणी स्थिर केलं. झऱ्यांची नाकं बुजवण्यात आली. आपल्याला सांगायला गावसंस्कृतीतलं काहीच ठेवलं नाही. म्हणून माझ्यातला कवी अस्वस्थ आहे. जगता जगता कवीला विश्वाच्या दुखण्याला कवटाळता येतं, त्याला कवेत घेता येतं. म्हणून काही माझ्यातला कवी ऱ्हासपर्व थोपवणार आहे असे नाही; तर त्या नष्ट होऊ पाहणाऱ्या गोष्टी मी कवितेत सांभाळू इच्छितो. ज्या ज्या गोष्टींना म्हणून संवेदनशीलतेचा वास आहे. त्या साऱ्याच कवितेत मला जपता येणार आहेत. ही किती छान गोष्ट झालीय.

माझी आई ज्या चुलीवर भाकरी भाजायची; ती शेवटची मातीची चूल मला जपून ठेवायची आहे. त्या चुलीचं भानोसं पोतारताना जो मातकट गंध यायचा; तोही मला शेवटचा जपायचा आहे. चुलीतल्या आळ्यातला तो उबदार विस्तव; जो थंडीच्या दिवसात आमच्या हाडाहाडात शिरून बसलेलं गारठं उचकटून फेकायचा. तो शेवटचा विस्तव मला जपायचा आहे. आणि ते दळणाचं दगडी जातंही. ज्यावर दळता दळता आईनं संपूर्ण जिंदगीची कथा गायली. अन् आईची ती शेवटची ओवीही; ज्यात तिचं संबंध आयुष्य कैद होतं. संस्काराचं आद्यपीठ असलेली आजी. तिची शेवटची गोष्ट मला जपायची आहे. आईनं बोट करून दाखवलेला तो चांदोमामा मला निंबोणीच्या झाडामागं शेवटचा जपून ठेवायचा आहे. गावातल्या बावडीवर शेवटचा गरगरणारा रहाट मला जपायचा आहे. गायीबैलांच्या घुंगुरमाळा मला शेवटच्या जपायच्या आहेत. शहराला अंगण नसल्यामुळे शहरातल्या साऱ्याच चिमण्या संपून गेल्यात. अन् दाणे टाकणारे हातही. मात्र माझ्या गावात सुरू आहे. चिमण्यांची चिवचिव. अन दाणे टाकणारे हात. ती चिमण्यांची शेवटची चिव चिव; अन् दाणे टाकणारे शेवटचे हात मला जपून ठेवायचे आहे. रानात गुरं चारायला गेल्यावर सारखा मागं मागं हिंडणारा तो सूर्य मला शेवटचा जपायचा आहे. तान्ह्या लेकराला निजवताना गायलेलं ते शेवटचं अंगाईगीत मला जपायचं आहे. नदीच्या काठावरून हळूहळू नष्ट केलं जाणारं ते गाव; याच गावात जिवाला जीव देणारी माणसं होती. एकमेकांच्या संकटात मदतीला धावून जायची. जेवत्या ताटावरून उठून, मेलेल्याला खांदा द्यायची. एकमेकांची दुखणीखुपणी निवारायची. ही दंतकथा व्हायच्या आधी; ही माणसं मला जपायची आहेत.


गावाच्या दिशेनं शहराचं महाकाय धूड येऊ लागलंय. त्याला थोपवणं माझ्याच्यानं शक्य नाही. मात्र हे शेवटचं गाव मला जपायचं आहे. तो नांगर, ती पांभर, तो वावर, ती शेळी ती गाय, तो कावळा, तो बगळा, ती चिमणी, तो बैल, ती साळुंकी, ती मुंगी, सारं सारं नष्ट होऊन जायच्या आत मला शेवटचं म्हणून जपायचं आहे.

केवढं विदारक वास्तव आ वासून आलंय; वर्तमानालाच लागलीय वाळवी. सकस माणसाचं बियाणं आताशा नष्ट होत चाललंय. दूषित माणसाचं बियाणं मात्र दिवसेंदिवस फोफावतंच चाललं आहे; एरंडासारखं! त्याला अटकाव नाही. अवघं जंगल वाढत जाईल त्यांच्याच नावचं! सकस आणि सगुण माणसाला मरण्यापुरतीही जागा उरणार नाही. म्हणूनच सकस माणसाचं बियाणं या सर्वातून मला वाचवत न्यायचं आहे. थोडक्यात हिरव्या चैतन्याचा लसलसता कोंभ जळून खाक व्हायच्या आत मला त्याचं शेवटचं चित्र माझ्या शब्दांत काढून ठेवायचं आहे. या जगातून अस्तंगत होणारं जे जे ते मला जपून ठेवायचं आहे. जिला शेवटच नाही अशी शेवटची कविता मला लिहून ठेवायची आहे. खरोखरंच कवितेची शेवटची वही इथल्या शेवटच्या मातीत शेवटची पुरून ठेवायची आहे! कारण नष्ट होत जाणाऱ्या शेवटच्या माणसाला कविताच वाचवणार आहे.

तात्पर्य या विश्वातील हिरव्या चैतन्याच्या लसलसत्या कोंभाचं कवीच संवर्धन करू शकतो. तो कवी मी एकटाच असेन असे नाही. ते कुठला नं कुठला कवी करणार आहे. त्या संवर्धन करणाऱ्यात काही शब्द माझे असतील एवढं मात्र खरं. किंवा सगळ्यांची मिळून एकच एक कविता तयार होईल. म्हणून जाता जाता मी असं म्हणेन की, जागतिकीकरणानं भले माणूस पराभूत केला असेल, तो माणूस माझ्यातही आहेच. पण कवितेला जागतिकीकरण पराभूत करू शकत नाही.

जागतिकीकरणाने कवीसमोर जी आव्हानं उभी केली आहेत त्या आव्हानांचा समाचार कविता घेऊ शकते. त्यासाठी मला एकच करावं लागेल. ते म्हणजे माझ्यातलं सत्त्व आणि स्वत्त्व जिवाच्या करारानं जपून ठेवावं लागेल. पायाखालची माती घट्ट धरून ठेवावी लागेल...

**– ऐश्वर्य पाटेकर**
भ्रमणध्वनी : ७५८८०१६५५९
oviaishpate@gmail.com



# आत काहीतरी धुमसतं...

## मनस्विनी लता रवींद्र

> **मी लाख म्हणेन मी असं असं मानते. पण माझ्या नेणिवेत काय आहे? माझ्या सिस्टिममधून मला नको असलेलं सगळं बाहेर पडलं आहे का? जर नाही तर ती कोणती शक्ती आहे जी माझं वागणं रेग्युलेट करते आहे? ती प्रसार माध्यमं आहेत? इंटरनेट आहे? सतत ऐकू येणारं गॉसिप आहे? धर्म आहे?जात आहे? स्त्री असणं आहे? किंवा हे सगळंच आहे. आणि तरी मला माझ्या विचारांशी प्रामाणिक रहायचं आहे. धुमसणाऱ्या गोष्टींना वाट करून द्यायची आहे.**

आमच्या शेजारी एक लहान मुलगी राहते.दीड वर्षांची. ती नुकतीच भाषा शिकू लागली आहे. परवा तिच्याशी मी खेळत होते.नाचता नाचता ती पडली आणि मला म्हणाली मला लागा.. मला कळलं तिला लागलंय असं म्हणायचंय. तोच ती पुढे म्हणाली, 'लागा चुनली मे दाग..' हे गाणं तिच्या घरी तिने ऐकलं होतं. आणि 'लागा' या शब्दाचा तिने त्वरित दुसऱ्यांदा वापर केला. तिला 'लागा' हा शब्द आला. समजला उमजला.

आठवीत असताना मी ओडिसी नृत्य शिकत होते तेव्हा घरी येऊन सतत मी वेगवेगळ्या मुद्रा बिद्रा करून दाखवायचे. नवीन काहीतरी शिकतांना आपण त्याची अनेक पर्मिटेशन्ज कॉम्बिनेशन्ज करून बघतो. त्याचे नियम आपल्याला समजून घ्यायचे असतात पण डोक्यात पक्के झालेले नसतात. भाषेच्या बाबतीतअसंच काहीसं असावं. किंबहुना आहे. व्याकरण शिकायच्या आधीच आपली भाषेची परिमाणं पक्की होतात. भाषेचे नियम नेणिवेत रूजतात. आणि आपण त्याच्याशी खेळ करणं बंद करतो. त्याची तोड-मरोड थांबवतो.

भाषा ही संकेतांवर आधारित असते. त्यामुळे प्रत्येक समाजजीवनाची मूल्य त्या त्या भाषेत आढळतात. मराठी ही आपली भाषा. आपल्या इतिहासाची पाळमुळं घेऊन ती आपल्या आयुष्यात येते. लहानपणीच. जितके आपले आईवडिल आपल्यासाठी जुने किंवा अध्याहृत असतात तितकंच आपण भाषेला पण गृहीत धरतो. आणि तिचा वापर फक्त कम्युनिकेशनपुरता मर्यादित होतो.कधीकधी लिहिते वाचते लोक भाषेला वेगळ्या पद्धतीने बघताना दिसतात. पण अनेक वर्षांपासून त्यात रूजलेले शब्द जी मूल्यव्यवस्था घेऊन येतात ती मात्र सगळे सहज बदलू शकत नाहीत. मराठी भाषेला वारकरी संप्रदायाची वैष्णव संप्रदायाची परंपरा लाभली आहे. म्हणजेच भाषेच्या इतिहासातच बंडखोरी आहे. समाजव्यवस्थेच्या खोट्या बूर्झ्वा मूल्यांविरुद्धचा असंतोष आहे. तो कधी अभंगातून येतो तर कधी बेदरकार आधी समाजमान्य नसलेल्या तमाशाच्या फॉर्म मधून. म्हणजे खरंतर आपल्या भाषेत त्यातल्या शब्दांमध्ये वाङ्मयातून किंवा कुठल्याही कलाकृतीतून व्यक्त होतांना अडचण यायला नको. विशेषत: अशा लेखक मंडळीना ज्यांना सनातन रूढी परंपरांविरुद्ध खदखद आहे. पण कधीकधी भाषा अपुरी पडते.

अशावेळी मला प्रश्न पडतो की असं काय नेमकं कारण आहे की ज्यामुळे आपल्याला आपल्याच भाषेत व्यक्त होताना त्रास होत असेल? मग मला आमच्या शेजारची लहान मुलगी आठवते भाषेशी खेळणारी. जे खेळणं कदाचित खूप कमी झालंय. एखाद्या आरशासमोर रोज प्रतिबिंब बघावं आणि बाहेर पडलं की दुसऱ्या आरशात बघणं टाळावं. कारण प्रतिबिंब वेगळं दिसेल ही भीती. आपलं रोजचं नेहमीच वाटणं जगणं बदलेल ही भीती.

मी लहान असताना कविता करायचे. मग कधीतरी कविता माझ्यातून बाहेर पडली आणि मी नाटक या माध्यमातून व्यक्त होऊ लागले. ॲब्स्ट्रॅक्शनकडून अधिक मूर्त आणि साचेबद्ध माध्यमाकडे वळले. कदाचित नाटक या माध्यमात असणाऱ्या इतर घटकांचं मला आकर्षण वाटलं असेल, कारण नाटक हे केवळ एका व्यक्तीचं माध्यम नाहीये. ती प्रयोगजीवी कला असल्याने ती समूहकला आहे. नाटक लिहून पूर्ण झालं की त्याचा प्रवास संपत नाही. त्याचं रूपांतर एका प्रयोगात होण्यासाठी त्यात दिग्दर्शक, नट आणि अनेक तंत्रज्ञांची गरज असते. कदाचित त्या टीम स्पिरिटच्या तारूण्यसुलभ आकर्षणाने मला नाटकाकडे वळवलं असेल. पण नाटक लिहिल्यावर माझ्यावर लेखक म्हणून शिक्कामोर्तब झाल्यासारखंच झालं. आता लिखाणापसून सुटका नाही हे कळलं. कधीकधी शब्द असे धबधब्यासारखे येतात. आणि आपण काहीच करू शकत नाही.मग त्याला कधी नाटकाचं

स्वरूप प्राप्त होतं तर कधी कथेचं तर कधी असचं एखाद्या रोजीनिशीचं. खूप दिवस आत काहीतरी धुमसतं आणि फूटून बाहेर येतं. ही खरंतर आंतरिक प्रक्रिया झाली. कुणी वाचलं तर म्हणेल काहीशी रोमॅन्टिक आणि भाबडी कल्पना आहे लिखाणाबद्दलची. पण त्याचा अर्थ आपण लिहितो त्यात विचार नसतो असतं नाही. उपमा अलंकारात सांगायचं झाल तर विचारांच दूध तापत असतं आणि भस्कन उतू जातं किंवा खूप जोराची लघवीला लागली असते आणि आवरणं अशक्य होतं. असं काहीसं. (हे असं लिहितेय – लेखक असल्याचे दुष्परिणाम) म्हणजेच आपल्यात काहीतरी केमिकल लोचा आहे. जो कदाचित आपल्यात आहे. आपल्या स्वभावाचा भाग असावा असा.किंवा एखाद्या तीळासरखा. ओळख दाखवणारा अविभाज्य घटक म्हणजेच लिहिणं आलीया भोगासी सारखं आहे. किंवा अश्वत्थाम्याच्या भळभळणाऱ्या जखमेसारखं. त्याच्यापासून सुटका नाही. मग व्यक्त होण्यात जे काही अडसर येतात ते जाणून घ्यायला हवेत. मग आपण जे करतोय ते का करतोय हे पण तपासून बघायची गरज निर्माण झाली. आणि मी, माझी भाषा आणि नाटकातली भाषा याचा नकळत विचार करू लागले.

१. स्त्री लेखिका आणि साहित्यातली भाषा.

लिहिते झालो की बिरुदं चिकटतातच. ती तुमच्या जात धर्म लिंग वय यावरून ठरतात ही एक गंमतच आहे. कधी तरुण लेखक कधी स्त्री लेखक, कधी दलित लेखक. सातत्याने नवीन स्टिकर लावून घेऊन लिहीत रहावं लागतं. आपलं लिंग, जात, विचारसरणी आपली ओळख बनते. म्हणजेच कुठेतरी आपण सगळ्यांमध्ये बसत नाही. तुम्ही लुटूपुटूचे खेळाडू, तुमच्यावर लिंबू टिंबूचा डाव टाकलाय. खेळा जिंका आमचा संबध नाही.आम्ही मूळ स्रोत.आणि मुख्य धारा. आम्हाला कोणी तुम्ही वरच्या जातीत असून लिहिता?तुम्ही पुरुष असून लेखक? तुम्ही केस पिकले तरी लिखाण करता? असं विचारत नाही.

स्त्री लेखक म्हंटलं की स्त्रीवादी अथवा भावुक असा काहीसा समज होतो. स्त्रीवाद ही एक विचारसरणी आहे. विचारसरणी आणि तुमचं लिखाण यात खूप खोल गहिरं नातं असतं. आणि ते असायलाच हवं.मार्क्सवाद, डावी विचारसरणी किंवा स्त्रीवाद याचा पगडा अनेकांवर दिसतो. किंवा उजवी विचारसरणी सनातन वाद, मध्यममार्गी विचारसरणी. कुठलीही बाजू न घेणारी. असे अनेक प्रकार असतात. पण सरळ सरळ जर प्रचारच करायचा असेल तर माणूस लेख लिहील, मुद्देसूद वैचारिक मांडणी करेल. माणसांमध्ये कशाला गुंतेल. माणसांच्या आयुष्यातली व्यामिश्रता धुंडाळायला कशाला जाईल. त्यामुळे कलेसाठी कला म्हणणाऱ्यांच्या मी फार बाजूची नसले तरी कलात्मक मूल्य मात्र साहित्यासाठी आवष्यक असतं. नाहीतर सगळंच साहित्य एकांगी आणि प्रचारकी होऊन जाईल. त्यातली विचारसरणी ही एखाद्या जिलेटिन पेपरसारखी असते. त्याचा रंग दिव्याला मिळतो. पण दिव्याचा उजेड आपला आपला असतो. विचारसरणीचा रंग हवाच. पण उजेड नको. असं मला वाटतं.

स्त्री लेखकांबद्दलचा दुसरा मुद्दा मात्र एखाद्या गॉसिपसारखा आहे. ते आपण ऐकलेलं असतं आणि आपल्याला ते खंरच वाटत राहतं. मग ते खरं की खोटं हे पडताळून बघायचे कष्ट आपण घेत नाही. काही पूर्वापार चालत आलेल्या समजांपैकी हा एक समज. स्त्रिया या भावनिक असतात. त्यामुळे त्यांच्या लिखाणाला एक भावुक किनार असते वगैरे. अनेक स्त्रिया स्वत: देखील या समजाला खरं मानत जगतात आणि लिहितात. ही गोष्ट निराळी. पण स्त्रियांची भाषा आणि पुरुषांची भाषा असा भेद करायचा झाला तर तो इतकाच होऊ शकेल की स्त्रिया त्यांच्या साहित्यकृतीतील स्त्री अथवा पुरुष पात्रांकडे समान आणि व्यवच्छेदक नजरेने बघत असाव्यात. पण पुरुष लेखक अनेकदा स्त्रिया ही जणू एक वेगळी जमात आहे. झेब्रा अथवा शहामृगासारखी. जिला आम्ही जाणून घ्यायचा प्रयत्न करतोय आणि तिच्याशी समरस होऊन तिच्याबद्दल लिहितोय असा काहीसा भाव त्यात असतो. (अर्थात हे विधान सरसकट सगळ्या लेखकांना लागू होत नाही ) अनेकदा लेखकांच्या स्वत:च्या स्त्रीबद्दलच्या कल्पना, फॅन्टसीच. आदर्श स्त्री बद्दलची प्रतिमाही त्यात उमटते. याउलट स्त्री लेखिका मात्र पुरुष आणि स्त्रिया, तृतीयपंथी सर्व माणसांना माणूस म्हणून बघतांना दिसतात. त्यामुळे त्यांची माणसांबद्दलची निरीक्षणे आणि समज अधिक सजग आणि खोल असतात. अनेकदा व्यवच्छेदक आणि तार्किक असतात. त्यामुळे स्त्री लेखकांच्या लिखाणात रंग, गंध, स्पर्श यांचे खूप जास्त डिटेल्स येताना दिसतात. मेघना पेठे, गौरी देशपांडे, अमृता प्रितम, इस्मत चुगताई. यांच्या कथांमध्ये ही सर्जनशील व्याप्ती दिसते.

२. भाषा, आशय आणि शीर्षासन

शीर्षासन केले की सगळं उलटं दिसतं. थोडा वेळ त्याच पोझिशनमध्ये राहिलं की की वाटतं जग उलटंच आहे. तसंच काहीसं भाषेचं असावं. अभिप्रेत आशय मांडण्यासाठी भाषेचं शीर्षासन घालावं लागतं. किंवा सिनेमात जसा दच ॲन्गल लावला जातो. ज्यातून जग तिरपं दिसतं तशी तिरकस नजर तयार करावी लागते. लहानपणी खेळताना डोळे बारीक करून डोळ्यांवर बोट ठेवून ते उघडून बघण्याची एक गंमत असते. मग रंगांची सरमिसळ होते. आकार डिफॉर्म होतात. कधी अंधुक दिसतं कधी डोळ्यांसमोर तारे चमकतात. असंच भाषेचं होतं का? तेच शब्द. तेच व्याकरण. पण अपेक्षित परिणामासाठी त्याची मोडतोड करावी लागते. सतीश आळेकरांच्या नाटकातले संवाद बघितले की ते प्रकर्षाने जाणवतं.

''मला हवीय एक मोठी वही. अवघड हिशोबांसाठी, एका बाकावर बसली दोन माणसे, त्यांच्यात वह्या किती? सापडली वही? अशी ही आणली नुसतीच कसनुशी वही.''

इथे आळेकरांनी कसनुशी हे विशेषण वहीसारख्या अत्यंत नीरस वस्तूला देऊन 'शनिवार रविवार' या नाटकातल्या गंमत या पात्राची मानसिक अवस्था दाखवून दिली आहे. कॉलेजमधील मैत्रिणीच्या सो कॉल्ड सुखी संसारात मध्येच उगवणारे गंमत नावाचं

हे पात्र. लग्नव्यवस्थेबद्दलच्या मध्यमवर्गीय संकल्पनांना तडा देत त्यातली विसंगती अधोरेखित करतं.

विजय तेंडुलकरांच्या घाशीराम कोतवाल या नाटकात सूत्रधार म्हणतो, ''शत्रू देखील म्हणती एक तेवढे नाना, बाकी सब करती तनाना.''

इथे पेशवाईतील भाषेवर असणारा हिंदीच्या पगड्याचा वापर करत एका वाक्यात चपखल भाषेत आपल्याकडील सत्तेचा खेळ (पॉवर गेम) अधोरेखित केला आहे.

तेंडुलकरांच्या नाटकांमध्ये कलात्मकता आणि सामाजिक भानातून आलेलं  समाजावरील परखड भाष्य आणि त्याच्या परिणामातून येणार वास्तववादी वैफल्य याचं बेमालून मिश्रण झालेलं दिसतं. उदाहरणार्थ सखाराम बाईंडर मध्ये ते देव या संकल्पनेशी जोडल्या गेलेल्या मूल्यांबद्दल बोलतात. ही मूल्य आपल्याला काय देतात तर एक चिंरतन भीती. ही भीती स्त्री पुरुष यांच्याबद्दलचे काही ठोकताळे आणि नियम निर्माण करते. एक चौकट निर्माण करते. त्या चौकटीला न जुमानणारा सखाराम. लक्ष्मीच्या येण्याने घरात गणपती आणतो. आणि त्याचा मित्र दाऊद त्याच्या घरातून बाहेर काढला जातो. धर्माची चौकट नीती अनीतीचे जे नियम घेऊन येते त्या नियमांचं पालन पोषण करताना एका निष्पाप निरागस जीवाचा चंपाचा जीव घेणं देखील तिथे गैर ठरत नाही.

जशी नाटकांमध्ये विजय तेंडुलकर, महेश एलकुंचवार, सतीश आळेकर, शफाअत खान, जयंत पवार, गो.पु. देशपांडे यांच्या नाटकात भाषेत किंवा आशयात प्रयोगशीलता दिसते तसंच चिं.त्र्य. खानोलकर, भालचंद्र नेमाडे, भाऊ पाध्ये, किरण नगरकर, यांच्या ललित साहित्यात, मर्ढेकर, नामदेव ढसाळ, दि.पु. चित्रे, नारायण सुर्वे, अरूण कोलटकर यांच्या कवितांमध्ये ही भाषेची सुरनळी सापडते. वाचकांच्या दिशेने सुरर्कन सोडलेली. मेंदूत हलचल माजवणारी. विचारांना प्रवृत्त करणारी. यातील काही लेखकांच पारडं कलात्मकतेकडे झुकलेलं असतं. ते मांडणीत प्रयोग करतात. काही लेखक आशयाला अग्रस्थानी मानून हवा तो भाव पोहोचवण्यासाठी कधी क्लासिक स्ट्रक्चरचा वापर करताना दिसतात. तर भाऊ पाध्ये किंवा विजय तेंडुलकरांसारखे काही लेखक आशय आणि मांडणी दोन्हीत प्रयोगशील असतात. आताच्या काळात जयंत पवार यांच्या कथांमध्ये तीच धग दिसते तर शिल्पा कांबळे या लेखिकेने 'निळ्या डोळ्यांची मुलगी' या कांदबरीत देखील आशयपूर्तीसाठी मांडणीत असाच प्रयोग केला आहे.

३. नाटक लिहायची उर्मी

आजचं नाटक मात्र वेगळं आहे का?मागच्या दहा वर्षात त्यामागील पन्नास वर्षात झाले नव्हते इतके आमूलाग्र बदल झाले आहेत. विशेषत: कम्युनिकेशनमध्ये हे बदल झाले आहेत. त्याचे चांगले वाईट परिणाम हा वेगळ्या चर्चेचा मुद्दा आहे.पण बदल झालाय हे नक्की.मोबाईल मुळे तर झालाच झाला आहे. टेक्नॉलॉजी सोपी सर्वदूर आणि सर्वांच्या अखत्यारीत आली आहे.अस्तित्ववादी साहित्यातील काहीच बदलणार नाही या निराशेतून एकटेपणात गुरफटलेला नायक जाऊन गर्दीत एकटेपण आलेला कथानायक आजचा हिरो आहे (हिरो हे स्त्री अथवा पुरुष कोणीही असू शकतं) आज भाषेच्या व्याकरणाचे नियम ढिले झाले आहेत. अनेक भाषांची सरमिसळ झाली आहे. इंग्रजीचा आणि इतर भारतीय भांषाचा एकत्रित अपभ्रंशात्मक परिणाम  बोली भाषांवर झाला आहे.आपल्याकडील डायलेक्ट्स (बोली भाषा) हळूहळू लोप पाऊ लागल्या आहेत. (तसंही पूर्वीपासून ग्रामीण बोलींना अशुद्ध मानून कधीच मुख्य प्रवाहात त्यांना येऊ दिलं गेलं नाही. त्यामुळे आपलीच भाषा समृद्ध होण्यापासून वंचित राहते आहे हे अनेक शुद्ध भाषा पंडितांच्या लक्षात आले नाही.) असो, पण आज बदलणारी भाषा हे कदाचित हे भाषेंच उतांत होणं असेल. कदाचित आपण बदलाच्या उंबरठ्यावर असू. जिथे भाषा आपली कात टाकून नवीन काया पांघरते, पण आपण भाषेचं स्थित्यंतर बघतो आहोत हे नक्की.

जगात होणारे बदल अत्यतं वेगवान आहेत.वाढती धर्मांध शक्ती, राजकारण आणि समाजजीवनातली वाढती तफावत, जाहिरातींचं वाढतं जाळं, मार्केट, सर्व गोष्टींचा कमोडिटी म्हणून केला जाणारा उपयोग. मग भावना असोत की न्यूनगंड. जाड आहात बारीक व्हायला हे प्रॉडक्ट, दु:खी आहात आनंदी व्हायला हा बाबा, निराश आहात यशस्वी व्हायला हे पुस्तक. सगळ्याचा बाजार. नातेसंबध साचेबंद्ध. लाईफस्टाईल शिकलेली. दाखवलेली, पाठ करून घेतलेली. यात भिन्नतेला थारा नाही. अशा वेळी लिहितं रहायचं तर कसं? कोणत्या भाषेत? कुठल्या अभिव्यक्ती माध्यमातून?मग जो काही गोंधळ आहे. तो प्रामाणिकपणे मान्य करून मांडणं हाच मार्ग राहतो. आपल्यात विसंगती आहे? आपण कनफ्यूज्ड आहोत मान्य. मी लिहिलेलं पहिलं नाटकं हे त्या गोंधळचाच परिपाक असावा. 'सिगारेट्स'मध्ये मी माझ्यापरीने अत्यंत स्वत:शी प्रामाणिक राहून माझं म्हणणं व्यक्त केलं. धर्मकीर्ती सुमंत याच्या 'गेली एकवीस वर्ष' यामध्ये देखील हाच प्रामाणिक प्रयत्न दिसतो. त्या प्रयत्नांना कुठेतरी ॲकनॉलेज केलं जातं.माझं देखील तेव्हा कौतुक झालं, पण सिगारेट्सनंतर दहा वर्षांनी मी तोच गोंधळ घेऊन बसू शकत नाही. माझा परीघ रूंदावतो. माझ्या कक्षा बदलतात. जगणं समोरं येतं. विसाव्या वर्षीचा आशावाद रोमॅन्टिसिझम विझतो.

४. राजकारण, व्यवस्था आणि आत्मभान

नाटक म्हणजे काय? कुठलीतरी गोष्ट. जळी स्थळी काष्टी पाषाणी गोष्टी आहेत. मी आमच्या पार्लरवालीकडे गेले तरी मला अनेक कथा ऐकायला मिळतात. 'गेली ना, तिची डिव्होर्सची केस सुरू आहे'. 'त्या बाई आल्या होत्या त्यांच्या नवऱ्याने त्यांना सोडलंय.' 'तो दुसऱ्या बाईसोबत राहतो. चार मुलं आहेत त्यांना. आणि आजूबाजूच्या बायका ह्या बाईतच कसा प्रॉब्लेम आहे' असं बोलतात.उखाळ्या पाखाळ्या करतात.शेजारच्यांचा मुलगा अचानक गेला हार्ट अटॅकने, पण आईवडिलांनी त्याला कसा घरात ठेवला नव्हता. आईवडिल छान पॉश सोसायटीत राहतात

आनि मुलगा झोपडपट्टीत घर घेऊन रहात होता. हे आणि असं बरंच काही. कथा मिळतात. कथा सगळ्यांकडे असतात. पण आपण त्याच्याकडे कसं बघतो? त्याला कसं इंटरप्रिट करतो यावर सगळं असतं. आजच्या घडीला नाटकातून मला काय मांडावसं वाटतं त्यासाठी मी कुठली पात्र निवडते? का निवडते यावरूनच माझ्या लिखाणाचं मूल्यमापन होऊ शकतं.

दहशतवादी हल्ले, युद्ध, रेप्स यावर नाटक मी लिहू शकत नाही. लिहीत नाही.इशूबेस्ड लिखाण केलं की अनेकदा ते ढोबळ होण्याची शक्यता असते. त्याचा सारासार विचार न होता भावनिक दृष्ट्या त्या गोष्टींकडे बघितलं जातं.. पण या सगळ्यामुळे माझ्यावर झालेला परिणाम मी माझ्या कथानकात आणायचा प्रयत्न नक्की करते. मी उत्सफूर्ततेकडून आता अधिक सूत्रबद्ध लिखाणाकडे वळतेय असं मला वाटतं. सगळं जरी मी ठरवलेलं नसलं तरी नाटक ह्या माध्यमात वावरतांना मी अनेकदा स्वत:चा शोध घेते. निराशा, गंड, भीती, पार मुळात, आत रुजलेल्या सवयी त्याची कारणं याचं मला आकर्षण वाटतं. कारण या सगळ्याच्या मुळाशी खोल आपली व्यवस्था असते. तिने दिलेला विचार असतो. मी लाख म्हणेन मी असं असं मानते. पण माझ्या नेणिवेत काय आहे? माझ्या सिस्टिममधून मला नको असलेलं सगळं बाहेर पडलं आहे का? जर नाही तर ती कोणती शक्ती आहे जी माझं वागणं रेग्युलेट करते आहे? ती प्रसार माध्यमं आहेत? इंटरनेट आहे? सतत ऐकू येणारं गॉसिप आहे? धर्म आहे?जात आहे? स्त्री असणं आहे? किंवा हे सगळंच आहे. आणि तरी मला माझ्या विचारांशी प्रामाणिक रहायचं आहे. धुमसणाऱ्या गोष्टींना वाट करून द्यायची आहे.शांतपणे विचार केल्यावर जाणवणाऱ्या वास्तवाला शब्द द्यायचे आहेत. आणि तेही तडजोड न करता. मग शब्दांचा पुर्नविचार करायला हवा. आजच्या काळात लिहितांना मी भाषेत तडजोड करत नाही.इतक्या श्रीमंत भाषेला त्यातल्या शब्दांना फटकारत नाही. पण आशयानुरुप त्याची मांडणी मात्र बदलते. वाचते, बघते आणि अनुभवते.सारा केन, सारा रूल किंवा क्रेल चर्चिलसारख्या नाटककारांची नाटकं वाचल्यावर वाटतं इथे पोहोचायचंय. असं काहीतरी लिहायचंय.किंवा असंच नाही पण या पद्धतीचं. निर्भीड. कदाचित वाटतांना ते अत्यंत वैयक्तिक वाटू शकेल. पण जितकी मी अधिक पात्रांच्या आत आत शिरू शकेन तितकी मी अधिक राजकीय होऊ शकेन. 'शांतता कोर्ट चालू आहे' मधील बेणारे जर जगातल्या घडामोडींबद्दल बोलली असती तर कदाचित ते नाटक इतकं राजकीय झालं नसतं. ते राजकीय होतं कारण ती समाजव्यवस्थेची एक बळी ठरते. आणि ती बळी का ठरते कारण ती प्रामाणिक आणि त्यामुळे कमकुवत असते.तिच्या आयुष्याची चिरफाड ही जेव्हा सगळ्यांसाठी एक गमतीचा विषय ठरते, तेव्हा ते नाटक फक्त बेणारेपुरतं रहात नाही. ते पॉवर पॉलिटिक्सचा एक अख्खा पट आपल्यासमोर उभं करतं. 'ग्लास मिनॅजरीज' हे टेनिसी विल्यम्सच्या आयुष्यावर बेतलेलं नाटक. अत्यंत पर्सनल म्हणावं असं, पण त्यातून त्याकाळचा अमेरिकन समाज बदलत्या परिस्थितीला आत्मसात न करु शकणारा आणि जुन्यात रममाण होणारा त्याचा मॉडर्नायझेशनमुळे होणारा. ऱ्हास चित्रित होतो.


ह्या सगळ्या पार्श्वभूमीवर आता लिहितांना वाटतं की शोध सुरू आहे, पण सापडेल. तरी अडखळायला होतं..मग नामदेव ढसाळांची ही कविता आठवते

मी भाषेच्या गुप्तांगाला उपदंश
लाखो उदास करूण डोळ्यातल्या चैतन्यानं
मला टाकलं आहे हादरवून
माझ्यातल्या विद्रोहानं मी चाललो आहे मोडून..

**– मनस्विनी लता रवींद्र**

भ्रमणध्वनी : ९७६४६४२४३४
manaswini.lr@gmail.com

ग्रंथाली




**भारतातील मुस्लिम स्थापत्यकला**

**डॉ. दाऊद दळवी**

**मूल्य ६०० रु.**

**सवलतीत ४०० रु.**

संपन्नता, समृद्धी आणि विविधता हे भारताचे वैभव. या वैभवात ज्या घटकांचा समावेश होतो, त्यापैकी एक आहे स्थापत्यकला. भारतभर या कलेच्या खुणा अनेक स्वरूपांत उभ्या आहेत. काही दिमाखात काळावर मात करून, तर काही काळाला शरण गेलेल्या. यांच्यावर त्या त्या काळच्या शैलींचा प्रभाव दिसून येतो. पैकी एक आहे मुस्लिम राजवटीतून निर्माण झालेल्या शैलीचा. उणापुरा सहा दशकाचा हा कालखंड. त्याचा प्रभाव स्थापत्यकलेवर प्रभावी होता, वर्चस्व असल्यासारखा. किल्ले, घुमट, मशिदी, मिनार, मकबरे, तुर्बती, महाल, सराया यांच्या खुणा ज्या जागोजागी दिसतात, त्या त्याच कालखंडातील वास्तू होत. भव्यता, भक्कमपणा, धाटणी, त्यावरील कलाकुसर आणि त्यातून विविध अंगांनी व्यक्त होणारी कलात्मकता त्यांच्या वैभवाची साक्ष देतात. यात स्थपतींची दृष्टी आणि कसब जसे मनाला भारावून टाकणारे आहे, तसे या वास्तू स्थापित करून घेणाऱ्या शासकांची दृष्टी, आवड, कल्पकता आणि गरजा प्रेरक ठरलेल्या आहेत. त्याचे अवलोकन करताना पर्यटक आजही अधोमुख होतो. परंतु दुर्दैवाने या वास्तूंचा इतिहास आणि संशोधन केलेली माहिती समग्र स्वरूपात उपलब्ध नव्हती. मराठीत तर नाहीच नाही. ही उणीव आणि निकड डॉ. दाऊद दळवी यांच्या 'भारतातील मुस्लिम स्थापत्यकला' या ग्रंथाने दूर झाली असे खात्रीने म्हणता येईल.


# व्यंगचित्रकारांच्या चष्म्यातून....

मराठी, भाषा, समाज आणि संस्कृतीसमोरील प्रश्न एकत्रितपणे व्यंगचित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून मांडण्याचा महाराष्ट्रातील पहिलाच प्रयत्न नुकताच झाला. मराठी अभ्यासकेंद्राने आयोजित केलेल्या या प्रदर्शनात प्रभाकर वाईरकर, प्रभाकर भाटलेकर, प्रशांत कुलकर्णी, महेंद्र भावसार, गजू तायडे आणि प्रदीप म्हापसेकर यांच्या व्यंगचित्रांचा समावेश होता. लिहिण्या–बोलण्यातून लुप्त होत चाललेले मराठी शब्द, माहितीच्या महाजालावर मराठी कसे येईल, दोन मराठी माणसांमधील न्यूनगंडातून आलेला अमराठी संवाद इ. समस्या मराठी भाषेपुढे असल्याचे मुख्यत्वे मांडले जाते. या समस्या खऱ्या आहेतच. मात्र या समस्यांपलीकडे आणि भूमिपूत्र आणि परराज्यीय या संघर्षात्मक बाबींपलीकडे जाऊन मराठी भाषेच्या जतन – संवर्धनाचा विचार व्हायला हवा. त्यामुळे मराठी भाषेसमोरील प्रचलित समस्यांपेक्षा मराठी भाषेसमोरील मूलभूत समस्यांना या प्रदर्शनातून मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रदर्शनाच्या निमित्ताने मराठी भाषा, समाज आणि संस्कृतीच्या जतन – संवर्धनासाठी महाराष्ट्र शासनाने काय करायला हवं आणि राज्य शासनाचं भाषाधोरण नेमकं काय असावं यासाठीच्या मागण्याही मराठी अभ्यास केंद्राच्या वतीने मांडण्यात आल्या होत्या. प्रमुख अकरा विभागात ६५ व्यंगचित्रे या प्रदर्शनात मांडण्यात आली होती. त्यापैकी काही निवडक व्यंगचित्रे...

(संयोजन : साधना गोरे, आनंद भंडारे ९१६७१८१६६८ bhandare.anandgmail.com)

---

**प्रभाकर वाईरकर**










प्रशांत कुलकर्णी




MARATHI SHALA
SUVICHAR: MATRUBHASHETUN SHIKA!
DINANK 16 JUN
IYATTA PACHAVI TUKADI-B
VISHAY
MARATHI

प्रदीप म्हापसेकर


इंग्रजीकरण
मराठी


मंत्रालय म.रा.
माफ करा... मी चोर दहशतवादी नाहीय!... विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ शोधतोय!....

प्रभाकर भाटलेकर


राज्याच्या स्थापनेनंतर म.भा.वि. सुरू
करण्यासाठी ५० वर्षे का लागली?
असं पत्रकारांनी विचारल्यास सांगायचं...
आम्ही यावर तावून-सुलाखून
निर्णय घेतलाय!
मराठी भाषा विभाग


मराठी शाळा
मराठी

गजू तायडे



गेली कित्येक वर्षं ते विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ शोधताहेत!


त्याच्यापासून जरा जपून! लई डेंजर माणूस! मराठी शाळा काढतो म्हणे!!

**महेंद्र भावसार**



डेब्रीज् युनिव्हरसिटी
मराठी
नॉट अलाऊड
ढ
उच्च शिक्षणाचं झालं आहे संपूर्ण इंग्रजीकरण
विद्यापीठांना ज्ञानभाषा म्हणून मराठीचं वावडं
सरकारने हात खटकले, विद्वानांनी अंग टाकले
मराठीच्या उच्च शिक्षणाचा झाला खेळखंडोबा
तरीही.... सर्वात पुढे महाराष्ट्र माझा ?

मराठी
Google
Microsoft
open source
गुगलने दिला मराठीचा पर्याय उपलब्ध
मायक्रोसॉफ्टने उघडली युनिकोडसाठी दारे
ओपन सोर्सही करतंय मराठीतून कामकाज
शासन मात्र पछाडलंय अनाठायी भितीने
तरीही.... सर्वात पुढे महाराष्ट्र माझा ?

# लोकभाषा आणि लोकशाही

**डॉ. भा.ल. भोळे**

समाजात जे राज्यकर्ते असतील त्यांची भाषा ही राजभाषा ठरते, हा सार्वत्रिक व सार्वकालीन नियम आहे. या देशात क्रमशः संस्कृत, अरबी, फार्सी व इंग्रजी या भाषांना राजभाषांचा दर्जा मिळत गेला, कारण त्या त्या वेळच्या राज्यकर्त्यांच्या त्या भाषा होत्या. परकीय राज्यकर्ते असले म्हणजे देशी भाषा मागे पडणे अनिवार्य असते. प्राकृत, पाली, शौरसेनी इत्यादी भाषांबद्दल हेच घडलेले आपणास दिसून येते. या देशाला स्वातंत्र्य मिळाले याचा अर्थ इथली जनता ही सार्वभौम सत्ताधारी बनली. तरीपण या सार्वभौम जनतेच्या भाषेला राजभाषेचा दर्जा आजही पुरेशा प्रमाणात मिळालेला नाही. इंग्रजी भाषेचे प्रभुत्व आजही या देशातील राज्यकारभारात, सार्वजनिक व्यवहारात व शिक्षणसंस्थात फार मोठ्या प्रमाणात आढळते हे अत्यंत दुर्दैवी म्हणावे लागेल.

एका अर्थाने स्वातंत्र्य आंदोलनाच्या द्वारे जी मूलगामी क्रांती महात्मा गांधींना या देशात घडणे अपेक्षित होते ती पूर्णतया घडून आली नाही, हाच निष्कर्ष आपल्याला वरील वस्तुस्थितीवरून काढता येतो. भारतातील क्रांती अपूर्ण राहिल्याच्या खुणा जागोजाग इथल्या लोकजीवनावर पडलेल्या दिसून येतात.

### इंग्जीधार्जिणा वर्ग

या क्रांतीला अपूर्ण ठेवणारे गुन्हेगार अनेक आहेत, पण मुख्यत्वे देशातील श्रेष्ठी वर्गच याला जाबाबदार आहे. शासन व राजकारण, उत्पादन व व्यापार, शिक्षण व समाजकारण, नेतृत्व व लष्कर या सर्वच आघाड्यांवरचा सूत्रधार हाच वर्ग आहे. उच्च मध्यमवर्गीय, आंग्लविद्याविभूषित व उच्चवर्णीय असा हा वर्ग आहे. इंग्रजीधार्जिणेपणा हे त्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे. तो आपल्या घरी इंग्रजी वातावरण तयार करतो. आपल्या मुलांना महागड्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये घालतो. लोकभाषा प्रचलित झाल्यास सामंतशाही कोलमडून आपले स्थान धोक्यात येईल आणि गरिबांची मुले वरिष्ठ पदांपर्यंत पोहोचू शकतील व त्यामुळे आपली मक्तेदारीच संपुष्टात येईल, अशी भीती त्याला वाटत असते. सत्तेसाठी व स्वार्थासाठी एक प्रभावी साधन म्हणून इंग्रजी भाषा त्याला अत्यंत उपयुक्त ठरते. इंग्रजी न जाणणाऱ्यांना गावंढळ समजण्याची विकृती यातून प्रादुर्भाव होते. जनसामान्यांवर 'गोळी' इतकाच जुलूम 'बोली'सुद्धा करू शकते, या लोहिया-वचनाचे प्रत्यंतर या देशात प्रकर्षाने येत आहे.

मूठभर श्रेष्ठींच्या नेमकी उलट स्थिती ९९ टक्के बहुजनसमाजाची असते. उच्चभ्रू समाजाकडे आशाळभूतपणे पाहाणाऱ्या या समाजाच्या ठिकाणी कमालीचा न्यूनगंड निर्माण होत असतो. मांत्रिकाच्या गूढ भाषेकडे पाहावे तसे भारावून तो आंग्लभाषकांकडे पाहात असतो. त्याला त्यातले कळत काहीच नाही, त्यामुळे राज्यकर्त्या वर्गाच्या काळ्या कृत्यांवर आयतेच पांघरूण पडत असते. आत्मविश्वासलुप्त असा हा समाज स्वाभिमान व स्वभाषाभिमान हरवून असतो. सार्वजनिक कार्यात आपण अपात्र आहोत अशी दृढ भावना याचे मन पोखरीत राहाते. तो त्याबद्दल उदासीन व विरक्त होतो. आपण वरिष्ठवर्गीयांशी इंग्रजीबाबत स्पर्धा करू शकत नाही हे न उमगल्याने 'इंग्रजी भाषा आपल्या मुलांनाही शिकवावी' अशी आत्मघातक व आत्मवंचक मागणी तो करू लागतो. मातृभाषेतून शिक्षण देणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांतर्फे चालणाऱ्या शाळा त्याला कमी प्रतीच्या वाटू लागतात.

### लोकशाहीला धोक्याच्या बाबी

लोकशाहीच्या दृष्टीने अशी विषम समाजरचना, मूठभरांचा अहंकार व अफाट जनतेचा हीनगंड, सार्वजनिक व कार्याबद्दल जनतेची अनास्था वगैरे बाबी अत्यंत धोक्याच्या असतात. इंग्रजीचे उच्चाटन व लोकभाषांची प्रतिष्ठापना यांच्याद्वारेच ही आंतरिक फूट व तफावत भरून निघू शकते. तसे झाले तरच आज मूठभरांची मिरासदारी असलेल्या आधुनिक गोष्टी सामान्य जनतेच्या आवाक्यात येऊ शकतील व सरंजामी श्रेष्ठींना लाभलेली सत्ता व प्रतिष्ठा व संपत्ती देशाच्या खऱ्या मालकांकडे संक्रमित होऊ शकेल. स्वातंत्र्य मिळाले तरी शासनकर्तावर्ग (रुलिंग एलीट) पूर्वीचाच कायम राहिला, हे जे गेल्या हजारो वर्षांपासून या देशात घडत आले आहे, ती प्रक्रिया खंडित करण्याचा, लोकभाषांची प्रतिष्ठापना हाच एकमेव मार्ग आहे. लोकशाहीसाठी अत्यावश्यक असलेले उभे व आडवे अभिसरण समाजात व्हायचे तर लोकभाषेद्वारेच ते शक्य होईल, आणि त्या अभिसरणातूनच सामाजिक परिवर्तनाचे व समाजाला एकजिनसी बनविण्याचे प्रयत्न यशस्वी ठरू शकतील. मूठभरांनीच

सर्व क्षेत्र हाती ठेवल्यामुळे देशातील संकुल गुणवत्तेचा लाभ होण्यापासून राष्ट्राला जे वंचित व्हावे लागते तेही लोकभाषेचा अवलंब केल्यास व्हावे लागणार नाही. कला-वाङ्मयापासून तर समाजकारण-राजकारणापर्यंतच्या सर्व क्षेत्रांत सकस व निकोप योगदान हा समाज करू शकेल. जातीय व वर्गीय एकाकीपणा नाहीसा होऊन बहुमुखी तणाव आपोआप ओसरू लागतील. आज भारतीय संस्कृती ही मूठभरांची संस्कृती झाली असल्यामुळे तिला जी अवकळा येत आहे, ती दूर होऊ शकेल. कप्पेबंद समाजजीवनात सांस्कृतिक अधःपतन अपरिहार्य ठरत असते.

**श्रेष्ठीजन-संस्कृतीचा दोष**

राज्यकर्त्यांचे अपयश शिक्षणक्षेत्रात व राज्यकारभाराच्या क्षेत्रात तर विशेष नजरेत भरते. इंग्रजीच्या उच्चाटनाला औष्ठिक मान्यता देत असतानाच त्यांनी त्या दृष्टीने कटू पण योग्य निर्णय घेण्याचे आजवर टाळलेलेच दिसून येते. जोपर्यंत इंग्रजीमुळे सत्ता, संपत्ती व प्रतिष्ठा लाभते तोपर्यंत इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मुलांना पाठवू नका, हे लोकांना सांगणे व्यर्थ आहे. सरकारने स्वतःचा या उच्चवर्णीय शाळा बंद करणे आवश्यक होते. कॉन्व्हेन्टमध्ये मिळणाऱ्या शिक्षणातून व संस्कारांमधून इथल्या विषमतेचे व शोषणाचे दृढीकरण होते आहे. याकडे आजवर शासनाने सोयिस्करपणे काणाडोळा केला आहे. याबाबतीत आता तरी सत्य निर्णय घेणे उचित ठरेल. 'शिक्षणाचा सामाजिक संदर्भ' या शीर्षकांतर्गत श्री. अ.रा. कामत यांचे तीन लेख 'समाजप्रबोधन पत्रिके'तून प्रसिद्ध झाले आहेत, ते विचारात घेतल्यास शासनाच्या डोळ्यांत जळजळीत अंजन घातले जाईल. आजवर या देशात झालेला शिक्षणाचा प्रसार व विकास बहुजनसमाजाच्या गरजा लक्षात घेऊन झालेला नाही. त्याचे प्रमाण व गुणवत्ता राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने फारच तोकडी आहे, असा त्यांचा अभिप्राय असून आकडेवारीसह त्यांनी त्यास पुष्टी दिली आहे. पण लक्षात कोण घेतो?

**शास्ते-शासित संवादभंग**

इतर काही देश असे आहेत की, ज्यांच्या स्वतःच्या भाषाच अस्तित्वात नव्हत्या म्हणून त्यांनी इंग्रजीचा अवलंब केला. त्यातही दोन हजार वर्षांपूर्वीच्या मृतप्राय हिब्रू भाषेचे पुनरुज्जीवन करून तिला राजभाषा करणाऱ्या इस्रायलचा अपवाद आहेच. परंतु देशभाषा अस्तित्वात असूनही, त्यांना अप्रगत व प्रतिगामी ठरवून, विदेशी भाषेला राज्यकारभाराची भाषा म्हणून स्वीकारणारा करंटा देश एकटा आपलाच आहे. शासकवर्गाचे स्वार्थ, पूर्वग्रह वा मूर्खपणा याच गोष्टीमुळे ही विपरीत स्थिती इथे आली आहे. सत्तारूढ वर्ग बहुतेकदा स्थितिवादी असतात. आज जो काही देशी भाषांचा वापर आपल्या राज्यकारभारात होताना आढळतो तो अगदीच तुटपुंजा, तोही अनिच्छेने व सक्तीपोटी केला जातो. आणि तोसुद्धा खालच्याच पातळ्यांवर. वरच्या पातळ्यांवर आजही इंग्रजीचे अधिराज्य आहे. शिवाय असे, की जो काही लोकभाषांचा वापर राज्यकारभारात होतो तोही सर्वसामान्य जनतेला अगम्य असलेल्या पद्धतीने होतो. त्यात उबवलेल्या कृत्रिम शब्दांचा भरणा असतो. जिथे आपल्या देशातील आंग्लभाषेच्या बुद्धिजीवींना अस्सल मराठी अभावानेच येते तिथे सरकारी अधिकाऱ्यांकडून या मराठीची अपेक्षाच करायला नको. या सर्वांचा परिणाम असा होतो की, शास्ते आणि शासित यांच्यात संपूर्ण संवादभंग घडतो. जनतेच्या आशाआकांक्षा राज्यकर्त्यांना कळत नाहीत आणि राज्यकर्त्यांच्या कारवाया अज्ञ जनतेला उमगत नाहीत. असा संवादभंग हे लोकशाहीवरचे सर्वात मोठे संकट होय.

**लोकभाषेसंबंधी भ्रमिष्ट कल्पना**

लोकभाषेच्या अवलंबामुळे देशात फुटीर प्रवृत्ती बोकाळतील, देशाची एकात्मता नष्ट होईल, भाषिक संकुचिततेला उधाण येईल अशी जी कारणे सांगितली जातात त्यामागे भ्रमिष्टपणा किंवा धूर्तता असते. उलटपक्षी असे म्हणता येईल की लोकभाषेतून कारभार चालल्यास त्याचे आकलन सामान्य मतदारांना होईल, जागृत लोकमत निर्माण होऊ शकेल. त्याचा वचक प्रशासनावर बसला म्हणजे लालफीतवाद, भ्रष्टाचार वगैरे दोष कारभारातून हद्दपार होतील. कारभारातील लोकांची रुची आणि सहभाग वाढेल. शासनप्रक्रियेबद्दल त्याला आत्मीयता व विश्वसनीयता वाटू लागेल आणि इथली लोकशाही अधिक चैतन्यमयी व बळकट होईल. राष्ट्रीय एकात्मता बलवत्तर होईल, शिवाय नव्या वर्गांचा शासक गटात प्रवेश होऊन शासन अधिक प्रातिनिधिक होण्यासही हातभार लागेल.

लोकभाषेचाच प्रश्न निर्माण करणारांवर असा आक्षेप अनेक हितसंबंधियांकडून घेतला जातो की, जनतेचे जीवनमरणाचे, प्राथमिक गरजांच्या पूर्तीचे प्रश्न आहेत त्यांना हात न घालता हा काय भलताच प्रश्न उभा केला जातो आहे? या प्रश्नांचे उत्तर देताना लोहियांनी एका ठिकाणी म्हटले आहे की, मनाचे प्रश्न व पोटाचे प्रश्न परस्परांपासून वेगळे केले जाऊ शकत नाहीत. इंग्रजीद्वारे लोकांच्या मनांवर प्रभुत्व मिळवणारे मोजके लोक अफाट जनसमुदायाच्या शरीरावरही ताबा मिळवीत असतात. बहुजनसमाजाचे प्रश्न हे खऱ्या अर्थाने राज्यकर्त्यांसमोर येतच नाहीत. कारण इंग्रजीच्या वर्चस्वामुळे त्यांची वाचाच बंद असते. मग मूठभरांचे प्रश्न हेच राष्ट्राचे प्रश्न मानले जाऊ लागतात. कामगारांचे प्रश्न सोडवण्याच्या प्रतिज्ञा करणारे कामगारनेते कामगारांना न कळणाऱ्या भाषेत सर्व व्यवहार करीत असतात. अंतस्थपणे सरकार व मालकवर्ग यांच्याशी तत्त्वशून्य तडजोडी करीत असतात. या तिघांची अनिष्ट युती कामगारांच्या हिताला मारक ठरते. कामगारांमधून त्यांचे खरे नेते उदयाला येत नाहीत, तर कामगार चळवळीच्या नेतृत्वाची एक पायरी म्हणून वापर करून घेणाऱ्या स्वार्थी पुढाऱ्यांच्या हाती कामगारांच्या हक्कांच्या संरक्षणाची धुरा सोपविली जाते. बाजरपेठांमधील उत्पादन व पुरवठा

या प्रक्रियाही मूठभरांच्या गरजा लक्षात घेऊनच चालत राहतात. सामान्य माणूस सगळीकडूनच उपेक्षिला जातो.

**वृत्तपत्रे व जनसंपर्क माध्यमे**

लोकशाहीव्यवस्थेत वृत्तपत्रे व अन्य जनसंपर्कसाधने यांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असते. जनमतनिर्माण, संघटित, आविष्कृत करण्याचे लोकशाहीसाठी प्राणभूत असलेले कार्य या माध्यमांच्या द्वारे चालत असते.

रेडिओ, दूरदर्शन, वार्तापट यांचे प्रयोजन लक्षात घेता प्रमाणभाषा व परिभाषा यांच्यापेक्षा लोकभाषेला त्यांच्यात प्राधान्य मिळणे अत्यावश्यक आहे. आज या माध्यमांच्या द्वारे शेतकरी, महिला, विद्यार्थी व कामगार यांच्यासाठी प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांमधील बोजड व पुस्तकी भाषा ऐकली म्हणजे वरील विधानाचा प्रत्यय येऊ शकेल. उच्चभ्रू शिक्षणाने 'प्रदूषित' न झालेले लोक जी भाषा बोलतात तिचा वापर या माध्यमांमधून झाला पाहिजे. त्याविना सामान्य माणसांपर्यंत सरकारला पोचता येणे सुतराम शक्य नाही. लोकभाषेचे हे दृश्य सामर्थ्य संबंधितांना कधी प्रतीतच झाले नसावे असे दिसते.

लोकभाषेचा प्रश्न हा सामान्य माणसाच्या मुक्तीचा प्रश्न आहे या गोष्टीची राज्यातील बुद्धिमंतांना व निर्णयकर्त्यांना पुरेशी जाणीव नाही. त्यामुळे इंग्रजी वा संस्कृत या भाषांच्या कुबड्या घेतल्यावाचून त्यांना लिहिता-बोलताच येत नाही. हजारबाराशे वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या मराठी भाषेवर त्यांनी एवढा अविश्वास का दाखवावा कळत नाही. त्यांची वर्गांध दृष्टी हेच यामागे एकमेव कारण दिसते.

**जनतेचे उत्तरदायित्व**

श्रेष्ठींच्या व सरकारच्या भूमिकांचे परीक्षण केल्यानंतर शेवटी याबाबतीत जनतेचे जे उत्तरदायित्व आहे त्याचाही निर्देश करणे आवश्यक वाटते. वर्गस्वार्थापोटी ते लोक आपल्या धोरणात व वागण्यात बदल करणार नाहीत हे आजवरच्या अनुभवांवरून ओळखून आता जनतेनेच पुढाकार घेण्याची गरज निर्माण झाली आहे. इंग्रजी भाषेविषयी जे अपसमज तिच्या मनावर हितशत्रूंनी पक्के बिंबवून ठेवले आहेत ते तिने प्रथम झटकून टाकायला हवेत. इंग्रजी ही एकमात्र विश्वभाषा नाही. कोणतीच एक भाषा विश्वभाषा होऊ शकत नाही. भारतात मात्र इंग्रज राज्यकर्त्यांच्या प्रभावाखाली इंग्रजी ही ज्ञानाची एकमेव खिडकी आहे, आधुनिकतेची संदेशवाहक आहे, वाघिणीचे दूध आहे - असे अनेक भ्रम पसरले व दृढ झाले. वस्तुतः इंग्रजी भाषेने इथले मौलिक चिंतन व ज्ञानाचा आकंठ आस्वाद अशक्य करून सोडला. जागतिक कीर्तीचा एकही मोठा समाजशास्त्रज्ञ व विचारवंत इथे होणे अशक्य करून सोडले. एकप्रकारच्या पोपटपंचीला विद्वत्ता ठरवून या राष्ट्राच्या नवनवोन्मेषशाली प्रतिभेला व बुद्धीला इंग्रजीने जायबंद करून टाकले. आपल्या भारतीय भाषांच्या तुलनेत शब्दभांडार, लवचिकता, नवशब्दनिर्माणक्षमता या कोणत्याच दृष्टीने इंग्रजी भाषा श्रेष्ठ व समृद्ध नाही.

जनतेने हे पक्के ध्यानात ठेवावे की सार्वजनिक संवादात व व्यवहारात लोकभाषा जसजशा अधिकाधिक वापरल्या जातील तसतशा त्या संपन्न होत जातील. भाषेचे तज्ज्ञ व सरकारी अधिकारी हे भाषेचे शिल्पकार नसतात. आहे तशीच भाषा ते वापरतात. भाषेचा नाद, लय, आणि उच्चारसौकर्य लक्षात ठेवून परक्या भाषेतल्या शब्दांवरून नवशब्दनिर्मिती करण्यात निरक्षर नागरिकांचा हात ते कधीच धरू शकणार नाहीत. लोकांच्या महान चळवळीतून भाषेची कारंजी उसळत असतात. लोकांच्या जागृतीतून भाषेचे मळे बहरत जातात. जनसंपर्कातून भाषा समृद्ध होत जातात. देशाच्या सांस्कृतिक परंपरा आणि कथाकीर्तनपुराणादी वारशातून अमाप शब्दांचे पीक उगवत असते.

**संस्कृतीचा बलदंड आधार**

हे सारे घडून आले तरच या देशातील लोकशाहीला भवितव्य आहे. गेबियल आल्मंड नामक गृहस्थाने राजकीय संस्कृतीचे तीन प्रकार सांगितले आहेत. संकुचित राजकीय संस्कृती, प्रजाजन राजकीय संस्कृती आणि सहभागात्मक राजकीय संस्कृती. त्याने सांगितलेल्या गुणलक्षणांच्या आधारे भारतीयांची आजची राजकीय संस्कृती ही दुसऱ्या प्रकारची आहे. सरकारकडून जे मिळेल त्यावर अल्पसंतुष्ट राहाणे, आपण शासनप्रक्रियेला वळण देऊ शकतो असा आत्मविश्वास गमावून बसणे, भल्याबुऱ्या सरकारी निर्णयांना शिरोधार्थ मानून निमूटपणे पाळणे आणि समाजातील सरंजामी रचना बिनतक्रार स्वीकारणे ही ती लक्षणे होत. लोकशाहीसाठी ही राजकीय संस्कृती अजिबात कामाची नाही. सहभागात्मक राजकीय संस्कृती असणे ही लोकशाहीसाठी आद्य महत्त्वाची बाब आहे. तीत नागरिकांना आपल्या हक्क-कर्तव्याची जाणीव असते, आपले हक्क तत्परतेने राबवण्याची इच्छा व क्षमता असते. ते स्वतःला राजव्यवस्थेचे क्रियाशील घटक मानतात व हवे ते निर्णय राज्यकर्त्यांकडून मिळवून घेऊ असा आत्मविश्वास बाळगतात. राज्यकारभाराचे मूल्यमापन व परीक्षण ते सतत करीत असतात. राजकीय निर्णयांना अनुकूल वा प्रतिकूल प्रतिसाद देत असतात. लोकशाही टिकून राहते ती अशा संस्कृतीच्या बलदंड आधारावरच. तेव्हा अशी संस्कृती प्रयत्नपूर्वक या देशात निर्माण करणे अत्यंत अगत्याचे झाले आहे. लोकभाषेचा सर्व आघाड्यांवर अवलंब झाल्यावचून ही गोष्ट केवळ असाध्य व अशक्य आहे. हे लक्षात ठेवून सरकारी व बिनसरकारी लोकशाहीवाद्यांनी लोकभाषेचा आग्रह धरावा. त्यासाठी राजभाषा वर्षच काय पण राजभाषा दशकही साजरे करावे लागल्यास ते करावे. मात्र त्यांनी जर आपली ही जबाबदारी टाळली तर, अस्थिर व उपरे राजकारण इथे कायम सुरू राहील आणि मग या देशातील लोकशाहीला कुणीच वाचवू शकणार नाही असा निर्वाणीचा इशारा द्यावासा वाटतो.

*(तरुण भारत, नागपूर, २६ जाने. १९८० वरून संक्षेपाने उद्‌धृत)*



# भारतीय भाषांची स्थिती-गती

**तुषार पवार**

'भारतातील प्रादेशिक भाषांची स्थितिगती आणि भाषिक चळवळींचा तुलनात्मक अभ्यास' या विषयावरील प्रकल्प मी सप्टेंबर २०११ ते सप्टेंबर २०१३ या दोन वर्षांच्या काळात प्रत्यक्ष क्षेत्रभेटींच्या माध्यमातून पूर्ण केला. यासाठी भारतातील प्रत्येक राज्याच्या राजधानीच्या शहरांना तसेच तिथल्या भाषिक चळवळीच्या अंगाने महत्त्वाच्या शहरांना केंद्रस्थानी ठेवून त्यांना भेटी दिल्या.

या लेखात संपूर्ण दौऱ्यानंतर भारतीय भाषांच्या सद्यस्थितीबद्दलच विस्तृत विवेचन करायची इच्छा असली तरी संपूर्ण स्थिती मांडणे शक्य होणार नाही. समाजाच्या सामान्य व्यवहारात विशेषतः बोलीव्यवहारातील भाषेचे स्थान, शालेय आणि उच्च शिक्षणाचे माध्यम म्हणून त्या भाषेचे स्थान, प्रशासकीय आणि न्यायव्यहाराची भाषा म्हणून त्या त्या राज्यातील भाषेचा होणारा वापर आणि जागतिकीकरणात तंत्रज्ञानातील भाषेचा वापर व त्यादृष्टीने विकासाचे होणारे प्रयत्न अशा भाषा टिकण्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या व्यवहारक्षेत्रांबाबतचे माझे अनुभव शक्य तितक्या संक्षेपाने मांडण्याचा माझा प्रयत्न असेल. पुन्हा सर्वच राज्यांतील भाषिक व्यवहारांचा तपशील जागेअभावी मांडणे येथे शक्य होणार नाही.

भारतीय भाषांची सद्यस्थिती मांडताना त्या त्या राज्यातील भाषेचे समाजाच्या बोलीव्यवहारातले नेमके स्थान काय हे समजून घेणे सर्वाधिक महत्त्वाचे ठरते. दक्षिणेकडील राज्ये वगळता ईशान्य भारतातील राज्ये, सिक्कीम, पश्चिम बंगाल, हरयाणा, राजस्थान या राज्यांमधली स्थिती याबाबत आश्वासक म्हणता येणार नाही. या सर्वच राज्यांमधल्या राजधानीच्या शहरांत मला त्यांचीच भाषा बोलीव्यवहारात आहे असे ठळकपणे जाणवले नाही. इथे सर्वत्र हिंदीचा प्रभाव अधिक होता. तो इतका की मी मुंबईच्या बाहेर कुठेतरी आहे याचा मला विसर पडावा. भाषिक कट्टरतेत आपण ज्या पश्चिम बंगालचे नाव घेतो तिथले स्थानिक बंगाली भाषक आपापसात बंगालीचा वापर करत असले तरी स्थलांतरित व्यावसायिक आणि कर्मचाऱ्यांसोबतचा त्यांचा संवाद मात्र हिंदीतच. त्यातही सुशिक्षित बंगाली भाषकांचा कल इंग्रजीतील संवादाकडे असल्याचेही माझे निरीक्षण आहे. हरयाणा आणि राजस्थान, उत्तराखंड यांसारख्या राज्यांत त्यांची स्वतःची भाषा हिंदीपेक्षा वेगळी असूनही तिथली राजभाषा मात्र हिंदी असल्याने आपसूक सगळ्या इथल्या बोलीव्यवहारात हिंदी झिरपत चालल्याचे आढळते. याबाबत दक्षिणेकडील राज्यांचा विचार केल्यास आंध्रप्रदेश, कर्नाटक, तमीळनाडू आणि केरळ या चारही राज्यांत त्यांच्या भाषांचा बोलीव्यवहारातला प्रभाव जाणवतोच. यात तमीळनाडू सगळ्यात आघाडीवर. इथली परिस्थिती अशी की इथे तुम्हाला तमीळ आणि इंग्रजीपैकी एकही भाषा येत नसली तर तुमचे जगणे मुश्किलच. इथे चहासुद्धा तुम्हाला किमान Teyya म्हणतच मागावा लागतो. महाराष्ट्रात मराठी बोलायला टाळणारा उत्तरभारतीय इथे तमीळ बोलताना तुम्हाला आढळेल. ते शिकायची तयारी नसलेले इथे टिकतच नाहीत अशी इथली परिस्थिती. बंगळुरूमध्ये सामाजिक व्यवहारांत स्थानिक आणि उच्चभ्रू स्थलांतरित वर्ग यांच्यातल्या खुल्या भाषिक संघर्षाला आर्थिक किनार असल्याने कानडीचा वापर हा अतिरेकी अस्मिता आणि दबावाचे तंत्र म्हणून असल्याचे ठळकपणे जाणवते. त्यामुळे किमान बंगळुरूसारख्या शहरातला कानडी बोलीव्यवहार उस्फूर्त म्हणता येणार नाही एवढे मात्र नक्की. केरळातली परिस्थिती मात्र आदर्श म्हणता येईल. पर्यटनामुळे इथला नागरिक समोरच्याच्या हिंदीला नाकारत नाही. मात्र असे असूनही आपले बोलीव्यवहार मल्याळीतच होतील याची दक्षता कोणत्याही भाषिक तंट्याशिवाय घेतली जात असल्याचा अनुभव मला इथे आला. याबाबतीत संपूर्ण भारतात माझ्यासाठी आश्चर्याचा धक्का ठरलेले राज्य म्हणजे मिझोराम. मिझो ही इथली राजभाषा. इथल्या बोली व्यवहारांत मिझोशिवाय इतर कोणत्याही भाषेचा वापर होताना मला आढळला नाही. इथल्या शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असल्याने नव्या पिढीशी तुम्ही इंग्रजीत संवाद साधू शकता. मात्र शिक्षणापासून वंचित दोनेक पिढ्या मागे गेल्यास तुम्हाला मूकाभिनयाशिवाय पर्यायच उरत नाही. दक्षिण भारत वगळता देशात इतरत्र हिंदी दूरचित्रवाणी माध्यमांमुळे आणि सिनेमांमुळे झालेल्या हिंदीच्या प्रसाराला अपवाद ठरलेले हे एकमेव राज्य माझ्या अनुभवास आले.

बोलीव्यवहारासोबतच दृश्य भाषा हा देखील त्या त्या राज्यातील भाषिक सद्यस्थितीच्या अंगाने महत्त्वाचा घटक म्हणावा लागेल. याबाबतीत दक्षिणेकडील राज्ये वगळता इतर राज्यांबाबत

काही सांगण्यासारखे नाही. रस्त्यारस्त्यांवरील जाहिरातींचे फलक, सूचनांचे फलक, शासकीय कार्यालयांतील नावांच्या पाट्या, सूचनांच्या पाट्या, दुकाने आणि तत्सम व्यावसायिक ठिकाणांच्या नावांचे फलक अशा सर्वच बाबतीत संपूर्ण देशात इंग्रजीचा अंमल जाणवतोच. ईशान्य भारतात मिझोरामचा अपवाद वगळला तर त्यांच्या भाषांची लिपी रोमन असल्याने इंग्रजी हीच दृश्य भाषा आहे. मिझोराममध्ये मात्र मिझो भाषेतील दुकानांचे फलक मला आढळले. (अर्थात रोमन लिपीमध्येच) शिलाँगला असताना राष्ट्रीयकृत बँकांच्या नावाचे फलक काही ठिकाणी रोमन लिपीत पण त्यांच्याच भाषेत आढळले. हिंदी पट्ट्यातील राज्यांमध्येही सर्वसामान्य दृश्य भाषा म्हणून (शासकीय कार्यालये वगळता) देवनागरीचे फार काही दर्शन मला झालेच नाही. हिंदी पट्टा वगळला तर देशातील इतर राज्यांतील दूरदर्शन आणि आकाशवाणी केंद्रातील डोळ्यांना दिसणारी हिंदी ही त्या त्या राज्याच्या भाषेवर केलेले आक्रमणच होते. ते इतके की त्या राज्याला स्वतःची भाषाच नसावी. हे वगळले तर दृश्य भाषेच्या बाबतीत दक्षिणभारत तुलनेने उरलेल्या भारताच्या नक्कीच आघाडीवर आहे. मात्र त्याला ओहोटीही तितकीच लागलेय. कारण इथे स्वभाषेचा आग्रह म्हणजे केवळ हिंदीविरोध आहे इंग्रजीचा नाही. दृश्य भाषेच्या बाबतीत आदर्श अपवाद मात्र कर्नाटकाचा. बंगळुरूत मला एकही ठिकाण अगदी एकही मॉल वा बस थांबादेखील मला असा दिसला नाही जिथे कानडीचा वापर नाही. याचे कारण प्रशासनाने याबाबतचा नुसताच नियम केलेला नाही तर कानडीचा वापर न करण्याबाबत दंडात्मक कारवाईची तरतूद करून त्याची तितकीच कडक अंमलबजावणीही केलेली आहे. हा दंड द्यावा लागू नये म्हणून इथे सगळेच तुमच्या डोळ्यांना कानडीचे दर्शन देतात. हे दर्शन न देण्याच्या मुजोरीमुळे व्होडाफोनसारख्या इंग्रजाळलेल्या आणि हिंदीशिवाय इतर देशी भाषांना पाण्यात पाहणाऱ्या मोबाईल कंपनीला प्रत्येक इंग्रजी फलकामागे आकारलेल्या दंडातून सूट मिळावी म्हणून कोर्टात धाव घ्यावी लागली असल्याचेही माझ्या ऐकण्यात आले.

आता भाषेच्या इतर मुख्य व्यवहारक्षेत्रांबाबत बोलूया. स्थानिक प्रशासकीय व्यवहार हे यातले सगळ्यात महत्त्वाचे क्षेत्र. आपल्या भाषा जपण्याची सगळ्यात मुख्य जबाबदारी राज्याच्या प्रशासकीय यंत्रणांवर आहे. आपल्या भाषांना राज्याच्या राजभाषेचा दर्जा देण्यासाठी तसा कायदा करून ही जबाबदारी जवळपास प्रत्येक राज्याने पार पाडलीय. (यातून आसाम आणि त्रिपुरा वगळता ईशान्येतल्या इतर राज्यांत त्यांच्या अनेक भाषा केवळ नाममात्र राजभाषा असल्याने ती राज्ये वगळणंच योग्य राहील.) मात्र अंमलबजावणीची वेळ जेव्हा येते तेव्हा अगदी तमीळनाडूपासून सर्वच राज्ये आपल्या भाषांना इंग्रजीसमोर दुय्यम स्थान देत असल्याचाच अनुभव मला आला. आसामसारख्या राज्यात तर आजही त्यांच्या राजभाषा कायद्याची अंमलबजावणी व्हावी म्हणून प्रयत्न करावे लागताहेत. आसाम साहित्यसभेसारखी संघटना आजही याचसाठी लढा देत आहे. १९६० साली आसामी राजभाषा कायदा आला आणि त्याच्या अंमलबजावणीतूनच राज्याचे मेघालय, नागालँड आणि मिझोराम असे तुकडे पडले. भाषिकतेत कट्टर असलेल्या दक्षिण भारतात तमीळनाडू आणि केरळसारख्या राज्यांनी तर आपल्या राजभाषा कायद्यातच इंग्रजीच्या वापराची तरतूद करून त्यावर अधिकृततेचा शिक्काच मारून ठेवलाय. बंगाली संस्कृतीचं प्रतिबिंब असलेल्या संवेदनशील साहित्यकृतींनी भाषेच्या बाबतीत आपल्याला आदर्श वाटणाऱ्या पश्चिम बंगालमध्ये तर आपल्याला ब्रिटिशांचा सर्वाधिक सहवास लाभल्याचं दाखवण्याचा अट्टाहासच आहे. त्यामुळेच अस्मिता आणि प्रशासनाच्या भाषेत तफावत आहे. हिंदी राजभाषा असलेल्या राज्यांत दिल्ली वगळता इतर राज्यांत प्रशासकीय यंत्रणेचा लाभ घेणारा वर्ग हा मोठ्या प्रमाणात आर्थिकदृष्ट्या कमकुवत असल्याने आणि तिथला जवळपास सर्वच नोकरदार वर्ग केवळ हिंदीचा वापर करुनच यंत्रणेत शिरलेला असल्याने हिंदीचा वापर होत असल्याचं दिसतं. मात्र त्याला स्वभाषेचा आग्रह नसून केवळ सोयीचा वापर असंच म्हणता येईल, कारण इथेही हिंदीचं स्वरूप दस्तावेजात कमी आणि बोलीत जास्त आहे. देशातलं असं एकही राज्य नव्हतं जिथे मला राज्य शासन त्यांच्या भाषेतच नियम, कायदे तयार करत असल्याची माहिती मिळाली. प्रत्येक राज्याच्या प्रशासनात नियमावली, कायदे, परिपत्रकं, मंत्रिमडळाच्या/सचिवांच्या बैठकांची इतिवृत्त, सचिवांच्या फायलींवरील नोंदी, त्यांच्या विधिमंडळातील कामकाजाचे दस्तावेजीकरण इंग्रजीतच करत असल्याची माहिती मिळाली. या सर्व बाबी आधी इंग्रजीत आणि गरज पडली तर नंतर राज्याच्या राजभाषेत अशाच प्रकारे सर्वच राज्यांची प्रशासनं काम करत असल्याची माहिती मिळत होती. (राजकीय लाभापोटी याला तमीळनाडू आणि कर्नाटक ही राज्ये मात्र अपवाद आहेत.) हिंदी पट्ट्यात जवळपास प्रत्येक राज्यात एक हिंदी अकादमी आहे. मात्र या अकादमींवर प्रशासकीय भाषाविकासाची नाही तर प्रामुख्याने साहित्यिक विकासाची जबाबदारी असल्याचंच मला आढळलं. प्रशासकीय भाषेसाठी आवश्यक पायाभूत तरतुदींच्या बाबतीत पंजाब आणि तमीळनाडूचा उल्लेख करावा लागेल. पैकी पंजाबचा भाषा विभाग आता जवळपास मृतावस्थेतच असल्यासारखा आहे. मात्र मला प्रत्यक्ष क्षेत्रभेटींमध्ये मिळालेल्या माहितीनुसार पंजाब राज्य हे स्वभाषेचा सर्वांगाने विचार करणारे आणि त्यासाठी यंत्रणा उभारण्याची सुरुवात करणारं पहिलं राज्य आहे. तमीळनाडूचा विचार करता मुळातच स्वभाषिक कट्टरता आणि त्यात हिंदी विरोध यातून इथल्या भाषिक तरतुदी मूलभूत आहेत. तमीळ विकास संचालनालय हा त्यांचा प्रशासकीय भाषा विभाग. या विभागाकडे प्रशासकीय भाषेसाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी करण्याचे अधिकार आणि जबाबदाऱ्या आहेत. हा विभाग अगदी प्रशासकीय दस्तावेजांच्या अनुवादापासून ते त्या संकेतस्थळांवर उपलब्ध करून देणे, कोशनिर्मिती करणे, भाषा प्रशिक्षण, राज्याच्या राजभाषा कायद्याच्या अंमलबजावणीसाठीच्या कार्यशाळा आणि प्रशिक्षण वर्गांचे आयोजन, संपूर्ण राज्यात तमीळच्या प्रशासकीय वापराचे

निरीक्षण करून त्याचा अहवाल सादर करणे अशा अनेक जबाबदाऱ्या पार पाडतो. मात्र असं असलं तरी कोणतीही दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद नाही. इथे चांगला आणि काम करणारा विभाग असला तरी तो परिणामकारक मात्र म्हणता येणार नाही. असं असतांनाही आपल्या संपूर्ण देश इंग्रजाळत असतांना छत्तीसगढीसाठी त्यांनी सुरू केलेले प्रयत्न नक्कीच दखलपात्र आहेत. याचं महत्त्वाचं कारण हे की छत्तीसगढीला अजून आठव्या परिशिष्टात स्थान नाही. म्हणजे भारतीय संसदेने छत्तीसगढीस अजूनही एक भाषा म्हणून मान्यता दिलेली नाही. तरीही या राज्याने छत्तीसगढीस स्वतःची राजभाषा म्हणून मान्यता दिली आहे, तसा कायदा केला आहे, आणि भाषेच्या विकासाठी छोटा का होईना पण स्वतंत्र विभागही स्थापन केला आहे. या विभागाने छत्तीसगढीचा कोशही तयार केला आहे. याचबरोबरीने प्रशासकीय दस्तावेजांचे अनुवाद व सामान्य व्यवहारात उपयोगात येणारे दस्तावेज छत्तीसगढीत तयार करण्याचे प्रयत्नही विभागाकडून होत आहेत.

**या संपूर्ण अभ्यास दौऱ्यात मातृभाषेतल्या शिक्षणासाठी काम करणारी अगदी मोजकीच माणसं मला भेटली. महाराष्ट्रात मराठी माध्यमाच्या शाळांकडे पाठ फिरवून इंग्रजी माध्यमाकडे वळणारी माणसं, ज्या कारणांची यादी वाचून दाखवताहेत तीच कारणं सबंध देशभरात मला ऐकावी लागली. याबाबतीत सबंध भारतात ऐक्य असलं तरी असं ऐक्य भारतीय भाषांसाठी धोक्याचा घंटानाद म्हणावा लागेल.**

शालेय शिक्षणाचा विचार केला तर मातृभाषेतील शिक्षणाची अवस्था देशभरात चिंताजनकच असल्याचे अनुभवास आले. लोक देशी भाषांमध्ये शिकताहेत पण त्याचे दोन पदर आहेत. विचार करून मातृभाषेत आपल्या मुलांना शिकायला पाठवणारे अपवाद आहेत आणि केवळ परवडत नाही म्हणून स्थानिक भाषांत शिकणारे अधिक आहेत. याला देशाचा कोणताही भौगोलिक पट्टा अपवाद नाही. हीच देशाच्या शालेय शिक्षणाची अवस्था होय. ही अवस्था इतकी चिंताजनक आहे की या संपूर्ण अभ्यास दौऱ्यात मातृभाषेतल्या शिक्षणासाठी काम करणारी अगदी मोजकीच माणसं मला भेटली. महाराष्ट्रात मराठी माध्यमाच्या शाळांकडे पाठ फिरवून इंग्रजी माध्यमाकडे वळणारी माणसं, ज्या कारणांची यादी वाचून दाखवताहेत तीच कारणं सबंध देशभरात मला ऐकावी लागली. याबाबतीत सबंध भारतात ऐक्य असलं तरी असं ऐक्य भारतीय भाषांसाठी धोक्याचा घंटानाद म्हणावा लागेल.

ईशान्य भारताचा विचार केल्यास अरुणाचल प्रदेश, नागलँड, मिझोराममध्ये शालेय शिक्षणाचं माध्यम इंग्रजी आहे. देशभरात अनिवार्यपणे तिथली राजभाषा किंवा स्थानिक भाषाच शिक्षणाचं माध्यम असलेलं एकही राज्य देशभरात नाही हे भारताचं शैक्षणिक माध्यमाचं वास्तव आहे. त्यामुळेच प्रत्येक राज्यात इंग्रजी माध्यमाच्या शाळांनी आपलं साम्राज्य व्यवस्थित पसरवलंय.

शालेय शिक्षणाच्या अवस्थेबाबत सांगितल्यानंतर खरं तर उच्च शिक्षणाबाबत काही सांगण्यासारखं उरतच नाही, कारण आपल्या भाषांमध्ये उच्च शिक्षण नसणं हे इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे कल झुकण्याच्या प्रमुख कारणांपैकी एक कारण आहे. हीच देशाच्या उच्च शिक्षणाची अवस्थाही आहे. पंजाब, तमीळनाडू आणि गुजरातचा अपवाद वगळला तर पदवी पर्यंतचा भाषा विषय वगळून इतर विषयांतलं उच्च शिक्षण आपल्या भाषांमध्ये नाही. त्यासाठी प्रयत्न देखील नाहीत. माझ्या चर्चेतल्या अनुभवांप्रमाणे तमीळनाडू वगळलं तर देशातल्या कोणत्याही राज्यात पदव्युत्तर शिक्षणात त्यांच्या भाषेत उत्तरे लिहिण्याची सोयही नाही. देशातल्या सर्वच विद्यापीठांतले भाषा विषयाचे अभ्यास साहित्यकेंद्री, उपयोजित नाहीच, अपवाद पुन्हा तमीळनाडूचाच. त्यामुळे भारतीय भाषांमधल्या उच्च शिक्षणाच्या स्थितीबाबत चर्चा करण्यासारखं फारसं नाहीच असं खेदानं म्हणावं लागतंय. तमीळ विद्यापीठ मात्र याबाबतीत थोडं आघाडीवर असल्याचं म्हणावं लागेल. तिथेही पंजाबी विद्यापीठाप्रमाणेच सर्वच अभ्यासक्रम तमीळमध्ये आहेत. त्याला स्थानिक विद्यार्थ्यांचा बऱ्यापैकी प्रतिसादही मिळतोय. अगदी तमीळमधल्या संगणकीय अभ्यासक्रमांना देखील. मात्र तिथल्या प्राध्यापकांचा सूर ज्यांना आपण इंग्रजीत पदवी वा पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करू शकत नाही असं वाटतं तीच मुलं इथे प्रवेश घेत असल्याचा होता. तमीळ विद्यापीठानेही अभियांत्रिकी आणि वैद्यकीय अभ्यासक्रम तमीळ भाषेत तयार केला होता. मात्र याला या दोन्ही शाखांशी निगडित व्यावसायिक संघटनांची परवानगी नसल्याने हे सुरू होऊ शकले नव्हते. यांपैकी साधारण २०१० पासून अभियांत्रिकीचा अभ्यासक्रम तमीळ भाषेत सुरू करण्यात आला. सध्या तो अण्णा विद्यापीठांतर्गत सुरु असून राज्यभरातून केवळ १०००० विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला होता. या दोन विद्यापीठांचा विचार केला तर खऱ्या अर्थाने त्यांनी प्रयत्न केल्याचं म्हणता येईल. मात्र एक प्रशासकीय अनास्थेला बळी पडलं तर दुसरं आपल्या प्रयत्नांचं सार्वत्रिकीकरण करण्यात कमी पडलं असं म्हणता येईल. त्यामुळेच या दोन्ही विद्यापीठांना त्यांना अपेक्षित यश मिळालं नाही. माझ्या मते त्यांचं अपयश ही इतर भारतीय भाषांच्या दृष्टीनेही वाईट गोष्टच आहे. कारण भारताच्या मानसिकतेचा विचार केला तर हे दोन्ही प्रयत्न यशस्वी झाले असते तर किमान दाखविण्यासाठी तरी इतर राज्यांमध्ये ते राबविले गेले असते. कदाचित त्यामुळेच महाराष्ट्रात आजतागायत मराठी भाषेचे विद्यापीठ उभे राहू शकले नसेल. महाराष्ट्रात प्रत्येक विद्यापीठात जसं ग्रंथनिर्मिती मंडळ होतं तसं गुजरात विद्यापीठातही आहे. या मंडळाने गांभीर्याने काम केल्यानेच आजही गुजरात युनिव्हर्सिटीत कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेचे अभ्यासक्रम गुजराती माध्यमातून उपलब्ध असल्याची माहिती मला तिथल्या भाषाविज्ञान विभागाचे माजी प्रमुख प्रा. अरविंद भंडारी यांच्याकडून मिळाली.उच्च शिक्षणासाठी गुजरातीतून पुस्तके उपलब्ध व्हावीत,

याकरता युनिव्हर्सिटी आणि शासनाच्या भागीदारीत युनिव्हर्सिटी ग्रंथनिर्मिती मंडळ सुरू करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना कमी दरात गुजराती भाषेतून सर्वच शाखांची पुस्तके उपलब्ध करून देता यावीत म्हणून प्राध्यापक, विविध विषयांचे जाणकार यांच्याकडून संदर्भ पुस्तके लिहून घेऊन ती स्वतः प्रकाशित केली जातात. हे मंडळ आजही सुरू असलं तरी पुनर्मुद्रण आणि विक्रीसाठी टाळाटाळ करत असल्याने सध्या पुस्तकांच्या प्रती उपलब्ध होत नसल्याचंही त्यांच्याकडून कळलं. अगदीच भारावून टाकणारा हा प्रयत्न नसला तरी महाराष्ट्रात विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळाकडून कितीसे काम झाले आणि त्याची परिणामकारकता काय हे पाहिलं तर गुजरात युनिव्हर्सिटीने केलेला प्रयत्न नक्कीच उजवा म्हणावा लागेल.

आता न्यायव्यवहाराबाबत बोलूया. शालेय शिक्षणाच्या प्रश्नाप्रमाणेच न्यायालयीन व्यवहाराविषयी मला देशभरात मिळालेली माहिती, मी पाहिलेली आणि अनुभवलेली वस्तुस्थिती निराशाजनकच होती. अगदी माझ्या दौऱ्यातील आसाम या पहिल्या राज्यापासून ते ओरिसा या शेवटच्या राज्यापर्यंत यासंबंधी माहिती मिळविण्याची माझी उत्सुकता टिकवून ठेवणे हेच माझ्यासमोरचं आव्हान होतं. अपवाद नव्हते असं नाही पण ते किरकोळच म्हणावे लागतील. हे अपवाद म्हणजे तमीळनाडू सारख्या राज्यातील राजकीय तर काही वैयक्तिक प्रयत्न. राज्यांच्या भाषांत न्यायव्यवहार कशाला, त्यासाठी इंग्रजीच बरी नाही तर योग्यच अशा एका सुरात भारत छातीठोकपणे बोलतांना मी पहिल्यांदाच ऐकला. ईशान्य भारतातील अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोराम, नागालँड या राज्यांचा अपवाद वगळल्यास प्रत्येक राज्याला स्वतःची राजभाषा आहे. एका अर्थाने किमान त्या त्या राज्यातील जिल्हा आणि तालुका पातळीवरील न्यायव्यवहार प्रयत्नपूर्वक त्या त्या भाषांमध्ये करता येतील. मात्र तरीही देशभरात एकाही राज्यात राज्यशासनाने स्वतःच्या राज्याच्या राजभाषेतच जिल्हा आणि तालुका पातळ्यांवरील न्यायालयांत व्यवहार व्हावेत म्हणून अधिसूचना काढल्याची माहिती मला मिळालीच नाही. प्रत्येक राज्यात राज्याच्या राजभाषा कायद्याप्रमाणे जिल्हा आणि तालुका पातळ्यांवरील न्यायालयांत त्या त्या राज्याची राजभाषा लागू होत असल्याचे ढोबळ उत्तर तेवढे मिळाले. भाषिक कट्टरतेत आघाडीवर असलेले तमीळनाडूदेखील याला अपवाद नसल्याचंही वास्तव आहे. तमीळनाडूची राजभाषा तमीळ आणि इंग्रजी अशी दोन्ही असल्याने या दोन्ही भाषांत काम करण्यास मुभा आहे. गुजरातमध्ये मात्र अशी कोणतीही अधिसूचना नसली तरी, उच्च न्यायालयाच्या अध्यादेशानुसार गुजरातमध्ये जिल्हा आणि तालुका पातळीवरील न्यायालयांच्या कामकाजाची भाषा गुजराती असल्याचं मला गुजरात उच्च न्यायालय वकील संघटनेचे अध्यक्ष अधिवक्ते विजय पटेल यांच्याकडून मिळाली. हीच काय ती एकमेव सकारात्मक माहिती. हिंदी पट्ट्यातल्या उर्वरित सात राज्यांपैकी दिल्ली ही देशाची राजधानी. हिंदीसह पंजाबी आणि उर्दू ही या राज्याची राजभाषा. दिल्लीच्या तीस हजारी न्यायालयाच्या परिसरात पोचल्यावर तिथले सर्व सूचनाफलक, नावांच्या पाट्या, परिसरातील टंकन व्यवसायधारकांच्या नावाच्या पाट्या, जाहिराती या सर्वांसाठी इंग्रजीसहित हिंदीचा ठळक वापर दिसला. या पार्श्वभूमीवर इथे किमान जिल्हा तालुका पातळीवर हिंदीच्या वापराची सकारात्मक माहिती हाती लागेल अशी निर्माण झालेली आशा, तीस हजारी जिल्हा न्यायालयाच्या वकील संघटनेचे सचिव आणि दिल्ली वकिल परिषदेचे सदस्य अधिवक्ते नितीन अल्हावत यांच्याशी झालेल्या चर्चेत सपशेल खोटी ठरली. संपूर्ण दिल्लीत न्यायव्यवहारात दावे दाखल करणे, प्रतिवाद करणे, न्यायनिवाडा अशा सर्व न्यायालयीन प्रक्रियांसाठी शंभर टक्के इंग्रजीचाच वापर होत असल्याचं अगदी मंजुळ वाणीत सांगतांनाच, अशा परिस्थितीत जिल्हा व तालुका पातळीवर राज्याची सहराजभाषा असलेल्या पंजाबी आणि उर्दूला न्यायालयीन व्यवस्थेत कुठे स्थान मिळणार असा उलट प्रश्नही त्यांनी मलाच केला होता. हिंदी पट्ट्यातील मध्यप्रदेशपासून वेगळी निर्मिती झालेल्या छत्तीसगढ, उत्तरप्रदेशापासून निर्मिती झालेल्या उत्तराखंड आणि बिहारपासून निर्मिती झालेल्या राज्यांना स्वतःचे राजभाषा कायदेच नाहीत. अपवाद उत्तराखंडचा, हा अपवाद म्हणजे २०१० मध्ये त्यांनी संस्कृतला राज्याची सहराजभाषा म्हणून दर्जा देण्यासाठी विधिमंडळात संमत केलेला ठराव होय. या ठरावानुसार हिंदी ही राज्याची प्रथम राजभाषा तर संस्कृत ही द्वितीय भाषा होय. या सर्वच राज्यांमध्ये बहुतांश कायदे हे त्यांच्या आधीच्या राज्यांतील कायद्यांनुसार आहेत. हिंदी पट्ट्यातील बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि राजस्थान या राज्यांत उच्च न्यायालयांच्या कामाजाचीच भाषा हिंदी आहे. त्यामुळे सहाजिकच तिथे जिल्हा आणि तालुका पातळीवर हिंदीच्या दृष्टीने चांगली परिस्थिती असेल असा माझा अंदाज होता. मात्र तोही खोटाच ठरला. केंद्र सरकारची कामकाजाची भाषा आणि आठ राज्यांचं पाठबळ असलेल्या हिंदी भाषकांनाच हिंदी व्यवहाराची भाषा न वाटण्याची आणि इंग्रजीला हुशारीची आणि सामाजिक स्तराची भाषा मानण्याची मानसिकताच हिंदीच्या मुळावर आल्याचं दोघांच्याही बोलण्यात होतं. तमीळनाडू वकील परिषदचे सचिव अधिवक्ते व्ही. दक्षिणमूर्ती यांनी दिलेल्या माहितीनुसार मद्रास उच्च न्यायालयाची भाषा तमीळ होण्यासाठी राज्यशासनाचे प्रयत्न सुरू आहेत. करुणानिधी यांच्या काळात राज्याच्या विधिमंडळाने यासंबंधीचा ठराव संमत करून तो केंद्र शासनास पाठवलाय मात्र त्याला आजतागायत कोणताही प्रतिसाद नाही. आजही आपण इंटरनेटवर शोधलं तर मद्रास उच्च न्यायालयाची भाषा तमीळ करण्यासाठी उपोषणे, धरणे यांसारखी आंदोलने होत असल्याच्या ताज्या बातम्या आपल्याला दिसतील. एकीकडे अशी आंदोलनं करायची आणि दुसरीकडे जिल्हा आणि तालुका पातळीवर इंग्रजीचा वापर करायचा हा इथला विरोधाभास.

संगणकीय व्यवहारातील भाषेबाबत दौऱ्याची सुरुवात केलेल्या आसाम राज्यापासून ते ओरिसा पर्यंतचा माझा अनुभव सांगायचा झाला तर दक्षिणेकडील राज्यांमधील काही प्रमाणात असेलेली

चांगली परिस्थिती वगळली तर इतरत्र मात्र त्याबाबत आनंदीआनंदच आहे असं म्हणावं लागेल. आसाम, दक्षिण भारतातील तमीळनाडू, केरळ आणि कर्नाटक ही चार राज्ये, पश्चिम बंगाल आणि गुजरात वगळलं तर युनिकोड हा शब्दच परग्रहावरून आल्यासारखा अनुभव मला इतरत्र आला. माझं हे म्हणणं अतिशयोक्तीचं नाही हे देखील मी तितक्याच जबाबदारीने सांगतोय. ईशान्य भारतातील अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोराम, नागालँड या राज्यांसाठी तर संगणकावरील स्वतंत्र भाषा हा विषयच मुळी संबंध नसल्यासारखा आहे. त्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे ही सगळी राज्ये मिळून साधारण पन्नासच्या आसपास वा अधिक भाषा असल्या तरी त्यांची लिपी रोमन आणि राज्याच्या कारभाराची भाषा इंग्रजी. ओरिसात मी ज्यांना ज्यांना भेटलो आणि युनिकोडबद्दल विचारलं त्या प्रत्येकाकडून मला काहीच माहित नसल्याचं उत्तर मिळणं मात्र निराशाजनकच नव्हे तर धक्कादायकच होतं. वास्तविक ओरिसामधील भाषिक स्थितीची व्यवहार्य स्थिती पाहता हे फारसं धक्कादायक नक्कीच नसलं तरी, तिथे बोली व्यवहारातील ओडियाचा वापर हा तमीळनाडू इतकाच जास्त असल्याच्या पार्श्वभूमीवर भाषेच्या प्रत्येक व्यवहार क्षेत्रासोबत संगणकीय क्षेत्रातील ओडियाचे अस्तित्व न जाणवून देणारा अनुभव एक भाषिक कार्यकर्ता म्हणून निराशाजनकच होता. हिंदी पट्ट्यातील कोणत्याही राज्यात सामाजिक स्तरावर हिंदीच्या संगणकीय वापरासंबंधी काम करणारी व्यक्ती वा संस्था मला प्रयत्न करूनही सापडली नाही, वा कोणाचे संपर्कही मिळाले नाहीत. अपवाद केवळ दिल्लीत राजभाषा विभागात गेलो होतो तेव्हा तिथेच विभागाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाशी संबंधीत वरिष्ठ तांत्रिक संचालक केवल कृष्ण यांच्याशी झालेली भेट हाच. मला हिंदीचं संगणकीय क्षेत्रात स्थान नाही असं बिलकूल म्हणायचं नाही. मात्र हिंदीच्या संगणकीय वापराच्या विकासाशी निगडित किमान शासकीय संघटनांचं अस्तित्व तरी प्रत्येक राज्यात असायला हवं होतं किंवा ते असेलच अशा अपेक्षेतच मी होतो आणि ही अपेक्षा मात्र फोल ठरली. याचा सगळ्यात मोठा धोका देशाच्या इतर भाषांनाही आहे हे मला इथे नमूद करावंसं वाटतं. त्याचं कारण हिंदी थेट केंद्र शासनाशी जोडलेली असूनही केंद्राचा माहिती तंत्रज्ञान विभाग त्याबाबत इतकी अनास्था बाळगून असेल तर संगणकीय व्यवहारात माहिती तंत्रज्ञान विभाग इतर भारतीय भाषांबाबत कसली धोरणात्मक कामे करत असेल याचा अंदाज आपण सहज बांधू शकता. वास्तविक संगणकीय व्यवहारक्षेत्रांत माहिती तंत्रज्ञान विभाग भारतीय भाषांसाठी काही धोरणात्मक कार्यक्रम राबवत असेल यावरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा हा अनुभव होता एवढं नक्की. पश्चिम बंगालमध्ये बंगाली भाषेचा संगणकीय वापर प्रामुख्याने युनिकोडमधूनच होत असला तरी त्याच्या सार्वत्रिकीकरणासाठी शासन काहीच करत नसल्याची खंतही डॉ. विद्युत वरन चौधरी यांनी व्यक्त केली होती. संगणकीय भाषेच्या बाबतीत दक्षिणेकडचा अनुभव खूप काही देणारा असला तरी त्याला आलबेल आहे असं मात्र म्हणता येणार नाही एवढं नक्की.

याचा पहिला प्रत्यय मला आंध्रप्रदेशात आला. इथे युनिकोडबद्दल अज्ञान आहे असं म्हणता येणार नाही. तिथे युनिकोडचा वापर होत असणार हे तिथल्या वर्तमानपत्रांच्या संकेतस्थळांवरून आणि महाजालावर तेलुगूतून उपलब्ध असलेल्या संकेतस्थळांवरून नक्कीच सांगता येईल. मात्र तेलुगूच्या संगणकीय विकासासाठी काम करणाऱ्या किंवा वाहून घेतलेल्या कोणत्याही संस्थेशी वा व्यक्तीशी माझी भेट वा संपर्क झाला नाही. डिजिटलायजेशनच्या बाबतीत मात्र मला आंध्रप्रदेशातील एका उपक्रमाची नोंद घ्यावीशी वाटते. आंध्र प्रदेशात प्रेस अकादमीच्या माध्यमातून झालेले हे डिजिटलायझेशन आहे. तेलुगू भाषेतील पत्रकारितेस चालना देण्यात यावी, पत्रकारांना प्रशिक्षण देण्यात यावे याकरता या प्रेस अकादमीची स्थापना १९९६ साली करण्यात आली होती. प्रेस अकादमीच्या माध्यमातून आंध्र प्रदेशमधील पत्रकारितेचा इतिहास जपला जावा आणि संशोधनास चालना मिळावी याकरता आजतागायत छापल्या गेलेल्या सर्व वृत्तपत्रांचे स्कॅनिंग करुन जतन केलेले आहे. प्रत्येक वृत्तपत्रांचे तारीखवार तपशील शोधण्याची सोयदेखील संकेत-स्थळावर करण्यात आलेली आहे.अकादमीच्या http://www.pressacademyarchives.ap.nic.in/ या संकेतस्थळास भेट दिल्यास याची सत्यताही पटते. मात्र यातही दुर्दैवाचा भाग हाच की हे संकेतस्थळ इंग्रजीतच उपलब्ध आहे. दैनिक आंध्रभूमीचे मुख्य वार्ताहर भूमी प्रसाद यांच्याशी केलेल्या चर्चेत मला या प्रकल्पाची माहिती मिळाली. मात्र या प्रकल्पातला दुर्दैवाचा भाग असा की हे संकेतस्थळ केवळ इंग्रजीतच उपलब्ध आहे. केरळ आणि कर्नाटकमधील प्रयत्न बिगर शासकीय तर तमीळनाडूमधील प्रयत्न शासकीय आहे. चेन्नईत तमीळ व्हर्चुअल अकादमी आहे. ही अकादमी म्हणजे मुळात ऑनलाईन विद्यापीठ आहे. तमीळनाडू बाहेर देशातील इतर राज्यांत तसेच देशाबाहेर राहणाऱ्या तमीळ नागरिकांची संख्या फार मोठी आहे. अशा सर्व लोकांची तमीळ भाषा आणि संस्कृतीशी नाळ टिकून रहावी तसेच त्यांना त्यांच्या सांस्कृतिक ठेव्याविषयी माहिती मिळावी याकरिता १९९९ साली तमीळ व्हर्चुअल विद्यापीठाच्या नावाने राज्यशासनाच्या वतीने हा शैक्षणिक उपक्रम सुरु करण्यात आला. आता त्याचे नाव बदलून तमीळ व्हर्चुअल अकादमी असे ठेवण्यात आले आहे. या अकादमीचं काम दोन स्तरावर चालतं एक शैक्षणिक आणि दुसरं तमीळ भाषेच्या माहिती तंत्रज्ञानातील विकासासाठीचे काम. अकादमीच्या वतीने तमीळ भाषा शिक्षणाचा प्रमाणपत्र ते पदव्युत्तर अभ्यासक्रम आणि संशोधनाची सोय ऑनलाईन उपलब्ध आहे. यातला प्रवेश ते निकाल या सर्व प्रक्रिया ऑनलाईन आहेत हे विशेष. देशभरात ऑनलाईन अभ्यासक्रम मोठ्या प्रमाणात असतील, पण भाषेला वाहून घेतलेला आणि बसल्याजागी भाषा शिक्षणाची सोय देणारा असा प्रयत्न मात्र एकमेव आहे एवढं नक्की. या प्रयत्नामुळेच राज्याबाहेरील अनेक तमीळ नागरिकांना आपल्या भाषा आणि संस्कृतीशी जोडून ठेवण्यातच नाही तर बिगर तमीळ नागरीकांना तमीळनाडूतील Only Tamil and English च्या वातावरणात

सहकार्य करण्याचा हा प्रयत्न आहे. माहिती तंत्रज्ञानाचा इतका चांगला वापर देशात इतरत्र अभावानेच सुचला असेल. केरळमध्ये मल्याळम कंप्युटिंग ही संस्था मल्याळम भाषेच्या संगणकीय विकासाच्या दृष्टीने प्रयत्न करते. श्री. बैजू (यांचा http://baijum.blogspot.in/ हा ब्लॉग आहे). या संगणकतज्ज्ञाने माझा संगणक माझी भाषा' या सूत्रातून संगणकावर युनिकोडच्या माध्यमातून मल्याळम भाषेच्या वापराचे सार्वत्रिकीकरण व्हावे यासाठी ही संस्था सुरु केली होती. मुळात नुसतंच संगणकीय मल्याळम नाही तर युनिकोडच्या माध्यमातूनच मल्याळमचा वापर आणि सर्वच बाबतीत मुक्त स्रोत प्रणाल्यांच्यामार्फत काम हे या संस्थेचं तत्व आहे. स्वतंत्र मल्याळम कंप्युटिंगचे महत्त्वाचे काम म्हणजे ओपन ऑफिस मल्याळम, फायरफॉक्स हे महाजालावर प्रवेश करण्याचे माध्यम तसेच डेबीसन आणि डायसबोरा (त्यांनी सांगितल्याप्रमाणे या operating system आहेत.) या प्रणाल्यांचे देखील मल्याळम मध्ये स्थानिकीकरण त्यांनी पूर्ण केलं आहे. त्याशिवाय विकिपिडीयावरील इंग्रजी भाषेचा मजकूर मल्याळम भाषेत अनुवादित करण्याचा प्रकल्पही संस्था चालवते. इतकंच नाही तर विकिपिडीयाच्या धर्तीवरच विकी मल्याळम हे विश्वकोशपर संकेतस्थळ संस्थेने सुरु केले आहे. संस्थेची दखल घ्यावी आणि त्याचं अनुकरण करावं अशी महत्त्वाची गोष्ट म्हणजे शाळेतील मुलांना लहानपणापासूनच संगणकावर मल्याळम भाषेच्या वापराची सवय रहावी म्हणून संस्थेने विद्यार्थ्यांसाठी 'स्कूल विकी' हा प्रकल्प सुरु केलाय.

लेखाच्या शेवटी केवळ इतकंच म्हणेन की, आपल्या बेगडी संस्कृतीप्रेमाने भाषा टिकणार नाहीत तर व्यवहारक्षेत्रांमध्ये भाषांचा विकास केल्यानेच त्या टिकतील. यादृष्टीने भारतात फारसं काही सकारात्मक घडतंय असं चित्र दिसत नाही. केवळ त्या बोलणाऱ्यांची संख्या अधिक म्हणून दोनेकशे वर्षे त्या जगणार असतील तरी मरणाच्याच दिशेने त्यांचा प्रवास सुरु आहे. हे थांबवायचं असेल तर शालेय आणि उच्च शिक्षणाचं माध्यम, प्रशासकीय व दैनंदिन व्यवहाराचं माध्यम, माहिती तंत्रज्ञान आणि न्यायालयाची भाषा म्हणून त्यांचा विकास झाला पाहिजे. केवळ पोपटपंची न करता प्रत्येकाने त्यात सक्रिय सहभाग दिलाच पाहिजे. नाहीतर चित्र धूसर झालंच आहे, ते काळवंडतंय, असंच सुरू राहिलं तर ते कायमचं पुसणार आहे.

**– तुषार पवार**
भ्रमणध्वनी : ९८२०२९५७८५
tusharpawar1982gmail.com


||ग्रंथाली||

# जगभर कुणीही शिकावी अशी...

# माय मराठी – My Marathi

## मराठी शिकवणारे सुलभ मार्गदर्शन

**मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाने तयार केलेला,**
**ग्रंथालीने प्रकाशित केलेला एक अपूर्व अभ्यासक्रम**




एकात्मिक संभाषणात्मक पद्धतीने पद्धतशीर
मराठी शिकू इच्छिणाऱ्या अमराठींसाठी.
'माय मराठी'च्या एका संचात
पाठ्यपुस्तक, अभ्यासपुस्तिका आणि
विनामूल्य दृक्‌श्राव्य डीव्हीडी यांचा समावेश आहे.

| प्रकल्प समन्वयक | लेखक |
|---|---|
| विभा सुराणा | सुहास लिमये |
| दीपक पवार | जयवंत चुनेकर |

**टपालखर्च १०० रु.**

# मराठी शाळा आणि भाषा विकास

**विनोदिनी पिटके-काळगी**

बाबूराव बागूल यांची 'वेदाआधी तू होतास' ही कविता भाषेचे सामर्थ्य अगदी नेमकेपणाने व्यक्त करते. ते म्हणतात,

हे माणसा
तूच सूर्याला सूर्य म्हटलेस
आणि सूर्य सूर्य झाला,
तूच चंद्राला चंद्र म्हटलेस
आणि चंद्र चंद्र झाला.
अवघ्या विश्वाचे नामकरण तूच केलेस

अवघ्या विश्वाचे नामकरण करणारा माणूस, माणूस झाला तो त्याच्या भाषेमुळे. माणसाकडे भाषा आली आणि त्याची या चराचर सृष्टीशी दोस्ती झाली. भाषेमुळे निसर्ग माणसाच्या जाणिवेच्या कक्षेत आला. त्याच्या सोबत माणूस आधिक डोळसपणे, आत्मविश्वासाने जगू लागला. भाषेने त्याचे माणूसपण समृद्ध केले आणि ज्ञानाच्या रचनेला सुरवात झाली.

खरे तर भाषा सर्व सृष्टीलाच मानवाच्या जाणिवेच्या कक्षेत आणते. पण 'अति परिचयात अवज्ञा' ही म्हण आपल्या भाषाविषयक समजुतीला अगदी अचूक लागू पडते. भाषाविकास म्हणजेच आपल्या जाणिवेचा विकास हे आपल्या लक्षातच येत नाही! अगदी जन्माला आल्यापासून प्रत्येकच मूल परिसराला समजून घेण्यासाठी धडपडत असते. तेच त्याचे शिक्षण असते. शिक्षण म्हणजे दुसरे तिसरे काही नसून आपल्या जाणिवेचा परीघ विस्तारत जाणे आहे. जन्मजात प्रेरणांच्या (Basic instinct) पलीकडे जाऊन स्वत:चे जग निर्माण करणे माणसाला भाषेशिवाय शक्यच झाले नसते. म्हणूनच भाषाविकास हा सर्व ज्ञानशास्त्राचा पाया आहे. शाळेत हे भाषाविकासाचे कार्य होणे फार महत्त्वाचे आहे. हे आजवर अनेक शिक्षणतज्ज्ञांनी सांगितले आहेच. लडाखमधील श्री. सोनम वांगचूक यांची मुलाखत 'वेध' या संमेलनात ऐकण्याचा योग आला. त्यांचे प्राथमिक शिक्षण लडाखी भाषेत झाले. त्यानंतर ते श्रीनगर विद्यापीठातून मेकॅनिकल इंजिनिअर झाले. त्यांच्या वर्गातील इराणी विद्यार्थ्यांचे आधीचे शिक्षण पर्शिअन भाषेत झाले होते. तेही इंग्रजीत शिकलेल्या भारतीय मुलांपेक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. हा अनुभव सांगून श्री.सोनम ठामपणे असे म्हणाले की मातृभाषेतून शिक्षण झाले की मेंदूची ज्ञान ग्रहणाची क्षमता अधिक विकसित होते आणि मग त्यानंतर अन्य कुठल्याही भाषेत काहीही शिकणे सहज साध्य होते. म्हणूनच भाषा विकासाकडे गंभीरपणे पाहायला हवे. यांत्रिकपणे किंवा पाठांतर करुन ते होणार नाही ती क्रमाने फुलत जाणारी गोष्ट आहे. शाळा अर्थातच मुलांना भाषा शिकवत नाही. भाषा घेऊनच मूल शाळेत आलेले असते. शाळेत मुलांना भाषेशी मुक्तपणे खेळायला दिले की ते त्याचे वेगवेगळ्या प्रकारे आविष्कार करायला शिकते. हा सगळा त्याच्या आनंदाचाच भाग असतो. हा अनुभव आम्ही आमच्या शाळेत रोजच घेत असतो.

मराठी ही साहित्याच्या दृष्टीने अतिशय समृद्ध भाषा आहे. त्यातील अनेक साहित्यप्रकारांची झलक पाठ्यपुस्तकात येतेच. मात्र ते केवळ वाचून आत्मसात करता येत नाही त्याला अनेक पूरक उपक्रमांची जोड दिली की मुले ते मजेत शिकतात. जसे तिसरीच्या पुस्तकात कविता शिकतांना शेवटच्या ओळीतील शब्द सारखेच येतात हे मुलांच्याा लक्षात आणून दिले की मग यमक जुळवण्याचा खेळ सुरु होतो. हा कवितेचा खेळ मुलांच्या मनाची दारं हळुवारपणे उघडतो. मुलांच्या आवडीनिवडी, अपेक्षा, मतं, त्यांचं अनुभवविश्व, भावविश्व मुलांच्या कवितेत दिसू लागतं. मुलं कविता अधिक जाणिवेनं वाचतात. कवितेतल्या खाचखोचा, गमतीजमती त्यांना न सांगता समजू लागतात. सगळी मुलं पुढे जाऊन कविता करतीलच असं नाही; पण या शिकण्या-शिकवण्याच्या प्रकियेचं साधन म्हणून 'आपण केलेल्या कविता' मुलांना बरंच काही शिकवून जातात. शिवाय कविता केली नाही तरी वाचायची, ऐकायची, आस्वाद घ्यायची तरी गोडी लागते. सातवीत जाईपर्यंत 'विंदां'च्या कवितेतलं पिशीमावशीचं एकटेपण त्यांना जाणवतं आणि मुलं अंतर्मुख होतात. कवितेला विषयाचं बंधन राहत नाही. भाषा हा विषय अनेक अभ्यासविषयांशी व जीवनातल्या विविध बाबींशी सहजपणे जोडला जातो.

या साऱ्यात काव्यगुण किती, याची आम्ही चर्चा करत

नाही. मुलांना भाषेशी विविध प्रकारे खेळता आलं पाहिजे. आपली अभिव्यक्ती महत्त्वाची आहे, असं ताई मानतात, हे त्यांच्यापर्यंत पोचलं, की मग ती सर्व प्रकारे लिहिती होतात. इतिहासाच्या ताई त्यांना शिवाजी महाराजांकडे नोकरीसाठी अर्ज करायला सांगतात. कधी ती कुणाची मुलाखत घेतात तेव्हाही आत्मविश्वासनं शब्दरचना करतात. संवाद लिहितात. पत्र लिहतात, जाहिरात लिहितात. घोषणा तयार करतात. असं बरंच काही. ज्ञान महत्त्वाचं आहेच; पण सादरीकरणही फारच महत्त्वाचं आहे. यातून हजरबाबीपणा वाढतो, चपखल शब्द शोधण्याची सवय लागते, शब्दांचे नाद, वजन आपोआप उमगतं. हे अनुकरणातून होत नाही, प्रत्यक्ष भाषा वापरानंच होतं. पाठ करून होत नाही, रचना करूनच होतं. मग ती कविता असो की गद्य. यासाठी माधुरी पुरंदरेंनी तयार केलेली 'लिहावे नेटके', 'वाचू आनंदे' यांसारखी सुंदर सुंदर पुस्तकंही खूप मदत करतात. त्याचा पुरेपूर वापर केला, की भाषा हा किती सोपा विषय होऊन जातो. मराठीत अशी सुंदर पुस्तकं असताना शिक्षकांनी फक्त पाठ्यपुस्तकात का अडकून पडावं? भाषा यायला लागली की अवांतर वाचनाची गोडी लागते. त्यातून भाषा अधिक समृद्ध होते, आकलन वाढते आणि अभिव्यक्तीही सुधारते. हे सर्व मराठी शाळेतील मुलांनाच मिळू शकते.

**भाषेची गरज नाही हा विचार उलटी वाटचाल करणारा आहे. स्वभाषा हे माणसाच्या विचारशक्ती व कल्पनाशक्तीच्या विकासाचे एकमेव साधन आहे. तेच हिरावले गेले तर त्याची निर्मितीक्षमताच खुंटते. केवळ पाठांतराने परीक्षेत गुणांचे भारे जमवता येतात पण प्रत्यक्षात उपयोजन शून्यच राहते. ज्ञानाची निर्मिती होत नाही.**

भाषेशी खेळण्याची गोडी लागली की मुले इतर भाषांशी खेळण्यासाठी उत्सुक होतात. मग इंग्रजी किंवा कोणतीही भाषा मुळाक्षरांच्या तुकड्यातून शिकवली जात नाही. त्यांच्या आसपासच्या ओळखीच्या वस्तू , झाडे, प्राणी यांच्यातून ती त्यांच्या पुढे येते. मुलांना सर्व दिसावे लागते. मग ती त्यात सहज रमतात आणि त्या भाषेशी दोस्ती होते. पाहाता पाहाता अन्य भाषेतही ती कविता करू लागतात, संवाद लिहू लागतात. सातवीत अनेक मुलं केंब्रिजच्या यंग लर्नर्स परीक्षेला बसतात व उत्तम गुणांनी उत्तीर्ण होतात. शाळेत आलेल्या परदेशी पाहुण्यांशी मुले आत्मविश्वासाने संवाद साधतात.

भाषा हाच सर्व ज्ञानशाखांचा पाया आहे. त्यामुळे मुलांना इतर विषयांचे आकलनही सहजपणे होते. शाब्दिक गणिते तर भाषा चांगली असल्याशिवाय सोडवता येतच नाहीत. तसेच विज्ञान, समाजशास्त्र या विषयांची भाषाशैली थोडी वेगळी असली तरी आकलनासाठी मूळ भाषेवर पकड असावीच लागते, म्हणून आमच्या शाळेत आम्ही दिलेल्या संख्या वापरून परिच्छेद लिहा, दिलेल्या क्रियेसाठी शाब्दिक उदाहरणे तयार करा असे स्वाध्याय देतो. विज्ञानातील संकल्पना समजण्यासाठी 'ओळखा मी कोण' अशी कोडी मुले स्वत: तयार करतात. वेधशाळा, आठवडे बाजार अशा क्षेत्रभेटींनंतर मुले त्याचे सामाजिक वर्णन मराठीच्या वहीत तर भौगोलिक आकलन भूगोलाच्या वहीत समर्थपणे व्यक्त करतात.

शीव इथल्या लोकमान्य टिळक रूग्णालयात विद्यार्थ्यांच्या अध्ययन अक्षमतेविषयी केलेल्या संशोधनात या विद्यार्थ्यांचा भाषाविकास नीट न झाल्याचं स्पष्ट झालं. याचं कारण मुख्यतः इंग्रजी माध्यमाचा पालकांचा आग्रह हे आहे असं लक्षात आलं. याला दुजोरा देणारी अनेक उदाहरणं आपल्याला आजूबाजूला दिसतात.

अलीकडे एका विद्वान संस्था चालकांनी, फक्त विज्ञान शाखेचीच महाविद्यालयं असावीत, बाकी ज्ञानशाखा महत्वाच्या नाहीत. असा महान विचार मांडला. हा दृष्टिकोन समाजात मूळ धरतो आहे, हे एकूणच ज्ञानप्रकियेविषयी असलेलं गाढ अज्ञान वाढत चालल्याचं द्योतक आहे! भाषाविकास हा सर्व ज्ञानाचा पाया आहे. हत्यारांची निर्मिती आणि भाषेची निर्मिती यामुळेच तर निसर्गापेक्षा वेगळ्या अशा माणसाच्या स्वतंत्र जगाची वाटचाल सुरू झाली. आता फक्त हत्यारंच पुरेशी आहेत. भाषेची गरज नाही हा विचार उलटी वाटचाल करणारा आहे. स्वभाषा हे माणसाच्या विचारशक्ती व कल्पनाशक्तीच्या विकासाचे एकमेव साधन आहे. तेच हिरावले गेले तर त्याची निर्मितीक्षमताच खुंटते. केवळ पाठांतराने परीक्षेत गुणांचे भारे जमवता येतात पण प्रत्यक्षात उपयोजन शून्यच राहते. ज्ञानाची निर्मिती होत नाही.

त्यामुळेच सर्व मराठी शाळांनी सेमी इंग्लिशचा भंपकपणा सोडून मराठीतच आत्मविश्वासाने सर्व विषय शिकवायला हवेत. पालकांच्या व सरकारच्या हेकेखोरपणाला मराठी शाळांनी विरोध करायलाच हवा.

**– विनोदिनी पिटके–काळगी**

भ्रमणध्वनी : ९४२१५०७७८२

anandniketan98@gmail.com

# केव्हा मिळणार मराठीला न्याय?

**शांताराम दातार**

भारतातील घटक राज्यांमध्ये शासन व्यवहार आणि विधीमंडळाचे कामकाज तेथील लोकभाषेतून म्हणजे प्रादेशिक भाषेतून करण्यासाठी कायद्याने तिला राजभाषेची म्हणजे शासन व्यवहाराची आणि विधिमंडळाच्या कामकाजाची भाषा म्हणून कायदेशीर मान्यता मिळावी यासाठी भारताच्या संविधानातील विधिमंडळ अनुच्छेद ३४५ मध्ये तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदीनुसार १९५६ मध्ये अस्तित्वात आलेल्या विविध भाषिक राज्यांच्या विधिमंडळांनी कायदा करून आपल्या राज्यातील लोकभाषा / प्रादेशिक भाषा असलेल्या भाषेला राज्याच्या शासन व्यवहाराची आणि विधिमंडळाच्या कामकाजाची भाषा केली आणि त्या कायद्यानुसार त्या त्या राज्यांमध्ये इंग्रजीची जागा त्या त्या राज्यातील लोकभाषा / प्रादेशिक भाषेने घेतली. त्या राज्यांमध्ये शासन व्यवहार व विधीमंडळाचे कामकाज त्या भाषांमधून सुरू झाले.

राज्याच्या उच्च न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयांच्या कामकाजाची भाषा ठरविण्याचा अधिकार सुद्धा फौजदारी प्रक्रिया संहितेतील कलम २७२ आणि दिवाणी प्रक्रिया संहितेतील कलम १३७(२) अन्वये राज्यांना प्रदान करण्यात आला आहे. त्या तरतूदीचा वापर करून १९५६ मध्ये अस्तित्वात आलेल्या राज्यांनी कायद्याद्वारे शासन व्यवहार आणि विधिमंडळाच्या कामकाजाची भाषा झालेल्या भाषेला अधिसूचनांद्वारे कनिष्ठ न्यायालयांच्या कामकाजाची भाषा घोषित केले आणि भारतीय ३४८(२)च्या तरतूदीचा वापर करून अनेक राज्यांनी प्रादेशिक भाषेला / राजभाषेला त्या राज्याच्या उच्च न्यायालयात प्राधिकृत भाषेचा दर्जा दिला. त्यामुळे १९५६ मध्ये अस्तित्वात आलेल्या राज्यांमध्ये अनेक वर्षांपासून शासन व विधिमंडळाच्या कामकाजाप्रमाणे कनिष्ठ न्यायालयातील कामकाज सुद्धा प्रादेशिक भाषेतून होत आहे, विधी व्यवहार प्रादेशिक भाषेतून होत आहेत आणि अनेक राज्यांच्या उच्च न्यायालयांमध्ये त्या राज्याच्या राजभाषेला प्राधिकृत भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे त्या राज्यांमध्ये राजभाषेतून कामकाज होत आहे. मा. अटल बिहारी बाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार केंद्रात असताना राज्य पुनर्रचना आयोगाच्या अहवालानुसार १९५६ मध्ये अस्तित्वात आलेल्या राज्यांपैकी बिहार, उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेश या राज्यांचे विभाजन होऊन अनुक्रमे झारखंड, उत्तरांचल आणि छत्तीसगढ ही राज्ये अस्तित्वात आली. त्या राज्यांमध्ये सुद्धा शासन व्यवहार, विधीमंडळाचे कामकाज आणि कनिष्ठ न्यायालयांचे कामकाज संविधानातील अनुच्छेद ३४५ अन्वये कायद्याद्वारे घोषित झालेल्या राजभाषेतून कामकाज होत आहे. या व्यतिरिक्त राजभाषेच्या विकासासाठी या राज्यांनी धोरण निश्‍चित करून त्याप्रमाणे पाऊले उचललेली आहेत. एक प्रकारे भाषावार प्रांतरचना करण्यामागचे धोरण या सर्व राज्यांमध्ये राबविण्यात आलेले आहे.

देशातील अन्य राज्यांच्या भाषाविषयक धोरणाच्या समकक्ष महाराष्ट्र राज्यात मराठी भाषाविषयक धोरणच नसल्यामुळे १ मे १९६०ला अस्तित्वात आलेल्या महाराष्ट्र राज्यात १९६४चा राजभाषा कायदा असूनही शासन व्यवहारात आणि विधिमंडळाच्या कामकाजात तर मराठी भाषेची स्थिती समाधानकारक नाही परंतु न्याय व विधी व्यवहारातसुद्धा तिची ससेहोलपट होत आहे.

देशातील अन्य राज्यात न्याय व विधी व्यवहार प्रादेशिक / राजभाषेतून निरपवादपणे होत असून त्या पार्श्वभूमीवर ५४ वर्षे झालेल्या आपल्या राज्यात न्याय व विधी व्यवहार निरपवादपणे मराठीतून होत नाही ही वस्तुस्थिती आहे. तिला मुंबई उच्च न्यायालयात प्राधिकृत भाषेचा दर्जा मिळालेला नाही हे वास्तव आहे.

राज्यकारभार करताना शासनास महत्त्वाच्या प्रश्नांबाबत धोरण ठरवावे लागते. त्याशिवाय शासनापुढील महत्त्वाचे प्रश्न मार्गी लागत नाहीत. मराठी भाषकांचे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर मराठी भाषेतून शासन व्यवहार व विधिमंडळाचे आणि न्याय व विधी व्यवहाराचे कामकाज करणे याचबरोबर त्याच भाषेचा ज्ञानविज्ञानासह सर्व क्षेत्रात विकास आणि संवर्धन याबाबतीत शासनाने एक निश्‍चित धोरण आखण्याची आवश्यकता होती.

राज्यकर्ता म्हणून दूरदृष्टी असलेले यशवंतराव चव्हाण १ मे १९६०ला अस्तित्वात आलेल्या महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले. ही गोष्ट महाराष्ट्र व मराठी भाषा यांच्या दृष्टीने अतिशय भाग्याची होती. संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्याच्या सुमारे चार महिने आधी ११ फेब्रुवारी १९६०ला विदर्भातील सावरगांव-डुकरे

येथे विदर्भ साहित्य संमेलन झाले. त्या संमेलनाच्या उद्‌घाटन प्रसंगी केलेल्या भाषणात यशवंतराव चव्हाण यांनी मराठी भाषेच्या विकासासंबंधी मांडलेले विचार हे मराठी भाषेच्या विकासासंबंधी दिशा दाखवणारे होते.

मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी १ मे १९६०ला झाला. त्याप्रसंगी बोलताना ''राज्यकारभार इंग्रजीच्या ऐवजी आता मराठीतून चालविणे कसे इष्ट व निकडीचे आहे याची सरकारला पूर्ण जाणीव आहे.'' असे त्यांनी प्रतिपादन केले आणि शासन व्यवहारात इंग्रजीची जागा मराठीने घेण्यासाठी मराठी शब्दावली व परिभाषा तयार करावी लागेल आणि भाषाविषयक कोष तयार करावे लागतील हे लक्षात घेऊन यशवंतराव चव्हाण यांनी मराठी भाषेच्या विकासासाठी १९६१ मध्ये भाषा संचालनालयाची, त्याचप्रमाणे मराठी साहित्य व इतर क्षेत्रातील महत्त्वाचे संशोधन कार्य यांना उत्तेजन देण्यासाठी राज्य साहित्य संस्कृती महामंडळाची स्थापना केली. मा. यशवंतराव चव्हाण १९६२ मध्ये संरक्षण मंत्री म्हणून दिल्लीला गेले. त्यानंतर राज्याच्या मुख्यमंत्री पदावर आरूढ झालेल्या एकाही मुख्यमंत्र्यांकडून मराठी भाषेचा विकास आणि संवर्धन यासाठी निश्चित धोरण आखण्यात आले नाही. त्याचा परिणाम असा झाला आहे की, मराठी भाषेचा सर्व स्तरावर मराठी भाषेचा अपेक्षित विकास झाला नाही आणि अन्य क्षेत्राप्रमाणे न्याय व विधी व्यवहारात सुद्धा तिला डावलले जात असून तिच्यावर राज्यपुरस्कृत इंग्रजी भाषेचे आक्रमण होत आहे. त्यामुळे मराठी भाषा कुंठित झाली आहे आणि त्याचा परिणाम शासन व्यवहार आणि विधिमंडळाचे कामकाजाप्रमाणे न्याय व विधी व्यवहार मराठी भाषेतून होण्याच्या बाबतीत झालेला आहे.

महाराष्ट्रात दहा कोटीपेक्षा जास्त लोकांची मातृभाषा असलेल्या मराठी भाषेला अनुच्छेद ३४५ अन्वये राजभाषेचा दर्जा मिळाण्यासाठी १९६४ पर्यंत वाट पहावी लागली आणि महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४ मध्ये करण्यात आला. पण त्या अधिनियमातील कलम ६ अन्वये कराराचे नियम शासनाने आजपर्यंत केलेले नाहीत. त्यामुळे शासन व्यवहारात व विधिमंडळाच्या कामकाजात मराठीचा वापर निरपवादपणे होत नाही. त्याचा परिणाम मराठीतून विधी व न्याय व्यवहार करण्यावर होणे स्वाभाविक आहे. शासनाने दिनांक ३०.०४.१९६६ रोजी काढलेल्या अधिसूचनांनुसार कनिष्ठ न्यायालयांच्या कामकाजाची भाषा मराठी झाली. परंतु त्या अधिसूचनेतील वर्जित प्रयोजनांमुळे आणि त्यामधील अनेक त्रुटींमुळे त्या अधिसूचना निष्प्रभ झाल्या. मराठी भाषेला उच्च न्यायालयात प्रादेशिक भाषेचा दर्जा मिळवण्याबाबतची स्थितीसुद्धा वेगळी नाही. १९६४च्या कायद्यान्वये मराठी भाषा शासन व्यवहाराची भाषा झाल्यानंतर संविधानातील अनुच्छेद ३४८(२)ची तरतुदीनुसार तिला मुंबई उच्च न्यायालयात प्राधिकृत भाषेचा दर्जा मिळणे क्रमप्राप्त होते, परंतु शासनाच्या निष्क्रियतेमुळे मुंबई उच्च न्यायालयात मराठी भाषेला प्राधिकृत भाषेचा दर्जा मिळालेला नाही. प्रादेशिक भाषेची ससेहोलपट कशी करावयाची तिचा विकास कसा अवरुद्ध करावयाचा याबाबतीत महाराष्ट्रासारखे एकही उदाहरण सापडणार नाही.

शासनाने कनिष्ठ न्यायालयांमध्ये निरपवादपणे मराठीतून कामकाज होण्यासाठी २१ जुलै १९९८ रोजी फौजदारी प्रक्रिया संहितेतील कलम २७२ अन्वये आणि दिवाणी प्रक्रिया संहितेतील कलम १३७(२) अन्वये अधिसूचना काढल्या. त्या २१ जुलै १९९८ च्या असाधारण राजपत्रात प्रसिद्ध केल्या. या अधिसूचनांना संविधानातील अनुच्छेद १३ अन्वये कायद्याचे स्वरूप आहे. सदर अधिसूचनांद्वारे मराठी भाषा ही २१ जुलै १९९८ पासून न्याय व विधी व्यवहाराची कायद्याने भाषा झालेली आहे, परंतु अनुच्छेद ३४८(२) अन्वये तिला मुंबई उच्च न्यायालयात प्राधिकृत भाषेचा दर्जा मिळालेला नाही.

शासनाने दिनांक २१ जुलै १९९८ रोजी फौजदारी प्रक्रिया संहितेतील कलम २७२ अन्वये काढलेल्या अधिसूचना आणि सदर अधिसूचनेतील वर्जित प्रयोजनांमध्ये सुधारणा करण्यासाठी ३१ ऑगस्ट २००० रोजी काढलेल्या अधिसूचना लक्षात घेता तालुका व जिल्हा पातळीवरील फौजदारी व सत्र न्यायालयांमध्ये खालील स्वरूपाच्या कामकाजाची भाषा फक्त मराठी आहे.

१. दाखल होणारे सर्व प्रकारचे अर्ज.

२. पोलिसांकडून दाखल होणारे आरोपपत्र.

३. बजावणीसाठी व अंमलबजावणीसाठी इतर राज्यांकडे पाठविणे आवश्यक असतील असे रिट, अधिपत्रे, समन्स, नोटिसा व इतर आदेशिका आणि तत्संबंधीचा पत्रव्यवहार वगळून राज्यांतर्गत पाठविण्यात येणारी रिट, अधिपत्रे, समन्स, नोटिसा व इतर आदेशिका आणि तत्संबंधीचा पत्रव्यवहार.

४. आरोपीवरील दोषारोपपत्र.

५. आरोपीस जामीन देण्यात आल्यानंतर घेण्यात येणारे जामीनपत्र.

६. शव परीक्षेच्या टिपण्या आणि वैद्यकीय व तज्ज्ञ साक्षीदारांचा साक्षीपुरावा वगळून अन्य सर्व प्रकारचा साक्षीपुरावा.

७. वेळोवेळी करण्यात येणारे आदेश व न्यायनिर्णय.

८. रोजनामे.

९. राज्य शासनाशी आणि एका न्यायालयाकडून दुसऱ्या न्यायालयाशी होणारा पत्रव्यवहार.

शासनाने दिनांक २१ जुलै १९९८ रोजी दिवाणी प्रक्रिया संहितेतील कलम १३७(२) अन्वये काढलेली अधिसूचना आणि सदर अधिसूचनेतील वर्जित प्रयोजनांमध्ये सुधारणा करण्यासाठी ३१ ऑगस्ट २००० रोजी काढण्यात आलेली अधिसूचना. या दोन्ही अधिसूचनांनुसार तालुका व जिल्हा पातळीवरील दिवाणी न्यायालयांमध्ये खालील स्वरूपाच्या कामकाजाची भाषा फक्त मराठी आहे.

१. दाव्याचे वादपत्र आणि त्यामध्ये वळोवेळी दाखल करण्यात येणारे सर्व प्रकारचे अर्ज, जबाब वगैरे.

२. विवाह याचिकांसह अन्य सर्व प्रकारच्या दिवाणी प्रकरणात

वेळोवेळी दाखल करण्यात येणारे सर्व प्रकारचे अर्ज, जबाब वगैरे.
३. बजावणीसाठी व अंमलबजावणीसाठी इतर राज्यांकडे पाठविणे आवश्यक असतील असे रिट, अधिपत्रे, समन्स, नोटिसा व इतर आदेशिका आणि तत्संबंधीचा पत्रव्यवहार वगळून राज्यांतर्गत पाठविण्यात येणारी रिट, अधिपत्रे, समन्स, नोटिसा व इतर आदेशिका आणि तत्संबंधीचा पत्रव्यवहार.

**पूर्वीच्या शासनकर्त्यांनी मराठी भाषा विभाग सुरू करण्याव्यतिरिक्त मराठी भाषेच्या विशेषतः मराठी न्यायभाषा होण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केलेली नाही. भाषा, समाज व संस्कृती यांचा अन्योन्य संबंध असल्यामुळे मराठी भाषेचा विकास होणे आवश्यक आहे. विद्यमान शासनाने मराठी भाषेसमोरील अनेकविध प्रश्नांचा धांडोळा घेऊन त्या प्रश्नांच्या सोडवणुकीला प्राधान्यक्रम दिला पाहिजे. तरच न्यायभाषा होण्याच्या बाबतीत मायमराठीपुढे असलेली आव्हाने संपुष्टात येतील.**

४. रोजनामे
५. वादेमुद्दे.
६. वैद्यकीय व तज्ज्ञ साक्षीदारांचा साक्षीपुरावा वगळून अन्य सर्व प्रकारचा साक्षीपुरावा.
७. इतर राज्यांकडे अंमलबजावणीसाठी हस्तांतरित केलेले हुकूमनामे व आदेश आणि तत्संबंधीचा पत्रव्यवहार.
८. वेळोवेळी करण्यात येणारे आदेश व न्यायनिर्णय.
९. राज्य शासनाशी आणि एका न्यायालयाकडून दुसऱ्या न्यायालयाशी होणारा पत्रव्यवहार.

राज्यशासनाने दिनांक २१ जुलै १९९८ला वर उल्लेखित काढलेल्या अधिसूचना मुंबई उच्च न्यायालयास दुय्यम असलेल्या फौजदारी, दिवाणी, सहकार न्यायालये, कामगार न्यायालये, कुटुंब न्यायालये यासह दुय्यम न्यायालये या व्याख्येत येणाऱ्या सर्व न्यायालयांना लागू असल्यामुळे या सर्व न्यायालयांनी अधिसूचनेतील वर्जित प्रयोजने वगळून त्यांचे सर्व कामकाज मराठीतूनच करावयास हवे. ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६ हा केंद्रिय अधिनियम ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी आहे. सदर अधिनियमांन्वये जिल्हा स्तरावर जिल्हा ग्राहक मंच आणि राज्य स्तरावर राज्य विधी आयोग अशी संरचना आहे. या मंचांच्या कामकाज आणि अन्य बाबतीत नियम करण्याचा अधिकार राज्यशासनास सदर अधिनियमांन्वये प्रदान करण्यात आलेला असून महाराष्ट्र शासनाने त्याबाबतीत २००० मध्ये नियम केलेले आहेत. त्या नियमातील नियम ६ अन्वये जिल्हा ग्राहक मंचाची भाषा निरपवादपणे मराठी आहे.

मुंबई उच्च न्यायालयाला दुय्यम असलेल्या तालुका व जिल्हा पातळीवरील न्यायालयांमध्ये २१ जुलै १९९८ पासून मराठी ही कायद्याने कामकाजाची भाषा झाली आहे. कायदा सर्वांना माहित आहे असे गृहितक असल्यामुळे कायद्याचे अज्ञान हा बचाव होऊ शकत नाही. तरीसुद्धा न्याय प्रशासनात महत्त्वाचे घटक असलेल्या न्यायाधीश व वकील वर्गाकडून या अधिसूचनांचे अपेक्षित स्वागत झाले नाही व न्यायालयीन कामकाजात मराठी भाषेचा वापर वाढला नाही. त्याचबरोबर कनिष्ठ न्यायालयांच्या मराठीकरणासाठी न्यायालयांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे आपले कर्तव्यसुद्धा राज्यशासनाने पार पाडले नाही. सर्वस्तरावरील पाठपुराव्यामुळे शासनाने थोड्या प्रमाणात का होईना कनिष्ठ न्यायालयांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या आणि मुंबई उच्च न्यायालयाने डिसेंबर २००५ मध्ये कनिष्ठ न्यायालयामध्ये न्यायाधीशानी कमीतकमी ५० टक्के न्यायनिर्णय मराठीतून आणि आदेशासह उर्वरित सर्व कामकाज मराठीतून करण्याबद्दल परिपत्रकाद्वारे आदेश दिले तरीसुद्धा कनिष्ठ न्यायालयामध्ये मराठीतून कामकाजाची टक्केवारी वाढली असल्याचे जाणवत नाही. मराठीतून दस्तऐवज लेखनाचे प्रमाणसुद्धा अल्प आहे.

कनिष्ठ न्यायालयांमध्ये मराठीतून कामकाज आणि विधी व्यवहार म्हणजे कायदेशीर मसुदा लेखन यामध्ये मराठीच्या वापराबाबत स्थिती समाधानकारक नाही. ती दूर करण्यासाठी अडचणी दूर करणे आणि अनेक आव्हानांना सामोरे जाण्याची आवश्यकता आहे.

मराठी भाषा संरक्षण व विकास संस्था आणि तत्सम अनेक संस्था आणि महाराष्ट्र व गोवा अधिवक्ता परिषद यांनी कनिष्ठ न्यायालयाचे मराठीकरण आणि मुंबई उच्च न्यायालयात तिला प्राधिकृत भाषेचा दर्जा यासाठी सतत प्रयत्न केले. परंतु शासनाकडून प्रतिसाद मिळत नसल्यामुळे 'महाराष्ट्र व गोवा अधिवक्ता परिषद' आणि 'मराठी भाषा विकास आणि संवर्धन संस्था' यांनी संयुक्तपणे १३ डिसेंबर २००७ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे अधिसूचनांनुसार कनिष्ठ न्यायालयांत मराठी भाषेतून कामकाज होण्यासाठी व मुंबई उच्च न्यायालयात मराठी भाषेला प्राधिकृत भाषेचा दर्जा मिळावा यासाठी एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण केले. पण शासनाकडून या आंदोलनाची दखल घेण्यात आलेली नाही. मुंबईसह महाराष्ट्र राज्य अस्तित्वात येऊन ५४ वर्षे होऊन गेली. तरीसुद्धा कर्नाटकात कानडी भाषेला, तामिळनाडूत तामिळ भाषेला, बंगालमध्ये बंगाली भाषेला याप्रमाणे देशातील अन्य राज्यातील भाषांना जे मानाचे पान आहे ते महाराष्ट्रात मराठी भाषेला मिळालेले नाही. ही तुमच्याआमच्या सर्वांच्याच मनातील प्रामाणिक खंत आहे. अशी खंत राजकीय पक्षांना वाटत नाही हे वास्तव आहे. कनिष्ठ न्यायालयाचे कामकाज मराठीतून होण्यासाठी शासनाने २१ जुलै १९९८ रोजी काढलेल्या अधिसूचना केवळ कागदोपत्री राहतील अशी परिस्थिती निर्माण होत आहे. शासनाकडून खालील प्रश्नांची सोडवणूक झाल्यास कनिष्ठ न्यायालयांचे कामकाज मराठीतून आणि विधी व न्यायव्यवहार मराठीतून होण्यास गती येईल.
१. राज्य व केंद्रीय मूळ अधिनियमांचे (of bare Acts)

मराठीत प्राधिकृत पाठ (authoratative texts) स्वरूपात तयार करून उपलब्ध करून देण्याकरिता तसेच विधी शब्दावली, शब्दसमूह (phrase) आणि विधी सूक्ती (legal maxims) मराठीतून तयार करून उपलब्ध करून देण्यासाठी आणि ती सातत्याने अद्ययावत ठेवण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी करणे.

२. न्यायनिर्णय आणि आदेश मराठीतून देण्यासाठी न्यायाधीशांना विधी अधिकारी प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षण देणे.

३. अन्य राज्यांमध्ये विधी अभ्यासक्रम इंग्रजी प्रमाणेच प्रादेशिक भाषेतून आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात सुद्धा विधी अभ्यासक्रमाचे माध्यम इंग्रजीप्रमाणे मराठीसुद्धा उपलब्ध करून देणे.

४. न्यायाधीशांची पदे भरण्यासाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षांमधे अन्य राज्यांप्रमाणे महाराष्ट्रात अन्य विषयांसोबत मराठी भाषेचा विषय ठेवणे.

५. मराठी भाषेला मुंबई उच्च न्यायालयात प्राधिकृत भाषेचा दर्जा देणे.

कनिष्ठ न्यायालयांमध्ये मराठीतून कामकाज व्हावे यासाठी उच्च न्यायालयाची भूमिका महत्त्वाची असते कारण कनिष्ठ न्यायालय ही उच्च न्यायालयास दुय्यम आहेत. २१ जुलै १९९८ रोजीच्या अधिसूचनांनुसार कनिष्ठ न्यायालयांमध्ये मराठीतून कामकाज व्हावे यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने डिसेंबर २००५ मध्ये काढलेले परिपत्रक केवळ तालुका व जिल्हा पातळीवरील फौजदारी व दिवाणी न्यायालयांपुरते मर्यादित आहे तसेच अधिसूचनांमध्ये जी वर्जित प्रयोजने वगळून इतर सर्व कामकाज कनिष्ठ न्यायालयांनी निरपवादपणे मराठीतून करावयाचे आहे असे डिसेंबर २००५च्या परिपत्रकाने स्पष्ट होत नाही आणि कनिष्ठ स्तरावर असलेल्या सहकार व अन्य न्यायालयांना असे निर्देश देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने अधिसूचना काढल्या त्या घटनेस १६ वर्षे एवढा प्रदीर्घ काळ झालेला आहे. परंतु कनिष्ठ न्यायालयांत आणि विधी व्यवहारात मराठी भाषा स्थिर झालेली नाही. मुंबई उच्च न्यायालयाने २१ जुलै १९९८ च्या अधिसूचनांची व्याप्ती स्पष्ट करत कनिष्ठ न्यायालयांना परत नव्याने परिपत्रकाद्वारे स्पष्ट आदेश दिल्यास मराठीतून विधी व न्याय व्यवहार मराठीतून करण्यास गती येईल.

महाराष्ट्रात नुकत्याच झालेल्या निवडणुकीत सत्ता परिवर्तन झालेले आहे. या शासनाने अनेक प्रश्नांसोबत मराठी भाषेच्या संवर्धनाच्या आणि विकासाच्या प्रश्नाकडे गंभीरपणे लक्ष देणे आवश्यक आहे. पूर्वीच्या शासनाने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविलेला असल्याचे समजते. त्यास केंद्रशासनाची मंजुरी मिळेल तेव्हा मिळेल परंतु मंजुरी मिळण्यामुळे मराठी भाषेपुढील असलेल्या अनेक प्रश्नांची सोडवणूक होईल असे नाही. पूर्वीच्या शासनकर्त्यांनी मराठी भाषा विभाग सुरू करण्याव्यतिरिक्त मराठी भाषेच्या विशेषतः मराठी न्यायभाषा होण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केलेली नाही. भाषा, समाज व संस्कृती यांचा अन्योन्य संबंध असल्यामुळे मराठी भाषेचा विकास होणे आवश्यक आहे. विद्यमान शासनाने मराठी भाषेसमोरील अनेकविध प्रश्नांचा धांडोळा घेऊन त्या प्रश्नांच्या सोडवणुकीला प्राधान्यक्रम दिला पाहिजे. तरच न्यायभाषा होण्याच्या बाबतीत मायमराठीपुढे असलेली आव्हाने संपुष्टात येतील आणि कनिष्ठ न्यायालयांत तसेच मुंबई उच्च न्यायालयात न्यायभाषा म्हणून तिला मानाचे पान मिळेल.

**– शांताराम दातार**

भ्रमणध्वनी : ८८२०९२६६९५

shantaramdatar@yahoo.com

ग्रंथाली




# हुमान

**संगीता उत्तम धायगुडे**

**५ वी आवृत्ती प्रसिद्ध झाली – २५ डिसेंबर २०१४**

नियतीनं घातलेली हुमानं सोडवत
स्वतःला सिद्ध करणाऱ्या स्त्रीचं आत्मकथन

**मूल्य ३५० रु. ● सवलतीत २०० रु.**

# प्रकाशन व्यवसायाचे भवितव्य

**अरुण जाखडे**

महाराष्ट्रातील प्रकाशन व्यवहाराच्या दोनशेदहा वर्षांच्या परंपरेविषयी आपण बोलतो, तेव्हा नक्कीच अभिमान वाटतो, परंतु भविष्यातील वाटचालीबद्दल बोलायचे-सांगायचे ठरले तर ह्या क्षेत्रातील जाणकार व गांभीर्याने विचार करणारा माणूस नेहमी गोंधळलेल्या अवस्थेतील विधाने करेल किंवा आपल्या विधानाबद्दल साशंक असेल. असे का घडावे? अशी कोणती गोष्ट झाली आहे की, आपण फार आत्मविश्वासपूर्वक प्रकाशन व्यवसायाच्या भवितव्याबद्दल नक्की काही सांगू शकत नाही. मला वाटते, त्याचे मुख्य कारण आज प्रकाशन व्यवसाय ज्या स्थितीतून वाटचाल करत आहे, ती स्थितीच कारणीभूत आहे. यावर काही दुमत होऊ शकते. असे काही प्रकाशक आहेत की, त्यांनी प्रकाशित केलेली पुस्तके बाजारात अपेक्षेपेक्षा जास्त विकली जात आहेत. त्यांना तुम्ही भेटलात तर ते म्हणतील, ''अहो, प्रकाशन व्यवसाय फार जोरात चालू आहे. गेल्या काही वर्षांत नव्हती एवढी विक्री ह्यावर्षी झाली आहे.'' अर्थातच अशी प्रतिक्रिया देणारे प्रकाशक शुद्ध वाङ्मयाची पुस्तके काढणारी नसतात. एखाद-दुसरे वाङ्मयीन पुस्तक चालते, हा अपवाद म्हणजे महाराष्ट्रातील संपूर्ण प्रकाशन व्यवसायाचे 'चित्र' म्हणता येणार नाही. आज तरी मी स्वत: माझ्या अनुभवातून ह्या निष्कर्षाला आलो आहे की, आदरणीय पुस्तके पूर्वीही फार विक्रेय नव्हती, पण आज तर ती अजिबातच विक्रेय नाहीत. अशा पुस्तकांना मान-सन्मान, पुरस्कार मिळतात, पण अशी पुस्तके प्रकाशित करणे म्हणजे आर्थिक झीज सोसणे, याची पूर्वतयारी करूनच ही पुस्तके प्रकाशित करावी लागतात.

खरंतर मराठी प्रकाशन व्यवहाराच्या भवितव्याबद्दल काही सांगायला मी योग्य माणूस नाही. मी माझ्या संस्थेला वाङ्मयीन प्रतिष्ठा देऊ शकलो; परंतु मी आर्थिक स्थैर्य देऊ शकलो नाही. कदाचित मला काही मर्यादा असाव्यात किंवा काहींना व्यवसाय जमतोच असे नाही. अशा वाट चुकलेल्या व्यावसायिकास वाट विचारणे, किती बरोबर आहे? पण मला वाटते ते मन:पूर्वक व खरेखरे सांगू इच्छितो.

निखळ व शुद्ध वाङ्मयीन व्यवहाराबद्दल मी येथे चर्चा करू इच्छितो. नवनिर्मितीचे जे प्रातिभ अविष्कार आहेत, त्यात कथा, कविता, कादंबरी, ललितलेखन, नाटक असे वाङ्मयप्रकार येतात. त्यांपैकी कविता आणि नाटक ह्या वाङ्मयप्रकारांची पुस्तके पूर्वीपासूनच ग्राहकांनी त्याज्य ठरविली आहेत. कविता हा वाङ्मयातील श्रेष्ठ प्रकार आहे आणि भारतीय साहित्यात महावेदपूर्वकाळांपासून प्रचलित असलेला हा साहित्यप्रकार आहे. ऋषिवर्यांच्या ऋचांपासून मौखिक व पुढे लिखित प्रकारात काव्यप्रतिभा बहरत आली. ह्या पार्श्वभूमीवर कवितांची पुस्तके विकली जायला हवीत; परंतु ती विकली जात नसल्यामुळे प्रकाशक कविता प्रकाशित करण्यासाठी उत्सुक नसतात. (आजच्या कवींच्या प्रतिभेबद्दल किंवा स्वयंघोषित कवींच्या उथळपणाबद्दल काही बोलणे आपण येथे टाळूया.) नाटकांची पुस्तके विकली जात नसली, त्यांना वाचक नसला तरीही निदान नाटक थिएटरमध्ये चालायचे. आज थिएटरमध्ये नाट्यप्रयोग करणेसुद्धा आव्हानात्मक ठरत आहे. पर्यायी माध्यमांनी नाटकाचे प्रेक्षक पळविले.

आता वरील दोन वाङ्मयप्रकारांतील पुस्तकांच्या विक्रीची स्थिती पाहता, ही पुस्तके फार अभावाने प्रकाशित होत आहेत.

कथा, कादंबरी, ललितगद्य, विज्ञान, प्रवासवर्णन, चरित्रे, आत्मचरित्रे ह्या विषयांची पुस्तके अधिक प्रमाणात तर समीक्षा, संशोधन, मानववंशशास्त्र, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र अशा काही प्रकारातील पुस्तके कमी प्रमाणात विकली जात होती; परंतु हा प्रकार खळाळता राहिला. प्रकाशन व्यवसायात अनेक स्थित्यंतरे आली. प्रथमपासूनची भूमिका बदलत गेली. उदा. प्रारंभीच्या ध्येयवादी प्रकाशकांपासून आजच्या व्यावहारिक, व्यावसायिक रूप देणाऱ्या प्रकाशकांपर्यंतचे हे स्थित्यंतर, कालमानानुसार साहित्यप्रकारात होत गेलेले स्थित्यंतर, दलित साहित्याची लाट, त्यामुळे मराठी साहित्याला व वाचनसंस्कृतीला मिळालेले नवे परिमाण, अशी काही स्थित्यंतरे झाली. तंत्रज्ञानही बदलत गेले. 'शुद्ध गायीच्या तुपातील शाईत छापलेली पुस्तके' अशा जाहिरातींपासून 'आज कोणतेही पुस्तक पन्नास रुपयांना घ्या', अशा जाहिरातींतून उलगडत जाणारे व्यवसायाचे स्थित्यंतर, अशा विविध स्थित्यंतरातून हा प्रकाशन व्यवसाय आजच्या

टप्प्यावर उभा आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगत वेगात आज त्याला आपले अस्तित्व टिकवायचे आहे. किंडल, इ-बुक्स, मोबाइल अशा नव्या पर्यायांनी प्रकाशन व्यवसायांच्या मुद्रणसंस्कृतीला झाकोळून टाकले आहे.

**लेखक समाजापासून दूर गेले आहेत, ज्ञानेश्वरांपासून-दुर्गा भागवत, पु. ल. देशपांडे अशा लेखकांपर्यंत साहित्यकारांच्या काही सामाजिक भूमिका होत्या. समाजाला ते आपले वाटायचे. आजचे साहित्यकार समाजविन्मुख होत चालले आहेत आणि त्यांची समाजाशी असलेली नाळ तुटत चालली आहे. अशा परिस्थितीत आपण समाजाकडून तरी कोणत्या अपेक्षा करणार?**

'मागचे सोडवत नाही आणि पुढचे झेपत नाही' अशा मन:स्थितीत माझ्यासारखे काही प्रकाशकबंधू आहेत. आता प्रश्न पडतो की, शुद्ध वाङ्मयीन पुस्तकांचा पूर्वीचा वाचक कोठे गेला? असे काय घडले आहे की आजच्या पिढीची वाङ्मयीन अभिरुची बदलली आहे? साहित्य हे चर्चाबाह्य का ठरत आहे? अशा प्रश्नांची अनेक उत्तरे आहेत, विस्तारभयास्तव हा मुद्दा बाजूला ठेवूया. मला आज ह्या गोंधळलेल्या स्थितीत लेखकांची भूमिका काय आहे, हे समजून घ्यायला आवडेल. कोणत्याही प्रकाशनसंस्थेत लेखक जातात, तेव्हा ते फक्त स्वत:च्याच पुस्तकाबद्दल बोलत असतात. त्यांना फार आत्मविश्वास असतो की, हे पुस्तक लवकर छापले तर हजारो प्रती जातील; परंतु त्या प्रकाशनसंस्थेने कोणती पुस्तके काढली आहेत, त्यातील कोणती पुस्तके यापूर्वी त्यांनी वाचली आहेत, ह्या प्रकाशनसंस्थेची वाङ्मयीन भूमिका अथवा चेहरा कोणता आहे, याचीही अनेकांना माहिती नसते. 'आपण फक्त आपलेच वाचतो' अशीच त्यांची भूमिका असावी इतका त्यांच्याविषयी संशय येतो. माझ्या पुस्तकाच्या हजारो प्रती खपणार ह्या त्याच्या प्रारंभीच बोलण्यावर प्रकाशक दबून जातो. माझा तर आत्मविश्वासच जातो. मग वाटते, हे आज घडणे फार अवघड आहे. लेखक म्हणतो त्याप्रमाणे हजारो प्रती गेल्या नाहीत तर त्याचा गैरसमज व्हायचा. त्याऐवजी आपण येथेच थांबावे. पुस्तकाचे स्क्रिप्ट न वाचताच, त्याची गुणात्मक चर्चा न करताच, त्याला नकार द्यावा असे वाटू लागते. अर्थात हे निरीक्षण सर्व लेखकांबद्दलचे नाही. अनेक लेखक-प्रकाशक आजच्या ग्रंथव्यवहाराची समस्या जाणणारे आहेत. ते बहुतेक साठीच्या पुढचे आहेत. त्यांच्या मनात वाङ्मयीन प्रेम, प्रकाशन व्यवहाराबद्दल आस्था आहे. परंतु अशा जाणकार व अनुभवी लेखकांकडून याबद्दलची चर्चा अपेक्षित आहे. अशा जाणकार लेखकांच्या गटात काही सीमारेषेवर असतात आणि त्यातून संदिग्धता वाढत जाते.

लेखक समाजापासून दूर गेले आहेत, ज्ञानेश्वरांपासून-दुर्गा भागवत, पु. ल. देशपांडे अशा लेखकांपर्यंत साहित्यकारांच्या काही सामाजिक भूमिका होत्या. समाजाला ते आपले वाटायचे. आजचे साहित्यकार समाजविन्मुख होत चालले आहेत आणि त्यांची समाजाशी असलेली नाळ तुटत चालली आहे. अशा परिस्थितीत आपण समाजाकडून तरी कोणत्या अपेक्षा करणार?

ह्यावर्षी पंजाबमधील घुमान येथे साहित्यसंमेलन होत आहे, जिथे एकही मराठी माणूस नाही. एरव्ही महाराष्ट्रात संमेलन होतात, तेव्हा प्रकाशक स्टॉल लावतात, अनेक वाचक पुस्तके घेतात, पाहतात. काही ग्रंथपाल येतात. पुढील व्यवसायाची काही पेरणी तिथे होते. ह्यावर्षी घुमान येथे संमेलन होत असल्यामुळे संमेलनात मराठी पुस्तकांची विक्री होणार नाही. यासाठी मराठी प्रकाशक परिषदेने आवाज उठविला. वृत्तपत्रांनी परिषदेची भूमिका सर्वदूर पोचवली. परंतु मधल्या ३-४ महिन्याच्या काळात एकाही लेखकांने याबद्दल स्पष्ट मत मांडले नाही. दोन माजी संमेलनाध्यक्षांनी घुमानला संमेलन घेणे कसे योग्य आहे असे माध्यमांना सांगितले. खरंतर आम्ही प्रकाशक किंवा पुस्तकविक्रेते लेखकांचीच पुस्तके विकतो. त्यांचेही नुकसान आहे. त्यांना एकदा आपले पुस्तक निघाले की काही घेणे-देणे नसते. लेखकांची अशी केवळ स्वान्त सुखाय भूमिका असेल, तर प्रकाशक तरी काय करतील? पुस्तके विकणे ही प्रकाशकांची जबाबदारी आहे; परंतु त्यांच्या मार्गात अडथळे तरी आणू नये. लेखक एखाद्या परिसंवादात सहभागी होण्यासाठी, पुरस्कारांसाठी व इतर अनेक गोष्टींसाठी अशी भूमिका घेतात.

समाज साहित्यापासून दूर का चालला आहे, याची अनेक कारणे याशिवाय आहेतच की. उदा. जीवनाला आलेला वेग, नवे तंत्रज्ञान, शिक्षणव्यवस्थेतील दोष इत्यादी, परंतु अशा चर्चांचे गुऱ्हाळ पुन्हा लांबवत बसण्यापेक्षा मूळ मुद्दा पुढे येतो, तो म्हणजे प्रकाशनसंस्थांचे आता नक्की भविष्य काय?

पूर्वी प्रत्येक प्रकाशनसंस्थेची काही वाङ्मयीन भूमिका, तिचा स्वत:चा चेहरा, प्रकाशकाची स्वत:ची काही भूमिका असायची. आता स्वत:चा चेहरा हरवत चाललेल्या प्रकाशनसंस्थांची संख्या वाढत चालली आहे. विकते ते छापतो, कारण हा व्यवहार आहे, असे त्यांना वाटते. विकले जाते तेच छापायचे, हीच भूमिका असेल तर त्यासाठी प्रकाशन व्यवसायच कशासाठी हवा? एवढाच वेळ, पैसे आणि श्रम इतर व्यवसायात गुंतवले तर नक्कीच पैसे जास्त मिळतील. परंतु आपण प्रकाशन व्यवसाय करतो, म्हणजे आपण सांस्कृतिक व्यवहार करतो आहोत, हा विचार वेडेपणाचा ठरवला जात आहे. वाचकांची अभिरुची घडविण्याऐवजी 'वाचकशरणता' वाढत चालली आहे. त्यातून ह्या व्यवसायात पूर्वी नव्हती, पण आज स्पर्धा वाढत चालली आहे. आज एमपीएससी, युपीएससी, इतर स्पर्धा परीक्षा, शालेय गाईडस्, व्यक्तिमत्त्व विकास अशा अनेकविध

प्रकारांची पुस्तके छापणाऱ्या संस्था बोटावर मोजण्याइतक्या होत्या आणि त्यांची भूमिका स्पष्ट होती; परंतु आज जो-तो उठतोय तो हेच छापू लागला तर आपसातील स्पर्धा वाढते, तशी वाढली आहे. त्यातून कमिशन व डिस्काउंटचे प्रमाण वाढत चालले आहे. नैतिकतेपेक्षा समोरच्याला संपवतो अशी ईर्षाही बळावत चालली आहे. अशा मित्रांना सांगावे वाटते की, ज्ञानेश्वरांनी सांगितल्याप्रमाणे दोन फांद्या एकमेकांवर घासतात, तेव्हा ऊर्जा तयार होऊन त्या दोन्ही जळतातच; परंतु त्यातून जो अग्नी तयार होतो, त्यामुळे संपूर्ण जंगल, वनच पेट घेते. असे ह्या व्यवसायात घडू नये एवढीच प्रामाणिक इच्छा आहे. हे माझे व्यक्तिगत मत आहे आणि अनेकांना ते आवडेलच असे नाही.

मराठी प्रकाशन व्यवहाराचे भवितव्य आज तरी अवघड वाटत आहे. समीक्षा, संशोधन, वैचारिक पुस्तकांचे खरे आश्रयस्थान, त्या-त्या विषयांचे प्राध्यापक, महाविद्यालयाची वाचनालये, विद्यापीठे आहेत. आज मराठी प्राध्यापकांना २५ लाख रुपये दिल्याशिवाय नोकरी मिळत नाही (काही अपवाद आहेत). येथे त्याची वाङ्मयीन गुणवत्ता पाहण्यापेक्षा आर्थिक स्थिती पाहिली जाते. यांमुळे व्यासंगी व अभ्यासू प्राध्यापकांची वानवा वाढत चालली आहे. एम.ए.ला प्रवेश घेताना विद्यार्थीच महाविद्यालयांना व प्राध्यापकांना अटी घालत आहेत, त्यात काहींची एक अट अशीही असते की, आम्ही वर्गात नियमाने उपस्थित राहणार नाही. हे चित्र विदारक आहे. अशा परिस्थितीत भविष्यात कोणती व कशी पिढी तयार होणार आहे, हे कलाशाखेच्या प्राध्यापकांना सांगणेही अवघड आहे. ज्ञानाची तहान ज्या वयात व ज्या व्यवसायात (प्राध्यापकी) असायला हवी, ती आज दिसत नाही. त्यामुळे अशा पुस्तकांच्या प्रती केवळ १०० ते ३०० छापण्याची दुर्दैवी वेळ माझ्यासारख्या प्रकाशकांवर आली आहे. पुन:पुन्हा अशी गुंतवणूक करणे अशक्य ठरणार आहे. आम्ही जी पुस्तके प्रकाशित करतो, ती कितीही मौल्यवान असली तरीही समाजच त्याला प्रतिसाद देणार नसेल, तर आम्ही करतो, त्या कामाची यथार्थता काय? कशासाठी हा उपद्व्याप करायचा? असाही प्रश्न पडतो.

शासनमान्य १०,००० वाचनालयांपैकी ५,००० वाचनालये खोटी आहेत, असे शासनाच्या निदर्शनास आता आले आहे, परंतु इतकी वर्षे त्यांना अनुदान देणारे, त्यांचा वर्गबदल करणारे शासनच होते. शासनमान्य वाचनालयांची झाडाझडती कोण घेणार? असे असंख्य प्रश्न आहेत.

जानेवारी २०१४ पासून पुस्तकविक्रीचा आलेख फारच कमी झाला आहे. यासंबंधी नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर, नाशिक अशा पुण्याबाहेरील शहरातून प्रकाशन व्यवसाय करणारेही सांगत आहेत. प्रकाशनसंस्था चालविण्यासाठी आज जो खर्च लागतो, तो पाहता, मिळणारे उत्पन्न व खर्च यांचा ताळमेळ घालणे भविष्यात शक्य होणार नाही. फक्त हजार-दोन हजार दिवाळी अंकाच्या प्रती विकल्या जाणार असतील (हे भाग्यही फार थोड्याच अंकांना मिळते) तर सहा महिने हा उपद्व्याप कशासाठी करायचा? कोणासाठी करायचा? पाच वर्षांपूर्वी जेवढे मानधन लेखकाला देत होतो, तेवढेच आजही देणार असू तर कोणत्या तोंडाने लेखकांना लेख पाठवा असे कळवायचे? ही वस्तुस्थिती सांगितली यावर कोणी म्हणेल हे फार नकारात्मक विचार झाले. व्यवसायात जशी 'फेज' येत असते. माझे अनुभव वा निरीक्षण हे सर्वांचे आहे असे मी म्हणत नाही पण अनेकांशी बोललो आणि सरासरी काढून हा विचार मांडला.

आता मराठी पुस्तकांचीच ही स्थिती आहे आणि हिंदी व इंग्रजीत फार आलबेल आहे असे काही नाही. दिल्लीतील अनेक प्रकाशक हिंदी व इंग्रजी पुस्तके १०० ते ३००, फारच शक्य झाले तर ५०० प्रती छापत आहेत. त्यामुळे त्यांच्या पुस्तकांच्या किमती अधिक असतात. त्यांना रिस्क घ्यायची नाही. शहरात गोडाउनचाही प्रश्न असतो. चेतन भगत किंवा एखाद्या नशीबवान लेखकाची पुस्तके लाखोंनी गेली म्हणजे प्रत्येक इंग्रजी पुस्तक असे खपतेच असे नाही. मराठीपेक्षाही हा व्यवहार आतबट्ट्याचा झाला आहे.

तरीही सर्वच भाषांमधील प्रकाशक पुस्तके का प्रकाशित करतात? ह्या प्रश्नाचे उत्तर माझ्याजवळ एवढेच आहे की, प्रत्येक प्रकाशकाला वाटते, माझे एखादे तरी पुस्तक अशी उसळी मारेल आणि माझे भाग्य उजळेल. ह्या आशेवर ते पुन:पुन्हा प्रयत्न करत राहतात. एखाद्याला अशी शिकार सापडतेही, पण त्याच्या शोधात राहणे तर आलेच.

हा सगळा लेख वाचल्यावर कोणी असा गैरसमज करू नये की, आता मराठी प्रकाशन व्यवसाय थांबणार का? तो थांबणार नाही. कितीही क्षीण झाला तरी आम्ही हा व्यवसाय करतच राहणार. कारण नाटक, पुस्तक प्रकाशन आणि शेती हे अव्यापारी वृत्तीचे व्यवसाय करणे हीच मराठी माणसांची ओळख आहे. ती ओळख कधीही अस्पष्ट होणार नाही. ते ह्या चुका पुन्हा करणार, तक्रारी करतील, कंठशोष होईल, आरोप-प्रत्यारोप होतील आणि वेळप्रसंगी कर्जबाजारी होतील. पूर्ण कंबरडे मोडल्यावर एक पडेल, तेव्हा दुसरा उभा राहतो आणि ही मालिका अशीच चालू राहते. फक्त ह्यात सुख व आनंद मिळणार का, एवढाच प्रश्न आहे.

**– अरुण जाखडे**

भ्रमणध्वनी : ९८५००८६४२३

arunjakhade@padmagandha.com

# सांस्कृतिक मरणाकडे नेणारी प्रसारमाध्यमातील मराठी

**विजय चोरमारे**

आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठीतले पहिले वृत्तपत्र 'दर्पण' सुरू केले. त्यानंतर सुरू केलेल्या साप्ताहिक वृत्तपत्राला त्यांनी 'दिग्दर्शन' असे नाव दिले होते. या नावांतून प्रसारमाध्यमांच्या भूमिकेचे सूतोवाच त्यांनी केले आहे.मराठीतले पहिले वृत्तपत्र सुरू होऊन १८२ वर्षे झाली असली तरीही प्रसारमाध्यमांच्या भूमिकेत बदल झालेला नाही. वेगवेगळ्या काळांनुसार आशय बदलला असला तरी मूळ भूमिका समाजासमोर आरसा धरण्याची आणि त्याचबरोबर समाजाला दिग्दर्शन करण्याची राहिली. स्वातंत्र्यलढ्यासाठी लोकांना प्रेरित करणारी स्वातंत्र्यपूर्व काळातील पत्रकारिता, स्वातंत्र्यानंतर समाजाला जुन्या रुढींपासून मुक्त करण्यासाठी धडपडणारी, समाजाचे प्रबोधन करणारी पत्रकारिता आणि जागतिकीकरणानंतर आर्थिक सत्तेला शरण गेलेली पत्रकारिता असे भारतीय आणि मराठी पत्रकारितेचे तीन टप्पे करता येतात. तिसरा टप्पा पत्रकारितेच्या मूळ उद्देशाला सुरूंग लावणारा आणि तिच्या अस्तित्वापुढेच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा असला तरीही त्यातून तावून सुलाखून निघण्यातूनच पत्रकारितेचे श्रेष्ठत्व सिद्ध होणार आहे. भारतीय पत्रकारितेमधील स्थित्यंतरे स्वाभाविकपणे मराठी पत्रकारितेतही घडत गेली. पत्रकारितेचा चेहरा बदलला. भाषासुद्धा बदलली.

प्रसारमाध्यमातील मराठीचा विचार करताना प्रामुख्याने वृत्तपत्रे, दूरचित्रवाणी वाहिन्या आणि दूरचित्रवाणी वाहिन्यांमध्येही प्राधान्याने वृत्तवाहिन्यांचा विचार करावा लागेल. मराठी भाषेबद्दल आस्था असणारे, त्यासंदर्भात गांभीर्याने विचार करणारे लोक गेली काही वर्षे सातत्याने प्रसारमाध्यमांच्या भाषेबद्दल चिंता व्यक्त करीत आहेत. गेली अनेक वर्षे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांमधूनही प्रसारमाध्यमांमधील मराठी भाषेसंदर्भात परिसंवाद आयोजित केले जातात. अलीकडे ठाण्यात झालेल्या संमेलनात त्यासंदर्भात अभिरूप न्यायालयासारखा कार्यक्रम आयोजित केला होता. प्रसारमाध्यमांनी मराठी भाषा बिघडवली असाच सगळ्यांचा सूर होता आणि प्रसारमाध्यमांतील धुरिणांनी त्याचा केलेला प्रतिवाद केविलवाणा होता.

प्रसारमाध्यमांमधील लोकांनी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, की भाषा हा माध्यमांचा प्राण आहे. मुद्रित माध्यमांचा तर आहेच, परंतु दृक्-श्राव्य माध्यमांमध्ये प्रत्यक्षात घटनांचे चित्रण असले तरी ती घटना प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी तेवढ्याच प्रभावी भाषेची गरज असते. परंतु आपल्याकडे हे कुणी लक्षात घ्यायलाच तयार नाही. किंबहुना भाषेवर हकूमत, प्रभुत्व मिळवण्यासाठी प्रयत्न होताना दिसत नाहीत. प्रसारमाध्यमांमध्ये प्रभावीपणे काम करायचे तर भाषेवर प्रभुत्व मिळवता आले पाहिजे, हे कुठे शिकवले जाते असे वाटत नाही आणि शिकवले जात असले तरी त्याकडे फार गांभीर्याने कुणी पाहात नाही, हे माध्यमांमध्ये येणाऱ्या नव्या पिढीकडे पाहिल्यावर दिसून येते.

'प्रसारमाध्यमे आणि मराठी' या विषयावरचे एक पुस्तक डॉ. भास्कर शेळके यांनी संपादित केले आहे.(कर्मवीर प्रकाशन, पुणे). या पुस्तकात 'प्रसारमाध्यमातील मराठी भाषा' या विषयावर ज्येष्ठ पत्रकार सुभाष नाईक यांचा एक लेख आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, ''प्रसारमाध्यमे माहितीच्या प्रसाराबरोबर भाषेचाही प्रसार करीत असतात. अनेक नवे शब्द आणि संज्ञा तयार करून त्या रुढ करण्यामध्ये प्रसारमाध्यमांचा मोठा वाटा असतो.नभोवाणी आणि दूरचित्रवाणी या माध्यमांतून बोली भाषेचा प्रसार झपाट्याने होत आहे; म्हणून प्रसारमाध्यमांनी प्रमाण व शास्त्रशुद्ध भाषा वापरावी असा संकेत आहे. तशी परंपराही आहे. परंतु अलीकडच्या काळात नभोवाणी व दूरचित्रवाणीवरील मराठी बातमीपत्रांत आणि अन्य कार्यक्रमांत वरचेवर आढळणाऱ्या भाषिक चुकांमुळे मराठीप्रेमी श्रोते व प्रेक्षक अस्वस्थ होतात, चर्चा करतात व वर्तमानपत्रांना त्याविषयी पत्रेही लिहितात.या माध्यमांना वेळेचे बंधन, थेट प्रक्षेपण, तरुण अननुभवी पत्रकार इत्यादी मर्यादा आहेत हे मान्य केले तरीही त्यांच्याकडून अचूकतेची अपेक्षा करणे गैर नाही. या माध्यमांचा प्रचंड मोठा प्रेक्षकवर्ग लक्षात घेता असे म्हणता येईल की, आजची तरुण पिढी दूरचित्रवाणीवर पोसली जाते आहे. इतका मोठा प्रभाव या माध्यमातील कार्यक्रमांचा आजच्या तरुण पिढीवर आहे. या माध्यमातील भाषेचा, भाषिक रचनांचा आणि उच्चारांचा मोठ्या प्रमाणावर परिणाम आजच्या पिढीवर होत असावा, असे म्हणण्यास वाव आहे.''

मराठीचा विचार करताना एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, शुद्ध मराठी भाषेचा आग्रह धरायलाच हवा, पण त्याचा

अतिरेक नको. दर बारा कोसांवर भाषा बदलत असते म्हणतात. ते खरेही आहे. कोल्हापूरसारख्या जिल्ह्याचा विचार केला तर कोल्हापूरच्या लोकांची ढब आणि उच्चार वेगळे असतात. शाहूवाडीचे लोक वेगळ्या रितीने बोलतात आणि गडहिंग्लज-चंदगडकडची भाषा वेगळी असते. त्याचप्रमाणे मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, कोकणातल्या लोकांची भाषा निराळी भासते. वृत्तवाहिन्यांसाठी वार्तांकन करताना भाषेच्या माध्यमातून त्या त्या प्रदेशाचा गंध दरवळला तर त्याचे स्वागतच करावयास पाहिजे. संबंधित प्रतिनिधी प्रमाण मराठीत बोलत नाहीत म्हणून नाक मुरडण्याचे कारण नाही. मात्र ही सवलत बातम्या देणाऱ्या अँकरला किंवा बातमी लिहिणाऱ्या-संपादित करणाऱ्याला असता कामा नये. त्यांनी मराठी भाषेचे नियम पाळायलाच हवेत. आणि आजचा सगळा घोळ त्याच पातळीवर होताना दिसतो आणि त्याचमुळे मराठी भाषेचे धिंडवडे निघतात.

**प्रसारमाध्यमांमध्ये प्रभावीपणे काम करायचे तर भाषेवर प्रभुत्व मिळवता आले पाहिजे, हे कुठे शिकवले जाते असे वाटत नाही आणि शिकवले जात असले तरी त्याकडे फार गांभीर्याने कुणी पाहात नाही, हे माध्यमांमध्ये येणाऱ्या नव्या पिढीकडे पाहिल्यावर दिसून येते.**

वृत्तवाहिन्यांकडून मराठीबाबत होणाऱ्या चुका या प्रमाद म्हणाव्या अशा स्वरूपाच्या असतात. त्यासाठी अर्थात बरीचशी कारणे सांगून समर्थन करण्याचा प्रयत्न केला जातो. हाताशी वेळ कमी असतो, प्रचंड स्पर्धा आणि चढाओढ असते त्यामुळे अशा चुका होतात, असे सांगितले जाते. परंतु त्याला काही अर्थ नसतो. कधीतरी होणारी चूक हा मुद्दा नसतो. कारण ती चूकच असते. मुद्दा असतो तो, अडाणीपणामुळे आणि भाषेच्या बाबतीत गंभीर नसल्यामुळे होणाऱ्या चुकांचा.

वृत्तवाहिन्यांचे निवेदक लोकांच्या मुलाखती घेत असतात. चर्चा करीत असतात. चर्चेचा समारोप करताना बहुतेक सर्व वाहिन्यांवरील बहुतेक लोक 'तुमचे धन्यवाद' असे म्हणत असतात. 'तुमचे आभार' हे योग्य आहे, परंतु 'तुम्हाला धन्यवाद' असे म्हणायला हवे. एखादा-दुसरा सन्माननीय अपवाद वगळता बहुतेक सगळे निवेदक धन्यवादास पात्र असल्यामुळे दिवसभरात शंभरेकवेळा 'तुमचे धन्यवाद' कानावर पडत असतात. समस्यांच्या बातम्या सतत दाखवल्या जातात, अनेकदा या समस्या 'सुधारण्याकडे' लक्ष वेधले जाते. समस्या सुधारायच्या नसतात तर त्या 'सोडवायच्या' असतात, हे समजून घेण्याच्या फंदात कुणी पडत नाही.

मराठीवरील हिंदी किंवा इंग्रजीच्या आक्रमणाची चर्चा तर नेहमीच होत असते. त्यासंदर्भात दोन प्रवाह दिसतात. वेगळ्या भाषेतले शब्द स्वीकारल्यामुळे भाषा बिघडत नाही, तर उलट समृद्ध होत असते आणि जगभरातल्या भाषा असे शब्दांचे आदान-प्रदान करीत असतात. त्यामुळे परक्या भाषेतील शब्दांचा वापर हे सरसकट मराठीवरील अतिक्रमण समजण्याचे कारण नाही, असा एक मतप्रवाह आहे. आणि भाषेची शुद्धता टिकवण्याचा आग्रह धरणारा दुसरा मतप्रवाह आहे. दोन्ही मतप्रवाहांचा आदर करून असे म्हणता येईल की, परक्या भाषेतील शब्द स्वीकारताना किंवा भाषाशुद्धतेचा आग्रह धरताना तारतम्य ही महत्त्वाची बाब आहे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक होणार नाही, याची दक्षता घ्यायला हवी, परंतु परक्या भाषेतले शब्द घेऊन मराठीचे व्याकरण बिघडणार नाही, हे पाहायला हवे. 'काट्याची टक्कर', 'चार चाँद लागले' हे शब्द नियमितपणे वापरले जातात. मराठीत इतिहास घडवला जातो, परंतु गेल्या काही वर्षात प्रसारमाध्यमांमधले नवे-जुने सगळे मिळून सातत्याने इतिहास 'रचत' असतात आणि आपण त्यात काही चूक करतोय, असे कुणालाच कधी वाटत नाही.

वर म्हटल्याप्रमाणे भाषा हा प्रसारमाध्यमांचा आत्मा आहे, परंतु मराठी प्रसारमाध्यमांमध्ये येणारे ९९.९९ टक्के लोक भाषेच्याबाबतीत कमालीचे उदासीन असतात. पत्रकारितेचे शिक्षण देतानाही भाषेचे महत्त्व नीट सांगितले जात नाही. भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी आवश्यक ते कष्ट घेतले जात नाहीत. त्यामुळे वृत्तवाहिनीचा एखादा रिपोर्टर काही सांगतोय, तर ते केवळ त्याच्या भाषेसाठी ऐकावे असे कधीच घडत नाही. हिंदीमध्ये ते अनुभवायला मिळते. एनडीटीव्ही इंडियाचे कमाल खान (लखनौ) किंवा हृदयेश जोशी (नवी दिल्ली) यांच्यासारखे रिपोर्टर एखादी माहिती देत असतात तेव्हा त्या माहितीइतकीच त्यांची भाषाही गारुड करीत असते. दुर्दैवाने मराठीत असे घडताना दिसत नाही.

प्रसारमाध्यमांतील मराठीची चर्चा करताना मराठी बिघडवण्याचे सगळे खापर इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर फोडले जाते. मुद्रित माध्यमांतील लोकही त्यांना हसत असतात. हे म्हणजे, 'आपण हसे लोकाला अन् शेंबूड आपल्या नाकाला' अशी गत असते कारण इलेक्ट्रॉनिक माध्यमांतील मराठीला हसणाऱ्या मुद्रित माध्यमांमध्येही भाषेचे तशाच पद्धतीने मुडदे पाडले जातात. हिंदी आणि इंग्रजी शब्दांचा वापर अमाप वाढला आहे. नित्याच्या वापरातील इंग्रजी-हिंदी शब्दांचा वापर करावयास हरकत असण्याचे कारण नाही, परंतु हा वापर अलीकडे अतिरेकी स्वरुपाचा झाला आहे आणि त्याहून गंभीर म्हणजे ज्यांना नीट मराठीच येत नाही ते खपते म्हणून इंग्रजी शब्दांचा वापर करतात. अनेकदा ते पर्यायी शब्दही चुकीचे असतात आणि त्यांचे उच्चारही चुकीच्या पद्धतीने लिहिलेले असतात.

इलेक्ट्रॉनिक माध्यमांना खूप गतिमानतेने काम करावे लागते, त्यामुळे चुका होतात, असे समर्थन तरी करता येते. वृत्तपत्रांना अशा समर्थनाचीही सवलत नाही. भाषिक दारिद्र्य हेच त्याचे मुख्य कारण असते आणि दुर्दैवाची गोष्ट म्हणजे त्याबद्दल कुणालाच खंत वाटत नाही. ना संबंधित पत्रकारांना. ना संपादकांना. आणि मालकांचे मराठीशी (व्यवहारापलीकडे)फारसे देणे-घेणे नसल्यामुळे मालकांना काही वाटण्याचा प्रश्नच येत नाही. मधल्यामधे बिचाऱ्या मराठीचेच हाल होतात.

सामाजिक जडण-घडणीत माध्यमांची भूमिका महत्त्वाची असते, असे म्हटले जाते आणि माध्यमांतली मंडळी तसा दावाही करतात. त्याचवेळी संबंधितांनी हे लक्षात घ्यायला हवे की, भाषिक जडणघडणीतही माध्यमांची भूमिका महत्त्वाची असते, त्यामुळे भाषेकडे गांभीर्याने लक्ष द्यायला हवे. जुन्याचा वृथा अभिमान किंवा नव्याविषयी अनावश्यक तुसडेपणा दाखवण्याचा प्रश्न नाही परंतु प्रसारमाध्यमांमधील नवी पिढी भाषिक कौशल्य वाढवण्यासाठी प्रयत्न करीत नाही, हे मात्र स्पष्ट जाणवते. नवी पिढी हुशार, कष्टाळू, तंत्रप्रगत आणि एकाचवेळी अनेक गोष्टी करणारी आहे. परंतु या सगळ्या गोष्टींची भाषेशी नीट सांगड घातली जात नसल्यामुळे आवश्यक परिणाम साधत नाही.


भाषेसंदर्भात आग्रही असणारे स्वातंत्र्यवीर सावरकरांच्यापासून अनेक लोक होऊन गेले आहेत. त्यातलेच अलीकडचे नाव म्हणजे सत्त्वशीला सामंत. त्यांनी म्हटले आहे, ''वाहतुकीची शिस्त मोडली की प्राणाशी गाठ पडते; त्याप्रमाणेच भाषिक शिस्त मोडली की सांस्कृतिक मरण जवळ ओढवून घेतले जाते.''

प्रसारमाध्यमांत काम करणाऱ्या लोकांनी भाषिक शिस्त पाळली नाही, तर सांस्कृतिक मरण दूर नाही, हे लक्षात घ्यावयास हवे.

**– विजय चोरमारे**
भ्रमणध्वनी : ९५९४९९९४५६
vijaychormaregmail.com

**ग्रंथाली**


## लेणी महाराष्ट्राची – डॉ. दाऊद दळवी



भारतात बाराशे लेणी आहेत. त्यांपैकी आठशे महाराष्ट्रात आहेत! इसवी सनाच्या आरंभकाळाच्या आगेमागे बौद्ध महाराष्ट्रात आले, त्यांना सह्याद्रीच्या डोंगरदऱ्या व त्यातील कातळ, लेणी खोदण्यास योग्य वाटले. त्यामधून एक नवा कलाविष्कार या भूमीत प्रकटला. नंतर हजार-बाराशे वर्षांपर्यंत बौद्धांबरोबरच हिंदू व जैन पंथीयांनी महाराष्ट्रात सर्वत्र उत्तमोत्तम, विविध गुणदर्शी लेणी कोरली, याची महती सांगणारा दस्तावेज.

**मूल्य १२०० रुपये • सवलतीत ७५० रुपये**

## मंदिर-शिल्पे – डॉ. माया पाटील




डॉ. माया पाटील यांच्या प्रस्तुत ग्रंथातून मंदिर-स्थापत्य आणि मूर्तिशिल्पे यांच्या आधारे संस्कृतीची सांगोपांग तसेच अंतर्बाह्य माहिती सांगण्याचा प्रयत्न केला गेला आहे. यासाठी त्यांनी मराठवाड्यातील लातूर आणि उस्मानाबाद या दोन जिल्ह्यांतील विविध मंदिरांचा आणि मूर्तिशिल्पांचा सांगोपांग विचार केलेला आहे, विश्लेषण केलेले आहे. त्याची चित्रांसह सर्वंकष माहिती देणारा हा ग्रंथ.

**मूल्य ३०० रुपये • सवलतीत १८० रु.**



# आधुनिक माहिती-तंत्रज्ञान आणि मराठी मानसिकता

**विवेक सावंत**

मला असं वाटतं की अमृताशी पैजा जिंकणारी जी आपली मराठी भाषा आहे, त्या भाषेला आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या संदर्भात कालानुरूप करण्यापेक्षा खरी गरज माहिती तंत्रज्ञानाने मराठी भाषेशी अनुरूप होत राहण्याची आहे. परंतु त्याचबरोबर आधुनिक ज्ञानयुगाच्या संदर्भात, आणि ते ज्ञानयुग माहिती तंत्रज्ञानाने सक्षम केलं आहे म्हणून त्या तंत्रज्ञानाच्या संदर्भात, मराठी मानसिकता कशी कालानुरूप व्हावी याचं मात्र आपण चिंतन करणं आवश्यक आहे. हा आपल्या मराठी समाजाच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे.

कविवर्य कुसुमाग्रजांनी म्हटलं आहे, ''मातृभाषेचा दुराभिमान माझ्या ठिकाणी नाही, पण अभिमान मात्र अवश्य आहे. इंग्रजांची सत्ता गेली, पण इंग्रजीची सत्ता वाढत्या प्रमाणात येथे फैलावत आहे. भारतातील कोणाही नागरिकाला आपल्याला इंग्रजी येत नाही याचा संकोच वाटावा, किंवा इंग्रजी येत नाही म्हणून प्रगतीचे अनेक दरवाजे त्याला बंद असावेत ही परिस्थिती खरोखर लज्जास्पद आहे. बहुसंख्य लोकांना न कळणाऱ्या भाषेत आपले सर्व वरच्या पातळीवरील आर्थिक, राजकीय व्यवहार होत असल्यामुळे लोकांना न कळणाऱ्या भाषेत चालणारी लोकशाही ही सुसंस्कृत जगात कोठेही नसलेली अद्भुत घटना आपण सिद्ध करीत आहोत. देशातील बहुसंख्यांना न समजणाऱ्या परस्थ भाषेचा पांगुळगाडा घेऊन सामाजिक परिवर्तनाचा पर्वत आपण चढू पाहतो आहोत. भाषाविषयक समस्या सोडविणे सोपे नाही हे तर खरेच, पण अवघड प्रश्न कपाटात कोंडल्यामुळे अधिक अवघड होत जातात आणि शेवटी सर्व संभाव्य उत्तरे गमावून बसतात. हा केवळ भाषेचा प्रश्न नसून समाजाच्या अस्मितेचा आणि म्हणून अस्तित्वाचा प्रश्न आहे. समाजाच्या परिवर्तनाची वा क्रांतीची पेरणी ही स्वभाषेच्या किनाऱ्यावरच होऊ शकते.''

आता आपण या प्रश्नाचा माहिती तंत्रज्ञानाच्या बाजूने विचार करू या. भाषा आणि तंत्रज्ञान यांच्यामधला सबंध हा आशय आणि त्याच्या अभिव्यक्तीच्या साधनांमधल्या सबंधासारखा आहे. आशय हा श्रेष्ठ आहे, अभिव्यक्तीची साधनं ही त्याला साहाय्यभूत आहेत. तंत्रज्ञानाच्या इंग्रजी भाषेतील व्यापक प्रमाणातील वापरातून महाराष्ट्रातही इंग्रजीचा प्रभाव वाढत आहे. त्यामुळे मराठी भाषा नामशेष होईल अशी भीती अनेकांना वाटत आहे. या भीतीतून एका बाजूने समाजात तंत्रज्ञानाविषयी गैरसमजूत पसरतेय व दुसऱ्या बाजूने मराठीच्या अस्तित्वाला असलेल्या आव्हानाचं सम्यक आकलन होण्यात अडथळे निर्माण होत आहेत. मला असं वाटतं की, आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या संदर्भात आज जो मराठीच्या अस्तित्वाबद्दलचा प्रश्न आहे तो खरा मराठीतील आशयाचा प्रश्न आहे; त्याच्या अभिव्यक्तीसाठी अनुरूप असं तंत्रज्ञान इंग्रजी प्रमाणेच मराठीलाही सहज उपलब्ध होत आहे.

जगामध्ये हजारो भाषा बोलल्या जातात व हजारो लिप्यांमधून त्या लिहिल्या जातात. युनिकोडचं तंत्रज्ञान जगापुढे आलं त्यावेळेला आपल्या हे लक्षात आलं की या सर्व लिप्यांचं सहअस्तित्व जर संगणकावर निर्माण करायचं असेल, तर त्या सर्व लिप्यांचं कोडिफिकेशन हे एका कळपटामध्ये (कीबोर्डमध्ये) करायला पाहिजे. युनिकोड प्रकल्प ज्यावेळेला सुरू झाला त्यावेळेला मार्क डेव्हिस यांनी ॲपल कंपनीचा राजीनामा देऊन युनिकोड फाऊंडेशन तयार केलं. या माणसाने भाषांची आणि लिप्यांची अव्याहत सेवा करण्यासाठी आपलं सबंध जीवन समर्पित केलं आहे. त्यांनी जो प्रचंड प्रकल्प राबवला त्यातून असं स्पष्ट झालं, की केवळ इंग्रजीच नव्हे तर जगातल्या हजारो लिप्या आणि त्यांच्याशी संलग्न असलेल्या भाषा संगणकांवर आता एकत्र नांदू शकतील व परस्परांमध्ये सहज व्यवहार करू शकतील.

यासंदर्भात आपली जमेची बाजू काय आहे हे आपण थोडसं लक्षात घेऊ या. महाराष्ट्र हा आता जवळ जवळ बारा कोटी मराठी लोकांचा प्रचंड असा एक भाषक गट आहे. त्यामुळे जगात मराठी भाषक गटाचा संख्यानिहाय क्रमांक १५वा आहे. ही जेवढी आपल्या संख्येच्या दृष्टीने जमेची बाजू आहे तेवढीच ही आपल्या अस्मितेच्या व आपल्या अस्तित्वाच्या दृष्टीने जमेची बाजू आहे.

तंत्रज्ञानाला स्थानिक व जागतिक बाजारपेठेची भाषा कळते. म्हणजे आपण जसं आपल्याकडे 'वसुधैव कुटुंबकम्' म्हणतो, तसं तंत्रज्ञान क्षेत्रातले लोक जगाकडे 'वसुधैव मार्केटम्' या दृष्टीने पहातात. त्यामुळे जर मराठी भाषकांचा एवढा मोठा समूह मराठीची कास धरणार असेल व संगणक, मोबाईल फोन, टॅब्लेट व तत्सम तंत्रज्ञानांचा वापर करून मराठीतून दैनंदिन व इतर व्यवहार करण्यासाठी आग्रही असेल, व त्यामुळे तशा तंत्रज्ञानासाठी एक

मोठी बाजारपेठ निर्माण होत असेल तर तंत्रज्ञान देणाऱ्या कंपन्या मराठी भाषेचा वापर तंत्रज्ञानातून सुलभ करण्यासाठी वाट्टेल ते करायला तयार होतील हे प्रथम लक्षात घेतलं पाहिजे.

मी सौदी अरेबियामध्ये एमकेसीएलचे अनेक प्रकल्प राबवतो. सौदी अरेबियाची लोकसंख्या ही अडीच कोटीपेक्षा कमी आहे. पण सौदी अरेबियाच्या कुठल्याही मॉलमध्ये तुम्ही गेलात तर प्रथम दर्शनी इंग्रजीत चालणारा कंम्प्यूटर सहसा दृष्टीस पडत नाही. तिथे त्याला मागणीच नाही, कारण कुठल्याही अरब ग्राहकाला उजवीकडून डावीकडे जाणाऱ्या अरेबिक लिपीमधलाच संगणक हवा असतो. म्हणजे मायक्रोसॉफ्टलासुद्धा जर सौदी अरेबियामध्ये सॉफ्टवेअर विकायचं असेल, तर सगळंच्या सगळं अरेबिक भाषेमध्ये करावं लागतं. त्यांच्या चौपटीपेक्षा जास्त लोकसंख्या असून आपल्याला मात्र हे भाग्य लाभलेलं नाही! याचं कारण आम्ही असा दृढनिश्चय केलेला नाही, की आम्ही जे काही संगणकावर करू, मोबाइल फोनवर करू ते मराठी भाषेमध्येच करू. जर आम्ही तसा दृढ निर्धार केला, तर मात्र जगातल्या कुठल्याही मोठ्या कार्पोरेट हाऊसला आमच्यासमोर हात जोडून त्यांचं तंत्रज्ञान मराठी भाषेमध्ये देणं भाग पडेल; एवढंच नाही तर ते त्यासाठी उत्सुक असतील. तंत्रज्ञानाला बाजारपेठेची भाषा बरोबर कळते हे महत्त्वाचं तत्व लक्षात घ्यायला हवं.

तुम्ही गुगल सर्चमध्ये गेलात आणि 'भाषा मराठी' वर क्लिक केलं, की मराठीतले सगळे सर्च रिझल्ट्स तुमच्यापुढे हात जोडून उभे राहतात. ज्यावेळेला हजारो मराठी लोकांनी मराठीमधून ब्लॉग्ज वापरायला मोठ्या प्रमाणात सुरुवात केली, आपली पोर्टल्स मराठीतून तयार करायला सुरुवात केली, आपल्या वेबसाईट्स मराठीतून तयार करायला सुरुवात केली त्यावेळेला हे परिवर्तन घडलं. कारण आमचं पोर्टल मराठीत आहे आणि गुगलमधून ते सर्च होत नसेल तर तो गुगलला कमीपणा आहे; आमच्या पोर्टलला नाही. त्याच्यामुळे गुगलसारखी महाकाय कंपनीही तत्काळ मराठीच्या सेवेला उपस्थित झाली. आज ज्या प्रमाणात आपण हे करायला पाहिजे त्या प्रमाणात मात्र आपण ते करत नाही, ही गोष्ट जरी खरी असली तरीसुद्धा आज निरनिराळ्या ब्लॉग्जच्या माध्यमातून विविध देशातली हजारो मराठी माणसं एकमेकांना भेटत आहेत. म्हणजे मराठीच्या अस्तित्वाचा प्रश्न तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेपेक्षा जास्त आपल्या मानसिकतेचा आहे.

मराठीच्या अस्तित्वाला असलेल्या इंग्रजीच्या आव्हानाचा विचार करताना म्हणूनच तंत्रज्ञानाच्या प्रभावाला दोष देत बसणं योग्य होणार नाही. याचा तंत्रज्ञानाच्या पलीकडे जाऊन विचार केला पाहिजे. आम्ही इंग्रजीचं मांडलिकत्व का स्वीकारलं आहे या प्रश्नाचं मूलभूत स्वरूप फारसं तंत्रवैज्ञानिक नसून सामाजिक आहे. मराठीची आजची चिंतनीय स्थिती का निर्माण झाली ते बघू या. आम्ही ज्यावेळेला मराठी' ही प्रमाणभाषा, शासकीय भाषा, इत्यादी, करण्याचा प्रयत्न केला, त्यावेळेला आम्ही सर्वसामान्य लोक दैनंदिन जीवनात वापरत असलेल्या (लोकप्रयुक्त) साध्या सोप्या मराठी भाषेतील शब्दांपेक्षा संस्कृतप्रचुर किंवा संस्कृतोद्‌भव अशा अपरिचित, दुर्बोध व उच्चारायला अवघड शब्दांना प्राधान्य द्यायला सुरुवात केली. हा एक दुर्दैवी पायंडा आमच्या समाजात पडला. महाराष्ट्राच्या एका माजी मुख्यमंत्र्यांनी विधानसभेपुढे ठेवण्यात आलेल्या (शासकीय) 'मराठी भाषेतील प्रस्तावाचं मराठीत भाषांतर' करून सदस्यांना द्यावं असं आपल्या मिश्किल शैलीत अधिकाऱ्यांना सुचवलं होतं!

ह्या नव्या शासकीय मराठी भाषेची निर्मिती करत असताना आव असा आणला गेला, की आम्ही बहुजनांपर्यंत त्यांच्या भाषेत शासन नेत आहोत. प्रत्यक्ष झालं असं, की त्या बुरख्याखाली आम्ही आमची प्रमाण भाषा व तिच्यातून चालणारं शासन लोकांपासून अधिक दूर नेले. काही वेळेला तर लोकांना इंग्रजी बरी, पण ही मराठी नको, असं वाटावं अशी परिस्थिती आम्ही निर्माण केली.

हे करत असताना त्याच्यामागे काही छुपी प्रेरणा होती का? आम्हांला आमच्या सर्वसामान्य जनतेला मुख्य प्रवाहामध्ये आणायचंच नव्हतं की काय? भारताचा इतिहास बघितला तर त्यात एकात्मतेसबंधी, समतेसंबंधी जिवापाड अशी आच ही फार क्वचित आपल्याला बघायला मिळते. काही थोड्या अभिजनांनी प्रचंड मोठ्या संख्येच्या बहुजनांवर सतत सत्ता गाजवणं याच वास्तवाने आमचा पूर्ण इतिहास बरबटलेला आहे आणि आजचं वास्तवही. त्यामुळे बहुजनांना समजणाऱ्या भाषेत जर आम्ही आर्थिक, राजकीय, सामाजिक व्यवहार केले, तर ते लोक ही शिडी चढून लवकर वर येतील, याची आमच्या मनात असलेली भीती हे त्यामागचे मुख्य कारण आहे. असं म्हणण्याचं कारण असं, की जपानचा इतिहास बघितला, चीनचा, रशियाचा, कोरियाचा, इराणचा किंवा तुर्कस्तानचा इतिहास बघितला, तर असं लक्षात येईल, की सर्वसामान्य लोकांना मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी स्वभाषेमधून केवळ शिक्षण देणं एवढंच नव्हे, तर विज्ञान, तंत्रज्ञान, आर्थिक व्यवहार, राजकीय व्यवहार, प्रशासन ह्या सगळ्या गोष्टी एका स्वकीय अशा सोप्या लोकप्रयुक्त पण प्रमाणित केलेल्या भाषेमधून देण्याचा-करण्याचा मोठा खटाटोप या देशांनी जिद्दीने दीर्घकाळ चालवला. सर्वसामान्यांच्या विकासासाठी स्वभाषेचा चहूबाजूनी विकास करण्याची ही विलक्षण रणनीती पाहून आपण थक्क होतो.

मी एकदा कोरियातल्या विद्यार्थ्यांना भारतामध्ये आयटीतल्या प्रगत शिक्षणासाठी आणण्याचा एक प्रकल्प निर्माण केला आणि सन २००० मध्ये मी कोरियामध्ये गेलो. मला तर काही कोरियन भाषा येत नव्हती. कोरियामध्ये गेल्यानंतर एक साधी युक्ती तिथल्या यजमानांनी केली. ती अशी की त्यांनी मला एका खोलीमध्ये नेलं आणि तिथे खाद्यपदार्थांसबंधी कोरियन शब्द मला अवगत होतील अशी पूर्ण व्यवस्था केली. मी म्हटलं की मला तर भूक लागली आहे आणि मी वेळेत जर जेवलो नाही तर माझं डोकं दुखतं तर ते लोक म्हणाले, ''काहीच हरकत नाही, पण तुमचा जेवणाचा मार्ग

याच खोलीतून जातो. तुम्ही प्रथम हे शब्द अवगत करा.'' त्याच्यानंतर त्यांनी मला एका कॅन्टीनमध्ये नेलं. तिथे मॅक्डोनाल्डच्या दुकानात दिसतात तशी पदार्थाची रंगीत छायाचित्रं नव्हती, की ज्यांच्याकडे बोट दाखवून मी ऑर्डर देऊ शकेन. तिथल्या कुठल्याही वेटरला कोरियन भाषेशिवाय दुसरी कुठलीही भाषा येत नव्हती आणि कुठलेही पदार्थ बुफेसारखे समोर मांडलेले नव्हते. त्या टेबलावर बसल्यानंतर माझे जे कोरियन यजमान होते, ते निघून गेले. मी एकटा उरलो! आणि आता तुम्हाला जर जिवंत राहायचं असेल तर कोरियन भाषेमध्येच ऑर्डर प्लेस केली पाहिजे अशी परिस्थिती त्यांनी सहजगत्या निर्माण केली! माझी जी काही आकलनाची मर्यादा होती आणि भुकेल्या पोटाने जेवढी काही शब्दसंपदा मी आत्मसात केलेली होती, त्याचा पुरेपूर उपयोग करून मी माझी जेवणाची ऑर्डर दिली आणि कोरियन भाषेतले काही पोटापुरते महत्त्वाचे शब्द शिकलो आहोत या जाणिवेने सुखावलो. मग मी त्या यजमानांना असं विचारलं, (ते चांगले निष्णात प्रोफेसर होते) काय हो तुमचा हा प्रकार? तर ते म्हणाले, सर, तुम्हांला सांगतो की भाषा डोक्याने शिकता येत नाही, ती पोटातून शिकावी लागते. परकीय लोकांमध्ये आपली भाषा रूजवण्याची त्यांची जी पद्धत आहे, त्यामागचा मनोवैज्ञानिक अभ्यास बघून मी चकित झालो. मग मला उमजलं, की या देशातल्या अगदी सर्वसामान्य लोकांनी ज्ञानाच्या क्षेत्रात एवढी मोठी मजल कशी मारली. साठसत्तर वर्षांपूर्वी अप्रगत असलेले हे देश आज तंत्रज्ञानाच्या बाबतीमध्ये स्वभाषेतून कार्यरत होणाऱ्या 'स्मार्ट सिटीज' उभारतात आणि आम्हांला त्यांच्या जवळपास पासंगाला पुरता येत नाही. आम्ही सुपरकॉम्प्युटिंगमध्ये खूप मोठं काम केलेलं असल्यामुळे अर्थातच मी एका आत्मविश्वासाने गेलो होतो, की या प्रगत देशामधील मुलांना मी भारतामध्ये प्रगत तंत्रज्ञान शिकवणार आहे. त्याप्रमाणे त्या मुलांना आणलंही. परंतु त्यांना आणण्यातला प्रवास मला त्या देशाने त्यांच्या भाषेतून करायला भाग पाडलं. आपल्या भाषेवर किती अविचल निष्ठा असावी, किती प्रेम असावं व तिच्या अपरिहार्यतेचा किती ध्यास घ्यावा याचं ते उत्कृष्ट उदाहरण आहे. सौदी अरेबियामध्येही आमचा अनुभव असाच आहे.

सौदी अरेबियामध्ये ज्यावेळी मी गेलो, त्यावेळी अर्थातच त्यांनी मला सांगितलं, हे सगळे तुमचे तंत्रज्ञान शिक्षणाचे उपक्रम अरेबिकमध्येच व्हायला पाहिजेत. मला असं वाटलं होतं, की आमचं सर्व शैक्षणिक ई-साहित्य अरेबिकमध्ये भाषांतरित करायचं म्हणजे आपल्याला फार मोठा त्रास आहे. पण अरेबिक स्कॉलर्सनी काही दिवसांच्या आत आमचा सबंध ईलर्निंग कन्टेन्ट त्यांच्या प्रमाण भाषेत भाषांतरित करून माझ्यासमोर हजर केला. ते म्हणाले, आमची मुलं शिकतील तर अरेबिकमधूनच शिकतील. डावीकडून उजवीकडे वाचणाऱ्या-लिहिणाऱ्या आम्हांला उजवीकडून डावीकडे जाण्याची पाळी आली! वेबडिझाइन करतानासुद्धा सगळ्या लिंक्स आम्हांला उजवीकडून डावीकडे जाणाऱ्या कराव्या लागल्या. ते त्यावेळी फारच सहज साध्य नव्हतं. म्हणजे आपल्या लक्षात येईल, की सर्वसामान्य लोकांना नव्या ज्ञानाच्या प्रवाहामध्ये आणण्यासाठी सुबोध व सुलभ अशा स्वभाषेच्या वापराची एक प्रकारची सर्वंकष रणनीती त्या देशांनी स्वीकारली, हे त्यांचं फार मोठं अनुकरणीय वैशिष्ट्य आहे.

MKCLच्या MS-CIT अभ्यासक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत महाराष्ट्रातील जवळ जवळ ८० लक्ष जिज्ञासूंना आम्ही संगणक साक्षर करण्याचा प्रयत्न केला. गावोगावी शिकवलं. गडचिरोलीच्या दुर्गम भागातही आमची केंद्रं आहेत. आपल्याला आश्चर्य वाटेल, की या सगळ्या सुमारे ४५०० केंद्रांमध्ये ८० लाख विद्यार्थ्यांपैकी ५० लाखाहून अधिक विद्यार्थी मराठी भाषेमधून संगणक वापरायला शिकले. त्यांना आधुनिक तंत्रज्ञान मराठी भाषेमधून शिकवलं गेलं. आमच्या अभ्यासक्रमाचा सबंध आशय जर जवळून बघितला, तर एक अतिशय सुबोध अशी मराठी भाषा आधुनिक माहिती तंत्रज्ञान शिकविण्यासाठी अत्यंत आकर्षक अशा पद्धतीने आपल्यासमोर येते आणि आपल्याला आपल्या भाषेचा अभिमान वाटतो.

आम्हाला आमच्या बहुजनांना अभिजनवर्गामध्ये आणायचंच नाहीये व त्यामुळे आम्ही हा सगळा इंग्रजी धार्जिणा घाट घातलाय, आणि प्रमाण स्वभाषा इंग्रजीहूनही परकी भासेल याची काळजी घेतलीय असं मला स्पष्टपणे जाणवतंय. बहुजनांना सुलभ अशा प्रमाण स्वभाषेतून आधुनिक ज्ञानाच्या उपासनेत रममाण करण्यासाठी जे मनापासून प्रयत्न व्हायला पाहिजेत, तसे MKCL सारखे सातत्यपूर्ण व व्यापक प्रयत्न कमी व क्षीण का आहेत, हे ही मला उमजतय.

दुसरा तितकाच महत्वाचा भाग असा की कुठल्याही भाषेला जर आज पुढे जायचं असेल तर ती केवळ साहित्याची आणि काव्याची भाषा असणं पुरेसं नाही, तसंच ती केवळ बोलीभाषा असणं पुरेसं नाही, तर ती ज्ञानभाषा असायला पाहिजे. स्वभाषेतून नवीन ज्ञानाची निर्मिती, जुन्या ज्ञानाशी तिची जोड, नव्या आणि जुन्या ज्ञानाचा मेळ घालत-वाढत जाणारा जो स्वभाषेतला ज्ञानसाठा आहे त्याचं समाजाच्या सर्व स्तरांमध्ये तत्काळ मुक्त वितरण, तसंच आर्थिक व सामाजिक विकासासाठी या ज्ञानाचं सर्वसामान्यांनी सातत्यानं केलेलं उपयोजन या बाबी महत्त्वाच्या आहेत. कारण आर्थिक-सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी स्वभाषेतल्या ज्ञानाचा वापर करता येण्याच्या संधी सर्वसामान्य समाजाला कितपत आहेत यावरून त्या भाषेचं भवितव्य स्पष्ट होतं. केवळ साहित्य, कला आणि संस्कृती यांची किंवा करमणुकीची भाषा राहून तिचं भविष्य उज्ज्वल रहातच असं नाही. विज्ञान तंत्रज्ञान अरेबिकमध्ये शिकवायचं असेल किंवा चायनीजमध्ये शिकवायचं असेल, तर त्यांच्याकडे सर्व शब्दसंपदा उपलब्ध आहे. तंत्रज्ञानातला अगदी प्राथमिक भाग जरी शिकवत असलात, तरी त्याला प्रतिशब्द आमच्याकडे नाहीत म्हणून अनाकलनीय अशा प्रमाण भाषेतील शब्दांनंतर कंसात आम्ही इंग्रजी शब्द छापू अशी वेळ त्या समाजांवर येत नाही. प्रगत ज्ञानक्षेत्रातली सुद्धा सुलभ शब्दसंपदा त्या भाषांकडे आहे. पण

आमच्याकडे ठायी ठायी इंग्रजी शब्द वापरावे लागतात. आम्हाला त्याचं तत्त्वज्ञान करावं लागतं. मग आम्ही असं म्हणतो, की ग्रामीण मराठी जनतेसाठी संगणक हा इंग्रजी शब्द आहे आणि कंम्प्यूटर हा मराठी शब्द आहे! हे आम्हांला सांगावं लागतं याचं कारण आम्ही आमच्या भाषेला सुलभ अशी ज्ञानभाषा बनवण्यात कमी पडत आहोत.

**अभिजनांकडून लोकाभिमुख अशा प्रमाणभाषेची निर्मिती होईल अशी भाबडी आशा बाळगण्यात अर्थ नाही. आता लोकांनीच लोकांसाठी प्रमाणभाषा बनवण्याची गरज आहे. विकिपिडियाप्रमाणे सर्वसामान्य मराठमोळ्या लोकांचा माहिती तंत्रज्ञानातील सामूहिक सहभाग वाढवून आपली लोकाभिमुख अशी (समांतर) प्रमाणभाषा व ज्ञानभाषा बनवण, ती रूढ करून दाखवणे शक्य आहे.**

इतिहास बघितला तर एकेकाळी मोठ्या प्रमाणात धातूंमध्ये काम करणारे आमचे कारागीर होते, आमच्याकडे नवीन वास्तुरचना करणारे कितीतरी असे उत्तम कारागीर होते, की ज्यांनी ताजमहालसारख्या आश्चर्यजनक वास्तू बांधल्या, कैलाससारखी जगाला आकर्षित करणारी अद्वितीय लेणी कित्येक पिढ्यांनी पुढच्या पिढीकडे ज्ञान संक्रमित करत करत बांधली, पण अशा लोकांना आम्ही समाजाच्या मुख्य ज्ञानप्रवाहामध्ये वैज्ञानिक किंवा तंत्रज्ञ म्हणून प्रतिष्ठा दिली नाही. त्यांची तसेच कोट्यावधी शेतकऱ्यांची, कष्टकऱ्यांची, बलुतेदारांची जी कामाची, व्यवहाराची ज्ञानभाषा होती, तिला आम्ही अभिजनांच्या भाषेमध्ये प्रवेशच दिला नाही, मानाचं स्थान दिलं नाही. श्रमाधिष्ठित अशा त्या सर्व व्यवहारासंबंधी व त्यातील जिवंत अशा ज्ञानभाषेसंबंधी अभिजन वर्गानं उदासीनता किंवा तिरस्कार दर्शवला. पराविद्यांची भाषा अभिजनांची व अपरा विद्यांची भाषा बहुजनांची अशी दरी निर्माण झाली. जगात विज्ञान-तंत्रज्ञानाच्या अपरा विद्यांचा उदय ज्या १९व्या व २०व्या शतकात झाला व त्या विकासाच्या स्रोत बनल्या त्या काळात आमच्या अभिजन वर्गाच्या भाषा त्या विद्यांच्या व्यवहाराला अपरिचित असल्यामुळे कालबाह्य ठरल्या व इंग्रजीची अपरिहार्यता अधोरेखित झाली. अभिजन व बहुजनांच्या अनुक्रमे डोक्याच्या व हाताच्या व्यवहारांमधली दरी अखेरीस आमच्या प्रमाण भाषेला अगदी नैसर्गिकपणे आणि दैनंदिन लोकव्यवहारातून विज्ञान-तंत्रज्ञानाची परिभाषा निर्माण करण्यासाठी सक्षम ठेवू शकली नाही. प्रमाण भाषा बनविण्याची मक्तेदारी अभिजनांकडे एकवटल्यावर दुसरे काय होणार? इतर देशांनी नेमकी ही चूक करण्याचं टाळलं. प्रत्यक्ष वैज्ञानिक आणि तंत्रवैज्ञानिक व्यवहार जे करत होते व त्या लोकांची जी रोजची व्यवहाराची भाषा होती, तीच थोडेफार उचित संस्करण करून प्रमाण भाषेच्या रूपात त्यांच्या आजच्या वैज्ञानिक शब्दकोशांमध्ये आहे. हा केवढा मोठा फरक आहे!

चौथी नापास झालेला एक गरीब तरुण विख्यात शास्त्रज्ञ सर हंफ्रे डेव्ही यांचा बुक बाईंडर होता. एक दिवस सर हंफ्रे त्याला म्हणाले, ''तू माझ्या व्याख्यानांचं बुकबाईंडींग करतोस, अलीकडे माझी व्याख्यानंसुद्धा ऐकून स्वत: लिहितोस, तर तू आता माझ्या प्रयोगशाळेमध्ये प्रयोगपण कर.'' मग दुपारच्या जेवणाची भ्रांत होती अशा घरातला हा मुलगा, त्या प्रयोगशाळेत प्रयोग करू लागला आणि कालांतराने त्याने एक विलक्षण शोध लावला. त्या वेळेला हंफ्रे डेव्ही त्याला म्हणाले की, ''तू रॉयल सोसायटीपुढे भाषण कर. तुझा हा शोध सर्व शास्त्रज्ञांपुढे मांड.'' मग त्याने आपला इलेक्ट्रोमॅग्नेटिक इन्डक्शनचा शोध मांडला, की ज्याच्यामुळे पृथ्वीवर आज रात्रीसुद्धा दिवस करता येतो. हे दिवे ज्याच्या संशोधनामुळे लागतात, तो मुलगा इंग्लंडच्या रॉयल सोसायटीमध्ये सर्वांच्या समोर येतो, आणि आपला संपूर्ण शोध हा प्रयोगाच्या सहाय्याने मांडून दाखवतो! त्यावेळेला समोर कोण बसलेले असतात? तर ब्रिटनचे अर्थमंत्री, चॅन्सलर ऑफ एक्सचेकर! ते त्याला विचारतात, याचा काय उपयोग आहे? लोहचुंबक तारेच्या वेटोळ्यातून पुढे मागे हलवलं की करंट निर्माण होतो व मीटरमधला काटा हलतो. पुढे काय? त्यावेळेला हा मुलगा आत्मविश्वासाने सांगू शकतो, सर, एका नवजात अर्भकाचा असा काय उपयोग असतो? आणि मग थांबून तो अर्थमंत्र्यांना एकदम म्हणतो, ''काय सांगावं सर, उद्या कदाचित ह्या शोधामुळे तुम्हांला निरनिराळ्या प्रकारचे कर गोळा करता येतील!'' आणि पुढे तसंच झालं. आजदेखील तुम्ही तुमच्या घरी येणारं MSEBचं बिल उघडून बघा, त्याच्यात कितीतरी अधिभार आणि कितीतरी कर आकारलेले तुम्हाला दिसतील!

सांगायची गोष्ट अशी, की समाजातल्या सर्वांत तळातल्या स्तरामधला हा मुलगा, भाषेचं कुठलंही बंधन नसल्यामुळेच एका श्रेष्ठ शास्त्रज्ञाची भाषणं लिहू शकतो; शोध लावू शकतो; ते जाहीररीत्या मांडू शकतो; नुसतंच बुक-बाईंडिंग करत बसत नाही. आमच्या समाजात जर असा एखादा मायकेल फॅरेडे जन्माला आला असता, तर तो सुरुवातीला बुकबाईंडर असता आणि शेवटी बुकबाईंडर म्हणूनच रिटायर झाला असता! याचं कारण त्या शास्त्रज्ञाची भाषा आणि या बाईंडरची भाषा यांचा काही मेळच नाही, संबंधच नाही. त्यामुळे वैज्ञानिक व्यवहारात ज्ञानाच्या पातळीवर बहुजनांनी सहभागी होण्याचा प्रश्नच नाही. भारतातील वैज्ञानिक प्रयोगशाळांमध्ये आजही हेच चित्र कायम आहे.

हे असं होण्याची कारणं जर आपण भारताच्या इतिहासामध्ये बघितली, तर आपल्या असं लक्षात येतं, की आमची राजभाषा ही नेहमी लोकभाषेपेक्षा वेगळी राहिलेली आहे. आमची राजभाषा एकेकाळी संस्कृत होती, त्याच्यानंतर ती पर्शियन झाली आणि त्याच्यानंतर ती इंग्लिश झाली. मग इंग्रज गेले तरी आमची राजभाषा मात्र इंग्लिशच राहिली! राजभाषा एक आणि लोकभाषा वेगळी हा प्रकार भारतात घडला. त्यामुळे भारतामध्ये तुम्ही अभिजन आहात ही तुमची ओळख ही तुम्हांला किती ज्ञान आहे, तुम्ही किती सुसंस्कृत आहात, यावरून ठरत नाही, तर तुम्ही अभिजन

आहात याची ओळख, ही तुम्ही सफाईदार इंग्रजीत बोलता की नाही यावर ठरते. आम्ही बहुजनांच्या मनांमध्ये एक प्रकारची अशी भावना आणि रुखरुख निर्माण केली की, तुम्ही नॉन एलिट आहात, कारण तुम्ही स्वभाषेमध्ये व्यवहार करता. तुम्हांला इंग्रजीमध्ये व्यवहार करता येत नाहीत. आणि जर तुम्हांला अभिजन व्हायचं असेल, तर इंग्रजीच्या राजमार्गावरूनच तुम्हांला ते होता येईल. हा लेख जरी तंत्रज्ञानाच्या संदर्भात असला तरी त्यातील प्रश्न खरं म्हणजे आपल्या समाजाच्या अभिजनांच्या व्याख्येमध्ये दडलेला आहे, हे आपण समजून घेतलं पाहिजे. त्यामुळे मला जर आता अपवर्ड मोबिलीटी हवी असेल (वरच्या सामाजिक स्तरात संक्रमण करायचं असेल), तर मी एखाद्या विषयामध्ये, एखाद्या व्यवहारामध्ये, एखाद्या तंत्रामध्ये किंवा एखाद्या कौशल्यामध्ये पारंगत व्हायला पाहिजे असं नाही, तर मला सफाईदार इंग्रजी यायला पाहिजे, असा दृढ समज आम्ही निर्माण केला. ग्रामीण भागातही इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील प्रवेशांचं सातत्यानं वाढणारं प्रमाण आमच्या अभिजनांच्या उफराट्या व्याख्येची परिणती आहे. म्हणून हा झगडा हा इंग्रजी विरूद्ध मराठीचा नाही. हा झगडा बहुजनांना मुख्य प्रवाहात आणायचं की नाही असा आहे. चुकून त्याला भाषिक स्वरूप दिलं जातं, ते त्याचं अतिशय मिथ्या असं स्वरूप आहे. जर आमचे वैज्ञानिक, तंत्रवैज्ञानिक, राजकीय, आर्थिक, प्रशासनिक व्यवहार लोकभाषेतून झाले, तर समाजातल्या सर्वांत तळातल्या माणसालासुद्धा ही शिडी फार चटकन चढता येईल. पण हे आम्हांला करायचंय का, हा खरा कळीचा प्रश्न आहे!

आता आपण तंत्रज्ञानाकडे येऊ या. माहिती तंत्रज्ञानाची, दिशा काय आहे? त्याची दिशा अशी आहे, की एकाच वेळी ती कोट्यवधींना स्पर्श करू शकते. म्हणूनच इंग्रजी येवो न येवो भारतामध्ये ८० कोटी लोकांच्या खिशामध्ये मोबाइल फोन आला. त्यांना समजेल अशा स्वभाषेत त्यांना तो बोलण्याऐकण्यासाठी वापरता येतो. तसेच मराठी भाषा आणि देवनागरी लिपी आता संगणकावर सहज वापरण्यासाठी उपलब्ध आहे.

माहिती तंत्रज्ञान उद्योगानं असाच विचार केला की जगातल्या १५व्या नंबरचे हे लोक आहेत. त्यांना कम्प्यूटरवर मराठीचा वापर करता आला नाही तर आमचं तंत्रज्ञान त्या बाजारपेठेत खपणारच नाही. म्हणून युनिकोडवर मराठी आणली गेली. मग त्याप्रमाणे सर्व संगणक-उत्पादकांनी ते प्रमाण म्हणून स्वीकारलं. त्याच्यामुळेच जागतिक बाजारातला कुठलाही संगणक हा आज मराठी भाषेत सहज वापरण्यासाठी सिद्ध आहे. म्हणजे तंत्रज्ञान हे तुम्हाला एक प्रकारचं व्यासपीठ देतं आहे, प्रश्न आमच्या मानसिकतेचा आहे. तंत्रज्ञानाचं मराठीवर आक्रमण होतंय इत्यादी गळेकाढू वल्गना दिशाभूल करणाऱ्या आहेत.

दुसरी गोष्ट - तंत्रज्ञान स्वस्त झालेलं आहे. सर्वदूर त्याची उपलब्धता वाढते आहे. त्याला लागणारी विद्युतऊर्जा कमी कमी होत चाललेली आहे, पण ते देत असलेली कंप्यूटिंग पॉवर मात्र वाढत चाललीय. त्याच्यामुळे तुमच्याकडे लोड शेडिंग असलं तरी तुम्हांला ते दीर्घकाळ बॅटरीवर वापरता येईल अशी सुविधा आज आहे. त्याचबरोबर ते तुमच्या भाषेमधून तुम्हांला वापरता येतंय. त्यामुळे भावनिकदृष्ट्या खोलवरचा असा एक व्यक्तिगत अनुभव तुम्हाला त्याच्यामध्ये घेता येऊ शकतो, तुम्ही त्याच्यातून तुमचे ब्लॉग्ज लिहू शकता, इ-बुक्स प्रकाशित करू शकता, तुमच्या भावनांचं, विचारांचं अभिसरण करू शकता. सर्वसामान्य गरीब मराठी लोकांच्या दृष्टीने तंत्रज्ञानाने दिलेली ही फार मोठी गोष्ट आहे. ज्ञानाचे स्त्रोत जर मराठीत असतील तर तंत्रज्ञान ते बहुजनांपर्यंत पोहोचवायला सज्ज आहे.

इजिप्तमधल्या स्त्रिया ज्यावेळी घरोघरी अरेबिकमध्ये कंप्यूटर वापरू लागल्या आणि फेसबुकवर एकमेकीला भेटू लागल्या, त्यावेळेला त्या बायकांनी आपल्या नव-यांना रस्त्यावर ढकललं. त्यांच्या मागोमाग त्याही आल्या आणि इजिप्तमध्ये सत्तांतर होणं अपरिहार्य झालं. म्हणजे एक तंत्रज्ञान किती वेगळी परिमाणं हुकूमशाहीनं दडपलेल्या समाजाला देऊ शकतं हे इजिप्तने आम्हाला दाखवलं. Organizing without organization 'संघटने शिवाय संघटन' हा एक नवा चमत्कार तिथे तंत्रज्ञानामुळे घडला. जे सर्वसामान्य लोक कैरोच्या तेहरीर चौकामध्ये आले होते त्यांची २१व्या शतकातली एक अतिशय अभिनव फॉर्म असलेली अदृश्य संघटना त्यापूर्वीच फेसबुकवर तयार झाली होती. तिच्यामुळे ते तिथे आले. नाहीतर त्यांना माहितीसाठी फक्त सरकारी मालकीची एकांगी प्रसारमाध्यमंच उपलब्ध होती. ते एका हुकूमशाहीतले नागरिक होते. म्हणजे तंत्रज्ञान आज किती इक्वलायझिंग (समानता आणणारं) होऊ शकतं याचा एक पुरावा आम्हांला अलीकडेच मिळाला.

आमच्याकडे स्वभाषेतून असे परिवर्तन वगैरे सोडाच, प्राथमिक शिक्षण सुद्धा मिळेनासे होतेय. इंग्रजीचा प्रभाव आमच्या शालेय शिक्षणावर वाढत असला तरी त्यातील इंग्रजी अध्यापनामध्ये एक मूलभूत चूक झालीय. ज्या पद्धतीने आमच्या शाळांमध्ये इंग्रजी शिकवलं जातं, ती भाषा शिकवण्यासाठी अत्यंत अशास्त्रीय अशी पद्धत आहे. आमच्या मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये इंग्रजी हा विषय संभाषणकेंद्री नसून व्याकरणकेंद्री बनवण्यात आला आहे आणि शिक्षक सामान्यत: इंग्रजीतून बोलून तो कधीच शिकवत नाहीत. ते मुलांशी मराठीत बोलतात, म्हणून मुलंही इंग्रजी बोलू शकत नाहीत. याउलट इंग्रजी माध्यमांच्या कॉन्व्हेंट व तत्सम शाळेतले शिक्षक इंग्रजीत बोलतात, म्हणून ती मुलंही इंग्रजी बोलायला शिकतात. नव्यानं पेव फुटलेल्या तथाकथित इंग्रजी माध्यमाच्या तसेच सेमी इंग्लिश शाळातील बहुसंख्य शिक्षकांना सफाईदार इंग्रजी बोलता येत नाही त्यामुळे ते मराठीचा वापर करतात व शाळेतील एकूण पर्यावरण अर्धवट मराठी व अर्धवट इंग्रजी राहिल्याने तेथील मुले धड इंग्रजी बोलू शकत नाहीत व धड मराठीही बोलू शकत नाही. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास खच्ची होतो आणि त्यांची भाषिक बुध्दिमत्ता या भाषिक गोंधळाच्या संभ्रमात निकृष्ट ठेवण्याचा गुन्हा आम्ही करत रहातो. ज्ञानयुगाकडे

झेप घेऊ पहाणाऱ्या भारताला सुमार भाषिक बुद्धिमत्तेच्या प्रचंड संख्येच्या पिढीमुळे मोठी किमत मोजावीच लागेल.

ही मुलं केवळ काही इंग्रजी शब्द आत्मसात करतात, पण मग त्यांच्या वाक्यरचना ह्या मराठी वळणाच्या असतात किंवा मराठी असतात आणि त्याच्यात काही शब्द तेवढे इंग्रजी असतात. सर्वसामान्य मराठी घरांमधली मुलं 'ब्लू जीन वर रेड टीशर्ट मॅच होतो', अशा प्रकारची वाक्यं मराठी भाषेमध्ये बोलतात! म्हणजे मोठ्या प्रमाणात इंग्रजी शब्दांचा वापर हा आम्ही मराठी भाषेचा बाज कायम राखून आता करतो. आता तर ती फॅशन झाली आहे. त्याचं सर्वात उत्कृष्ट उदाहरण म्हणजे आमचे एफएम रेडिओ चॅनल वरचे रेडिओ जॉकी. ते एकाच वेळी मराठी, हिंदी, इंग्रजीची इतकी बेमालूम सरमिसळ करतात की, मी स्वत:मध्ये न्यून समजतो की मला तशी भाषा बोलता येत नाही! इंग्रजीपासून पिढ्यानुपिढ्या वंचित राहिलेल्या व इंग्रजीच्या बेसुमार प्रभावामुळे गोंधळून गेलेल्या लोकांचा अभिजनवर्गाकडे सरकण्याचा प्रवासही अशाच मिश्र भाषेच्या वाटेने जातो आहे हे आपण लक्षात घ्यायला हवं.

आज कितीही ग्रामीण भागातला मुलगा असला तरी त्याला अनेक इंग्रजी शब्द आत्मसात करणं भाग पडतं, कारण त्याच्याशी समानार्थी असे बोलायला-लिहायला सोपे, साधे, छोटे, चपखल अर्थवाही असे मराठी शब्दच अस्तित्वात नाहीत. दैनंदिन व्यवहारासाठीच्या संवादाची सोय ही तर कुठल्याही भाषेकडून प्राथमिक अपेक्षा असते. प्रमाण मराठी आज ही प्राथमिक अपेक्षाही पूर्ण करत नाही, कारण प्रमाण भाषेची निर्मिती करण्याचा हक्क राखणारा अभिजन वर्ग आपले व्यवहार इंग्रजीत करण्यात तरबेज आणि मग्न आहे. खेड्यातला मुलगासुद्धा मोबाइलवर टॉप-अप' घेताना म्हणतो की, अनलिमिटेड टॉक टाइम फ्री असायला हवा. कारण ह्याचे समानार्थी सोपे शब्दच आमच्याकडे नाहीत. त्यामुळे हा वर्ग आपल्या दैनंदिन गरजेपोटी एका मिश्र भाषेची निर्मिती करतो आहे. ही एक चिंतेची बाब आहे कारण या प्रकारामुळे ही पिढी एकीकडे स्थानिक व जागतिक पातळीवर निखळ इंग्रजीत व्यवहार करू शकत नाही आणि दुसरीकडे मराठी ही लोकाभिमुख अशी ज्ञानभाषा म्हणून विकसितही होत नाही.

अशा परिस्थितीत अभिजनांकडून लोकाभिमुख अशा प्रमाणभाषेची निर्मिती होईल अशी भाबडी आशा बाळगण्यात अर्थ नाही. आता लोकांनीच लोकांसाठी प्रमाणभाषा बनवण्याची गरज आहे. विकिपिडियाप्रमाणे सर्वसामान्य मराठमोळ्या लोकांचा माहिती तंत्रज्ञानातील सामूहिक सहभाग वाढवून आपली लोकाभिमुख अशी (समांतर) प्रमाणभाषा व ज्ञानभाषा बनवण, ती रूढ करून दाखवणे शक्य आहे.

माहिती तंत्रज्ञानामध्ये भाषेविषयी आता एक नवीनच गोष्ट घडते आहे. आणि ती आपण नीट समजून घेतली पाहिजे. मज्जाशास्त्राचा अभ्यास जसा पुढे गेला तसं आपल्या लक्षात आलं की माणसाच्या मेंदूमध्ये भाषेसंदर्भात दोन केंद्रं असता. एक भाषा आकलनाचं केंद्र आणि दुसरं भाषा व्यक्त करण्याचं केंद्र. सर्व मानवांच्या मेंदूमध्ये भाषिक बुद्धिमत्तेची हीच दोन केंद्रं असतात. म्हणजे ज्या भाषा मनुष्य निर्माण करतो त्यांच्या उगमाच्या व विकासाच्या मागे हीच दोन केंद्रं आहेत हे लक्षात येईल. ह्या दोन केंद्रांचा अभ्यास हा आता खूप वेगळ्या दिशेने चालू आहे. आणि तो असा आहे की सर्व भाषाभगिनींमध्ये व्याकरण दृष्ट्या साम्यस्थळं काय आहेत? ह्याच दोन केंद्रांनी आकलन होण्याचं व व्यक्त करण्याचं सर्व काम होत असेल, तर मग त्यांच्या मदतीने तयार झालेल्या भाषांमध्ये बरंचसं मूलभूत साम्य असायला पाहिजे. ते शोधणं आणि त्याचा भाषांतराचं तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी उपयोग करणं ही आता संशोधनाची दिशा आहे.

त्याचा उपयोग करून आम्ही काय करणार आहोत? तर टेलिफोन कंपन्या अजून दहा-वीस वर्षांच्या आत अशी एक तांत्रिक व स्वयंचलित सेवा देतील, की वेगवेगळ्या भाषा बोलणारे लोक त्या सेवेच्या माध्यमातून आपापल्या भाषांमध्ये बोलू शकतील व ते इतरांनाही त्यांच्या-त्यांच्या भाषांमध्ये त्याच वेळी आपोआप भाषांतरित होऊन ऐकू येऊ शकेल. ह्याला 'रिअल टाइम व्हॉइस/ लँग्वेज ट्रान्सलेशन टेक्नॉलॉजी' असं संबोधलं जातं. माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्यानं आपोआप आणि प्रचंड वेगानं सध्या होत असलेल्या संगणक किंवा मोबाईल फोनवरील लिखित मजकुराच्या लिप्यंतराच्या (transliteration) आणि भाषांतराच्या (translation) फार फार पुढची ही झेप आहे. ज्या संशोधनासाठी आत्ता मोठ्या प्रमाणात रिसर्च फंडिंग होतं, त्या गोष्टींचे दहा-वीस वर्षात तंत्रज्ञानात मेगाट्रेंड (महाप्रवाह) होतात. तुमच्या खिशात आज जो मोबाइल फोन आहे, त्याच्या तंत्रज्ञान विकासासाठी १९८०च्या दशकामध्ये फार मोठ्या प्रमाणात रिसर्च फंडिंग दिलं गेलं होतं. म्हणून तुमच्या खिशात आज प्रगत तंत्रज्ञानावर चालणारे मोबाइल फोन आहेत. मग आज कशाला रिसर्च फंडिंग दिलं जातय? तर या ऑनलाईन भाषांतर तंत्रज्ञानाच्या संशोधनाला. कारण आम्हांला आमच्या टेलिकॉम कंपनीतर्फे आमच्या ग्राहकांना ही एक अभिनव सेवा द्यायची आहे, कारण आमचं मार्केट ग्लोबल करायचं आहे. आणि आम्हाला तर हे माहीत आहे की आमचे जे मराठी बांधव आहेत किंवा अनेक देशांतले अनेक स्थानिक भाषा बोलणारे जे बांधव आहेत, त्यातले १०% पेक्षा अधिक लोक इंग्लिश शिकू शकणार नाहीत. तंत्रज्ञानातल्या लोकांना याची पूर्ण खात्री आहे. मराठी भाषेचं काय होणार, ती जगणार की नाही, कुठेतरी अस्तंगत होईल की काय, सगळेच इंग्रजीत बोलू लागतील की काय अशी काल्पनिक भीती निष्क्रिय विद्वान व्यक्त करत असतात. तंत्रज्ञानातल्या लोकांचे मार्केट सर्व्हे मात्र खूप स्ट्राँग असतात. त्यांना ठाऊक आहे की ही मराठी भाषा कदाचित थोडीशी मिश्र होईल, पण ती अस्तित्वात राहणार आहे आणि कोट्यावधी मराठी माणसं तिचा वापर दैनंदिन जीवनात करणार आहेत. तसं सगळ्याच भाषांचं होणार आहे. तर मग तंत्रज्ञान कुठली दिशा घेतंय? फारच इन्टरेस्टिंग दिशा आहे. समजा, एक मराठी माणूस आहे, एक जॅपनीज माणूस आहे, एक रशियन आहे, एक कोरियन आहे, एक चायनीज

आहे, एक इंग्लिश आहे, एक स्पॅनिश आहे – असे लोक त्यांना एकमेकांची भाषा येत नाही, पण आता एका कुठल्यातरी ग्लोबल अशा व्यवहारामध्ये ते परस्परांशी मोबाईल फोनवर कॉन्फरन्स द्वारे संभाषण करत आहेत. अशा वेळेला आमची टेलिकॉम कंपनी त्यांना असं म्हणणार आहे, ''तुम्ही सर्वजण ही कॉन्फरन्स तुमच्या मोबाइलवरून करा. तुम्ही सर्वजण तुमच्या-तुमच्या मातृभाषांमधूनच बोलत राहा. तुम्ही ज्यांच्याशी कॉन्फरन्स करता आहात त्यांना त्यांच्या त्यांच्या मातृभाषांमध्ये रन-टाइम ट्रान्सलेशन म्हणजेच तत्क्षणी भाषांतर उपलब्ध होत राहील! काही सेकंदाची कदाचित गॅप असेलही, पण ती तुम्हांला कळणार नाही. सुरुवातीला ती भाषांतरे अगदी अचूक व परिपूर्ण नसतील, पण हळूहळू होत जातील आणि त्यामुळेच तर परस्परांच्या भाषा अवगत नसूनही हे लोक जागतिक व्यवहारात सहजतेनं पुढे जातील, कारण त्यासाठी तयार होत असलेलं सॉफ्टवेअर सेल्फ इम्प्रुव्हिंग व सेल्फ करेक्टिंग (स्वतःच स्वत:मध्ये आपोआप सुधारणा करणारं व चुकांची दुरुस्ती करणारं) असणार आहे. नॅनो टेक्नॉलॉजीमुळे ते अतिशय वेगवान अशा संगणकांवर व मोबाईल फोन्सवर चालेल व रिअल टाइम इफेक्ट आपल्याला बोली भाषांतराच्या स्वरूपात मिळेल.''

सेल्फ इम्प्रूव्हिंग आणि सेल्फ करेक्टिंग सॉफ्टवेअरच्या निर्मितीची पहाट झालेली आहे. आता त्याच्या छोट्या छोट्या पाऊलखुणा आपल्याला दिसताहेत. डोकोमो कंपनीने आपल्या जपानी ग्राहकांना मोबाईलवरील संभाषणात जपानीतून इंग्रजीत व इंग्रजीतून जपानीत तत्काळ बोली भाषांतर सेवेची प्रायोगिक पातळीवर सुरूवात केली आहे व त्याचे निष्कर्ष उत्साहवर्धक आहेत. त्यामुळे आपली भाषा जपण्याची, ती वाढविण्याची एक खूप मोठी संधी निर्माण होणार आहे. इंग्रजी भाषेतील वाङ्मयाचा जरूर अभ्यास करावा. चार्ल्स डिकन्स वाचू नका असं कोण म्हणेल? पण आमच्या प्रगतीच्या मार्गातला इंग्रजी भाषा हा अडसर ठरता कामा नये. तंत्रज्ञान तशा दिशेने प्रगत होतंय. मग या तंत्रज्ञानाच्या संदर्भात आमची मराठी मानसिकता कशी बदलली पाहिजे? ती कशी कालानुरूप होऊ शकेल? त्यासाठी प्रथम आपण बाजारात किंवा हॉटेलमध्ये गेल्यानंतर मराठीत बोलणं, शाळेत, कॉलेजात, ऑफिसात, फॅक्टरीत, कोर्टात, सरकारी कार्यालयात, दवाखान्यात, इस्पितळात, रिक्षा-टॅक्सीमध्ये, बसमध्ये, ट्रेनमध्ये सर्वत्र मराठीत बोलणं, टेलिफोनवर, मोबाइल फोनवर मराठीत बोलणं, मराठीत चॅट करणं, एसेमेस, इमेल, ब्लॉग, ट्विटरवर मराठीत व्यवहार करणं, आपलं ज्ञान सोप्या मराठीत व्यक्त करण्याचा प्रयत्न सातत्यानं करणं; आणि आपल्या मुलांशी घरात मराठीत बोलणं, मराठीत जे जे काही श्रेयस्कर आहे त्याचा मनापासून अभिमानाने अंगीकार करणं, आस्वाद घेणं आणि मराठीमध्ये स्वत:ला व्यक्त करणं हे महत्त्वाचं आहे असा संदेश आपल्या प्रत्यक्ष कृतीतून इतरांना देणं, इतर भाषकांना प्रेमाने मराठी शिकवणं, मराठी शिकण्यासाठी ई-लर्निंग सुविधा तयार करणं, मराठीसाठी ऑटोमॅटिक रिअल टाईम भाषांतराचं तंत्रज्ञान उपलब्ध होण्यासाठी आग्रह धरणं आणि हाती आल्यावर ते सतत वापरणं, स्वतःहून शिकणा-या, स्वतःच्या चुका दुरुस्त करणा-या व सुधारणा करत रहाणा-या अभिनव सॉफ्टवेअर प्रणालींवर ते अवलंबून आहे हे लक्षात घेऊन आपण इतर भाषकांशी या तांत्रिक भाषांतर सेवेचा अधिकाधिक वापर करून, मराठीत जितकं जास्त बोलता येईल तितकं बोलून, आपल्या सामूहिक कृतीतून हे भाषांतर तंत्रज्ञान अधिकाधिक विश्वासार्ह बनवणं. अर्थात आपल्या मराठीचं भवितव्य आपण ती इतर मराठी भाषकांबरोबरील व्यवहारात किती वापरतो यावर जितकं अवलंबून आहे तितकंच जगातल्या इतर भाषकांबरोबर तांत्रिक भाषांतर सेवेतून किती वापरतो यावरही अवलंबून असणार आहे.

आमचे ग्रामीण मराठी युवक व युवती नजिकच्या भविष्यकाळात त्याच्या आयुष्याची १५ वर्षं इंग्रजी शिकण्यात वाया घालवूनही न्यूनगंडात रहाण्यापेक्षा या तंत्रज्ञानामुळे स्वतःच्या मराठी भाषेत जागतिक बाजारपेठेत आत्मविश्वासाने व्यवहार करू शकतील. आजचे इंग्रजीचे जगाची संपर्क भाषा म्हणून असलेले स्थान आणि इंग्रजी माध्यमकेन्द्री शिक्षण या दोन्ही गोष्टी कालबाह्य होण्याची घटिका समीप येत आहे!

जितक्या आत्मविश्वासाने आपल्या खेड्याच्या सीमांचं बंधन तोडून मोबाईल फोनवरून हे युवा आज आपल्या स्वभाषक गटात व्यवहार करतात तितक्याच आत्मविश्वासानं ते स्वभाषेतूनच जगातल्या इतर भाषक गटांशीही त्याच्या विकासासाठी जोडले जातील. अशा पद्धतीची आपली एक रणनीती यापुढे सर्व मराठी भाषकांनी एकत्र येऊन कृतीत आणली पाहिजे तरच तंत्रज्ञान आपल्या मराठी बाजारपेठेला अनुकूल होईल. त्यासाठी खास मराठी' असा ग्राहकवर्ग असलेली बाजारपेठ निर्माण करायला हवी व वाढवायला हवी, परंतु सर्वसामान्य लोक वरती आले तर, आपल्यावर आपत्ती येईल असं काही अभिजन समजतात. त्यांच्यामुळे आमची स्पेस कमी होईल असं त्या अभिजनांना वाटतं. हा विचार खरं तर ज्यावेळेला समाज हा शेतीप्रधान व्यवस्थेमध्ये होता तेव्हा ठीक होता. याचं कारण शेती करण्यासाठी असलेली पृथ्वीवरची जमीन ही मर्यादित आहे. तिची जर वाटणी जास्त लोकांमध्ये झाली तर माझ्या वाट्याला येणारी जमीन कमी होणार आहे, पण हा विचार ज्ञानयुगामध्ये सयुक्तिक ठरत नाही. याचं कारण प्रत्येक जण नवीन ज्ञाननिर्मिती व त्यातून संपत्तिनिर्मिती व मूल्यनिर्मिती करू शकला आणि तशा कर्मशील ज्ञानाचं आदानप्रदान जर आम्ही सहजासहजी करू शकलो, तर ज्ञानाचा व त्यातून निर्माण होणाऱ्या संपत्तीचा विस्तार पृथ्वीच्या क्षेत्रफळाशी सबंधित नाही हे लक्षात येईल. त्यामुळे आता सगळ्याच समाजाला वर येण्यासाठी फार मोठा अवकाश आहे आणि सगळ्यांच्या उन्नतीसाठी संधी आहे.

एकाची उन्नती झाली असता दुसऱ्याची अवनती होते अशी जी स्थिती शेतीप्रधान व्यवस्थेमध्ये होती ती आता बदलते आहे. ज्ञानप्रधान व्यवस्थेमध्ये 'विन-विन' अशी परिस्थिती सहज शक्य आहे आणि त्याच्यामुळे एक नवा जोडलेला समाज निर्माण करून

ज्ञानयुगामध्ये आम्ही सगळेच पुढे जाऊ शकतो. कोणाला तरी खाली दाबूनच, त्याचे शोषण करूनच, मला माझा विकास करता येतो ही मानसिकतासुद्धा आम्हांला बदलायला पाहिजे. मग आम्हांला अभिजन आणि बहुजन असा वाद निर्माण करण्याची गरज पडणार नाही. खरं म्हणजे, सगळ्यांनाच आम्ही जर बरोबर घेऊन जाऊ शकलो तर एका विषमताविरहित समाजाची आणि राष्ट्राची निर्मिती आम्ही करू शकू. आज आमच्याकडे लांच्छनास्पद परिस्थिती अशी आहे, की भारतात कितीही तथाकथित आर्थिक विकास झाला, आर्थिक विकासाचा दर वाढला तरी ८० कोटी लोक हे प्रचंड दारिद्र्याच्या विळख्यात रहातात, शोषित अवस्थेत रहातात. इतक्या भीषण अशा प्रकारचं जीवन ८० कोटी लोक जगताहेत याचं मूळ आमच्या त्या 'विनलूज' मानसिकतेमध्ये आहे. नव्या ज्ञानयुगामध्ये आम्ही सगळ्यांना समृद्धतेकडे घेऊन जाऊ शकतो. आम्ही जर ज्ञानाधिष्ठित अशी शेती करू लागलो, आम्ही जर ज्ञानाधिष्ठित असे उद्योगधंदे करू लागलो तर त्याच्यातून निर्माण होणारी संपत्ती सर्वांना पुरेशी असू शकेल. त्यामुळे आमचा सर्वसामान्य विद्यार्थी, सर्वसामान्य कुटुंबातला मुलगा किंवा मुलगी ही ह्या ज्ञानप्रधान संस्कृतीमध्ये किती लवकर सहभागी होईल हे आम्हांला बघावं लागेल. त्यामुळे ती व्यक्ती स्वत:ही एका नवीन ज्ञानाच्या निर्मितीमध्ये रत होईल आणि एका नवीन दारिद्र्यमुक्त व विषमतामुक्त समाजाच्या निर्मितीसाठी ती खूप महत्त्वाचं योगदान द्यायला तयार होईल आणि तेही तिच्या स्वभाषेतून.

अभिजनांची मानसिकता जी बदलायची आहे ती समतेच्या दिशेने आपल्याला बदलायची आहे. ही आत्ता आपल्या पुढची फार महत्त्वाची प्राथमिकता आहे. भाषेचं त्याला फक्त आवरण आहे, हे आपण कृपा करून नीट लक्षात घ्या. नाहीतर खूप चुकीची रणनीती निर्माण होते. आम्ही मराठी पाट्या लावा असं म्हणायला लागतो. कुणी बेरोजगार अमराठी युवक नोकरीसाठी उमेदवार म्हणून आला तर त्याच्यावर जाऊन आम्ही हल्ले करतो. मला असं वाटतं, की खरा प्रश्न अगदीच वेगळा आहे आणि आपण जी रणनीती अवलंबतो ती कालबाह्य आहे किंवा एक प्रकारे गैरसमजूत करून देणारी आणि लोकांमध्ये विशिष्ट पद्धतीने फूट पाडणारी आहे. त्याच्यापासून आपण सावध राहायला पाहिजे. खरं तर आम्हांला मराठी पाटी लावण्याशिवाय गत्यंतरच राहिलं नाही पाहिजे कारण सौदी अरेबियात जशी सर्वसामान्यपणे लोकांना अरेबिक भाषेशिवाय दुसरी भाषाच कळत नाही तसंच आपल्याकडेही मराठीचं होऊ शकेल. याचं कारण एकदा याची खात्री पटली की ती ज्ञानभाषा आहे, ती विज्ञान तंत्रज्ञानाची भाषा आहे, तिच्यातून मला इतर सगळ्या जगातल्या लोकांशी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने बोलता येतंय, व्यवहार करता येतायत मग ते चिनी असोत, नाहीतर जॅपनीज असोत, मग मला इंग्रजीच्या पांगुळगाड्याची गरजच रहाणार नाही. ह्या नव्या परिस्थितीकडे आपलं तंत्रज्ञान आपल्याला घेऊन जातंय. ही त्याच्यातली सर्वात आनंदाची बातमी आहे. म्हणजे सहिष्णुतेवर व प्रेमावर आधारलेल्या, भाषेच्या द-या बुजवणा-या आणि जगभर शांततामय सहजीवनाची निर्मिती करणाऱ्या दिशेला तंत्रज्ञानाचा विकास चालू आहे.

जाताजाता एक सांगेन की, आमचे जे भाषा विषयातले तज्ज्ञ आहेत किंवा साहित्यातले काही तज्ज्ञ आहेत, ते तंत्रज्ञानाचा भारी तिरस्कार करतात. पण आजच्या डिजिटल युगातले युवा आता डिजिटल तंत्रज्ञान वापरूनच त्यांचे बहुतेक सर्व दैनंदिन व्यवहार करणार आहेत. भाषा कुठलीही असो, भाषिक व्यवहारांसाठी तंत्रज्ञानाची अपरिहार्यता त्यामुळे नाकारून कशी चालेल? अशा परिस्थितीत आमच्या भाषेला खरं वैभव हे तिला तंत्रज्ञानाची भक्कम जोड दिल्यामुळेच प्राप्त होणार आहे.

मला एक किस्सा आठवतो. तो असा की, ज्यावेळेला गुस्ताव आयफेल हा पॅरिस शहरामध्ये आयफेल टॉवर बांधत होता त्यावेळेला पॅरिस शहरातले लोक त्याच्यावर भारी नाराज होते. कारण काय तर पॅरिस सारखी आमची रम्य नगरी आणि त्याच्यामध्ये कुठे हा लोखंडी असा उंच मनोरा बांधताय तुम्ही, वगैरे, अशी त्याच्यावर टीका व्हायची. ट्रेड फेअर जवळ जवळ येत राहिली आणि त्यावेळी त्याचं उद्‌घाटन व्हायला पाहिजे होतं, कारण ट्रेड फेअरचे ते प्रतीक होतं. मोपांसा नावाचा प्रसिध्द फ्रेंच कादंबरीकार तर गुस्ताव आयफेलच्या मनोऱ्याचा कट्टर विरोधक होता. तो आयफेल टॉवरच्या इतकं विरोधी लिहीत असे की आयफेल कधी उत्तर देण्याचं वगैरे धाडसंच करत नसे. प्रयत्नांती शेवटी आयफेल टॉवर उभा राहिला. आयफेल टॉवरच्या वरती एक कॉफी बार बांधण्यात आला. मोपांसा आयफेल टॉवर झाल्यानंतर रोज वरती चढून जायचा. आजच्यासारख्या लिफ्ट नव्हत्या त्यावेळी. तरीही चढून जायचा. तिथं बारमध्ये कॉफी पित बसायचा आणि तिथे बसून आयफेल टॉवरच्या विरोधी लेखन करायचा आणि ते प्रकाशित व्हायचं. पॅरिसमधले लोक ते मोठ्या चवीने वाचायचे. शेवटी लोकांनी त्याला विचारलं की, अरे तू एवढा आयफेल टॉवरला विरोध करतोस आणि रोज मात्र तिथेच जाऊन त्याच्याविरूद्ध लेख लिहतोस, हे विसंगत नाही का? त्यावर मोपांसानं उत्तर दिलं, ''काय करणार ? आता अख्ख्या पॅरिस शहरात आयफेल टॉवर ही एकमेव अशी जागा शिल्लक राहिली आहे की जिथून मला आयफेल टॉवर दिसत नाही आणि माझी रम्य पॅरिस नगरीच फक्त दिसते.'' तंत्रज्ञानाचा तिरस्कार करणाऱ्या मराठीप्रेमींना मला एवढंच सांगायचंय की यापुढे तुमच्या मराठीची रम्य नगरी तुम्हाला फक्त आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या उंचच उंच आयफेल टॉवरवरूनच दिसणार आहे !!

**– विवेक सावंत**
भ्रमणध्वनी : ९८२२० ५२९१४
mdmkcl.org



# सोशल मीडिया आणि मराठी माणसे

**अविनाश वीर**

सोशल मीडियावर मराठी असे शीर्षक घेऊन मला लिहायला सांगितले गेले तेव्हा मी अचानक भूतकाळात गेलो. सोशल मीडिया म्हणजे नक्की काय असते हे मला विकिपिडिया किंवा तत्सम संकेतस्थळवर जाऊन व्याख्या शोधाव्या लागल्या. गंमतच असते ना. ज्या मीडियावर आपण दिवसरात्र आपली मतप्रदर्शने करत असतो. जो सहजरीत्या वापरत असतो त्याची आपण व्याख्याच समजून घेतलेली नसते. आलेल्या प्रवाहात आपण वाहत गेलेलो असतो. आपल्याकडे सोशल मीडियाची ताकद तशी कोणीही जोखू शकले नव्हते. अमेरिकेत हे माध्यम अतिशय प्रभावीपणे वापरले गेले, पण आपल्यासारख्या विविधतेने नटलेल्या देशात ओपिनियन मेकर म्हणून ते कितपत यशस्वी ठरेल याबद्दल सगळेच साशंक होते, पण मे महिन्यामध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकांनी सगळेच चित्र बदलून टाकले. सोशल मीडिया किती प्रभावी असू शकतो आणि त्याचा किती परिणामकारकरीत्या वापर केला जाऊ शकतो याचे प्रत्यंतर आपल्याला या निवडणुकीत आले, पण हे सगळ्यानांच साधता आले असे नाही. नुकतेच एका प्रभावशाली नेत्याने सांगितले की सोशल मीडीयाला आम्ही फार गांभीर्याने घेतले नाही हे आमचे चुकलेच. अशा चुका होतच असतात, पण फक्त राजकारणामुळेच सोशल मीडिया पुढे आला असे नाही तर तो सततच वापरल्याने कौटुंबिक संबंधात देखील ताणतणाव निर्माण होऊ शकतात असे बरेचसे रिपोर्ट वाचनात येत आहेत. इतपत तो महत्त्वाचा झाला आहे. अर्थात सध्यातरी त्याचा इश्यू करावा असे काही होत नसल्याने आपल्याकडे त्याचे फार गांभीर्य आहे असे दिसत नाही. पण हा लेख वाचणारे किमान ५०% लोक तरी यातून जात असतील असे मला प्रामाणिकपणे वाटते. ते नाकारण्यात अर्थ नाही. साधारणपणे जी काही लोकप्रिय माध्यमे आहेत त्यात फेसबुकचा वापर जास्त केला जातो असे दिसते. ट्विटरचा उपयोग अजून तरी तितकासा होताना दिसत नाही. बाकी सोशल मिडियातली माध्यमे जसे की रेड इट, डिग्ग वगैरे अजूनही आपल्या पचनी पडलेली नाहीत, किंवा अजूनहि हा वापरत नाही ना मग मी काय वापरून करू अशा मानसिक गोंधळात सापडलेली आहेत. ऑर्कुट असताना फेसबुक आहे माहित असणारे बरेच जण होते, पण सगळे मैतर ऑर्कुटला आहेत तर मी तिथे जाऊन काय करू असे म्हणत फेसबुकवर अकाउंट असूनहि बरेचजण ऑर्कुटवर पडीक असायचे. आता ती जागा फेसबुकने व्यापलीय.

सोशल मीडियाचा झालेला सर्वात मोठा फायदा म्हणजे बोलीभाषेचा होणारा बिनधास्त वापर. जी भाषा प्रामुख्याने घराघरात, नाक्यावर बोलली जाते. तिचा सर्रास वापर इथे केला जातो. त्यात प्रामुख्याने अहिराणी, खानदेशी, आगरी, मालवणी, घाटी याचा उल्लेख करता येईल. काही अकाऊंट्स तर खास त्या भाषेसाठी म्हणून ओळखले जातात. जसे की अहिराणी भाषिक, आगरी डॉन आणि इतर काही. सोशल मीडियामुळे मला काय वाटते हे व्यक्त करण्यासाठी एक साधे सरळ व्यासपीठ उपलब्ध झाले. सुरुवातीला काही लोकांना याचे अप्रूप वाटायचे तर काही लोकांना न्यूनगंड. आपल्या लिखाणावर थेट टीका करणारे लोक सरळ सरळ कॉमेंट करून भेटत असल्याने काहींना जरूर अवघडल्यासारखे वाटले, पण त्यात आता बरेचसे सरावलेले आहेत. चांगल्या, निकोप चर्चा घडताना दिसतात. ज्यांना या चर्चेत शिवीगाळ करावीशी वाटते ते आता प्रवाहानुसार बाजूला फेकले गेलेले आहेत. त्या शिव्या देण्यात पण मराठीचे फार काही नावीन्य असल्याचे कधी जाणवले नाही. नवीन जर काही शिव्या असत्या तर निदान शिव्या खाणारा तरी सुखावला असता. जसे आईबहिणीवरून शिव्या देणारे जर बाप-भाऊ वगैरे वरून शिव्या देत असते तर काहीतरी त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली असती. सोशल मीडियावर अशा काहीजणांची जरूर दहशत होती, पण कालांतराने ती सगळ्यांनी (एकमेकांविरोधी विचारसरणी असलेले दोन्ही गट) मिळूनच मोडलेली दिसते. अजूनही काही लोक ती भाषा वापरताना दिसतात, पण त्यांना फारसे कुणी गांभीर्याने घेत नसल्याने ते अनुल्लेखानेच किंवा ब्लॉक करून मागे पडलेत. वादग्रस्त गोष्टी पोस्ट करणारी ही एक वेगळी जमात सोशल मीडियावर आहे. ते त्यांच्या कळपापुरतेच मर्यादित राहिलेले दिसतात. त्यांच्या मराठीतदेखील तोच तोच बटबटीतपणा जाणवतो. दोन दिवसाची नवलाई या प्रकारात असले लोक मोडतात. राजकीय आणि जातीय विचार, या दोन विषयावर लोक हमरीतुमरीवर येताना दिसतात. बऱ्याचदा तर या चर्चांचा काही शेवटच होत नाही, पण थेट वाचकाला याचा जरूर फायदा होतो. तो सगळे वाचून (त्याची

खरेच इच्छा असेल तर) त्याचे योग्यप्रकारे पृथ:क्करण करू शकतो. हा सोशल मीडियाचा एक मोठा फायदा म्हणायला हरकत नाही. हे झाले फेसबुकबद्दल.

ट्विटरनामक एका सोशल मीडियाची प्रचंड दहशत फेसबुकवरील आणि एकंदर देवनागरीमध्ये लिहू इच्छिणाऱ्या मराठी लोकांमध्ये दिसते.

**सोशल मीडियाची खासकरून फेसबुकची स्वत:ची अशी एक साहित्यिक भाषा आहे. लोळ, परवडेबल, जेष्ठेष्ठ, लोक्स हे असले काही शब्द त्याच परंपरेतून उदयाला आलेत. अजूनही बरेच शब्द पुढे येणार आहेत. ते स्वीकारायची मानसिक तयारी भाषाधुरिणांनी ठेवली पाहिजे.**

फेसबुक जर संदर्भांसहित स्पष्टीकरण आणि वरून वैशिष्ट्य असे काही असेल तर ट्विटर म्हणजे थोडक्यात उत्तरे द्या या प्रकारात मोडते. त्यात भल्याभल्यांची दांडी गुल होते. त्यामुळे फेसबुकची आणि ट्विटरची दुनिया ह्या फारच वेगवेगळ्या आहेत. फेसबुकची लोकप्रियता ट्विटरला नाही तर ट्विटरची थोडक्या शब्दांत निर्माण होणारी परिणामकारकता फेसबुकला नाही. दोघांची आपापली बलस्थाने आहेत. पण ट्विटरला मराठीची अवस्था दयनीय आहे असे म्हटले तर वावगे नसावे. बऱ्याचजणांना हा मीडिया समजूनच घेता आलेला नाहीय. त्यातही देवनागरीमध्ये ट्विटर वापरणे हे प्रचंड मोठे जिकिरीचे आणि त्याहून जास्त कौशल्याचे काम आहे. फार डोके तिथे कुणी लावताना दिसत नाही.

सामाजिक कारणावरून ज्या काही घटना समाजात घडतात त्याचे पडसाद सहजरीत्या सोशल मीडियात उमटतात आणि सर्व मंडळी त्यात हिरीरीने भाग घेतात. जवखेडा हत्याकांडसारखे प्रकरण असो, मराठा आरक्षणाचा विषय असो वा एलिझाबेथ एकादशीवर बहिष्कार टाकलेला निर्णय असो. प्रत्येकजण आपापले भाष्य त्यावर देत असतो. यात काहीजण आपापला अजेंडा ठरवून असतात. कालांतराने अजेंडा ठरवणारे आणि तो हाणून पडणारे यांचा एक वेगळाच ग्रुप तयार होतो आणि त्यातून काहीही निष्पन्न होत नाही. मूळ प्रश्न राहतो बाजूलाच. तरीही संवाद निर्माण होतो. काही बातम्या लोकांना विचार करायला भाग पडतात हेही नसे थोडके. खूपशा संयमाने बरीचशी मराठी मंडळी आपले म्हणणे मांडताना दिसतात. काहीजण चक्क मी, माझा समाज आणि बाकीचे या विषयावर बोलत राहतात. याने संवाद साधताना अडथळा निर्माण होताना दिसतो. दुर्दैवानं आपला प्रिंट मीडिया सोशल मीडियातील मराठी जनमानसाला, त्यातील प्रतिबिंबाला टिपण्यास काहीसा अयशस्वी ठरलेला दिसतो. आता आता कुठे अमक्या अमक्याने ट्वीट किंवा तमक्याने असे फेसबुकवर लिहिले यापलीकडे दाखल घेताना दिसत नाहीत. यातदेखील ट्विट हे प्रामुख्याने इंग्रजीतून मराठीत भाषांतरित केलेले असतात. दोनेक वर्षभरापूर्वी एका पत्रकाराने तर फेसबुकची प्रचंड खिल्ली उडवली होती. त्यावर तीव्र प्रतिक्रिया आल्यावर त्यांना काय वाटले हे माहीत नाही. सोशल मीडिया माहित नसताना त्याची खिल्ली उडवणे हे काही सुरुवातीच्या दिवसात नवीन नव्हते. सध्या एका लोकप्रिय दैनिकाच्या संपादकपदी असलेल्या एका व्यक्तीने अशीच टीका ट्विटरवर केलेली. आता हेच महाशय नियमितपणे ट्वीट करताना दिसतात. अर्थात इंग्रजीतून. मराठीतून ट्विटर वापरणे हे अजूनही बऱ्याचजणांना जमत नाहीय.

सोशल मीडिया फार वयस्कर झाला नसला तरी पण इथे रोजच लिहिणारे 'लोक्स' असल्याने इथले 'लोक्स' मात्र वयस्कर झाले आहेत किंवा सरावले आहेत. इथे लेखन करणाऱ्या लोकांपेक्षा वाचक जास्त हुशार आहेत, चाणाक्ष आहेत हे समजून घ्यावे लागेल. मला काय वाचायचे आहे आणि मला ते कोण देऊ शकेल, मग त्याच अकौंटवर मी जाईन असा वाचकांचा कटाक्ष असतोय. थोडक्यात वाचकाला इथे चॉईस आहे आणि तो लेखकांपेक्षा जास्त आहे. लोकांच्या प्रतिक्रियादेखी वाचनीय असतात. ते देखील एक निरंतर वाचन आहे. सोशल मीडियामुळे थोडेफार का होईना लोकांचे वाचन वाढले आहे हे मान्य करायला हवे. सोशल मीडियावर सगळेच काही पारदर्शक असल्याने भूमिकेपासून मागे हटणे थोडे मुश्कीलच असते. लोक तुमच्यावर बरोब्बर लक्ष ठेवून असतात. त्यामुळे कुणीही यावे आणि लिहावे असा हिशोब इथे असला तरी तो हिशोब चोख ठेवावा लागतो, असावा लागतो. नाहीतर सोशल मीडियावरची तुमची सो कोल्ड लोकप्रियता डोक्यात येऊ शकते. तुम्ही नामशेष होऊ शकता. सोशल मीडियाची चटक लागलेल्या लोकांसाठी हे परवडेबल नसते. हे सगळे करणारी बरीचशी मराठी मंडळी दिसतात. अर्थात लेखक आणि वाचक दोघेही.

स्मार्टफोनचा वापर वाढल्याने अगदी खेड्यापाड्यात आपल्याला वाचले जाते याची जाणीव सोशलमीडियावर वावरणाऱ्या लोकांना आहे. आधी इंग्रजीमध्ये मराठी लिहिणारे आता देवनागरीमध्ये मराठी लिहू लागलेत, पण यामुळे होणारा एक तोटा असा की बरेचजण कागदावर मराठी लिहिणे विसरूननच गेले आहेत. सोशल मीडियावर वावरणारे बरेचजण फक्त मोबाईल किंवा लॅपटॉप यावर टंकताना दिसतात. त्यांना एका पानावर एक परिच्छेद लिहायला सांगितला तरी दमछाक होते. पेनदेखील नीट पकडता येत नाही अशी स्थिती आहे. काहीजण तर फक्त चेकवर सही करण्याइतपतच काही लिहितात असे झालेलं आहे. हा धोका बऱ्याचजणांच्या अजूनही नीटसा लक्षात आलेला नाहीय. एका मोठ्या मराठी वृत्तवाहिनीचे ट्विटर अकाउंट तर अक्षम्य अशा चुका करत असते. सोशल मीडियाचा झालेला मोठा फायदा म्हणजे काही करू इच्छिणाऱ्या मराठी गृहिणींना आपले स्वत:चे व्यासपीठ मिळाले. आपले जग मिळाले. व्यक्त होण्यासाठी टपरीवर जमणारे आणि फेसबुकवर संमेलने भरवणारे यात फारसा फरक करता येत नाही, पण हे करताना एकीकडे संवाद वाढताना, वैयक्तिक संवाद कमी होतोय हेदेखील तितकेच खरे. बहुरंगी, बहुढंगी माणसे जशी सोशल मीडियावर सापडतायत तसे जवळच्या माणसांबरोबर

संवाददेखील कमीच होत चाललाय.

एकंदर निष्कर्ष काढायचा झाला. तर सोशल मीडियामुळे मराठीचा वापर प्रचंड प्रमाणात वाढला आहे. वाचन वाढले आहे. सोशल मीडियाची खासकरून फेसबुकची स्वत:ची अशी एक साहित्यिक भाषा आहे. लोळ, परवडेबल, जेष्ठेष्ठ, लोक्स हे असले काही शब्द त्याच परंपरेतून उदयाला आलेत. अजूनही बरेच शब्द पुढे येणार आहेत. ते स्वीकारायची मानसिक तयारी भाषाधुरिणांनी ठेवली पाहिजे. मुक्त व्यासपीठ मिळाल्याने लिखित प्रमाणभाषा नामक प्रकारावर लिखित बोलीभाषा वरचढ होत चाललीय. तिला जी अधिक प्रतिष्ठा मिळत चाललीय, ती म्हणजे सोशल मीडियामुळेच. मी जसे बोलतो, तसेच लिहितो. ते लोक वाचतात आणि प्रतिक्रिया देतात म्हणजे मी चुकत नाहीय हा जो काही आत्मविश्वास बोलीभाषा लिहिताना यायला हवा तो सोशल मीडियानेच दिलाय. त्याचे योगदान आताच नव्हे तर भविष्यातदेखील नाकारता येणार नाही.

**– अविनाश वीर**

भ्रमणध्वनी : ९८७०२४२४६५

avveer@gmail.com





# पुस्तके बोलू लागली....

**विशाखा टिकले–पंडित**

बऱ्याचदा मुलांवर आणि खास करून तरुण पिढीवर हा आक्षेप घेतला जातो की त्यांना मराठीतून बोलायला आवडत नाही. त्यांना इंग्लिश बोलणं म्हणजे स्टेटस सिम्बल वाटतं. बरीच मराठी मुलं हिंदीतून बोलण्यात खुश असतात. काही प्रमाणात हे आक्षेप खरे असतीलही पण माझ्या व्यवसायाच्या निमित्ताने या मुलांशी बऱ्याचदा बोलणं होतं त्यातून मला जे चित्र दिसतं ते वेगळं आहे. ''काय रे ही भाषा तुमची जरा नीट मराठी बोला ना'' असं म्हटल्यावर त्यांची खरी समस्या कळून येते.त्यांच्याच भाषेत सांगायचं तर... ''ताई, यार मराठी बोलायला जातो ग पण सॉलिड लोच्या होतो बघ, वर्ड्स आठवतच नाहीत, वाचायला आवडतं ग पण फ्लूएन्टली वाचता येत नाही. काही शब्दांचे अर्थ समजायची बोंब.. काय करायचं काय''... आपले प्रॉब्लेम्स मांडून ती मोकळी होतात. ताई नंतर आलेला यार, सॉलिड लोच्या, वर्ड्स न आठवणे, वाचताना होणारी गडबड, अर्थाची बोंब या त्यांच्या सगळ्या शब्दांना झेलल्यावर काही गोष्टी लक्षात यायला लागतात.

समस्या समोर आहे...इंग्रजी माध्यमातून शिक्षण झाल्याने मराठी वाचन करणं कठीण होतंय. आजूबाजूला विविध जाती धर्माची लोकं राहत असल्याने हिंदी आणि इंग्रजीतून जास्त बोललं जातं, पण ही समस्या फक्त वेगळ्या माध्यमातून शिक्षण झाल्याने वाढलीय का, तर नाही. मराठी माध्यमातून शिकलेली अशी किती मुलं शिक्षण संपल्यावरदेखील आवडीने वाचन करताना दिसतात ?

आजकाल वाचनाची आवड कमी होत चाललीय अशी ओरड केली जाते, फेसबुक आणि व्हॉटसअपवर तासनतास पडीक राहण्यापेक्षा एखादं पुस्तक का नाही वाचत? असं विचारल्यावर उत्तर असतं, ''अगं फेसबुक आणि व्हॉट्सॲप २४ तास आमच्या हातात असतं, वेळ मिळाला की उघडा पटकन, पुस्तक वाचायचं तर लायब्ररीत जा, पुस्तक आणा, ठरल्यावेळेत ते बदला, जिकडे जाल तिकडे कॅरी करा, नाही प्रत्येक वेळेला शक्य होत, पण तुला काही चांगलं मिळालं ना तर पिडीएफ करुन पाठव ते सोपं पडेल वाचायला''. या मुलांशी बोलल्यावर एक ठाम खात्री झाली वावडं भाषेचं नक्कीच नाही. याउलट चांगलं मराठी कसं बोलायचं आणि कसं वाचायचं ते सांगशील का ? हे विचारणारे अनेक जणभेटतात. सांगितलेल्या गोष्टी मनापासून करुन मराठीतलं बोलणं आणि वाचन रेकॉर्ड करुन पाठवणारी अशी अनेक मुलं आहेत.

मराठीत इतकं उच्च दर्जाचं साहित्य आहे पण त्याची फारशी माहिती या मुलांना नसते. हाताच्या बोटावर मोजण्याइतकी नावं आणि त्यांचं साहित्य या विषयी कानावर पडलेलं असतं. हे साहित्य त्यांच्यापर्यंत पोचवायचं तर पुस्तक वाचनासोबत पुस्तक ऐकायला दिलं तर?त्यातूनच पाश्चिमात्य देशात अतिशय लोकप्रिय झालेल्या ऑडिओ बुक्स या संकल्पनेचा विचार डोक्यात आला..

मुळात हा प्रकार नवीन नाही. आपण आकाशवाणीवरुन अभिवाचन, श्रुतिका, नाट्यवाचन ऐकत आलेले आहोत. ऑडिओ बुक्स हा त्यातलाच एक प्रकार. फक्त इंटरनेटमुळे ही ऑडिओ बुक्स तुम्हाला हवी त्या वेळेला डाऊनलोड करुन ऐकता येतात. इंटरनेट व्यतिरिक्त सिडी, डिव्हिडीच्या माध्यमातून आपण पुस्तक ऐकण्याचा आनंद घेऊ शकतो.

अंध बांधव, वयामुळे वाचन करणं न जमणारे ज्येष्ठ नागरिक, लिपी वाचता न येणारे पण भाषा समजणारे वाचनप्रेमी यांच्यासाठी ऑडिओ बुक्स उपयुक्त ठरत आहेत. आजकाल आपला बराचसा वेळ प्रवासात जातो, चालत्या गाडीत वाचनाने डोळ्यावर ताण येतो, मुंबईसारख्या उपनगरात रेल्वे आणि बसमध्ये उभं रहायला जागा मिळणं कठीण अशा ठिकाणी पुस्तक वाचणं लांबचीच गोष्ट, याशिवाय जे लोक स्वतः गाडी चालवतात अशा वाचनप्रेमींसाठी ऑडिओ बुक उपयुक्त ठरतं.

ऑडिओ बुक म्हणजे एखादं पुस्तक नुसतं वाचणं नव्हे तर त्याविषयानुरुप त्याला पार्श्वसंगीत, वेगवेगळे इफ्केट्स देऊन तो मजकूर जास्तीत जास्त प्रभावीपणे पोचवला जातो. साहित्यप्रकारानुरुप प्रत्येक पुस्तकाला वेगवेगळी ट्रीटमेंट दिली जाते.

पाश्चात्त्य देशात ऑडिओ बुक लोकप्रिय ठरली आहेत. साधारणपणे १९३०च्या सुमारास अंध वाचकांसाठी तयार केलेल्या कार्यक्रमातून बोलकी पुस्तकं आकारास आल्याची नोंद मिळते. १९९४ साली अमेरिकेच्या Audio Publishers association ने 'ऑडिओ बुक' ही संकल्पना प्रस्थापित केली.

भारतात साधारण२००८च्या दरम्यान ऑडिओ बुक्स बनायला सुरुवात झाली. सध्या इंग्रजी भाषेतील पुस्तकं प्रामुख्याने ऑडिओ बुक्स केली जात आहेत. प्रादेशिक भाषांमध्ये हा ट्रेंड धिम्या

पावलाने येताना दिसतोय. मराठीचा विचार करता फारच थोडी पुस्तकं ऑडिओ बुक्सच्या माध्यमातून उपलब्ध होत आहेत. त्यात पु.ल. देशापांडे, व.पु. काळे यांच्या गाजलेल्या पुस्तकांचंही ऑडिओ रूपांतर करण्यात आलं आहे. पुण्याच्या स्नॉवेल कंपनीने रारंगढांग, कुमाऊंचे नरभक्षक, शितू, सारे प्रवासी घडीचे, कथामोकाशी यासारखं मराठीतील दर्जेदार साहित्य ऑडिओ स्वरुपात आणलं आहे. त्याचप्रमाणे 'बोलती पुस्तके' या ब्लॉगवर मराठीतील काही पुस्तकं ऑडिओ स्वरुपात ऐकण्यासाठी उपलब्ध आहेत.या सारखे आणखी काही प्रयत्न होताना दिसतात पण त्यांचं प्रमाण फार कमी आहे.

**सर्वसामान्य वाचकांना परवडेल अशी किंमत, चांगलं साहित्य, सहज उपलब्धता, प्रभावी मार्केटिंग याची जुळणी व्यवस्थित करता आली तर 'ऑडिओ बुक' ही संकल्पना इंग्रजी इतकीच मराठीतही यशस्वी होऊ शकते.**

ज्या लोकांनी ऑडिओ बुक्स ऐकली आहेत त्यांची या प्रकाराला पसंती मिळतेय.हातात घेऊन वाचलेल्या पुस्तकांसारखाच ऑडिओ बुक्स ऐकणं हाही आनंद देणारा अनुभव असल्याच्या प्रतिक्रियाही ऐकायला मिळतात. विशेष म्हणजे परदेशात जे मराठी वाचक राहतात त्यांच्यासाठी ऑडिओ बुक्स ही एक पर्वणी ठरत आहे.जिथं आपली भाषा फारशी कानावर पडत नाही तिथं आसुसलेल्या कानांना तृप्त करण्याची किमया ऑडिओबुक पार पाडत आहेत. तिथे या पुस्तकांना चांगला प्रतिसाद मिळत आहे.

आपल्याकडे ऑडिओ बुक्सबद्दलची फारच कमी माहिती उपलब्ध असल्याने वाचकांपर्यंत हा प्रकार फारसा पोचला नाही. बाजारात ऑडिओ बुक नावाचं काही उपलब्ध आहे हेच मुळी माहीत नसल्याचं चित्र आहे. अगदी शहरी भागात जिथं इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो तिथेदेखील मराठी ऑडिओ बुक्सबद्दल माहिती असण्याचं प्रमाण नगण्य आहे अशावेळी ग्रामीण भागात याचा प्रचार-प्रसार दूरदूर पर्यंत असलेला दिसत नाही. जे ऑडिओ बुक्स ऐकतात त्यांचा विचार केला असता त्यांच्यात इंग्रजी ऑडिओ बुक्स ऐकणाऱ्यांचं प्रमाण जास्त आहे. कारण आवड असूनही मराठीत किती ऑडिओ बुक्स आली आहेत आणि ती कुठे विक्रीसाठी उपलब्ध आहेत याचीदेखील खूप कमी माहिती वाचनप्रेमींना मिळते. याचं कारण म्हणजे याची म्हणावी तशी प्रसिद्धी करण्यात आलेली नाही. सध्याचा जमाना मार्केटींगचा आहे. छापील पुस्तकांच्या तुलनेत ऑडिओ बुक्स कमी उपलब्ध असल्याने त्याचं मार्केटींगही कमी प्रमाणात आहे. याशिवाय दुकानं, साहित्य संमेलन, पुस्तक मेळावे अशा ठिकाणी मराठी ऑडिओ बुक्सच्या नगण्य संख्येमुळे ती फारशी प्रकाशात येत नाहीत. मात्र सर्वभाषिक पुस्तक मेळाव्यांमध्ये ऑडिओ बुक्सला उत्तम प्रतिसाद मिळाल्याच्या बातम्या आशादायी चित्र निर्माण करत आहेत.

एकीकडे मराठी ऑडिओ बुक्सना ज्यानी ऐकलंय त्यांचा चांगला प्रतिसाद मिळत असला तरी त्या प्रमाणात ऑडिओ बुक्सची निर्मिती होताना दिसत नाही. याची अनेक कारणं आहेत. त्यातील महत्वाचं कारण म्हणजे आर्थिक गणित. छापील पुस्तकांच्या तुलनेत ऑडिओ बुक्सच्या निर्मितीला जास्त खर्च होतो. व्हॉईस आर्टिस्ट, स्टुडिओचं भाडं,पार्श्वसंगीत, साऊंड इफेक्टस हे त्यातले महत्वाचे घटक. या साऱ्याचा विचार करता हा काहीसा खर्चिक प्रकार होतो. अर्थात आज मराठी पुस्तकं अगदी नगण्य प्रमाणात बनत असल्यानं हा प्रकार खर्चिक आहे पण मोठ्या प्रमाणावर पुस्तकं बनल्यास त्याच्या खर्चातही लक्षणीय घट होऊ शकते. याचं उत्तम उदाहरण म्हणजे शालेय अभ्यासक्रमातील विषय. आज शाळा-महाविद्यालयांमधील विविध विषय ऑडिओ व्हिज्युअल माध्यमातून विद्यार्थांसमोर आणण्याकडे शिक्षणसंस्थांचा आणि शैक्षणिक साहित्य निर्माण करणाऱ्या प्रकाशन संस्थांचा कल वाढला आहे. फक्त तोंडी माहिती देण्यापेक्षा प्रत्यक्ष चित्र आणि ध्वनीच्या माध्यमातून तो विषय मांडणं सोपं झालं आहे.

इ-लर्निंगच्या या प्रयोगाला चांगलं यश मिळत आहे. या शैक्षणिक साहित्यनिर्मितीचं प्रमाण जास्त असल्यानं त्याची प्रॉडक्शन कॉस्ट कमी ठेवणं शक्य झालं आहे.

सर्वसामान्य वाचकांना परवडेल अशी किंमत, चांगलं साहित्य, सहज उपलब्धता, प्रभावी मार्केटिंग याची जुळणी व्यवस्थित करता आली तर 'ऑडिओ बुक' ही संकल्पना इंग्रजी इतकीच मराठीतही यशस्वी होऊ शकते.

बुकप्रमाणेच ऑडिओ मुव्ही म्हणजे ध्वनिपटाचं माध्यम उपलब्ध आहे. मिट्ट काळोखात समोर काहीच नाही फक्त आपल्या सारखे प्रेक्षक आणि कानात पडणारा आवाज, त्या आवाजातून उलगडत जाणारी कथा. अभिनेता दिग्दर्शक निखिल हजारे याने व.पु. काळे यांच्या साहित्यावर आधारित केलेल्या ध्वनिपटांना अनेक नामवंतानी गौरवलं आहे.

जनमानसात असलेली क्रेझ लक्षात घेता ऑडिओ बुक्सच्या वाचनासाठी सेलेब्रिटींना बोलावण्याचं प्रमाण जास्त आहे. जगभरात तेदेखील मोठ्या उत्साहाने या प्रोजेक्टमध्ये सामील होत आहेत.

ऑडिओ बुक्सची संख्या आता झपाट्याने वाढतेय. मराठीतही ती हळूहळू का होईना पण वाढतेय. लवकरच ती वेग घेईल असं चित्र आहे कारण परदेशात याला मिळणारा प्रतिसाद पाहून मराठीतही अनेक जण या क्षेत्राकडे करिअर म्हणून पाहू लागले आहेत.यामुळे व्हॉईस आर्टिस्ट, संगीत संयोजक, इफेक्ट बनवणारे आर्टिस्ट या सगळ्या क्षेत्रात काम करण्याची संधी उपलब्ध होतील.

योग्य नियोजन केल्यास मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी ऑडिओ बुक्स निश्चितच महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात.

**- विशाखा टिकले-पंडित**

**भ्रमणध्वनी** : ९८७०९९४०५१

vishakha.tikale@gmail.com

# भाषांतरांचे सांस्कृतिक संचित

**वंदना भागवत**

भाषांतराचा विचार इंग्रजी भाषा व साहित्याची प्राध्यापिका, स्त्रीवाद या चर्चाविश्वाबद्दल आस्था असणारी लेखिका आणि मराठी माध्यमाच्या 'अक्षरनंदन' या प्रयोगशील शाळेची संस्थापक सदस्य या अनुभवांमधून मी करणार आहे. कोणतीही साहित्यकृती तसेच संकल्पना ही तिच्याभोवतीच्या संदर्भांत बघावी लागते. असे असताना भाषांतर या संकल्पनेचे आणि प्रक्रियेचे सांस्कृतिक संचित तसेच त्याची प्रस्तुतता आपण आज कशी बघायची हा प्रश्न आपण गांभीर्याने हाताळायला हवा. त्यासाठी भाषाव्यवहाराचे सांस्कृतिक संचित आपण कसे पाहातो ते महत्वाचे ठरते. भाषांतराचा विचार करताना तर हे पाहाणे अधिकच गुंतागुंतीचे होते कारण तिथे ज्या संहितेचे भाषांतर आपण करतो त्या संहितेची मूळ भाषा आणि ज्या भाषेत भाषांतर करतो ती भाषा अशा दोन भाषाव्यवहारांचे सांस्कृतिक संचित आपल्याला बघावे लागते.

भाषांतराच्या संदर्भांची मांडणी करणे हा खरे तर फ़ार मोठा प्रकल्प आहे. कारण भाषा जिवंत राहाते ती तिच्यातील व्यापक संदर्भांना आपलेसे आणि नेमके करण्याच्या क्षमतेमुळे. जेव्हा भाषेचे हे प्रयोजन संपते तेव्हा भाषाही संपते. आज जगातल्या असंख्य भाषा मरत आहेत कारण त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक संचित व्यापक संदर्भांशी जोडण्याची क्षमता त्यांना बदलत्या परिस्थितीत गमवावी लागत आहे. ही मोठी हिंसा आहे कारण भाषा मरणे म्हणजे समाजाचे व्यापक सांस्कृतिक संचित गमावणे, जे देवाणघेवाणीतून व्यापक बनत असते. भारतासारख्या देशात भाषिक वैविध्याची जी समृद्धी आहे त्यातून आपल्या सगळ्याच भाषा खरे तर भाषांतरपुष्ट बनू शकतात. ज्या सहजी आपण विविध भाषांच्या बोली आणि नाद एकत्र करत असतो त्यातून आपल्या देवाणघेवाणीला एक भाषांतर-सौष्ठव लाभत जाते. त्यामुळे भाषांचे वैविध्य वाचायचे झाले तर भाषांतरपुष्टतेची आपली सवय गमावून चालणार नाही. भाषांतर करणे म्हणजे ज्या भाषिक कृतीचे भाषांतर आपल्याला करायचे आहे त्या भाषेचे सांस्कृतिक संचित लक्षात घेऊन त्याचा अर्थ लावणे.

सांस्कृतिक संचित म्हणजे काय? संस्कृती आणि सभ्यता या दोन अर्थच्छटांचे पर्याय आपल्याकडे इंग्रजी culture आणि civilization या शब्दांसाठी उपलब्ध आहेत. संस्कृती-अभ्यासांचे महत्त्व एकापेक्षा अधिक संस्कृत्या समोरासमोर आल्यामुळे निर्माण झाले. त्यातील राजकीय विस्तारीकरणाचा आणि आर्थिक हितसंबंधांचा भाग मोठा असला तरी त्यांचे मूळ मानवी नातेसंबंधांकडे बघण्याची त्या त्या समूहाची दृष्टी काय आहे यात असते. ते संचितही असते, घडणेही असते आणि बदलणेही असते. या अर्थाने cultivation हाही शब्द संस्कृती या शब्दाशी जोडला गेला आहे. म्हणजे सांस्कृतिक संचित घडवण्याचे अथवा बदलण्याचे प्रयत्न हे सांस्कृतिक संचिताच्या आकलनावर आधारलेले असतात, जे जोपासता येतात, ज्यांची निगराणी करता येते. असे असले तरी त्यातील गुंतागुंतीकडे बघायचे झाले तर आपण काय जोपासतो आहोत हाही काळजीपूर्वक तपासण्याचा मुद्दा आहेच.

आपल्या सामाजिक आणि भौतिक पर्यावरणाचा आपण जो अर्थ लावण्याचा प्रयत्न करतो, त्याला विविध प्रकारे पारखून बघत आपल्या प्रतिभेच्या सहाय्याने त्याचे अर्थविपुलन करण्याचा प्रयत्न करत असतो, ते आपले सांस्कृतिक संचित म्हणता येईल. अर्थ लावण्याची प्रक्रिया कधीच संपत नसते, त्यामुळे ती जितकी खुली, वैविध्याचा आदर जितका सच्चा तेवढे आपले सामाजिक संचित आपल्या जगण्याला प्रगल्भ बनवत असते. अर्थाचा संकोच करणे, एकच एक दृष्टी वैध मानत संहितांना एक आयामी बनवणे यांतून जी हिंसा घडते त्यात भाषेचा पहिला बळी जात असतो. म्हणूनच भाषांतरांचे स्थान आपली भाषिक क्षितिजे विस्तारण्यात मोलाचे आहे. संहितांचा अर्थ लावण्याच्या या प्रयत्नांत आपल्याला आपल्या जीवनदृष्टीचा आणि संहितेच्या तात्त्विक अधिष्ठानाचा अभ्यास करणे गरजेचे असते. भाषांतराचा विचार केवळ दोन संहितांमधली शब्दबदलाची प्रक्रिया इतकाच सीमित नाही तर एका संहितेतील विविध आवाजांना ऐकण्याची, मौनाला ऐकण्याची, कोणत्या संदर्भांत कोणते आवाज मूक होतात हे जाणण्याची क्षमता आपल्यासारख्या विविधता असणाऱ्या देशात विकसित करणे म्हणजेही भाषांतराचे मर्म जाणणे असे मला वाटते, कारण कोणत्याही संहितेत स्वीकारलेले, प्रस्थापित झालेले समाजघटक आणि नाकारलेले, वंचित समाजघटक यांच्यातला ताण-काहीवेळा लेखकाच्याही नकळत-लिहिला जात असतो. त्याचे प्रयोजन, ते ताण समजून घेत बदल घडवणे असे असते. हे जाणले नाही तर भाषांतराचे प्रयत्न निव्वळ बाजारपेठेतील विक्रीयोग्य वस्तू एवढ्यापुरतेच मर्यादित राहील. मग ती दलित आत्मकथने भारताबाहेर

नेणे असो अथवा परदेशी साहित्यरचना भारतात आणणे असो.

जागतिकीकरण स्थिरावल्यानंतर लक्षात येते की भाषांतराच्या संदर्भात काही प्रश्न गुंतागुंतीचे झाले आहेत. बाजारपेठ वाढली आहे आणि बरेच जागतिक वाङ्मय आपल्याला भाषांतरित स्वरूपात आज उपलब्ध होते आहे. साक्षरता वाढल्यानंतर ज्याप्रमाणात वाचकसंख्या उपलब्ध झाली आहे त्यातूनही भाषांतरित साहित्याची, परदेशातील साहित्याची आणि विशेषतः दृक्‌श्राव्य माध्यमातून येणाऱ्या सांस्कृतिक ओळखींची बाजारपेठ तर आज फ़ारच तेजीत आहे. त्यातून मग वाचकवर्ग घडवण्याची प्रक्रिया साधण्याचे तंत्रही विकसित होत चालले आहे. त्यासाठी भाषांचे संमिश्र होत जाणे, त्या त्या क्षेत्रातली परिभाषा त्याच्या मूळ भाषेत वापरणे, त्यामागची जीवनदृष्टी विविध माध्यमांतून लोकांसमोर सतत मांडत राहणे यातून मुख्य प्रवाहातील वाचकवर्गाची अभिरुची घडवली जाते. आजच्या सामाजिक गरजांमधून आहार, व्यवस्थापन, आरोग्य, संगणकशास्त्र यासारख्या विषयांवरील पुस्तके तत्काळ खपतात. त्यातून एक संकरित भाषा आणि शैलीही निर्माण होते आहे. उदाहरणार्थ, विविध माध्यमांचा सगळ्यात लाडका विषय म्हणजे पाककृती. त्यातील पदार्थांची नावे ज्या देशाचे पदार्थ त्या देशांतील भाषेत आणि मग इंग्रजीमध्ये दोन्हीतही सांगितले जातात. अस्फोइटिडा याने के हिंग असे म्हटले जाते, ते पदार्थ भाषांतर करायच्या भाषेत नसतील तर मूळ स्वरूपात सामावले जातात उदाहरणार्थ बेसिलची सात आठ पाने घ्या, वगैरे. त्यामुळे मुख्य प्रवाहातील मर्यादित विषयांची स्वतःची अशी उपयुक्त संकरित भाषा तयार झाली आहे. व्यवस्थापन, आरोग्य, संगणक याची भाषा सगळीकडे सारखीच असते. प्रश्न निर्माण होतो तो विशिष्ट विचारविश्व मांडणाऱ्या साहित्याच्या संदर्भांत, जे खरे तर मूल्यभावातून वैश्विकतेला भिडू पाहात असते. त्यासंदर्भांतील आज निर्माण झालेले प्रश्न मांडते.

उदाहरणार्थ, अलीकडे 'मी स्त्रीवादी नाही' असं म्हणणाऱ्या तरुण मुलींनी इंटरनेटवर स्वतःचा फ़ोटो टाकून केलेले पुकारे आणि त्यात सामील होण्याची आवाहने यासंदर्भात बरेच लेखन होते आहे. पाश्चात्त्य स्त्रीवादासंबंधीचे आपण जोपासलेले गैरसमज आणि भारतीय स्त्रीप्रश्नांचे जातिविशिष्ट आकलन या संचितातून त्यात बरीच आक्रमकता आहे. त्याला परत एकदा स्त्रीशिक्षणातून सक्षम झालेल्या स्त्रियांनी आर्थिक संधींचा मिळवलेला फ़ायदा याचीही पार्श्वभूमी आहे, पण 'स्त्रीवाद' या चर्चाविश्वाला काही इतिहास आहे, त्याचे स्वतःचे तत्वज्ञान विकसित होते आहे हे त्यातून वगळले गेले आहे. स्त्रीवाद हे विचारविश्व आपल्याकडील सरंजामी मानसिकतेला नकार देण्यासाठी खरे तर अत्यंत परिणामकारकरीत्या वापरता येऊ शकते. हा विषय इतक्या मजेत हाताळण्याचा नाही. माझ्या डोळ्यासमोर वोलस्टोन क्राफ़्ट्पासून ते अगदी आत्तापर्यंतच्या अँजेला डेविसपर्यंतच्या बुद्धिमान बायकांचे साहित्य येऊन गेले. मग ताराबाई शिंदेंपासून ते महाश्वेता देवींपर्यंतची आपल्या भाषांतील बुद्धिमान साहित्यपरंपरा उभी राह्यली. आणि जोडीने आंतर-जातीय विवाहातून केल्या जाणाऱ्या हत्या, बलात्कार हे सगळे समोर आले. हे लक्षात न घेता 'आम्ही नाही बाई स्त्रीवादी' अशी टूम अधून मधून का काढली जाते? आणि ती खुलेपणाने चर्चेत का आणली जात नाही? मग करुणा गोखलेंनी इतक्या कष्टपूर्वक केलेल्या सिमोन द बोव्हुआरच्या 'द सेकंड सेक्स' च्या भाषांतराला समजून घेऊन वाचणारा वाचक कोणता? इथे आपल्या समकालीन सांस्कृतिक संचिताचा विचार करावा लागतो.

जागतिकीकरणात स्थिरावलेल्या भांडवली अर्थव्यवस्थेने आता समाजाचे काहीसे स्थिर असलेले स्वरूप बदलले आहे. त्यामुळे सध्याच्या सगळ्याच संकरित माहोलात आपण कोणत्या स्त्रीवादाची संकल्पना मांडणार? आपण ती कोणाला उद्देशून मांडणार? म्हणजे आपला वाचक कोण असणार? हे प्रश्न उभे राहतात. स्त्रीवाद भाषांतरित करायचा झाला तर मला प्रथम एका निश्चित जागी उभे राहावे लागते. मी ते स्थान वाचकाच्या स्थानाशी कसे जोडणार आहे हे ठरवावे लागते, कारण प्रवासवर्णनांसारखा स्त्रीवाद मांडणे असा काही सांस्कृतिक टूरिझम असू शकत नाही. आज स्त्रिया, स्त्री-पुरुष प्रतिमा अत्यंत आक्रमकपणे घडवल्या जात आहेत. सर्व माध्यमातल्या जाहिराती, लेखांतील प्रतिमा, लेखांचे विषय, दूरदर्शन मालिका यांतून त्या वारंवार समोर आणल्या जात आहेत. बाजारपेठेने घडवलेल्या या प्रतिमांमध्ये वास्तव अदृश्य करण्याची जबरदस्त ताकद आहे. बलात्कारांची आकडेवारी, बेघर व्हावे लागणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न, वेश्याव्यवसायाची भयावह आंतरराष्ट्रीय बाजारपेठ, स्त्रियांवरची हिंसा, जातवास्तवाची हिंस्त्रता, इभ्रतीसाठी केले जाणारे खून हे सगळे स्त्री-शक्ती च्या दागिन्यांनी आणि चकमकीत वस्त्रप्रावरणांनी नटलेल्या प्रतिमांमागे लपवले जाते. तेव्हा मी कुठे उभी राहून, कोणाशी काय बोलणार आहे याचा विचार आज फारच तपशीलात जाऊन करावा लागतो. संहितेशी निगडित असलेल्या जीवनदृष्टीबद्दल आणि वैचारिक परंपरांबद्दल आपल्याला माहिती करुन घ्यायची तयारी असायला लागेल. अन्यथा संहितेचा अर्थ संकोचण्याचा आणि आपण आपल्याला न तपासता काही ग्रह करुन घेणाचा संभव असतो. उदाहरणार्थ, 'नॉट विदाऊट माय डॉटर' हे झपाट्याने खपणारे पुस्तक असणार आहे कारण ते आपल्या माहिती-वंचित पूर्वग्रहांशी नाते सांगते. पण 'लोकशाहीवादी अम्मीस' या सईद मिर्झांच्या पुस्तकाशी असलेले आपले नाते अतिशय सखोल, सच्चे आणि विचारप्रवर्तक आहे हे समजून घेणारा, वाचकवर्ग विशिष्ट गटातच राहातो, ही जागतिकीकरणानंतरची शोकांतिका आहे. लोकल त्याच्या संचिताविना ग्लोबल होते त्यामुळे ग्लोबल म्हणजे एक कोणत्यातरी लोकलचा सुटा नमुना म्हणून पेश होते. म्हणजे संकल्पना, परिभाषा व्यापक होते आहे त्याचबरोबर ती तिचा ऐतिहासिक अर्थ व त्याची परंपरा व गांभीर्य गमावून बसते आहे. प्रकाशनांचा लोंढाही इतका जबरदस्त आहे आणि त्यांची केवळ संख्या इतकी दडपून टाकणारी आहे की शेवटी त्यातून त्यांना निवडीसाठी बाजारात उपलब्ध असणारी वस्तू इतकाच अर्थ उरतो.

या सगळ्यातून निर्माण होऊ शकणारा एक धोका असा आहे की आपण भाषांतरित साहित्याच्या केलेल्या निवडींमधून आपल्याला प्रत्यक्ष प्रश्नाशी जोडायचे थांबवतो. आज त्यातील मानवी नातेसंबंधांचे ताण विसरले जाऊन भाषांबद्दल एकप्रकारची

निरिच्छ वृत्ती निर्माण झाली आहे. ती विकण्याची आणि विकत घेण्याची वस्तू बनली आहे. याचे कारण आपण आपल्याला घडवण्याची, तपासण्याची, भाषांतरित करण्याची गरज असते हेच विसरलो आहोत. बाजारपेठेकडून जे दिले जाते ते घेणे इतकेच काम आपण करतो आहोत. इथे इंग्रजी भाषेच्या राज्यकर्त्यांनी फ़ार पूर्वीच भाषाशिक्षणाविषयी आखलेले धोरण आज नव्याने वाचून बघितले पाहिजे, कारण भाषिक राजकारणाची ऐतिहासिकताही आपल्याला एक दृष्टी देत असते.

सप्टेंबर १९४३ साली अमेरिकेमध्ये हार्वर्ड विद्यापीठात विन्स्टन चर्चिल यांचे भाषण झाले, त्यात ते रूझवेल्ट यांच्या BASIC British-American Scientific International Commercial विषयी बोलताना म्हणाले होते, "Such plans offer far better prizes than taking away other people's provinces and lands or grinding them to exploitation. The empires of the future are the empires of mind."

१९५६ मध्ये ब्रिटीश शिक्षण खात्याच्या Report of the Official Committee on the Teaching of English Overseas मध्ये असे नोंदवले आहे, "We are looking at the language mainly as a valuable and coveted export--which many nations are prepared to pay for, if it can be supplied in right quantities. English is an export which is very likely to attract other exports--British advisors and technicians, British technological or universiy education, British plant and equipment, and British capital investment. There are clear commercial advantages to be gained from increasing the number of potential customers who can read technical and trade publicity material written in English."

इंग्रजीकडे आर्थिक साम्राज्यवादाचा एक हात म्हणून जेव्हा त्या भाषेच्या राजकारणाने बघितले होते तेव्हा आपण नुकतेच स्वतंत्र होऊन इंग्रजी भाषेचे जोखड शालेय शिक्षणाच्या मानगुटीवरुन उतरवण्याचा प्रयत्न करत होतो. सातवीपासून इंग्रजी, पाचवीपासून इंग्रजी असे प्रयोग करत असताना आपले सांस्कृतिक भान पूर्णपणे एतद्देशीय बनवण्याचा प्रयत्न आपण करत होतो. जागतिक साहित्याचा जो परिचय आपल्याला इंग्रजी भाषेतून झाला होता त्याने आपली क्षितिजे विस्तारण्याचा अनुभव आपण घेतला होता. त्यामुळे साहित्य संस्कृती मंडळाने भाषांतराचे घेतलेले प्रकल्प काहीएका व्यापक सांस्कृतिक भानाची दखल घेत होते, पण भाषांतरांतून भाषिक संचित विस्तारण्याचे आपले धोरण फार तगले नाही. त्यांचा जोर १९८० पर्यंत टिकला आणि नंतर थंडावला. कारण खाजगीकरणाच्या अर्थव्यवस्थेने मुळे रोवल्यानंतर इंग्रजीचे भाषिक राजकारणही आक्रमक झाले. जी जबाबदारी कल्याणकारी सरकारी धोरणांची होती ती सरकारने नाकारली. भाषाशिक्षणाच्या सक्षमीकरणाच्या प्रकल्पाची वाताहात होत ती जागतिक व्यापार संधींच्या ओझ्याने वाकवली. आधुनिक तंत्रज्ञान आणि विज्ञान इंग्रजीतूनच उपलब्ध होत राह्यले साहजिकच नोकऱ्यांचा प्रश्न त्यातून मिळणाऱ्या ज्ञानाशी जोडलेला राहिला. मग परत एकदा आपल्या भाषाशिक्षणाच्या धोरणांनी पलटी खात साहित्यावरचा भर कमी करुन १९८० च्या सुमारास उपयोजित भाषाशास्त्रातून निव्वळ दैनंदिन वापरण्याच्या भाषेपुरता त्याचा परीघ मर्यादित करत आणला. ते धोरण फसले कारण तेव्हाही इंग्रजी ही आपली दैनंदिन बोलण्याची, व्यक्त होण्याची भाषा नव्हती. परिसर भाषा नव्हती. १९९० नंतर भाषाशिक्षणाने परत एकदा पलटी मारली आणि संवाद कौशल्यांचा सांधा बाजारपेठेशी घट्ट जोडून टाकला. म्हणजे भाषेचा परीघ अधिक तांत्रिक आणि त्यामुळे बाजाराने देऊ केलेल्या नोकऱ्यांशी जोडला. हे तांत्रिक कौशल्य कमवायचे तर ते जितक्या लहान वयात कमावता येईल तितके बरे असे म्हणत मग पहिलीपासून इंग्रजी आणि दैनंदिन बोलण्यासाठी इंग्रजी शिकणे आपण भयग्रस्त होत स्वीकारले आणि संवाद-कौशल्यांचे शिक्षण इ-मेल, औपचारिक पत्रे, अजेंडा, मिनिट्स, जाहिराती यासाठी लागणाऱ्या भाषिक कौशल्यांपुरतेच उरले. इंग्रजी भाषाशिक्षणाची बाजारपेठ त्यातून आज केवढी भरभराटीला आली आहे आणि संपूर्ण शिक्षणाचे राजकारण परत एकदा जागतिक भांडवली व्यवस्थेशी कसे जोडले गेले आहे पण त्याच जोडीने सखोल आणि व्यापक संवादाच्या शक्यता संपुष्टात येत आहेत हे आपण अनुभवतो आहोतच.

आता इथे आपण आपल्या आणि इंग्रजी भाषेच्या नात्यातून काही वेगळे सांस्कृतिक संचित उभे करु शकतो आहोत का? या मुद्याचा विचार करावा लागेल. तो करताना भाषांतर कौशल्य कळीचे ठरते. जर आपण इंग्रजी साहित्यातून व्यापक सांस्कृतिक भान मिळवू शकतो तर त्या भानातून आपण आपले भाषिक संचित आणि परंपरा अधिक व्यापक पायावर उभी करत आपल्या बुद्धीने त्याचे अर्थनिर्णयन आणि अर्थजोडणी का करु नये? थोडक्यात नक्कल करण्यापेक्षा भाषांतर का करु नये? आपल्या व्यापक भानाचे धागे विशिष्ट ते वैश्विक असे विस्तारायचे असतील तर आपल्या भाषिक सामर्थ्याचा विकास करणे आणि त्यातून विविध भाषेत उपलब्ध असणाऱ्या संचिताचे भाषांतर करणे हे आजचे अत्यंत उत्फुल्ल आणि बुद्धिवान आव्हान आहे. सांस्कृतिक संचितांचा सखोल अभ्यास करत एक ऐतिहासिक भान विकसित करणे आणि त्या बळावर नवीन दिशा दर्शवणारे शब्द निर्माण करणे, भाषांतर करणे ही दिशा जर आपल्या भाषाशिक्षणाने शिक्षणपद्धतीमध्ये रुजवली, जोपासली तर संपूर्ण शिक्षण संकल्पना संकोचण्याचा जो धोका आपल्यासमोर उभा आहे त्याला एक उत्तर मिळू शकेल. जर आपण आपल्या भाषावैविध्याकडे आणि त्यामुळेच आपल्या सांस्कृतिक संचितात रुजलेल्या भाषांतर क्षमतेकडे एक सामर्थ्य म्हणून पाहू शकलो तर भाषांतराशी भाषाशिक्षणातून एक व्यवस्थित नाते जोडू शकू ज्यातून आपले सांस्कृतिक संदर्भ व्यापक, सक्षम आणि संवादी करता येतील. असे समृद्ध संचितच आपल्या संस्कृतीला प्रवाही करु शकेल.

**- वंदना भागवत**
भ्रमणध्वनी ९६५७५५८५५०
onlyvandan@gmail.com

# अन्य भाषकांची 'माय मराठी'कडे वाटचाल

**प्र.ना. परांजपे**

मराठी स्वभाषा नसलेले लाखो लोक महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर आहेत. त्यांना मराठी शिकण्याची गरज वाटते आणि ती गरज वाढत राहणार आहे. विशेषत: मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद इत्यादी शहरांत व्यापार आणि उद्योगधंदा करायचा असेल तर मराठी समजण्याची आणि वापरता येण्याची गरज वाढत जाणार आहे. पर्यटकांनाही तात्पुरत्या व्यवहारासाठी तोडके मोडके का होईना, मराठी शिकण्याची गरज भासते. केंद्र सरकार आणि व्यापार उद्योगात काम करणाऱ्या अन्य भाषक लोकांना मराठी समजणे आणि मराठी बोलता येणे आवश्यक ठरत जाणार आहे. इंग्रजी माध्यमातून शिकणाऱ्या अन्य भाषक विद्यार्थ्यांच्या पालकांनाही मराठी शिकण्याची गरज वाटते, त्यामुळे द्वितीय भाषा आणि परकीय भाषा म्हणूनही मराठी शिकवण्याची सोय करणे आवश्यक आहे.

अमराठी मंडळींना मराठी शिकविण्याचे प्रयत्न पूर्वी झाले आहेत. ब्रिटिशांनी महाराष्ट्र जिंकण्यापूर्वीच ब्रिटिश, फ्रेंच, पोर्तुगीज दरबारांचे वकील शिवाजी महाराजांकडे, मराठी सरदारांकडे, पेशव्यांकडे येत असत. त्यांनाही मराठी शिकावे लागे. त्यासाठी मराठी शास्त्री-पंडितांची ते शिकवणी ठेवत. पेशवाईच्या अस्तानंतर १९व्या शतकाच्या मध्यापासून ब्रिटिश राज्यकर्ते व ख्रिश्चन धर्मप्रसारकांनी मराठीचा पद्धतशीर अभ्यास सुरू केला. त्यासाठी त्यांनी मराठीचे व्याकरण लिहिणे, मराठी-इंग्रजी शब्दकोश तयार करणे असे उद्योग सुरू केले. (कॅन्डी, मोल्सवर्थ ही नावे यासंदर्भात कोणालाही आठवतील.) इंग्रजी पुस्तकांची विशेषत: बायबलची मराठी भाषांतरे करणे हाही याच प्रयत्नाचा भाग होता. त्यावेळी मराठी शिकण्या-शिकवण्यासाठीही काही प्रयत्न झाले होते. भारत स्वतंत्र झाल्यानंतर आणि विशेषत: महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर मराठी संस्कृती, मराठी संतसाहित्य, ऐतिहासिक दस्तावेज यांचा अभ्यास आणि संशोधन करण्यासाठी पाश्चात्त्य अभ्यासक मुंबई, पुण्याकडे वळू लागले. अमेरिकेच्या शिक्षण विभागाने अमेरिकन संशोधकांना मराठी शिकणे शक्य व्हावे म्हणून विशेष निधीची व्यवस्था करून पुस्तक तयार करवून घेतले. त्या पुस्तकाचे नाव 'स्पोकन मराठी'. डॉ. नरेश कवडी आणि डॉ. साऊथवर्थ या दोघांनी हे पुस्तक 'पेन्सिसिल्वेनिया' युनिव्हर्सिटीच्या 'साउथ एशिया रिजनल स्टडीज' विभागाच्या अंतर्गत हे पुस्तक तयार करून घेतले आणि १९६५ मध्ये प्रकाशित केले. त्याचे उपशीर्षक 'फस्ट इयर इन्टेनसिव कोर्स बुक' असे होते. या पुस्तकात मराठीच्या स्वर आणि व्यंजनापासून मराठीचे उच्चार, मराठीची वाक्यरचना, मराठीचे व्याकरण इत्यादींचा समावेश केलेला होता. या पुस्तकात सर्व मराठी मजकूर फोनेटिक (उच्चाराधारित म्हणजे International Phonetic Associationच्या लिपीत) लिपीमध्ये दिलेला आहे. सर्व विवेचन इंग्रजीमध्ये आणि सर्व मराठी उदाहरणे, वाक्य आणि प्रश्न हे फोनेटिक लिपीमध्ये दिलेले आहेत, पण या पुस्तकाचा पुढील भाग प्रसिद्ध झालेला माझ्या पाहण्यात नाही. पुस्तक तयार करण्यासाठी नरेश कवडी अमेरिकेला जाऊन राहिले होते पण आज हे पुस्तक निवडक ग्रंथालयांव्यतिरिक्त कुठेही उपलब्ध नाही.

भारत सरकारने केंद्रीय भाषा संस्थानांची स्थापना १९६९ मध्ये केली आणि त्याची सात केंद्रे भारताच्या विविध राज्यात स्थापन केली. त्या केंद्रामध्ये शिक्षकांना त्यांच्या प्रादेशिक भाषेव्यतिरिक्त अन्य एखादी भाषा शिकण्यासाठी 'शिष्यवृत्ती' दिली जाई. भारताचे त्रैभाषिक धोरण यशस्वी करण्यासाठी हा प्रयत्न करण्यात येत होता. या केंद्रात त्या-त्या भाषा अन्य भाषकांना शिकवण्यासाठी पुस्तकेही तयार करण्यात आली. असे एक केंद्र पुण्यात असून त्याचे नाव 'पश्चिम विभाग भाषा केंद्र' असे आहे. त्या केंद्राच्या पहिल्या संचालक डॉ. विजया चिटणीस-माडगुळकर यांनी एक पाठ्यपुस्तक तयार केले. त्याचे नाव होते, 'ॲन इन्टेन्स कोर्स इन मराठी.' सुमारे हजार बाराशे पानाचे हे पुस्तक १९७८च्या सुमारास प्रसिद्ध झाले. याशिवाय डॉ. कल्याण काळे आणि डॉ. अंजली सोमण, डॉ. रमेश धोंगडे, डॉ. नीती बडवे आणि अगदी अलीकडे मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाने तयार केलेले कम्युनिकेटीव्ह मराठी उर्फ 'माय मराठी' पुस्तक पहिले अशी काही पुस्तके आतापर्यंत प्रसिद्ध झाली आहेत. अमेरिकेतील 'असोसिएटेड कॉलेजेस ऑफ मिडवेस्ट'

या संघटनेतर्फे मराठी व महाराष्ट्र यांचा अभ्यास करण्यासाठी अमेरिकी विद्यार्थी दरवर्षी पुण्यात येतात. या संघटनेसाठी डॉ. मॅक्सिन बर्न्सन व जाई निंबकर यांनी पाच भागांचे एक पाठ्यपुस्तक १९८० मध्ये तयार केले. त्याची भारतीय आवृत्ती 'ग्रंथाली' व 'मराठी अभ्यास परिषद' यांनी १९८३ मध्ये प्रसिद्ध केली.

**मराठीचा विकास हा केवळ मराठी वाङ्मयाच्या विकासाने साधणार नाही. त्यासाठी उद्योग, व्यापार, व्यवहार यात मराठीचा वापर वाढायला हवा. त्यासाठी मराठीशी संबंध येणाऱ्या अन्य भाषकांना मराठी शिकवण्याची जबाबदारी मराठी भाषकांनी उचलली पाहिजे. गंभीरपणे, चिकाटीने प्रयत्न केले पाहिजेत.**

भाषेच्या अध्ययनाकडे बघण्याचे तीन दृष्टिकोन आढळतात. १९३० नंतर आणि विशेषत: दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जो दृष्टिकोन प्रचलित होता, त्याचा आधार वर्तनवादी मनोविज्ञान हा होता. या दृष्टिकोनात असे गृहीत धरण्यात आले होते की, भाषा ही एक सवय आहे. एखादी गोष्ट वारंवार केल्याने तिची प्राण्याला जशी सवय होते तशी माणसालाही होते. यासंदर्भात पावलॉव या मनोवैज्ञानिकाचे प्रयोग प्रसिद्ध आहेत. त्यामुळे नवीन भाषा शिकायची म्हटले की त्या भाषेतील वाक्ये पाठ करायची, वारंवार वापरायची अशी धारणा झाली. आघाडीवर जाणाऱ्या सैनिकांना त्या-त्या देशातील भाषा शिकवण्यासाठी या सिद्धांताचा उपयोग करण्यात आला आणि तो मर्यादित प्रमाणात यशस्वीही झाला. १९६० नंतर मात्र वर्तनवादी मनोविज्ञानाची पिछेहाट होऊ लागली आणि त्याची जागा ज्ञानवादी (कॉग्निटिव्ह) मनोविज्ञानाने घेतली. या धारणेनुसार मूल जेव्हा भाषा शिकते तेव्हा ते ऐकलेल्या शब्दांची आणि वाक्यांची केवळ पुनरावृत्तीच करते असे नाही तर त्यांच्यातील परस्परसंबंधांचे आकलन करून ते नवीन वाक्ये बनवायला सुरुवात करते. त्यात झालेल्या चुका मोठ्या माणसांनी दुरूस्त केल्या तर ते आंतरिक पातळीवर तयार केलेल्या व्याकरणात सुधारणा करत जाते आणि अशा रीतीने पहिल्या चार ते पाच वर्षात मूल आपली मातृभाषा आत्मसात करते. या दृष्टिकोनाच्या आधारावर १९६० नंतर जर्मन, स्पॅनिश, फ्रेंच, इटालियन इत्यादी युरोपीय भाषा शिकवण्याच्या नवीन पद्धती विकसित करण्यात आल्या. या पद्धतींचा वापर त्या भाषा शिकवण्यासाठी भारतातही १९७० नंतर होऊ लागला. या पद्धतीमुळे रोजच्या व्यवहारात गरज पडणाऱ्या भाषेपासून सुरुवात करून विविध टप्प्यांवर भाषा शिकवली जाते. या पद्धतीचा भर ती भाषा बोलण्यावर असतो. तिला 'कम्युनिकेटीव्ह मेथड' असे म्हणतात.

पूर्वी भाषा शिकवण्याच्या दोन पद्धती महाराष्ट्राला परिचित होत्या. त्यातील पहिली पद्धत म्हणजे 'ट्रान्सलेशन पद्धत.' तखर्डकरांची भाषांतर पाठमाला व काळ्यांची भाषांतर पाठमाला या पद्धतीवर आधारलेल्या आहेत. त्यानंतर महाराष्ट्रात 'डायरेक्ट मेथड'चा बोलबाला सुरू झाला त्यामध्ये मुलांच्या (विद्यार्थ्यांच्या) मातृभाषेचा अजिबात उपयोग न करता त्यांना अन्य भाषा शिकवण्यावर कटाक्ष असे. याचे विनोदी उदाहरण आचार्य अत्रे यांनी आपल्या टीचर्स डिप्लोमा संबंधीच्या एका लेखात दिले आहे. 'बेड' हा शब्द शिकवण्यासाठी एक शिक्षक वर्गात कॉट घेऊन गेले होते. आणि त्यावर झोपून त्यांनी 'बेड' आणि 'स्लीप' हे शब्द शिकवले. 'कम्युनिकेटीव्ह मेथड'मध्ये, विद्यार्थ्याच्या निज भाषेचा उपयोग टाळण्यात येत असला तरी तो पूर्णत: निषिद्ध मानण्यात आलेला आहे. असे नाही त्यामुळे या पद्धतीने शिकवण्यासाठी तयार केली जाणारी पुस्तके प्रदीर्घ संशोधन आणि प्रयोग यांच्या साहाय्याने तयार केली जातात. आधी उल्लेखिलेल्या मराठीच्या अध्यापन पुस्तकामध्ये इंग्रजी व मराठी अशा दोन भाषांचा उपयोग केलेला आढळतो. म्हणजे स्पष्टीकरणे आणि विवेचन इंग्रजीमध्ये आणि उदाहरणे, प्रश्नोत्तरे, शब्द हे मराठीत अशी त्यांची रचना आहे, परंतु या वर्षी मुंबई विद्यापीठाचा जर्मन विभाग आणि ग्रंथाली यांनी प्रकाशित केलेल्या कम्युनिकेटिव्ह मराठी ऊर्फ माय मराठी या पुस्तकामध्ये फक्त मराठीचाच वापर केलेला आहे. हे पुस्तक विद्यार्थ्यांना वापरणे सोपे व्हावे म्हणून त्यात विविध रंग, कविता, चुटके, कथा रोजच्या व्यवहारातील संवाद व्यंगचित्रे इत्यादींचा उपयोग केलेला आहे. त्यामुळे हे पुस्तक ह्या पूर्वीच्या सर्व पुस्तकांहून अतिशय वेगळे व देखणे झाले आहे. केवळ महाराष्ट्रात किंवा भारतातच नव्हे तर ज्या ज्या ठिकाणी मराठी शिकविले जाते, उदाहरणार्थ अमेरिका, कॅनडा, जर्मनी, इंग्लंड त्या त्या ठिकाणी हे पुस्तक आनंदाने स्वीकारले जाईल आणि वापरले जाईल यात मला शंका वाटत नाही.

मराठीचा विकास हा केवळ मराठी वाङ्मयाच्या विकासाने साधणार नाही. त्यासाठी उद्योग, व्यापार, व्यवहार यात मराठीचा वापर वाढायला हवा. त्यासाठी मराठीशी संबंध येणाऱ्या अन्य भाषकांना मराठी शिकवण्याची जबाबदारी मराठी भाषकांनी उचलली पाहिजे. गंभीरपणे, चिकाटीने प्रयत्न केले पाहिजेत. केवळ आक्रस्ताळी भाषा वापरून तोंडाची वाफ दवडल्याने ते साध्य होणार नाही. मराठीसाठीच्या येत्या २५ वर्षातील धोरणामध्ये अन्य भाषकांना मराठी शिकवण्याचा प्राधान्य दिले गेले तरच या दिशेने काही प्रगती होऊ शकेल.

**– प्र.ना. परांजपे**
भ्रमणध्वनी : ९४२२५०९६३८
pranaparanjpe@gmail.com

# मराठीसाठी भाषानियोजनाची गरज

**डॉ. प्रकाश परब**

ज्या महाराष्ट्रात मराठी भाषेच्या दुरवस्थेचे अस्वस्थ करणारे वास्तव मराठी समाजापुढे मांडून त्याला मराठीच्या संवर्धनासाठी जागे करण्याचा प्रयत्न इतिहासाचार्य वि.का. राजवाडे, कविवर्य कुसुमाग्रजांनी केला त्याच महाराष्ट्रात, मराठी भाषेला काहीही झालेले नाही आणि भविष्यातही काही होणार नाही अशा अफवा पसरवून, मराठीसाठी काहीतरी करू पाहणाऱ्यांची मराठीसाठी 'उगाचच गळा काढणारे' म्हणून संभावना करणारे साहित्यिकही झाले. आज अशा अफवा पसरवणाऱ्यांचे प्रमाण कमी झाले असून मराठीचे लगेचच काही बरेवाईट होणार नसले तरी तिची सद्य:स्थिती गंभीर आहे आणि मराठी समाज म्हणून आपण काही हातपाय हलवले नाहीत तर भविष्यात परिस्थिती हाताबाहेर जाऊ शकते याची एक प्रकारे मूक कबुलीच मिळत आहे.

ह्याचा अर्थ मराठीच्या समस्येचे आपणास यथार्थ आकलन झाले आहे आणि त्यातून कसा मार्ग काढता येऊ शकतो याबाबत मराठी समाज म्हणून आपले एकमत झाले आहे असे मात्र नाही. कारण भाषेचे स्वरूप व कार्य, भाषेचा विकास – मृत्यू – पुनरुज्जीवन आदींबाबत आपल्या समाजात शास्त्रीय दृष्टीचा अभाव आहे. अगदी सुशिक्षितांमध्येही भाषेचे संवर्धन करायचे म्हणजे नेमके काय करायचे आणि ते कोणी, कसे करायचे यांबाबत गैरसमज आहेत. मराठीचे स्वयंघोषित कैवारी असलेल्या राजकीय पक्षांचे मराठीच्या समस्येविषयीचे आकलन तर भाबडेपणाचे व अज्ञानमूलक आहे. दुकानाच्या पाट्या मराठीत करणे, घरी किंवा सार्वजनिक ठिकाणी आवर्जून मराठीत बोलणे, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा ह्यासाठी केंद्र सरकारकडे तगादा लावणे ह्यापलीकडे त्यांचा मराठीचा विकासकार्यक्रम जात नाही. मराठी शाळांचा प्रश्न हे त्यांच्यासाठी अवघड जागेचे दुखणे बनून राहिलेले आहे. कारण स्वत:च्या मुलांना इंग्रजी (त्याही कॉन्व्हेंट) माध्यमाच्या शाळांमध्ये पाठवल्यावर इतरांना मराठी शिका म्हणून कुठल्या तोंडाने सांगणार? त्यातूनही काही राजकीय पुढारी आपले मराठीचे तारणहार असणे अबाधित ठेवताना दिसतात. त्यांचे म्हणणे असे, की आमची मुले कॉन्हेंटमध्ये शिकली म्हणून काय बिघडले? मराठी शाळांत न शिकताही घरी मुलांकडून शुभंकरोती वदवून व मराठी सणसमारंभ साजरे करून मराठीपण टिकवता येते. त्यांच्यासाठी मराठीचे राजकारण हे मराठी भाषेचे काही बरे व्हावे म्हणून करायचे मिशन नसते तर मराठीच्या मुद्यावर मतांचे ध्रुवीकरण करण्याचे एक साधन असते. काही राजकीय पक्षांना भाषाभेद आणि जातिभेद ह्या सारख्याच निषिद्ध बाबी वाटतात. त्यामुळे ते आम्हाला सर्व भाषा समान असून शाहू–फुले–आंबेडकरांच्या महाराष्ट्रात भाषावाद खपवून घेतला जाणार नाही असा सज्जड दमही (कोणाला?) भरतात.

मराठीच्या प्रश्नाची वास्तव जाण ज्यांना असायला हवी आणि ज्यांनी आपले व्यावसायिक हितसंबंध जपण्यासाठी तरी मराठीच्या प्रश्नावर आवाज उठवायला हवा ते मराठीचे प्राध्यापक, मराठी पत्रकार–माध्यमकर्मी, साहित्यिक 'लक्षणीय व सोयीस्कर मौन' पाळताना दिसतात. मराठी भाषेकरिता काम करणाऱ्या ज्या काही हाताच्या बोटावर मोजता येतील अशा संस्था महाराष्ट्रात कार्यरत आहेत त्यांच्या पाठीशी उभे राहण्याएवढीही भाषिक संवेदनशीलता व कृतिशीलता दाखवत नाहीत. जणू मराठीचा प्रश्न त्यांच्यासाठी संपलेला आहे किंवा तो अस्तित्वातच नाही. ज्यांनी मराठीच्या प्रश्नावर काही भूमिका घ्यावी, भाषिक उपक्रमांचे–चळवळींचे नेतृत्व करावे तेच जर असे हातपाय गाळून असतील तर सर्वसामान्य मराठी भाषकांकडून काय अपेक्षा ठेवावी? समाजातील उच्चभ्रूवर्गही बव्हंशी मराठीकडून इंग्रजीकडे वळल्यामुळे अपराधगंडामुळे मराठीच्या बाजूने बोलताना दिसत नाही. तो तटस्थ राहिलेला दिसतो.

सरकारविषयी तर काही बोलायलाच नको. भाषेच्या आधारावर स्थापन झालेल्या राज्यात सार्वजनिक भाषाव्यवहाराचे व्यवस्थापन, नियमन व नियोजन करण्याची जबाबदारी स्वीकारून राज्याचे भाषाविषयक धोरण ठरवणे, तज्ज्ञांकडून भाषाविकासाचा आराखडा तयार करवून घेणे, तो राबवण्यासाठी संस्थात्मक यंत्रणा सिद्ध करणे, त्यासाठी आवश्यक ती साधनसामग्री उपलब्ध करून देणे हे सरकारचे कामच आहे. व्यक्ती आणि स्वयंसेवी संस्था यांचे त्यात योगदान अपेक्षित असले तरी ह्याबाबतीत पहिले पाऊल सरकारनेच उचलले पाहिजे. अनेक प्रगत देशांमध्ये स्थानिक भाषांच्या विकासासाठी तेथील सरकारे पुढाकार घेताना दिसतात. सार्वजनिक व्यवहारात धर्मनिरपेक्षतेप्रमाणे भाषानिरपेक्षतेचे धोरण स्वीकारता येत नाही कारण कायद्याच्या चौकटीत राहून विशिष्ट

भाषेचा विकास घडवून आणणे, प्रसंगी भाषिक पक्षपात करणे हे विधिसंमत असते, परंतु आपल्याकडे जातिभेद, धर्मभेद आणि भाषाभेद हे सारखेच निषिद्ध मानून राजभाषेच्या विकासासाठीही आवश्यक ती पावले उचलली जात नाहीत.

मराठीच्या दुरवस्थेला मराठी भाषक म्हणून आपली अनास्था, सामुदायिक आळस, नाकर्तेपणा, भावनिक व भाबडेपणातून आलेली अवैज्ञानिक भाषादृष्टी एवढ्याच गोष्टी कारणीभूत नसून जागतिकीकरणानंतर निर्माण झालेली अभूतपूर्व परिस्थितीही कारणीभूत आहे. बहुभाषकच नव्हे तर तुलनेने एकभाषक असलेल्या देशांनाही आपापल्या भाषांच्या सुरक्षिततेविषयी चिंता वाटते आहे. जगाचे बदललेले अर्थकारण, दळणवळणाची अत्याधुनिक साधने, माहिती-तंत्रज्ञानामुळे झालेली संपर्कक्रांती व स्थलांतर यांमुळे जगाची वाटचाल बहुभाषिकतेकडून एकभाषिकतेच्या दिशेने चालली आहे की काय असे वाटावे इतक्या मोठ्या प्रमाणात भाषाबदल (Language Shift) घडून येत आहे. लोक खेड्यांकडून शहरांकडे, शहरांकडून महानगरांकडे आणि महानगरांकडून प्रगत देशांकडे ज्या कारणांसाठी वळतात, जवळपास त्याच कारणांसाठी लोक बोली भाषांकडून प्रमाण भाषांकडे आणि मग प्रबळ भाषेकडे वळताना दिसतात. इंग्रजी ही ह्या बदललेल्या परिस्थितीची सर्वाधिक लाभार्थी आणि वैश्विक भाषेची प्रबळ दावेदार मानली जाते.

इंग्रजीचा प्रभाव जगभर वाढत असला तरी प्रत्येक समाजाला आपली भाषा जपण्याचा, तिचा विकास करण्याचा अधिकार आहे. स्वभाषा वापरण्याचा अधिकार हा एक मानवाधिकारही आहे. मानवी जीवनात संप्रेषणाचे साधन म्हणून भाषेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भाषेमुळे व्यापक व व्यामिश्र समाजव्यवहार शक्य व सुकर होतो हे आपणास माहीत आहे, पण संप्रेषणाव्यतिरिक्तही भाषा विविध भूमिका पार पाडत असते. भाषा ही विशिष्ट समाजाची पृथगात्म ओळख असते. भाषा ही समाजाचे सांस्कृतिक संचित असते. मुख्य म्हणजे ती समाजाच्या भौतिक प्रगतीला उपयुक्त असे सामाजिक संसाधन असते. अशा विविध भूमिका पार पाडणाऱ्या भाषेचा विकास जाणीवपूर्वक व शास्त्रशुद्ध रीतीने करण्यासाठी भाषानियोजन प्रक्रियेचा अवलंब केला जातो. समाजाच्या भौतिक प्रगतीमध्ये भाषेला महत्त्वपूर्ण भूमिका असल्यामुळे भाषाव्यवहाराकडे धर्मनिरपेक्षतेप्रमाणे तटस्थ राहून पाहता येत नाही. जी भाषा समाजाच्या भौतिक प्रगतीचे माध्यम बनते तीच भाषा समाजात मान्यता व प्रतिष्ठा पावत असल्यामुळे अभिप्रेत असलेली भाषा व समाजाचा भौतिक व्यवहार यांची नियोजनपूर्वक सांगड घालावी लागते.

भाषानियोजन करण्यामागे आणखी काही गोष्टी गृहीत धरलेल्या आहेत, त्या अशा- कोणताही विकास हा स्वयंभू किंवा अपघात नसतो तर जाणीवपूर्वक, नियोजनपूर्वक केलेल्या प्रयत्नांचा इच्छित परिणाम असतो. भाषाविकासही याला अपवाद नाही. जगातील प्रत्येक भाषेमध्ये विकासाची अंगभूत क्षमता असली तरी प्रत्यक्ष व्यवहारात वेगवेगळ्या कारणांमुळे त्या क्षमतेचा सारखा वापर होत नाही. परिणामी काही भाषा प्रगत म्हणून मान्यता पावतात तर काही भाषांची पिछेहाट होते. भाषेची प्रगती म्हणजे समाजाच्या सर्व व्यवहारक्षेत्रांत भाषेचा गुणवत्तापूर्ण वापर. हा वापर जाणीवपूर्वक करावा लागतो, तो आपोआप होत नाही. पण तो करणे - न करणे हे शेवटी त्या त्या समाजावर अवलंबून असते, म्हणून भाषेच्या प्रगती-अप्रगतीला संबंधित समाज किंवा त्या समाजाचे नेतृत्व करणारे सरकार जबाबदार असते. भाषाव्यवहार हा सार्वजनिक व्यवहार असल्यामुळे त्याचे नियमन व व्यवस्थापन करावे लागते. भाषाभेद हा सांस्कृतिक भेदांचा मूलाधार असल्यामुळे प्रत्येक समाजाकडून आपापल्या भाषेचे जतन व संवर्धन अपेक्षित आहे, परंतु ते करताना समाजामध्ये भाषिक तंटे-वाद संभवतात. काही भाषिक समस्या व अडचणी उद्‌भवतात. त्यांची वस्तुनिष्ठ व न्याय्य पद्धतीने सोडवणूक करण्यासाठी सामाजिक हस्तक्षेपाची गरज असते. असा सकारात्मक हस्तक्षेप म्हणजेच भाषानियोजन.

समाजाच्या भाषिक वर्तनात व भाषिक संरचनेत बदल घडवून आणण्यासाठी जाणीवपूर्वक केलेले सामूहिक प्रयत्न म्हणजे भाषानियोजन होय असे थोडक्यात म्हणता येईल. भाषानियोजन ही केवळ भाषिक प्रक्रिया नसून व्यापक सामाजिक प्रक्रिया आहे. ती अपरिहार्यपणे उद्दिष्टलक्ष्यी, कृतिलक्ष्यी प्रक्रिया आहे. भाषानियोजनाची एक वा अनेक उद्दिष्टे असू शकतात. उदाहरणार्थ भाषाविषयक धोरण ठरवणे, भाषेचे प्रमाणीकरण करणे, लेखनपद्धती घडवणे किंवा तीत सुधारणा करणे, शब्दसंग्रहाचे आधुनिकीकरण करणे, भाषेच्या वापरक्षेत्रांचा विस्तार करणे, त्यासाठी परिभाषा तयार करणे, भाषाशिक्षणाची साधनसामग्री सिद्ध करणे, भाषेला तंत्रज्ञानसुसज्ज करणे इत्यादी.

भाषानियोजनाकडे जगातील भाषावैविध्य जपण्याचा एक उपयुक्त मार्ग म्हणूनही पाहिले जाते. बहुभाषिक समाजात भाषातटस्थतावादी भूमिका (Laissez faire) घेऊन जे होईल ते पाहत राहिलो तर राजकीय व आर्थिक दृष्ट्या प्रबळ असलेली भाषा अधिकाधिक प्रबळ होत जाते व इतर भाषा एकेका व्यवहार क्षेत्रातून मागे पडत अखेर ऱ्हास पावततात. अशा परिस्थितीत जमेल तेवढ्या भाषांचे सहअस्तित्व टिकवणे गरजेचे असते. जगात अनेक भाषा असणे ही समस्या नसून संपत्ती आहे. ती टिकवली पाहिजे. प्रबळ भाषा दुर्बल भाषांना गिळून टाकण्यापूर्वी सामाजिक, राजकीय हस्तक्षेपाची गरज असते. समकालीन, भौतिक जीवनाच्या गरजा भागवण्यासाठी उपयोगी न पडणाऱ्या भाषा वेळीच हस्तक्षेप केला नाही तर कालांतराने वापरशून्य होतात. ही फार मोठी सामाजिक, सांस्कृतिक हानी असते. अशा भाषा केवळ सक्ती करून जगवता येत नाहीत. त्या संधींशी जोडाव्या लागतात. बोली भाषांकडून प्रमाण भाषांकडे आणि प्रमाण भाषांकडून प्रबळ भाषांकडे वळण्याकडे (व एकभाषक राहण्याकडे) समाजाचा कल असतो तो त्या भाषांशी निगडित असलेल्या कमी-जास्त संधींमुळे. जगात अन्यत्रही लोक स्वभाषा सोडून इंग्रजीमागे धावत आहेत ते त्यांचे स्वभाषेवर प्रेम नाही व त्यांना इंग्रजीविषयीच प्रेम वाटते म्हणून

नव्हे, तर इंग्रजी ही त्यांच्यासाठी भौतिक संधींची भाषा आहे म्हणून. इंग्रजी ही जगातील एकमेव प्रगत भाषा नाही. स्पॅनिश, फ्रेंच, जर्मन आदी अनेक प्रगत भाषा जगात आहेत. बहुभाषक समाजात दुर्बल भाषांच्या वापराच्या प्रेरणा क्षीण झालेल्या असतात म्हणून त्यांच्यावर लक्ष केंद्रित करावे लागते. भाषेचा विकास व्यापक व गुणवत्तापूर्ण वापरातूनच होऊ शकतो. भाषा हे असे सामाजिक संसाधन आहे की तिचा वापर जितका जास्त करावा तितका तिचा विकास होत जातो आणि कमी करावा तितका तिचा ऱ्हास होत जातो.

भाषानियोजन ही भाषिक प्रश्नांची सोडवणूक करणारी व समाजाच्या भाषाव्यवहारात जाणीवपूर्वक बदल घडवून आणणारी प्रक्रिया असली तरी त्यासाठी संस्थात्मक यंत्रणेची गरज असते. प्रगत देशांमध्ये त्यासाठी सरकारच्या वतीने भाषानियोजन करणाऱ्या Language Planning Agencies स्थापन केलेल्या आढळतात. त्यांपैकी काही स्वायत्त असतात तर काही सरकारच्या नियंत्रणाखाली असतात. आपल्याकडील राज्य मराठी विकास संस्था ही मराठी भाषेच्या नियोजनबद्ध विकासासाठी स्थापन झालेली (पण त्या प्रकारचे काम न करणारी) संस्था म्हणता येईल. काही स्वयंसेवी संस्था तसेच काही व्यक्तीदेखील भाषानियोजनाच्या कार्याला हातभार लावत असतात. भाषाविकासासाठी समाजातील व्यक्ती, संस्था व अन्य संसाधने यांचा यथोचित उपयोग करून घेण्यासाठी आवश्यक तो कृतिकार्यक्रम तयार करणे व संबंधितांमध्ये समन्वय साधणे हे काम शासनाने प्राधिकृत केलेल्या संस्थेने करायचे असते. शेवटी भाषाव्यवहार हा लोकव्यवहार आहे, म्हणून त्यात लोकसहभागही महत्त्वाचा ठरतो.

ह्या पार्श्वभूमीवर मराठीच्या प्रश्नाचा विचार केला तर निराशेशिवाय काही हाती लागत नाही. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर मराठीच्या प्रशासकीय जडणघडणीसाठी व विकासासाठी आपण काही संस्था जरूर स्थापन केल्या, पण भाषानियोजनासारखी कालबद्ध विकासप्रक्रिया राबवली नाही. परिणामी प्रशासन वगळता विधी व न्याय, उद्योग व वाणिज्य, माहिती-तंत्रज्ञान, उच्च शिक्षण आदी कळीच्या क्षेत्रांत मराठी ही इंग्रजीप्रमाणे वाढू शकली नाही. मराठीचा हक्काचा अवकाश इंग्रजीने खाऊन टाकला आणि आपण वास्तव उपाययोजना करण्याचे टाळून मराठीच्या अभिमानाचे-अस्मितेचे ढोल बडवत राहिलो. आज मराठी ही धड ना अर्थार्जनाची भाषा आहे ना ज्ञानभाषा. सैन्य पोटावर जगते त्याप्रमाणे भाषादेखील पोटावर जगतात व वाढतात, म्हणून भाषेच्या साहित्यकारणापेक्षा अर्थकारणाकडे अधिक व जाणीवपूर्वक लक्ष द्यावे लागते. ते न दिल्यामुळे व मराठीला काही झालेले नाही व होणार नाही अशी सोयीस्कर भाबडी समजूत करून घेतल्यामुळे लोकभाषा, राजभाषा असूनही मराठी भाषा प्रगत व्यवहार क्षेत्रांत रुजली नाही की वाढली नाही. बंद पडणाऱ्या मराठी शाळा हा मराठी भाषेच्या सार्वत्रिक व शासकीय अवहेलनेचा ढळढळीत पुरावा आहे. मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडतात ह्याचा अर्थ दोन पिढ्यांतील भाषिक संक्रमण व सातत्य टिकवणे यांत आपण अपयशी ठरलो आहोत. दोन पिढ्यांतील भाषिक संक्रमण सुरळीत असणे हा सुदृढ आणि सुरक्षित भाषेचा एक प्रमुख निकष मानला जातो. नवीन पिढीला स्वत:ला आणि त्यांच्या पालकांनाही त्यांच्या मुलांनी मराठी माध्यमातून शिकावे असे वाटत नाही ही मराठीसाठी धोक्याची घंटा आहे.

**मराठीचा हक्काचा अवकाश इंग्रजीने खाऊन टाकला आणि आपण वास्तव उपाययोजना करण्याचे टाळून मराठीच्या अभिमानाचे-अस्मितेचे ढोल बडवत राहिलो. आज मराठी ही धड ना अर्थार्जनाची भाषा आहे ना ज्ञानभाषा. सैन्य पोटावर जगते त्याप्रमाणे भाषादेखील पोटावर जगतात व वाढतात, म्हणून भाषेच्या साहित्यकारणापेक्षा अर्थकारणाकडे अधिक व जाणीवपूर्वक लक्ष द्यावे लागते.**

उचित व न्याय्य भाषाधोरण, कालबद्ध व उद्दिष्टलक्ष्यी भाषानियोजन, भाषाविकासाची उत्तरदायी व सक्षम यंत्रणा यांच्या अभावाची ही अपरिहार्य परिणती आहे. अशा निर्नायकी, निरंकुश परिस्थितीत मराठी भाषा अद्याप टिकून आहे याचेच नवल वाटावे. आज मराठी भाषेला भीती आहे ती इंग्रजीची नव्हे तर मराठीसाठी भाषाविकासाची सक्षम यंत्रणा प्रस्थापित न करणाऱ्या व त्याबाबतचे आपले उत्तरदायित्व नाकारणाऱ्या राज्यकर्त्यांची. त्याहून अधिक भीती आहे ती मराठी भाषक समाजाच्या सार्वत्रिक अनास्थेची. मराठीच्या मुद्यावरून निवडणुकांच्या निमित्ताने होणारे अस्मितेचे राजकारण आणि मराठी भाषादिनासारखे प्रतीकात्मक व दिखाऊ उपक्रम यांतून मराठीचे काहीही भले होणार नाही.

सामाजिक, राजकीय इच्छाशक्ती असेल तर मराठीसाठी भाषानियोजनाच्या माध्यमातून खूप काही साध्य करता येईल. त्यासाठी पुढील गोष्टी तातडीने कराव्या लागतील.

१) मंत्रालयातील मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय आणि राज्य मराठी विकास संस्था यांचे सक्षमीकरण करून राज्य मराठी विकास संस्थेला मराठीसाठी भाषानियोजन करणारी स्वायत्त संस्था म्हणून प्राधिकृत करणे. त्यासाठी भरीव अर्थसंकल्पीय तरतूद करणे. ह्याबाबतीतला आपला पूर्वेतिहास चांगला नाही. कारण राज्यात १९६० नंतर स्थापन झालेल्या भाषाविकासाच्या यंत्रणा आज मोडकळीला आलेल्या असून आपापल्या कार्यादेशापासून भरकटलेल्या आहेत. त्याचे एक कारण ह्या संस्था आर्थिक दृष्ट्या कुपोषित राहिल्या व त्यांना योग्य नेतृत्व मिळाले नाही. इंग्रजी ही आयती प्रगत भाषा हाताशी असल्यामुळे मराठीच्या विकासासाठी काही खर्च करणे हे सतत कर्जबाजारी राहिलेल्या सरकारला अव्यवहार्य व अनावश्यक वाटू लागले.

२) राज्य मराठी विकास संस्थेमार्फत मराठी भाषेसंबंधीचे राज्याचे ध्येयधोरण, विकासलक्ष्य ठरवणे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा

मिळवण्याच्या प्रतीकात्मक मार्गांचा अवलंब करण्यापेक्षा मराठी भाषेची व्यावहारिक व्याप्ती व गुणवत्ता वाढवून तिचा ज्ञानभाषा म्हणून विकास करण्याचे ध्येय समोर ठेवण्याची आवश्यकता आहे.

३) राज्याचे भाषाधोरण ठरवताना सार्वजनिक व्यवहारात तमीळनाडूप्रमाणे त्रिभाषासूत्राऐवजी मराठी-इंग्रजी अशा द्विभाषाधोरणाचा विचार व्हावा. कारण केंद्रीय आस्थापनांनी लिपीसाधर्म्याचा फायदा घेत हिंदीला झुकते माप देऊन मराठीचे खूप नुकसान केले आहे. शिक्षणातही हिंदी भाषा हा मराठी भाषेला समकक्ष पर्याय असू नये.

४) राज्य मराठी विकास संस्थेने तातडीने हाती घ्यायची कामे- मराठीच्या सद्य:स्थितीबीबत श्वेतपत्रिका काढणे. मराठी भाषेसंदर्भात SWOT विश्लेषण करणे. आवश्यक ती सर्वेक्षणे करणे, आणि भाषा नियोजनाचा कालबद्ध आराखडा तयार करणे. अर्थात, ह्यासाठी राज्य मराठी विकास संस्थेची धुरा साहित्यिकाच्या हाती नव्हे तर भाषातज्ज्ञाच्या हाती सोपवली पाहिजे आणि त्याला आवश्यक ती संसाधने उपलब्ध करून दिली पाहिजेत. हे सर्व आपण मराठीच्या विकासाबाबत किती गंभीर व कटिबद्ध आहोत ह्यावर अवलंबून आहे.

५) मराठी अथवा इंग्रजी ह्याऐवजी मराठीसह इंग्रजी आणि इंग्रजीसह मराठी हे राज्याच्या भाषाधोरणाचे सूत्र असावे. विविध व्यवहारक्षेत्रांतील इंग्रजी भाषेच्या वापराची मक्तेदारी कमी करून मराठीला राजभाषा म्हणून तिच्या हक्काचा अवकाश प्राप्त करून द्यावा. त्यासाठी सक्ती आणि संधी ह्या धोरणाचा जमेल तेवढा अवलंब करावा.

६) मराठीसाठी भाषानियोजन करताना भाषाविकासाशी संबंधित अन्य शासकीय संस्थांप्रमाणे स्वयंसेवी संस्थांनाही सहभागी करून घेतले जावे. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, मराठीचा व्यावसायिक वापर करणाऱ्या नाट्यचित्रपटादी कलाक्षेत्रांतील व्यक्ती व संस्था, माध्यमकर्मी, प्रकाशन व्यावसायिक, माहिती-तंत्रज्ञ आदींना प्रामुख्याने विचारात घ्यावे.

७) मराठीचा विकास म्हणजे नेमके काय व तो कधी, कोणी, कसा कारायचा याचा स्पष्ट आराखडा तयार करणे. मराठीच्या आजच्या अवस्थेला आपण सर्वच जबाबदार आहोत आणि आपण सर्वांनी मिळूनच मराठीचा विकास केला पाहिजे असे कृतिशून्य व मोघम बोलत राहिल्याने काहीच साध्य होत नाही. त्यामुळेच मराठीच्या विकासाबाबत व्यक्ती व संस्था यांची जबाबदारी - त्यांचे उत्तरदायित्व निश्चित केले पाहिजे.

८) मराठीच्या कालबद्ध विकास आराखड्याची अंमलबजावणी करताना केलेल्या कामाचे मूल्यांकनही झाले पाहिजे. रस्ते, पाणी, वीज आदी संसाधनांच्या विकासाप्रमणे भाषासंसाधनाच्या विकासाचेही अंतिम उत्तरदायित्व राज्य शासनाने स्वीकारले पाहिजे.


९) मराठीचा विकास आराखडा तयार करताना मराठीच्या बोलींचे जतन व संवर्धन होईल याकडेही लक्ष दिले पाहिजे.

१०) मराठीसाठी यशस्वीपणे भाषानियोजन करायचे असेल तर त्यासाठी प्रचंड प्रमाणात आर्थिक गुंतवणूक करावी लागेल. हा पैसा राज्यात 'मराठी विकास अधिभार' लावून उभा करता येईल. सध्या मराठी भाषेसाठी जी आर्थिक तरतूद केली जाते ती इतकी अत्यल्प आहे की तीमधून मराठीच्या विकासाचे अस्सल व व्यावहारिक उपक्रम राबवण्याऐवजी प्रतीकात्मक, उत्सवी उपक्रम राबवणेच शक्य आहे आणि तेच आपण करीत आलो आहोत.

११) मराठीचा ज्ञानभाषा म्हणून विकास करायचा असेल तर ती शिक्षणाच्या सर्व स्तरांवर माध्यमभाषा असणे ही एक पूर्वअट आहे. ह्याबाबत राज्याच्या शैक्षणिक धोरणातही आवश्यक ते बदल करावे लागतील. मराठी शाळा बंद पडल्या तर कालंतराने मराठीचे उच्च माध्यमिक व महाविद्यालयील शिक्षणही धोक्यात येईल. आजच तसे संकेत मिळू लागले आहेत. इंग्रजी हीच एकमेव उच्च शिक्षणाची व रोजगार-व्यवसाय- उद्योगाची भाषा आहे असा समज मराठीसाठी घातक ठरत असून त्याबाबत काही धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. भाषेच्या वापरामागे मुख्य प्रेरणा ही आर्थिक असते. मराठीला आर्थिक प्रेरणांची जोड देणे हा भाषानियोजनातील अग्रक्रमाचा मुद्दा असला पाहिजे. मराठी भाषेचा विकास आणि मराठी भाषकाचा विकास यांच्यातील द्वैतभाव संपवण्याची गरज आहे. मराठी भाषेचा विकास करताना मराठी भाषकांचे व मराठी भाषकांचा विकास करताना मराठी भाषेचे हितसंबंध लक्षात न घेतल्यामुळे हे द्वैत निर्माण झाले आहे. एका बाजूला उच्चभ्रू, प्रगत मराठी माणूस हा आज मराठी भाषेपासून दूर गेलेला दिसतो तर दुसऱ्या बाजूला ज्याला 'मराठी' म्हणता येईल असा मोठा वर्ग भौतिक प्रगतीपासून वंचित आहे. अशा वर्गाला मराठी ही संपत्तीऐवजी आपत्ती वाटली तर नवल नव्हे. इंग्रजी व मराठी भाषा अनुक्रमे समृद्धी आणि वंचना यांच्या निदर्शक बनल्यामुळे वर्गोन्नतीसाठी आर्थिक संधींच्या शोधात असलेला तळागाळातील मराठी समाज स्वाभाविकपणे मराठी भाषेकडून इंग्रजी भाषेकडे वळतो आहे. बहुजनांना इंग्रजीपासून रोखण्याऐवजी अभिजनांना मराठीकडे वळवण्याचे व्यवहार्य मार्ग शोधावे लागतील. मराठी शाळा झोपडपट्ट्यांतून नव्हे तर उच्चभ्रूंच्या वस्तीतून टिकल्या पाहिजेत, वाढल्या पाहिजेत तरच बहुजन समाज त्याचे अनुकरण करील.

मराठीच्या विकासासाठी भाषानियोजनाचा मार्ग कालही उपलब्ध होता व आजही उपलब्ध आहे, पण तो पूर्ण क्षमतेने व गांभीर्याने वापरण्यासाठी लागणारी तीव्र इच्छाशक्ती मराठी समाजात आहे काय?

**- डॉ. प्रकाश परब**
भ्रमणध्वनी : ९८९२८१६२४०
parabprakash8@gmail.com



# बालनाट्यातून भाषासमृद्धी

**राजू तुलालवार**

सहा महिन्यांच्या बालनाट्य शिबिराचा समारोपसमारंभ सुरू होता. चार ते चौदा वयोगटातील मुले मराठीतून आपले अनुभव प्रेक्षकांसमोर कथन करीत होती. काही मुलांच्या बोलण्यातून इंग्रजी-हिंदी शब्द येत होते; पण ती बिनधास्त बोलत होती. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता. आठवीतील एक मुलगी म्हणाली, ''शिबिरात येण्याआधी आय हेट मराठी. पण नाटक झाल्यानंतर आय लाइक मराठी... ॲण्ड नाऊ आय लव्ह मराठी.''

एकदा एका पालकांनी भेटून मला सांगितले, ''सर, शिबिरामुळे माझा मुलगा चार नवे मराठी शब्द शुद्ध भाषेत बोलायला लागला. तो पेपरमधल्या मराठी नाटकांच्या जाहिराती आवडीने वाचतो... नाटकांच्या नावांचे अर्थ विचारतो आणि आता तर अनेकदा तो मला विचारतो की 'हा' मराठी शब्द मी बरोबर बोलतोय का? मराठीवर तो आता अधिक लक्ष देतोय हे पाहून 'आई' म्हणून मला खूप आनंद झाला.'' ही आई मराठी होती पण तिचे लग्न मारवाडी घरात झाले होते. आपल्या मुलाने मराठी भाषेशी जवळीक साधावी या एकाच उद्देशाने या मातेने मुलाला शिबिरात घातले होते. बालनाट्य शिबिराचा फॉर्म भरताना आमचा एक प्रश्न असतो. शिबिरात भाग घेण्याचा उद्देश काय? यावर बरेच पालक लिहितात, भाषेचे संस्कार होण्यासाठी, चांगले मराठी बोलता यावे यासाठी वगैरे वगैरे. असे का घडतेय? मराठी कुटुंबातील ९०% मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून शिकत असल्यामुळे आणि याच शाळेतील बहुभाषिक मुलांच्या संपर्क व सहवासामुळे मराठी मुले जेव्हा घरी बोलतात तेव्हा त्यांच्या तोंडून बाहेर पडणाऱ्या इतर भाषीय शब्दांमुळे, मराठीप्रेमी पालक चिंतातुर होतात. गंमत अशी की मुलांना आपण अशुद्ध बोलतोय याची जाणीवसुद्धा नसते. ती कसेही बोलून आपल्या भावना व्यक्त करतात. या मुलांना शाळेत मराठी विषय शिकवला जातो पण तरीही मुलांच्या बोलण्यातून योग्य आणि शुद्ध भाषा ऐकायला का मिळत नाही? लिहिण्यावर आणि वाचण्यावर लक्ष केंद्रित केले जाते, पण तिथे आज मुलांची भाषा घडत नाही. ती शिकवली जात नाही. मग मुले एकमेकांचे ऐकतात. ऐकून आत्मसात करतात आणि तेच बोलतात.



बालनाट्य हे भाषा संवर्धनाचे काम करते. बालनाट्यामुळे मुलाची भाषेची जाण समृद्ध होण्यास मदत होते यावर आता सर्वांचेच एकमत झाले आहे. मुलाच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि भाषेची प्रगती साधण्यासाठी लहान मुलांना 'नाटक' ही कला मदत करते, यावर पालकांमध्येही दुमत नाही. बालनाट्यामुळे मुलांचा बौद्धिक, मानसिक, भावनिक, सामाजिक आणि भाषिक विकास साधला जातो.

२००५ सालच्या भारताच्या राष्ट्रीय शैक्षणिक आराखड्यात नाटकाबद्दलची विशेष नोंद आहे. नाटक हा सर्वात जास्त सामर्थ्यवान आणि तरीही सर्वात कमी वापर होणारा शिक्षणाचा प्रकार आहे. 'नाटक' हा विषय शाळेत शिकवला जावा ही शिफारस या आराखड्यात केली आहे यासाठी १ली ते १०वी पर्यंतचा पाठ्यक्रमही तयार केला आहे. ज्या शाळांमध्ये नाटक शिकवतात त्या शाळेतील मुलांची भाषा चांगली असते असे निरीक्षणामध्ये आढळले आहे. नाटक शिकताना अनेक मराठी शब्द मुलांना नव्याने शिकायला मिळतात. अनेक नव्या शब्दांशी ओळख होते. वाक्प्रचार, म्हणी यांचा नेमका उपयोग कळतो. संवादामुळे शब्दांचे सामर्थ्य कळते. नाटकांमध्ये वाचिक किंवा शाब्दिक अभिनय करताना स्पष्टोच्चाराचे महत्त्व कळते. संवाद बोलताना-स्वल्पविराम, पूर्णविराम घेताना शब्दांचे आणि वाक्यांचे अर्थ कसे बदलतात हे सुद्धा मुलांना कळते. नाटकात येणाऱ्या गाण्यांमुळे गाणी गुणगुणतांना हळूहळू मुलांना भाषेबद्दल आत्मीयता वाटू लागते. 'नाटक' ही 'कला' असली तरीही मुलांसाठी नाटक हा 'खेळ' असतो. नाटक नावाचा 'खेळ' खेळता खेळता मुले भाषेतल्या

शब्दांशीसुद्धा खेळू लागतात. बोलताना गमतीने नवे-नवे प्रयोग करतात आणि अशा खेळण्यातून अनेक नवे शब्द मुल शोधून काढतात. त्याचा आनंद घेतात. माझ्या अनेक बालनाट्यांची नावे-टीव्हीवेडा वाघोबा, ब्युटीक्वीन, चेटकीण, ससोबा रॉकेटवाले, चॉकलेटखाऊ सिंहोबा ही मुलांनीच सुचविलेली नावे आहेत.



मुलांना भाषेची गोडी लागावी व शब्दांची गंमत कळावी म्हणून मी एक खेळ घेतो. या खेळात आम्ही मुलांच्या कल्पनेने व मदतीने गंमतगीत किंवा बडबड गीत तयार करतो. मी सुरवात करतो, 'एक होतं माकड'... मग मुले जुळवून म्हणतात, 'रोज खायचे पापड'.. मग पुढे त्यांना कल्पना सुचते व ती म्हणतात, 'त्याचे नवे कापड' आणि मग पुढे म्हणतात, 'शाळेत खायचे झापड..' माकड, पापड, कापड आणि झापड या शब्दांवर मुले खूश होऊन स्वतःशीच हसतात आणि मग दुसरी कविता, गीत रचले जाते, ''एक होती मुंगी, तिचे नाव गुंगी, वाजवायची पुंगी, घालायची लुंगी''.. गमतीदार शब्द साभिनय सादर करताना मुलांना मजा वाटते आणि मग मजेमजेत त्यांचा शब्दसंग्रह वाढतो.

बालनाट्य बसवताना भाषेच्या उच्चारणाच्या बाबतीत आम्ही दक्ष असतो कारण येणारा बालप्रेक्षक नाटक 'पाहताना' नाटक 'ऐकत' असतो. बालनाट्य बघायला आपल्या मुलांना घेऊन येणारा पालकही भाषेच्या बाबतीत आग्रही असतो. आपल्या मुलांच्या कानावर चांगली व शुद्ध भाषा पडावी असे त्यांना मनापासून वाटते. बालनाट्यात मुलाच्या आंगिक/शारीरिक अभिनयापेक्षा त्याच्या शाब्दिक अभिनयाला हा 'मोठा' प्रेक्षक बघत असतो. मुले चांगले आणि शुद्ध बोलली की त्यांची तारीफ होते.

भाषेच्या संदर्भात कोणती क्रिया महत्त्वाची? लिहिणं, वाचणं, बोलणं की ऐकणं? मला ऐकण्याची क्रिया महत्त्वाची वाटते. मुंबईतल्या परप्रांतियांना मराठी लिहिता, वाचता येत नाही पण त्यांना ऐकून समजते. ऐकल्यामुळे ते मोडकीतोडकी मराठी बोलतातसुद्धा. शाळेत जाण्याच्या आधी लहान मूल केवळ ऐकूनच बोलायला शिकतं, म्हणून मराठी ऐकायला हवी. यासाठी मराठी नाटक, सिनेमा, मालिका पाहताना ऐकायला हव्यात. मुलांनी छान छान गोष्टी, बडबडगीते, बालगीत, बालगाणी ऐकायला हवीत. मूल जे ऐकेल तेच बोलेल आणि म्हणूनच मुलांशी मराठीतूनच बोलायला हवे. मला वाटते की शाळेत 'भाषा' विषय शिकवणाऱ्या शिक्षकांना चांगले मराठी बोलता यायला हवे. चांगली 'भाषा' बोलणारे शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये नेहमीच लोकप्रिय असतात.

बालनाट्यामध्ये भाषा लिहायची गरज नसते, वाचायची गरज असते, पण मराठी वाचता न येणाऱ्या मुलांना त्यामुळे अडचण येत नाही. पालकांच्या मदतीने ती नाटकात बोलू शकतात आणि ऐकू शकतात. नाटकात 'बोलणं' आणि 'ऐकणं' दोन्हीवर लक्ष केंद्रित करताना मुलांना अख्खे नाटक पाठ होते आणि एका नाटकामुळे त्यांचा शब्दसंग्रह प्रचंड वाढतो. नाटकात अभिनयामुळे शब्दांचा नेमका अर्थ समजतो आणि नाटकांच्या तालमींना वारंवार उच्चारला गेल्यामुळे डोक्यात पक्का बसतो.

मराठी भाषा टिकणार याची मला खात्री आहे. महाराष्ट्रात जेवढी 'नाटके' होतात तेवढी भारतात कुठेही होत नाहीत. मराठी सिनेमाने आता कात टाकलीय. मालिकांमुळे मराठी मनात घर करून आहे. नाटक, सिनेमा, मालिका यांना प्रेक्षक मिळतोय कारण प्रेक्षकांचे मराठी भाषेवरचे प्रेम. उद्याचा प्रेक्षक घडवण्याची जबाबदारी मराठी बालनाट्यांवर आहे आणि आजच्या बालप्रेक्षकांवर व बालकलाकारांवर आहे. या सर्वांना मार्गदर्शन करून योग्य दिशा देण्याचे कर्तव्य आपल्याला करावे लागणार आहे.

पर्यावरणरक्षणासाठी शाळेत मुलांना प्रत्येकी एक झाड लावण्याचा संदेश देतात. तसेच मराठी भाषेच्या रक्षणासाठी व समृद्धीसाठी मला वाटते की प्रत्येक मुलाने एका नवीन मराठी शब्दाला जन्म द्यावा. तो शब्द स्वतः रोज वापरावा आणि त्या शब्दाला लोकप्रिय करावे. मुलांना हे सहज शक्य आहे कारण मुलांची कल्पनाशक्ती, निरीक्षणशक्ती व ग्रहणशक्ती अचाट आणि अफाट असते. मुलांना नवनिर्मितीची आस असते. ओढ असते. नवे प्रयोग करायला, नवे अनुभव घ्यायला त्यांना आवडते. महाराष्ट्रातील प्रत्येक मुलाने फक्त एका मराठी शब्दाला जन्म दिला व त्या शब्दाचे पालकत्व स्वीकारून त्या शब्दाला मोठे करण्याचा विडा उचलला तर मराठीत किती शब्द असतील! मराठी ही जगातील सर्वाधिक संपन्न भाषा असेल.

**- राजू तुलालवार**
**भ्रमणध्वनी ९८६९००४५५७**
rajutulalwar@yahoo.in



# संगीतक्षेत्रातील मराठी

## कौशल इनामदार

काही वर्षांपूर्वीची गोष्ट. उत्तर हिंदुस्थानी अभिजात संगीत गाणाऱ्या एका विदुषीनं केलेल्या एका विधानावर काही मित्रांमध्ये घनघोर चर्चा रंगली होती. 'संगीताला भाषा नसते' असं ते विधान होतं. हे विधान वरवर वाटतं तितकं काही सोपं नाही. साधं तर अजिबात नाही. संगीत आणि भाषा यांच्या संबंधांच्या निबिड अरण्यात शिरलात की तुम्ही वाट चुकलातच म्हणून समजा! कारण 'संगीताला भाषा नसते' या विधानाला अनेक कंगोरे आहेत. त्याचे अनेक अन्वयार्थ आहेत.

१) संगीत कळायला भाषेची आवश्यकता नसते.

२) संगीत हीच मुळात एक स्वतंत्र भाषा आहे.

३) भाषेशिवायही संगीत लोकांच्या मनावर परिणाम करतं.

४) संगीतामध्ये भाषेला दुय्यम स्थान आहे.

५) संगीताची वाटचाल भाषेवर अवलंबून नसते.

संगीतक्षेत्रातील मराठीच्या विषयाकडे जाण्याअगोदर, संगीत आणि भाषा यांच्यामध्ये जे नातं आहे त्यावर थोडा प्रकाश टाकणं गरजेचं आहे.

**भाषा आणि संगीत**

H. W. Longfellow म्हणतात, Music is the universal language of mankind.

लाँगफेलोचं हे काहीसं काव्यमय वाक्य, संगीताद्वारे संज्ञापन होतं असं सुचवू पाहतं. ते खरंच होतं का यावर संगीतज्ज्ञांमध्ये बरीच मतं-मतांतरं आहेत. एकीकडे स्ट्राविन्स्कीसारखा संगीतकार म्हणतो की संगीत काहीही आपणहून व्यक्त करत नाही, किंबहुना करू शकत नाही तर दुसरीकडे डेरेक कुक नावाचा संगीतज्ज्ञ म्हणतो की संगीत भावना व्यक्त करण्याचं एक उत्तम माध्यम आहे. कुठेतरी मध्यावर आरन कोपलंडसारखे संगीतज्ज्ञ म्हणतात की भाषा व्यक्त न करू शकणाऱ्या भावना संगीत व्यक्त करू शकतं.

उत्तर भारतीय अभिजात संगीताबद्दलसुद्धा ही मतं-मतांतरं आढळतात. रागाला मूड असतो की नाही यावर अनेक संगीतकार आपापली मतं नोंदवत असतात.

दरबारी म्हणजे गंभीर, बागेश्री म्हणजे शृंगार, मारवा म्हणजे उदासी असे रागांना मूड जोडण्यात येतात. पं. सत्यशील देशपांडे मात्र म्हणतात, आपण चेहरा गंभीर केला म्हणजे दरबारी गंभीर असं काही नाही. त्या रागातही लालित्य आणता येतं. त्यालाही नाचवता येतं. म्हणूनच 'दरबारी'मध्ये 'नैन सो नैन मिलाये रहो जी'सारखी लालित्यपूर्ण शृंगारिक बंदिश ऐकायला मिळते आणि बागेश्रीमध्ये कुमारगंधर्व 'फेर आयी मौरा'सारखी करुण आशयाची बंदिश बांधतात.

उत्तर भारतीय अभिजात संगीत आणि कर्नाटक अभिजात संगीत हे वेगवेगळ्या वाटांनी का गेलं असा शोध घेतला तर त्यांचं संगोपन वेगवेगळ्या भाषांमध्ये झालं असंच उत्तर येईल.

कुठल्या भाषेत संगीतनिर्मिती होत आहे (किंवा वाद्यसंगीतामध्ये वादक कुठल्या भाषेत विचार करतो) यावर निर्माण होणाऱ्या संगीताचा पोत ठरत जातो हे मात्र नाकारता येणार नाही. उदाहरणार्थ, उत्तर हिंदुस्थानी अभिजात संगीतामधल्या बंदिशी अवधी किंवा ब्रजभाषेतच का निर्माण होतात? मराठी किंवा उडिया भाषेत या बंदिशी का तयार होत नाहीत? सत्यशील देशपांडे म्हणतात की शब्दोच्चारातच स्वरोच्चार अनुस्यूत असतात. शब्दोच्चार बदलले की स्वरोच्चारही बदलतात.

रवींद्र संगीत बंगाली सोडून इतर भाषेत निर्माण होणं मला कठीण वाटतं. मला बंगाली भाषा येत नाही पण माझं एक निरीक्षण आहे. आपल्याकडे जो 'अ' उच्चारला जातो, त्याचा बहुतांश वेळा बंगालीमध्ये 'ऑ' होतो. जसा 'जय'चा 'जॉय' होतो. 'मंदिरा'ची 'मॉंदिरा' होते. 'रसगुल्ला' 'रॉशॉगुल्ला' होतो, आणि संपूर्ण 'जीवन' 'जीबॉन' होऊन जातं. म्हणजे अनेक 'लघु' अक्षरं 'गुरू' होतात. त्यामुळे गीतकाव्यामध्ये कमीतकमी 'लघु' अक्षरं आणि जास्तीत जास्त 'गुरू' अक्षरं येतात. त्यामुळे बंगाली गाण्यांच्या चाली आपोआप जास्त ठहरावाच्या होत असाव्यात. गाण्याची लय वाढली तरी अक्षरांची संख्या कमीच असल्यामुळे 'मालिनी' वृत्तासारखं एखादं वृत्त बंगाली गाण्यात सापडेल याची शक्यता

फार दिसत नाही. किंवा एखादं –

घनन घनन घिर घिर आयी बदरा
घन घन घोर कारे छाये बदरा
दमक दमक गुँजे बदरा के डंके
चमक चमक देखो बिजुरिया चमके

असं लघुमात्राप्रधान गीत बंगालीमध्ये होणं कठीणच वाटतं.

तमीळ भाषेतल्याही चाली जशा होतात तशा त्या का होतात याचं गमक त्या भाषेतच आहे. आपण रहमानचं सुरुवातीच्या काळातलं कुठलंही एक गाणं घेऊ. 'दिल है छोटासा' आठवा. तुमच्या ध्यानात येईल की ओळीच्या शेवटी एक पॉज येतो. 'छोटासा'मधला 'सा' हे गुरू अक्षर असलं तरी ते मधेच तोडलंय – क्लिप केलंय. हीच गोष्ट तुम्हाला 'रोजा जानेमन' या गाण्याबद्दलही आढळेल. याची कारणमीमांसा केली की लक्षात येतं की मुळात ही तमीळ गाणी होती. आता मराठीमध्ये कविता किंवा गीत सादर करतांना आपण शब्दाचं शेवटचं अक्षर पूर्ण उच्चारतो.

उदाहरणार्थ, 'काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्याचे हात.'

यामध्ये 'काढ' किंवा 'गळ्यातील' ह्या शब्दांची शेवटची अक्षरं ही पूर्ण उच्चारली जातात.

हिंदी किंवा उर्दूमध्ये या अक्षराला एक अलिखित हलन्त असतो. उदाहरणार्थ 'प्यार', 'मुहब्बत'. पण तमीळमध्ये अनेक असे शब्द आहेत जे पूर्णही उच्चारले जात नाहीत अथवा संपूर्ण तोडलेही जात नाहीत. त्यांचा उच्चार केवळ अर्ध्या मात्रेपुरता केला जातो. देवनागरीत ऱ्हस्व 'उ' त्या शब्दांच्या शेवटी लावला जातो, पण त्याचा उच्चार आपल्या ऱ्हस्व 'उ'पेक्षाही कमी वेळात केला जातो. तमीळनाडूमधला 'डू' हा फक्त अर्ध्या मात्रेपुरता उच्चारून पाहा! त्यामुळे तमीळ गाण्याचं हिंदी गाणं होतं पण जिथे यती आहे त्या जागेवर एक पोकळी निर्माण होते!

तात्पर्य काय, तर सांगितिक विधान हे भाषेप्रमाणे वळण घेत असतं. रहमानचं तमीळ असणं जसं त्यांच्या काही हिंदी गाण्यांमधून दिसतं तसंच सुधीर फडकेंचं मराठी असणं त्यांच्याही हिंदी गाण्यांतून दिसत असतं आणि एस.डी. बर्मनचं बंगाली असणं त्यांच्या हिंदी गाण्यांतून झळकत असतं!

**संगीत आणि मराठी**

माझा एक कोंकणी मित्र आहे. त्याचं मूळ गाव उडिपी, कर्नाटक. तो मला सांगत होता की लहानपणापासून उडिपीच्या देवळात आम्ही भजनं म्हणत असू. लहान होतो. काय म्हणतोय काही कळायचं नाही. चाली कानडी वळणाच्याच असायच्या पण भाषा अनोळखी वाटायची, पण चालीमुळे शब्द लक्षात राहायचे. कामानिमित्त मुंबईत स्थायिक झालो तेव्हा कळलं की आम्ही जे गात होतो ते सगळं मराठी होतं! मित्र म्हणाला, आजही लहान लहान मुलं उडिपीच्या देवळात तीच भजनं म्हणतात.

'संगीतक्षेत्रातील मराठी' असा विषय समोर येतो तेव्हा प्रामुख्यानं विचार होतो तो मराठी भावसंगीताचा आणि चित्रपट संगीताचा. लोकसंगीताच्या बाबतीतही मराठीचा विचार होऊ शकतो, परंतु ज्या प्रमाणात भावसंगीत प्रवाही असतं त्या प्रमाणात लोकसंगीत नसतं. जेव्हा ते प्रवाही करायचा प्रयत्न होतो तेव्हा ते भावसंगीतामध्येच विलीन होतं.

आपल्याकडे भावसंगीताचा उगम भक्तिसंगीत आणि अभिजात संगीतात झालेला दिसतो. अण्णासाहेब किर्लोस्करांनी 'सौभद्र' आणि 'शाकुंतल'मधल्या अनेक चाली कीर्तनपरंपरेतून घेतल्या. भास्करबुवा बखले, गोविंदराव टेंबे आणि नंतर मास्तर कृष्णराव यांनी कव्वाली, गजल, ठुमरी, लावणी अशा त्या काळातल्या उंबऱ्याबाहेरच्या संगीतप्रकारांनाही जवळ केलं आणि त्यांचं मराठीकरण केलं.

'वद जाऊ कुणाला शरण ग' हे पद मुळात 'नेसली पितांबर जरी' या लावणीवरून घेतलं होतं. 'नाही मी बोलत' हे पद 'हमसे न बोलो राजाजी' या ठुमरीवरून घेतलं आहे. इतकंच नाही तर कर्नाटक संगीतामधून आणि ब्रिटिश बँड पथकांमधूनही काही चाली आयात करण्यात आल्या आहेत.

यातली अनेक गाणी चालींवर रचली असल्यामुळे त्यातली भाषा काहीशी क्लिष्ट आणि संस्कृतप्रचुर होती. 'अयोध्येचा राजा'पासून बोलपटांचा जमाना सुरू झाला आणि रंगमंचावरचं संगीत चित्रपटात गेलं. तिथेही सुरुवातीला भाषेचा पोत तोच राहिला कारण सुरुवातीला चित्रपटांमध्येही ऐतिहासिक आणि पौराणिक विषयच हाताळले जात होते. पण 'माणूस', 'शेजारी' यांसारख्या चित्रपटांबरोबर सामाजिक चित्रपटांचं युग अवतरलं आणि चित्रपटातील गाण्यांची भाषा बदलली. 'लख लख चंदेरी' किंवा 'आता कशाला उद्याची बात' यांसारखी बोलीभाषेतली गाणी चित्रपटांमधून ऐकू येऊ लागली. हाच बदल मो. ग. रांगणेकरांनी नाटकामधील गाण्यांमध्ये केला. त्याच काळात जी.एन. जोशी, जे.एल. रानडे आणि प्रामुख्याने गजाननराव वाटवे यांनी भावगीत हा प्रकार लोकप्रिय केला. वाटवेंच्या कार्यक्रमाला होणाऱ्या गर्दीच्या आख्यायिका आम्ही आता आतापर्यंत ऐकत होतो.

'अमर भूपाळी', 'राम जोशी' या चित्रपटांच्या निमित्ताने लावणीनं मराठी चित्रपटसृष्टीत प्रवेश केला आणि 'सांगत्ये ऐका'मुळे लावणी स्थिर झाली. एकामागे एक आलेल्या तमाशापटांनी मराठी संगीतामधली भाषा एकदम बदलली.

सुधीर फडके यांनी भावगीत आणि वसंत पवार यांनी लावणी हे संगीतप्रकार मराठी चित्रपट संगीतामध्ये खऱ्या अर्थानं रुजवले. वसंत पवारांनी रचलेल्या पायावर राम कदमांनी कळस चढवला. जोडीला आनंदघन, वसंत प्रभू, दत्ता डावजेकर यांच्यासारखे संगीतकार उत्तमोत्तम रचना सादर करत होते. ग.दि. माडगूळकर आणि जगदीश खेबूडकरांबरोबर शांताबाई शेळके यांनी चित्रपटगीतांना आपल्या शब्दसंपत्तीनं श्रीमंत केलं.

सुरुवातीच्या काळात मराठी आणि हिंदी चित्रपटांच्या निर्मितीमूल्यांमध्ये फार उघड असा फरक नव्हता. पण १९७०–७१ पर्यंत मराठी आणि हिंदी चित्रपटांतली दरी चांगलीच खोल

झाली होती. निर्मितिमूल्यं कमी झाल्याचा फटका जसा चित्रपट व्यवसायाला बसला तसा तो चित्रपटसंगीतालाही बसला. दादा कोंडके सोडले तर फारसे यशस्वी निर्माते मराठीत दिसायचे कमी होऊ लागले. दादा कोंडकेंच्या चित्रपटांचं संगीत सुरुवातीला राम कदम आणि नंतर राम-लक्ष्मण यांनी दिलं. दादा कोंडकेंच्या चित्रपटातील गाणी सवंगता आणि लोकप्रियतेची सीमारेषा ओलांडून हळूहळू अश्लीलतेकडे झुकू लागली आणि तिथपासूनच चित्रपटसंगीताला अवकळा आली असं माझं संगीतकार म्हणून मत आहे. साहित्यिकांचा चित्रपट व्यवसायाशी संबंध सुटत गेला आणि एकाही गीतकाराला आपली छाप पाडता आली नाही. यात आशेचा किरण म्हणजे हृदयनाथ मंगेशकर, भास्कर चंदावरकर यांनी संगीत दिलेल्या काही चित्रपटांमधली गाणी हाच होता. 'जैत रे जैत', 'सिंहासन', 'सामना', 'उंबरठा' या जब्बार पटेलांच्या सर्व चित्रपटांमध्ये संगीत ही त्यांची जमेची बाजू ठरली यात शंका नाही. शिवाय या चित्रपटांमुळे मराठी भाषेचे अनेक विभ्रम पुन्हा एकदा मराठी संगीतामध्ये दिसू लागले, कारण वेगवेगळ्या सांस्कृतिक वातावरणामधल्या कवींनी आपापल्या शब्दसंपत्तीचा बटवा या गीतांमधून मोकळा केला. खानदेशातल्या ना. धों. महानोरांनी नागरी आणि ग्रामीण मराठीमध्ये एक साकव बांधला. विदर्भातल्या सुरेश भटांनी गजलची ओळख महाराष्ट्राला करून दिली. त्यांच्या कवितांच्या कार्यक्रमांना बहुजनांची गर्दी होत होती. कविता फक्त अभिजनांसाठी आहे हा भ्रम भटांनी दूर केला. कोकणातल्या आरती प्रभूंनी आपल्या भाषेतून रसिकांच्या मनावर भूल घातली. वसंत बापटांनी संस्कृतप्रचुर आणि प्रमाण मराठीचा संपूर्ण आविष्कार करून दाखवला. 'निवडुंग'सारख्या चित्रपटांमधून ग्रेसांच्या कवितांना हृदयनाथ मंगेशकरांनी गाण्याची वाट मोकळी करून दिली. आधी वसंत प्रभू आणि नंतर हृदयनाथ मंगेशकर अभिजात मराठी कविता संगीतामधून सादर करत होते.

त्यानंतर विनोदी आणि कौटुंबिक मेलोड्रामांची लाट आली मराठी चित्रपटाचा दर्जा पूर्ण ढासळला. याची झळ मराठी संगीताला बसल्याशिवाय राहणार नव्हती हे उघडच होतं. या काळात अनिल-अरुण यांनी मराठी चित्रपटांना संगीत देण्यास सुरुवात केली. सुरुवातीला अनिल-अरुण या जोडगोळीनं आणि नंतर अरुण पौडवाल आणि अनिल मोहिले यांनी स्वतंत्रपणे मराठी संगीताला चालू हिंदी चित्रपटसंगीताचा बाज बहाल केला. मला वाटतं, याच काळात मराठी भाषेबद्दल एक प्रचंड न्यूनगंड निर्माण झाला आणि शांताराम नांदगावकरांसारख्या गीतकारांनी आपल्या गीतांमधून हिंदी शब्दांचा मुबलक वापर सुरू केला. 'प्यार', 'इश्क', असे शब्द मराठी गाण्यांमधून काहीशा बेढब पद्धतीनं येण्यास सुरुवात झाली. संगीत आणि त्यातली भाषा, दोन्ही निस्तेज पडू लागले. या काळात आनंद मोडक एकमात्र संगीतकार होते जे चित्रपटामधल्या काव्याच्या दर्जावर अंकुश ठेवून होते.

**आज संगीतक्षेत्रातल्या मराठीला कुठल्याही प्रकारची दिशा द्यायची असेल तर सजग प्रयत्न आवश्यक आहेत. हे प्रयत्न जसे संगीतकारांकडून अपेक्षित आहेत, तसेच ते संगीताच्या रसिकांकडून आणि समाजातल्या बुद्धिजीवी लोकांकडूनही घडणं आवश्यक आहेत. गीतकारांकडे आणि विशेषतः गीत या काव्यप्रकाराकडे तुच्छतेनं बघितलं जाऊ नये. भावसंगीतासाठी जे अभ्यासक्रम तयार होतील (आणि तसे ते व्हावेत) त्यामध्ये भाषा या विषयाला अव्वल स्थान असावं. छंदशास्त्र, मात्रा, वृत्त याचा अभ्यास कवींनी आणि संगीतकारांनी करणं आवश्यक आहे हे मनात रुजवायला हवं. महत्त्वाचं म्हणजे आपल्या भाषेतलं संगीत ही आपली आणि आपल्या समाजाची गरज आहे हे रसिकांनी ओळखायला हवं.**

रेडिओमुळे मात्र अनेक संगीतकार लोकांसमोर आले. यामध्ये प्रामुख्यानं श्रीनिवास खळे, यशवंत देव आणि कवी मंगेश पाडगांवकर यांनी मराठी भावगीत जिवंत ठेवण्याचं काम केलं. १९६०च्या दशकात यांच्या गाण्यांमुळे एक रोमॅन्टिसिझम सर्वत्र पसरला. गाणी स्वप्नाळू, सामाजिक वास्तवापासून काही प्रमाणात पलायन करणारी होत होती. १९७२ साली मुंबईत आणि मग लवकरच संपूर्ण महाराष्ट्रात टीव्ही आला आणि भावसंगीतासाठी रेडिओ नावाचं एक महत्त्वाचं दालन, एक प्रभावी माध्यम म्हणून, जवळजवळ संपुष्टात आलं.

१९८० पासूनचा काळ हा फक्त मराठी भावसंगीतासाठीच नाही तर हिंदी चित्रपटसंगीतासाठीसुद्धा उतरणीचाच काळ होता. शब्दाचं महत्त्व एकूणच कमी झालं. याला एक कारण म्हणजे चालींवर शब्द लिहिण्याचं प्रमाण वाढलं. पहिल्यापासूनच दोन्ही पद्धतीनं गाणी होत होती. मराठीमध्ये मात्र संगीतकार 'आधी शब्द आणि नंतर चाल' या तत्त्वावर जास्त विश्वास ठेवणारे होते. चाल आधी करून त्यावर शब्द लिहून घेण्यास काही संगीतकारांचा कडाडून विरोध होता. श्रीनिवास खळे म्हणायचे, ''आधी चाल आणि नंतर शब्द म्हणजे आधी झबलं शिवायचं आणि मग त्या मापाचं बाळ शोधत फिरायचं!''

हा दृष्टिकोन तर्कशुद्धही आहे, परंतु आधी चाल करण्याचे आणि मग त्यावर शब्द लिहून घेण्याचे काही फायदेही आहेत. आधी चाल केल्यामुळे संगीतकार गीतकाराला सुचेल त्या छंदावर अवलंबून राहात नाही. संगीतकाराला काही अनवट छंदात धुन सुचू शकते. उदाहरणार्थ, बाळ पार्टेंनी शांताबाई शेळकेंना एक चाल दिली आणि त्यावर शांताबाईंनी शब्द लिहिले -

पुनवेचा चंद्रम आला घरी
चांदाची किरणं दर्यावरी
खाऱ्या खाऱ्या वाऱ्यात
चांदण्याच्या चुऱ्यात
तुझा माझा एकांत रे साजणा!

इथे 'साजणा' हा जो शब्द पडतो तो एरवी कदाचित

शांताबाईंनी लिहिला नसता. पण चालीच्या छंदाप्रमाणे त्यांना ती जागा मिळाली. यात एक लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे तिथे शांताबाई होत्या म्हणून त्यांना चालीवर लिहितानासुद्धा 'चांदण्याच्या चुऱ्या'सारखी एक उपमा सुचली. तात्पर्य, चाल आधी करून नंतर शब्द लिहायचे असतील तर गीतकार प्रतिभावंत असावा लागतो. त्याला / तिला चालीतले संकेत कळायला हवेत. ते कळले नाहीत तर मात्र 'चालीला अक्षरांचा अग्नी दिला' अशी गत होऊ शकते.

आता मराठीमध्ये ९०% गाणी आधी चाल आणि नंतर शब्द याच तत्त्वावर केली जातात. त्यामुळे 'चांदण्याच्या चुऱ्या'पेक्षा 'साजणा'च जास्त सापडतात. मराठीत चांगल्या गीतकारांचं प्रमाण घटण्याचं आणखी एक कारण म्हणजे साहित्यिकांनी 'कवी' आणि 'गीतकार' असा एक साहित्यिक जातीयवाद निर्माण केला. गदिमा गीतकार आहेत, कवी नाहीत असं हिणकसपणे म्हटलं जायचं. यात तर्क कमी आणि हिणकसपणा जास्त होता आणि माझं हे ठाम मत आहे की मराठी संगीतजगताचं या साहित्यिक ब्राह्मण्यवादानं अपार नुकसान केलं. गीत हा काव्याचाच प्रकार आहे आणि त्यात कलेबरोबर कसबही गरजेचं आहे, याकडे साहित्यिकांनी काणाडोळा केला.

जसा प्रकार कवी आणि गीतकाराबद्दल झाला तोच प्रकार अभिजात संगीत आणि भावसंगीत किंवा ललित संगीत याबद्दल झाला. शब्दप्रधान संगीत हे कमी दर्जाचं संगीत आहे असा ढोबळ समज समाजात पसरत गेला. या संगीतप्रकाराला एक वेगळं शास्त्र आहे याकडे पं. यशवंत देव सोडले तर फारसं कुणाचं लक्ष गेलं नाही.

मी १९९२-९३ साली जेव्हा संगीत करायला सुरुवात केली तेव्हा मराठी संगीतसृष्टीवर नॉस्टॅल्जियाचा अंमल होता. 'नव्या' संगीताकडे काहीसं तुच्छतेनं आणि बरंचसं संशयानं पाहिलं जायचं. 'जुनं ते सोनं'सारख्या म्हणी कायम संगीताच्या बाबतीत ऐकू यायच्या. मराठी संगीताचे कार्यक्रम म्हणजे फक्त जुन्या गाण्यांचा ऑर्केस्ट्रा इतकंच समीकरण होतं. 'बुगडी माझी सांडली गं' ते येऊ कशी प्रिया' किंवा 'शारदसुंदर चंदेरी राती' या कालखंडातलीच गाणी या कार्यक्रमांमधून गायली जायची. अनेक संगीत कंपन्याही जुन्या गाण्यांच्या प्रतिकृती करण्यातच व्यावसायिक यश संपादन करत होत्या. 'मेंदीच्या पानावर'सारख्या ध्वनिमुद्रिका प्रत्येक सार्वजनिक सत्यनारायण पूजेच्या मंडपात ऐकू यायच्या.

नवीन गाणी कार्यक्रमातून घेणं हे धाडस ठरत होतं. नव्या संगीताच्या ध्वनिमुद्रिकाही फारशा बाजारात येत नव्हत्या. शांता शेळकेंच्या काही रचनांना चाली देऊन त्यांची एक ध्वनिमुद्रिका तयार करावी या उद्देशानं जेव्हा मी एका म्युझिक कंपनीला प्रस्ताव दिला तेव्हा त्यांनी थंडपणे 'कोण शांता शेळके' असा सवाल मला केला!

आज संगीतक्षेत्रातील मराठी प्रामुख्यानं चित्रपटातल्या मराठीवर अवलंबून आहे. गैरफिल्मी संगीत हे आर्थिक दृष्ट्या अपंग झाल्यामुळे आज मराठीतली नव्या संगीताची निर्मिती ही खूप प्रमाणात चित्रपटातल्या संगीतावर अवलंबून आहे. हिंदी चित्रपटसृष्टी मुंबईतच असल्याचा फायदा सोडाच, उलट तोटाच चित्रपटातल्या आणि संगीतामधल्या मराठीला झाला आहे.

मी सुरुवातीलाच म्हटलं की भावसंगीत प्रवाही असतं. या संगीताचा आणखी एक गुण असतो. हे संगीत समाजातले बदल जितक्या प्रमाणात टिपत असतं तितक्या प्रमाणात लोकसंगीत किंवा अभिजात संगीत टिपत नाही. रहमानचा प्रभाव जसा हिंदी चित्रपटसंगीतातल्या इतर संगीतकारांवर पडला तसाच तो अनेक मराठी संगीतकारांवरही पडला. मराठी संगीतकारांची नवी पिढी ही जुन्या मराठी संगीतकारांच्या प्रभावापेक्षा रहमानच्या प्रभावाखाली जास्त आहे. याचा परिणाम आपल्याला स्वरवाक्यांवर दिसतो. मराठीतही स्वरवाक्यं (musical phrases) छोटी होत गेली आणि या स्वरवाक्यांची पुनरुक्ती हा चालीचा पॅटर्न बनत चालला आहे.

स्वररचनेत झालेला आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे 'हुक लाइन' वर आधारित रचना. याचा अर्थ असा की स्वररचनेमध्ये धृवपदाच्या शेवटी एक स्वरवाक्य असं येतं ज्याची पुनःपुन्हा आवृत्ती होते आणि त्या स्वररचनेची ती ओळ ओळख होते. आपल्या डोक्यातही तीच ओळ घोळत रहावी या हेतून तिची रचना केली जाते. 'माऊली माऊली' या गाण्याचं उदाहरण देता येईल, किंवा 'डिबाडी डिबांग' किंवा मीच केलेलं 'परवरदिगार' ही सर्व गाणी 'हुक लाइन'वर जोर देणाऱ्या स्वररचना आहेत.

या लेखाच्या सुरुवातीला पं. सत्यशील देशपांडेंचं एक वाक्य मी उद्धृत केलं आहे, की शब्दोच्चार बदलले की स्वरोच्चारही बदलतात. हेच थोडं बदलून मला असं म्हणायचं आहे की स्वररचना बदलली की भाषाही बदलते. हुक-लाइनवर आधारित स्वररचना आल्या की छोटे छोटे शब्द वापरण्याकडे कल वाढतो.

मराठी संगीतामध्ये आणखी एक महत्त्वाचा बदल झाला तो असा की अनेक चित्रपटांचे निर्माते किंवा संगीत कंपन्यांचे चालक यांची मातृभाषा मराठी नव्हती. हल्लीचे अनेक दिग्दर्शकही मला असे माहीत आहेत ज्यांची मातृभाषा मराठी असली तरी हिंदी चित्रपटांच्या वातावरणात जास्त वावरत असल्यामुळे व्यवहारात मराठीपेक्षा हिंदी किंवा इंग्रजी जास्त वापरतात. याचमुळे मराठी चित्रपटांची हिंदी नावं आणि मराठी गाण्यांमध्ये हिंदी-इंग्रजी शब्दांचं प्रमाण वाढू लागलं. 'इश्कवाला लव' किंवा प्यारवाली लवस्टोरी' अशी शीर्षकं दिसू लागली आहेत.

दोस्ती के रास्ते, लव हुआ आस्ते,
इन्तज़ार करतो रे, बेक़रार होतो रे,
क्या सुहानी रात है, तीन लफ़्ज़ों की बात है,
मी कशाला डरतो रे, आह क्यों भरतो रे,
इस सफ़र का कौन राही, येऊनी सांगेल काही
I am waiting for you! ओ जानेजाँ!

अशी मिश्र भाषा ऐकू येऊ लागली आहे. माझं असं निरीक्षण आहे की अशी भाषा विशेष करून प्रेमगीतात जास्त दिसते आहे. याचं एक कारण म्हणजे प्रत्यक्ष प्रेम मराठी भाषेत कसं करावं

याबद्दलची तरुणांमधली संभ्रमावस्था. प्रेम व्यक्त करण्यासाठी इंग्रजीमधलेच तीन शब्द योग्य वाटतात हे मराठीत प्रेम व्यक्त करण्यासाठी भाषाच तयार झाली नाही याचं द्योतक आहे असं म्हणायला हवं. १९२५ साली डॉ. श्री.व्यं. केतकरांनी पु.य. देशपांडे आणि श्रीमती विमल कोल्हटकर यांच्या प्रेमविवाहानंतर एक पत्र लिहिलं होतं. या पत्रात डॉ. केतकर लिहितात –

''आपल्याकडे अनुनयोत्तर (after courtship) विवाह थोडेच होतात. आणि ह्यामुळें आपल्या विवाहाकडे भाषाविकासजिज्ञासु ह्या दृष्टीनें मी पाहातों. अनुनयास मराठी भाषा योग्य नाहीं असाहि भाषेवर अपवाद आहे. अनुनयोत्तर लग्नें अधिक होत गेलीं म्हणजे भाषेला निराळा संस्कार झाल्याशिवाय राहणार नाहीं. मनात आलेले आवेग कोणत्या मराठी शब्दांनीं परिस्फुटित होत गेले ह्यासंबंधाचें एकाच्या अनुभवाचें चित्र पुढल्या अनुनयांस खास उपयोगी पडेल. तुमची अनुनयक्रिया कांहीं अंशीं मराठीच्याच सहाय्यानें झाली असेल असें मी गृहीत धरतों. मराठींत प्रेमाची भाषा कशी बोलली जाते ह्याचे मासले अनुभविकांकडून मिळावयास पाहिजेत. प्रथमपरिचय, मग परिचयदृढता, आशयव्यक्ति. ह्या सर्वांचीं खरीं चित्रें वाङ्मयांत आली पाहिजेत. आजच्या मराठी कादंबऱ्यांत ह्या गोष्टीचा एक अभाव तरी असतो किंवा वर्णनें आलींच तर तीं काल्पनिक किंवा नकली असतात. ह्यासाठीं तुम्हांस अशी विनंती करतों कीं, ह्या बाबतींतला अनुभव गोष्टी लिहून किंवा 'नाट्यछटे'सारखे लेख लिहून प्रसिद्ध करावा. त्यांस 'विद्यासेवकां'त मी आनंदाने जागा देईन.''

हे पत्र वाचल्यावर वाटतं की श्री.व्यं. केतकर द्रष्टे असावे!

आज संगीतक्षेत्रातल्या मराठीला कुठल्याही प्रकारची दिशा द्यायची असेल तर सजग प्रयत्न आवश्यक आहेत. हे प्रयत्न जसे संगीतकारांकडून अपेक्षित आहेत, तसेच ते संगीताच्या रसिकांकडून आणि समाजातल्या बुद्धिजीवी लोकांकडूनही घडणं आवश्यक आहेत. गीतकारांकडे आणि विशेषतः गीत या काव्यप्रकाराकडे तुच्छतेनं बघितलं जाऊ नये. भावसंगीतासाठी जे अभ्यासक्रम तयार होतील (आणि तसे ते व्हावेत) त्यामध्ये भाषा या विषयाला अव्वल स्थान असावं. छंदशास्त्र, मात्रा, वृत्त याचा अभ्यास कवींनी आणि संगीतकारांनी करणं आवश्यक आहे हे मनात रुजवायला हवं. महत्त्वाचं म्हणजे आपल्या भाषेतलं संगीत ही आपली आणि आपल्या समाजाची गरज आहे हे रसिकांनी ओळखायला हवं. या संगीताची अशी ओळख पटवणं हे आपलं कर्तव्य आहे याचं भान संगीतकारांनी आणि गीतकारांनी ठेवावं! त्याच वेळी तंत्रज्ञानाविषयी मराठी गीतकार-संगीतकारांनी उदासीन राहू नये.

सगळंच चित्र काही उदासीन नाही. मराठी चित्रपटांचा दर्जा सुधारतोय. नव्या दमाचे संगीतकार नव्या दमाच्या दिग्दर्शकांना चांगला प्रतिसाद देत आहेत. 'अजिंठा', 'बालगंधर्व', 'फँड्री', रमा माधव', 'कापूसकोंड्याची गोष्ट' यासारखे भाषिक नमुने जपणारे चित्रपट तयार होत आहेत आणि त्या निमित्ताने तसं संगीतही निर्माण होत आहेत. पुन्हा एकदा प्रकाश होळकर, अशोक बागवे, यांच्यासारखे कवी चित्रपटाच्या गीतलेखनाकडे वळले आहेत. त्याबरोबर वैभव जोशी, संदीप खरे, गुरू ठाकूर, चंद्रशेखर सानेकर, दासू यांच्यासारखे लोक चित्रपट आणि चित्रपटाच्या बाहेर सकस असं गीतलेखन करत आहेत.


मराठी जपण्यात गाण्याची फार मोठी भूमिका असणार आहे हे आपण प्रत्येकानं ध्यानात ठेवायला हवं. एक इंग्रजी म्हण आहे - song has the longest life. आपण एका मुलाच्या किंवा मुलीच्या ओठावर आपल्या भाषेतलं एक गाणं दिलं तर ते मूल असेपर्यंत त्या गाण्याच्या निमित्तानं आपली भाषा, आपली संस्कृती जिवंत राहते. मुख्य म्हणजे आशावाद सोडता कामा नये. जोवर उडिपीतल्या देवळात लहान कोंकणी मुलं आजही मराठी भजनं गात आहेत तोवर संगीतक्षेत्रातील मराठीला आशाही आहे अन् दिशाही!

**– कौशल इनामदार**

**भ्रमणध्वनी** : ९८२०४५४५०५

ksinamdar@gmail.com

ग्रंथाली



**मराठीतील साहित्यलेणी**

**दीपक घारे**

**मूल्य १०० रु.**

**सवलतीत ६० रु.**

'लीळाचरित्रापासून 'संवादा'पर्यंतच्या निवडक मराठी ग्रंथांचा तपशील व थोडक्यात परिचय. प्रत्येक ग्रंथप्रेमीच्या संग्रही असायलाच हवे असे संदर्भपुस्तक!



# मराठी सिनेमा नव्या वळणावर

**संतोष पाठारे**

आशयाला पूरक अशा तंत्राच्या साहाय्याने प्रेक्षकांचं मनोरंजन करणारा सिनेमा असं नेमक वर्णन आजच्या मराठी सिनेमाबद्दल खात्रीने करता येईल. भारतात आणि परदेशातही सध्या मराठी सिनेमातील विषयवैविध्याचे कौतुक होताना दिसत आहे. हिंदी चित्रपटसृष्टीच्या विशेषतः बॉलिवूडच्या सावलीत उभ्या राहिलेल्या मराठी सिनेमाचं 'आशय' हेच एक मुख्य बलस्थान आहे.

भारतातल्या चित्रपटसृष्टीची मुहूर्तमेढ दादासाहेब फाळके या मराठी गृहस्थांनी केली असली आणि व्ही. शांतारामसारख्या प्रतिभासंपन्न दिग्दर्शकांनी अनेक अभिजात कलाकृती निर्माण केल्या तरीही मराठी चित्रपटसृष्टी नेहमीच दुय्यम स्थानावर राहिली. मराठी चित्रपटांचं बजेट, सदोष व्यवस्था व मर्यादित प्रेक्षकवर्ग यामुळे मराठी सिनेमा एका विशिष्ट चाकोरीत फिरत राहिला. ग्रामीण व कौटुंबिक कथानकामध्ये अडकलेल्या मराठी सिनेमावर सत्तरच्या दशकात सुरू झालेल्या समांतर चळवळीचा थोडाफार प्रभाव पडला.

पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूट मधून चित्रपटनिर्मितीचे प्रशिक्षण घेतलेली व नाट्य क्षेत्रात आपले वेगळेपण सिद्ध केलेली अरुण खोपकर, अमोल पालेकर, डॉ.जब्बार पटेल, सत्यदेव दुबे, जयू-नचिकेत पटवर्धन यांसारख्या मंडळीनी शांतता कोर्ट चालू आहे', सामना', २७ जून १८९७', आक्रीत', उंबरठा' सारखे ऑफबीट सिनेमे मराठीत निर्माण केले. विजय तेंडुलकरांसारख्या सिद्धहस्त पटकथा लेखकाचा  निर्मितीमध्ये महत्त्वाचा सहभाग होता. या सिनेमांची दखल फिल्म फेस्टिव्हलच्या वर्तुळात घेतली गेली व राज्य सरकारच्या पारितोषिकांनी त्यांना गौरवले गेले तरीही त्यामुळे मराठी चित्रपटांच्या एकूण वाटचालींवर त्याचा फारसा परिणाम झाला नाही हे मात्र खरं! याच दरम्यान मराठी सिनेमामध्ये विनोदी सिनेमांची लाट आली. दादा कोंडकेंचे विनोदी चित्रपट सातत्याने व्यावसायिक यश मिळवत होते. त्यांच्या मागोमाग सचिन, महेश कोठारे, अशोक सराफ आणि लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या विनोदी चित्रपटांनी धुमाकूळ घातला. 'नवरी मिळे नवऱ्याला', 'धुमधडाका', 'अशी ही बनवाबनवी' सारखे काही मोजके चित्रपट प्रेक्षकांचे मनोरंजन करणारे होते यात वादच नाही पण या चित्रपटांच्या यशानंतर मराठी चित्रपट म्हणजे विनोदी चित्रपट असं एक समीकरण बनून गेलं. विजय कोंडकेंच्या 'माहेरच्या साडी'ने या दरम्यान




मराठी चित्रपटाला देदिप्यमान यश मिळू शकतं याचा दाखला दिला. एका बाजूला बिनडोक विनोदी चित्रपट आणि दुसऱ्या बाजूला तीन तास रडण्याची हमी देणारा कौटुंबिक जिव्हाळ्याचा चित्रपट यामध्ये मराठी सिनेमा त्याचं नेमकं वैशिष्ट्य शोधत होता. नाही म्हणायला राजदत्तचे 'शापित', 'पुढचं पाऊल', स्मिता तळवलकरांचे 'कळत नकळत', 'चौकट राजा', 'तू तिथं मी' या सारख्या चित्रपटांनी मराठी चित्रपटातील सकस आशय कायम ठेवण्याचं काम केलं. सुमित्रा भावे, सुनिल सुखथनकर ही दिग्दर्शक द्वयी मराठीच्या चौकटीत राहूनही वेगळ्या वाटेवरील वेगळ्या चित्रपटाची निर्मिती करत होती. या वेगळ्या वाटेला अधिक वेधक करण्याचं काम संदिप सावंतच्या 'श्वास'ने केलं. 'श्वास'ची कथा, सादरीकरण यात ताजेपणा होता. एक संवेदनशील विषय हाताळणारा 'श्वास' ऑस्करवारीमुळे अमराठी प्रेक्षकांमध्ये कुतूहल व कौतुकाचा विषय ठरला. मराठी सिनेमा केवळ मराठी प्रेक्षकांपुरताच असतो या समजाला छेद देण्याचं काम 'श्वास'ने केलं. त्याच्या पाठोपाठ आलेल्या निशिकांत कामतच्या 'डोंबिवली फास्ट' या क्राईमथ्रिलरने मराठी चित्रपट असाही असू शकतो याचं उत्तम उदाहरण घालून दिलं. 'माझा सिनेमा हा केवळ सिनेमा असतो, तो मराठी किंवा हिंदी नसतो' असं ठामपणे म्हणणारा सचिन कुंडलकर, जागतिक सिनेमाचा प्रभाव असूनही मराठी माणसाला रुचेल असा चित्रपट निर्माण करणारे उमेश कुलकर्णी, मंगेश हाडवळे यासारख्या तरुण अभ्यासू दिग्दर्शकांची फळी गेल्या

दहा वर्षामध्ये मराठी चित्रपटसृष्टीत उभी राहिली आहे. पारंपरिक मराठी प्रेक्षकांना आवडणारे चित्रपट आजही निर्माण होत आहेत. जत्रेतल्या प्रेक्षकांची आवड लक्षात घेऊन निर्माण केल्या जाणाऱ्या या चित्रपटांची संख्या तुलनेने जास्त असली तरीही 'श्वास' नंतर अधिक सकस आशयाच्या मराठी चित्रपटांच्या संख्येत लक्षणीय वाढ झालीय ही वस्तुस्थिती आहे.

**आशयाला पूरक अशा तंत्राच्या साहाय्याने प्रेक्षकांचं मनोरंजन करणारा सिनेमा असं नेमक वर्णन आजच्या मराठी सिनेमाबद्दल खात्रीने करता येईल. भारतात आणि परदेशातही सध्या मराठी सिनेमातील विषयवैविध्याचे कौतुक होताना दिसत आहे. हिंदी चित्रपटसृष्टीच्या विशेषतः बॉलिवूडच्या सावलीत उभ्या राहिलेल्या मराठी सिनेमाचं 'आशय' हेच एक मुख्य बलस्थान आहे.**

गेल्या दहा वर्षात अनेक प्रमुख शहरात आयोजित होत असलेले आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, त्यांना पूरक असलेली फिल्म सोसायटी चळवळ यांनी चांगला प्रेक्षक घडवण्याचं काम केलंय त्याच बरोबरीने फिल्म फेस्टिव्हल मधील उत्तमोत्तम चित्रपट पाहणारे व फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये फिल्म मेकिंगचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेणारे दिग्दर्शक व तंत्रज्ञ यांनी मराठी चित्रपटाच्या वाढीला हातभार लावलाय.

भारतातील इतर राज्यांमध्ये मराठी चित्रपटांचा दबदबा वाढतोय, अमराठी कलावंत व तंत्रज्ञांना मराठी चित्रपटात काम करण्याची इच्छा निर्माण होतेयं व अमराठी प्रेक्षक आवर्जून मराठी चित्रपट पाहण्यासाठी थिएटरमध्ये येतोय, ही स्थिती मराठी चित्रपटसृष्टीला सुखावणारी आहे. या स्थितीला कारणीभूत असणारा प्रमुख घटक म्हणजे हिंदी चित्रपटसृष्टीची स्पर्धा असूनही व तिथे शिरकाव करण्याचा वाव असतानाही आवर्जून मराठी चित्रपट निर्माण करण्याचा निर्णय घेणारे दिग्दर्शक.

सचिन कुंडलकरने 'रेस्टॉरंट', 'निरोप', 'गंध' आणि नुकत्याच प्रदर्शित झालेल्या 'हॅपी जर्नी'मधून वेगवेगळ्या मानवी संवेदना टिपणाऱ्या कथांची मांडणी तरलपणे केली आहे. 'हॅपी जर्नी'मधील भाऊ बहिणीच्या नात्यातील वेगळ्या पैलूचा सचिन कुंडलकरने घेतलेला वेध करण कुलकर्णीच्या संगीतातील ताजेपणा व रंगराजन रामबद्रन यांच्या प्रसन्न छायाचित्रणामुळे प्रेक्षणीय झालाय. तीन लघुपटांना आशयसूत्रात गुंफून निर्माण केलेला 'गंध' हा मराठी चित्रपटसृष्टीतील सचिनने केलेला एक उल्लेखनीय प्रयोग म्हणायला हवा. विजू माने, गजेंद्र आहिरे, रवि जाधव व गिरीश मोहिते या चार दिग्दर्शकांनी चार मान्यवर कवींच्या कवितांना लघुपटांच्या माध्यमातून चित्रबद्ध केलेला 'बायोस्कोप' हे 'गंध'च्या पुढचं पाऊल आहे.

सचिन कुंडलकरप्रमाणेच पुण्याच्या उमेश कुलकर्णीने मराठी मातीशी इमान राखणारा 'वळू' निर्माण केला. बोजड कलाविष्कारा ऐवजी उपहासात्मक विनोदाचा आधार घेत विविध स्वभावाच्या व्यक्तिरेखा हे उमेश कुलकर्णीच्या 'वळू', 'देऊळ'चं खास वैशिष्ट्य म्हणायला हवं. उमेश कुलकर्णीच्या 'विहीर'मुळे मराठी चित्रपटांच्या निर्मितीत कॉर्पोरेट कंपन्यांचा सहभाग सुरु झाला. सरकारी अनुदानावर अवलंबून राहण्यापेक्षा दर्जावर भर देऊन, जाहिरातींच्या माध्यमातून अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत आपला चित्रपट पोहचवण्याचे व त्यातून नफा कमवण्याचा मार्ग मराठी सिनेमांना उपलब्ध झाला. महेश मांजरेकरांचा 'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय', रवी जाधवचे 'बालक पालक', 'टाईमपास' या चित्रटांच्या व्यावसायिक यशात त्यांच्या प्रसिद्धीचा अधिक वाटा आहे. थिएटर प्रदर्शन, चित्रपट महोत्सवात समावेश, दूरचित्रवाणीवरील प्रदर्शनाचे हक्क यातून निर्मितीचा खर्च व नफा यांची हमी मिळाल्यामुळे मराठी चित्रपट निर्मात्यांची संख्याही वाढली आहे. चित्रपटाची निर्मितीमूल्य उच्च दर्जाची असतील तर प्रेक्षक थिएटरमध्ये चित्रपटाचा आस्वाद घ्यायला येतात. गेल्या दहा वर्षात मल्टिप्लेक्सची वाढलेली संख्या देखील मराठी चित्रपट निर्मीतीला पोषक ठरली. या वातावरणाचा फायदा घेऊन परेश मोकाशी, सतीश मन्वर, राजीव पाटील, श्रीहरी साठे, राजेश पिंजानी, शिवाजी लोटण पाटील यांनी आपल्या नव्या कल्पना चित्रपट माध्यमातून मांडल्या. मराठी चित्रपट म्हणजे केवळ ग्रामीण जीवनातील वेदना न राहता शहरी जीवनाचं संवेदनशीलपणे चित्रण देखील 'इन्व्हेस्टमेंट', 'संहिता', 'अस्तु' यासारख्या चित्रपटातून केलं गेलं. या सगळ्या दिग्दर्शकांमुळे मराठी सिनेमा बहुविध झाला पण त्यात महत्त्वाचा वाटा आहे तो कलाकार व तंत्रज्ञांचा! अमलेन्दु चौधरी (गंध, हरिश्चंद्राची फॅक्टरी) महेश लिमये (यलो, बालगंधर्व, नटरंग), संजय जाधव (चेकमेट, रिंगारिंगा), शैलेश अवस्थी (मी शिवाजीराजे भोसले बोलतोय) यासारख्या अनेक छायाचित्रकारांनी मराठी चित्रपटांना प्रेक्षणीय बनवण्यासाठी, दिग्दर्शकाच्या मनातील कल्पना प्रतिमेद्वारे पडद्यावर प्रभावीपणे मांडल्यात.

या सर्वांचाच परिणाम म्हणून मराठी चित्रपट आज भारतीय प्रादेशिक चित्रपटसृष्टीतल्या प्रमुख स्थानावर आलाय. यंदाच्या गोव्यातील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'किल्ला', 'डॉ. प्रकाश बाबा आमटे', 'लोकमान्य', 'एलिझाबेथ एकादशी', 'एक हजाराची नोट', 'ए रेनी डे' आणि 'यलो' हे तब्बल सात चित्रपट भारतीय पॅनोरमा मध्ये दाखवण्यात आले ही घटना मराठी चित्रपटसृष्टीला अभिमानास्पद आहे. नागराज मंजुळेचा 'फॅण्ड्री', श्रीहरी साठेंचा 'एक हजाराची नोट' हे चित्रपट आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळवत आहेत. चैतन्य ताम्हाणेने दिग्दर्शित केलेला 'कोर्ट' हा चित्रपट तर केवळ मराठीतच नव्हे तर भारतीय चित्रपटातील एक आगळा वेगळा प्रयोग म्हणून गौरवला जातोय. मराठी चित्रपटांना मिळवलेलं हे आश्वासक स्थान टिकवून ठेवणं हे आता आपल्या सारख्या सुजाण प्रेक्षकांचंही कर्तव्य आहे!

**– संतोष पाठारे**

भ्रमणध्वनी : ९८२०३७४०९३

santosh_pathare1@yahoo.co.in

# भाषेच्या कविता

मूळ हिंदी कविता

**भावानुवाद – वीणा सानेकर**

## मला हवी आहे

मला हवी आहे पूर्ण पृथ्वी...
तिच्या झाडांनी, समूहांनी आणि माणसांनी घेरलेली...
एक छोटंसं घर पुरेसं नाही...
एका खिडकीनंही होणार नाही माझं काम...
मला हवंय संपूर्ण आकाश
त्याच्या असंख्य नक्षत्रांनी आणि ग्रहांनी गच्च भरलेलं...
एका छोट्याशा कंदिलानं संपणार नाही माझा अंधार
मला हवाय एक धगधगीत ज्वलंत सूर्य.
थोड्याशा शब्दांनी नाही रचू शकत मी कविता
मला हवी समग्र भाषा...
सारी हिरवाई पृथ्वीची
सारी निळाई आकाशाची
सारी लाली सूर्योदयाची!

**– अशोक वाजपेयी**

## मातृभाषा

जशा मुंग्या परततात बिळांमध्ये
सुतारपक्षी परततो त्याच्या ढोलीकडे
विमानं परततात एकामागून एक
लाल आकाशात पंख पसरत
विमानतळाच्या दिशेने...
हे माझ्या मायभाषे,
मी परततो आहे तुझ्यात तेव्हा...
जेव्हा गप्प राहता राहता
आखडते माझी जीभ
आणि दुखू लागतो माझा आत्मा

**– केदारनाथ सिंह**

## इंग्रजी

इंग्रजांनी इंग्रजी शिकवून प्रजा तयार केली
इंग्रजी शिकवून आता आम्ही राजा तयार करत आहोत.

**– रघुवीर सहाय**

## भाषेच्या उद्ध्वस्त परिस्थितीत

प्लॅस्टिकची झाडं
नायलॉनची फुलं
रबराची चिमणी
टेपवर विस्मृतीत गेलेल्या
लोकगीतांच्या उदास लड्या...
एक झाड जेव्हा सुकतं...
तेव्हा सर्वात आधी सुकतात
त्याचे सर्वात कोमल भाग...
त्याची फुलं... त्याची पानं...
एक भाषा जेव्हा सुकते
तेव्हा शब्द हरवू लागतात त्यांचं कवित्व
हरवू लागतात भाव-भावनांचं ताजेपण,
विचारांचं सच्चेपण...
वाढत जातात वाढत्या लोकांदरम्यान
अनोळखीपणाच्या ओसाड दऱ्या...
मी असा विचार करतोय विचारांच्या बाबतीत
की कशाप्रकारे सांगता येईल त्यांच्याबद्दल की जेणेकरून
सगळ्यांचं लक्ष त्यांच्याकडे जावं...
भाषेच्या उध्वस्त परिस्थितीत
जर कुठे आग लागणारच असेल तर सर्वप्रथम तिथे लागेल
जिथे शुष्क काष्ठ झालेल्या असतील
आपल्या जमिनीतून रस शोषून घेणाऱ्या सर्व शक्ती!

**– कुँवर नारायण**

## भाषेचा आवाज

बोलता बोलता अचानक माझा आवाज
जुन्या सेवकांसारखा वाटला
मला अचानक जाणवलं,
ज्या भाषेत मी विचार करतोय आणि बोलतोय
ती गुलामांची भाषा आहे
पण हे कधी झालं आणि केव्हा झालं?
मला तर वाटलं की ही आमच्या स्वातंत्र्यसंग्रामाची भाषा आहे
स्वतंत्रता आणि नव्या शहरांच्या निर्मितीदरम्यान
लाखो लोकांनी आपल्या जुन्या वस्त्या
उजाड होण्याच्या आणि नव्या वस्त्यांच्या वसण्याच्या प्रक्रियेत
घडवलंय आमच्या या भाषेला...
तिच्यात त्यांच्या आपापसातील गप्पांचे आणि
गाण्याबजावण्याचे आवाज आहेत.
त्यांच्या कामा-धंद्यातील अडचणी, त्यांची सुखं-दुःख
यांनी बनली आहे ही भाषा
मुलगी देऊन जोडली आहेत त्यांनी
नात्यांसह नवी कुटुंबे...
पण कदाचित आमच्याकडूनच झाली होती चूक
किंवा आम्हीच पाहू शकलो नाही की आमच्या
स्वातंत्र्यसंग्रामाची भाषा निर्णयाची भाषा नव्हती.
अर्ध्या रात्रीच्या अंधारात निर्णय तर त्याच
सत्तेच्या भाषेत लिहिले गेले होते,
जिच्या विरुद्ध आम्ही लढलो होतो
बाजाराने आधीच चोरली होती नाणी
आम्ही खिशात ठेवलेली...
आणि आता तो सौदा करू पाहतोय
आमच्या भाषेचा आणि स्वप्नांचा.
जुन्या अनुभवाची वस्त्रं लेवून
नव्या समीक्षेच्या परिभाषेसमोर उभा होतो मी
सैरभैर झाल्यासारखा...
आणि नव्या बाजारात सौदा करणाऱ्या
एका विदूषकासारखा वाटू लागतो

महत्त्वाकांक्षेच्या मायानगरीत कुठेच नव्हती
आमची भाषा...
कुठेतरी दूर कानाकोपऱ्यात कधी-कधी
ऐकू येत होता तिचा खूप अस्फुट आणि पराभूत आवाज
लढल्याशिवायच हरू लागलो आम्ही
आमची लढाई...

**– राजेश जोशी**

## शब्द

वायूंना नाव द्या
शब्द सृष्टीचे संचित आहे
बोलणं ओठांची कसरत नाही
लिहिणं बोटांचा खेळ नाही
शब्द असण्याचा पुरावा आहे
तो एक विराट मौन सोडायला लावतो
एका निबिड अंधारातून वर काढतो
काय माध्यम आहे आमच्याकडे
त्या दिक्कालाशी झुंजायचं,
ज्याच्या मधोमध आम्ही फेकले गेलो आहोत!

**– विश्वनाथप्रसाद तिवारी**

## अशी भाषा

अख्खं आयुष्य मुलांना शिकवली भाषा
आणि पाठवणी करताना त्यांची,
जवळ नव्हता एकही असा शब्द
जो देऊन म्हणू शकलो असतो...
घ्या... याला सांभाळून ठेवा
हा संकटकाळी कामी येईल
किंवा हा तुम्हाला शरमेपासून वाचवेल
किंवा हा तुम्हाला पडण्यापासून सावरेल
किंवा गरज लागली तर हा तुम्हाला रोखेल
किंवा तुम्ही याच्या आधारे कोणत्याही नीचपणाचा
सामना करू शकाल
किंवा इतकंच की कधी-कधी तुम्ही यानं आपलं
रितेपण भरू शकाल.
किंवा हा शब्द भाकरीच्या दोन चतकोरांपेक्षा मोठा आहे
पण काहीच नव्हतं माझ्यापाशी
'काहीच नाहीय' हे सांगायलाही भाषा नव्हती.

**– भगवत रावत**

## रोहन प्रकाशन — अतुल कहाते लिखित ३ नवी पुस्तकं

### इंटरनेट वापरणाऱ्या प्रत्येकासाठी

इंटरनेटचा वापर 'सुरक्षित'पणे व 'स्मार्ट'पणे
कसा करावा याबाबत 'साक्षर' करणारं
उपयुक्त पुस्तक...मराठीत प्रथमच!

**इंटरनेट वापरातील धोके टाळण्यासाठी**

**अर्थात सायबर सिक्युरिटी**

ऑनलाइन खरेदी, क्रेडिट/डेबिट कार्ड, इंटरनेट बँकिंग
तसेच फेसबुकसारख्या सोशल नेटवर्किंग साइट्स
इत्यादींच्या सुरक्षित वापराबाबत सर्वांगीण मार्गदर्शन

पृष्ठं : १९२ • किंमत रु.२०० • **सवलतीत रु. १६०**

### भारतातील 'आयटी' उद्योगाच्या विलक्षण प्रवासाचा रंजक मागोवा...

*मराठी व ENGLISH दोन्ही भाषेत उपलब्ध*

**'केवळ 'आयटी'तच...!'**

भारतातील एका 'बूमिंग' उद्योगाचा उगम, विस्तार व त्याचे सामाजिक परिणाम

पृष्ठं : १६० • किंमत रु.१५०

**IT HAPPENS ONLY IN I.T.**


FASCINATING STORY OF THE INDIAN 'I.T.' INDUSTRY

Pages : 208 • Price Rs.199

## रोहन प्रकाशन — २ लोकप्रिय लेखिकेंची २ नवी पुस्तकं

### पद्मजा फाटक (मजेत)

**यांच्या लेखणीतून साकार झालेलं अनोख्या रत्नांनी डवरलेलं शेवटचं पुस्तक**





*काही अनुभवपर,
चिंतनशील,
वैचारिक
तर काही
निखळ लालित्यपूर्ण
लेख...
व्यापक
जीवनानुभूती
देणारा लेख संग्रह*

पृष्ठं : २०८ • किं. रु.२०० • **स्वागतमूल्य रु. १६०**

### शोभा बोंद्रे लिखित सत्यकथा...

**सत्यकथा एका झरीनाची गगनाला गवसणी घालणाऱ्या उमेदीची!**




*सुखी संसाराचं,
एका उबदार
घरट्याचं स्वप्न
उद्ध्वस्त होतं...
तरीही
आयुष्याच्या लढाईत
झरीना खंबीरपणे
उभी राहते!
एक गुंतवून
ठेवणारी
उद्बोधक कथा*

पृष्ठं : २५२ • किं. रु.२४० • **स्वागतमूल्य रु. २००**

रोहन प्रकाशन
५ व ६ धवलगिरी, शनिवार पेठ, पुणे ३०
✆ पुणे २४४८०६८६ मो. ८१४९१२०२१०
✆ मुंबई २३८९२३७८ मो. ९८६९११८७६२

अधिक माहिती व ONLINE SHOPPING यासाठी भेट द्या
**www.rohanprakashan.com**

# विविध प्रकाशने




सुजय शास्त्री लिखित **डॉ. मनमोहनसिंग एक वादळी पर्व** पुस्तकाचे प्रकाशन

श्रीधर पाटील, सुदेश हिंगलासपूरकर, मनमोहनसिंग, सुजय शास्त्री, कुमार केतकर, अनुराधा कोगेकर, शारदा साठे.




कवी मनोहर जाधव लिखित **तीव्र एकांतातल्या जीर्ण काळोखात** पुस्तकाचे प्रकाशन

लतिका भानुशाली, उत्तम कांबळे, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, रावसाहेब कसबे, वसंत आबाजी डहाके, मनोहर जाधव



पद्मा कऱ्हाडे लिखित **स्वान्त सुखाय** आणि **भटकंतीची साथ** पुस्तकांचे प्रकाशन

पुरुषोत्तम कऱ्हाडे, सी.ई. पोतनीस, दिनकर गांगल, पद्मा कऱ्हाडे, प्रशांत कऱ्हाडे, अनघा कऱ्हाडे.



कवियत्री मंदाकिनी पाटील लिखित **अनाहत** कविता संग्रहाचे प्रकाशन

सतीश सोळांकूरकर, नीरजा, अशोक बागवे, अरुण म्हात्रे, श्रीधर पाटील.

## सोलापूरचा संस्कृतिवेध – क्षणचित्रे





फिरते ग्रंथ प्रदर्शन.




संस्कृतिवेध : अनुभव कथन.
शेखर रेडे, वैभव मोडक,
राजा पटवर्धन.




अक्षरभाषेकडून चित्रभाषेकडे,
दिनकर गांगल विचार मांडतांना.
सहभाग : धनंजय गांगल,
डॉ. गो.मा. पवार, प्रा. सुहास
पुजारी, संजय भास्कर जोशी,
प्रा. रविंद्र चिंचोळकर.



पंढरपूर संस्कृती शिबिर.
दिनकर गांगल संवाद साधतांना.

## मराठी चित्रपटातील नवी लाट




या चर्चेत बोलताना समीर पाटील.




या चर्चेत बोलताना अमोल साफळकर.




या चर्चेत बोलताना संजय भास्कर जोशी.



उस्मानाबाद इथे रंगली गझल मैफल. सादरीकरण करताना चंद्रशेखर सानेकर आणि भाग्यश्री केसकर.

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**
**संपर्क : ९८६९२०७४०३**

'अंतिम समय तुरुंगाच्या दाराशी हजर झाला आहे. याक्षणी मी आता परमेश्वराचे स्मरण करू लागलो तर, तो समजेल हा भेकड आहे. तो हसेल माझ्यावर उपहासाने. आणि म्हणेल, या भेकडाला आता माझी आठवण आली, मृत्यू दाराशी आल्यानंतर. संपूर्ण आयुष्यात कधीही माझे स्मरण केले नाही. यापेक्षा मी असाच या जगातून गेलेला ठीक राहील, जसा आतापर्यंत जगत आलो. त्यामुळे कदाचित लोक म्हणतील, भगतसिंग नास्तिक होता. त्याने ईश्वरावर कधी विश्वास ठेवला नाही. परंतु एक, भगतसिंग भेकड होता, असे कुणीही म्हणू शकणार नाही.'

या परिच्छेदावरून लक्षात आले असेल, हे मनोगत शहीद भगतसिंगाचे आहे, तर ते खरे आहे. भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या क्रातिवीरांना फाशीच्या तख्तावर उभे करण्यात आले. समोर फाशीचा दोर त्यांच्या गळ्याला आलिंगन देण्यास आतूर होता. त्यावेळीही या ध्येयाधीर वीरांच्या ओठांवर उत्स्फूर्त शब्द होते,'इन्किलाब झिंदाबाद!' इथे ईश्वराच्या स्मरणाला जागाच होतीच कुठे?




'रंग दे बसंती चोला' हे स्मिता भागवत यांचे नवीन पुस्तक. त्यांच्या लेखनसंपदेतील हे एकावन्नावे पुस्तक. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या वीरांची गाथा ही नेहमीच प्रत्येकाला प्रेरणादायी वाटत आली आहे. तिचा अभिमान वाटत आला आहे. अंदमान म्हटले की आपणास स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे स्मरण आवर्जून होते. परंतु त्यांच्यासोबत काळ्या पाण्याची शिक्षा भोगणारे जवळपास सातशे स्वातंत्र्यसैनिक तेथे होते. त्यांची यादी पाहताना, सगळीच नावे आपल्या परिचयाची नाहीत, याची जाणीव लेखिकेला तीव्रतेने होते. अशा या आपणास अज्ञात असलेल्या वीरांची अवस्था म्हणजे ' नाही चिरा नाही पणती' अशी. सुखदेव लाहोरच्या तुरुंगात असताना त्यांनी गांधीजींना लिहिलेल्या पत्रात हेच नमूद केले आहे, 'सशस्त्र क्रांती करणारे काही आम्ही तिघेच नाही. परंतु प्राणदंड जाहीर झालेले, हिंदुस्थानच्या प्रजेचे अमाप प्रेम आणि आदर ज्यांनी मिळवला आहे असे आम्ही तीन वीर आहोत. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव ही नावे साधारणपणे माहीत असलेला प्रत्येक भारतीय आहे असे ठामपणे सांगता येईल. परंतु अनेक असे क्रांतिकारक आहेत, त्यांची ओळख आपणास नाही. काळाच्या उदरात गडप होताना त्यांनी कधी आपल्या उदरनिर्वाहासाठी कुणाकडे हात पसरला नाही. नाही पुरावे दाखवून लाभ घेतले. अशा क्रातिवीरांचा शोध घेणे आवश्यक आहे. त्यांचे कार्य, त्याग, बलिदान नव्या पिढीला ज्ञात झाले पाहिजे. ही तळमळ ठेवून लेखिकेने या पुस्तकाचा संकल्प ठेवला असल्याचे दिसून येते.

या पुस्तकात आलेले क्रांतिवीर आहेत, चंद्रशेखर आझाद, सुखदेव थापर, शिवराम हरी राजगुरू, बटुकेश्वर दत्त, भगवतीभाई व्होरा आणि त्यांची पत्नी दुर्गाभाभी, महावीरसिंग, जतींद्रनाथ दास, भगतसिंग आणि त्याचे वडील, किशनसिंग, काका अजितसिंग व स्वर्णसिंग. या सगळ्यांचा इतिहास सादर करताना केवळ क्रांतीची ओळख व्हावी, इतकाच मर्यादित हेतू लेखिकेने ठेवलेला नाही. तर वीरांची मानसिकता, त्यांच्या चळवळीची पद्धत, शिस्त, अंमलबजावणीतला काटेकोरपणा, त्यांचे तारुण्यसुलभ वागणे, बोलणे, स्वभाव, पेहराव, शारीरिक क्षमता, गुणदोष आणि ध्येयाकडे घेऊन जाणारा खंबीरपणा, यांचीही ओळख करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. बाळाचे पाय पाळण्यात दिसतात म्हणतात. तसे क्रातिकारकांचेही पाय पाळण्यात दिसत होते. अशा क्रातिकारकांच्या आठवणींचे स्वतंत्र प्रकरण यात दिलेले आहे. क्रांतिकारकांच्या रोमांचक कथा एका प्रकरणात दिलेल्या आहेत. आपल्या संशोधनात मिळालेली माहिती परिशिष्टात दिलेली आहे. सशस्त्र क्रंातीचा अनुरोध करताना 'हिसप्रस'ने प्रसंगोपात सादर केलेली काही निवडक निवेदने दिलेली आहेत. त्यात असेंब्ली हॉलमध्ये बॉम्ब फेकल्यानंतर बटुकेश्वर आणि भगतसिंगाने उधळलेले निवेदन, बाँबचे तत्त्वज्ञान, यांचा समावेश आहे. क्रांतिवीरांनी लिहिलेली पत्रे, क्रातिकारकांची मूळ नावे आणि धारण केलेली नावे, झालेल्या शिक्षा व त्यांचा बलिदानाचा दिनांक, यांची माहिती या परिशिष्टात दिलेली आहे. त्यामुळे थोडक्यात तरी पुरेशी माहिती असलेली ही क्रातिवीरांची गाथा ठरते.

यात आलेले काही शेर लक्षात ठेवावेत असे आहेत,

'मेरे खूनसे हाथ रंगकर बोले, क्या अच्छा है रंग, अब उम्रभर मंहेदी रचना मना है'

'शहीद हुआ हो प्रीतम जिसका, वह बेवा नही, सुहागन है!'

मनोज आचार्य यांचे मुखपृष्ठही पुस्तकाच्या नावाला साजेसे झाले आहे.

• **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**
**संपर्क : ९८६९२०७४०३**




'वारी हे मोठे विश्व आहे. विठ्ठलभक्ती हे त्या विश्वाचे आदितत्त्व आहे. जीवनाची नैतिकता हे त्याचे व्रत आहे. आध्यात्मिक आणि सामाजिक मूल्यांशी जोडून आपले जीवन अधिकाधिक प्रामाणिक करणे हाच त्याचा संस्कार आहे. तर 'आत्मोपम्येन सर्वत्र '– या गीतेच्या वचनाप्रमाणे, आपल्यातून विश्वाला तर संपूर्ण विश्वातून आपल्याला पाहणे आणि समभावाचे दर्शन घडविणे हा त्याचा धर्म आहे.'

'महाराष्ट्रातला विठ्ठल हा असा एकमेव देव आहे की, त्याचे दर्शन होत नाही. त्याची भेट घेता येते. दर्शनामध्ये अंतराय असतो. भेटीमध्ये एकरूपता असते. 'दर्शन' नेत्रांना सुख देते; तर 'भेट' देहालाच रोमांचित करीत असते. एकात 'लीनता' असते. तर दुसऱ्यात 'तल्लीनता' असते. म्हणूच 'ऐसा ठाव नाही कोठे , देव उभा–उभी भेटे.' ही ओळ अनेकांच्या ओठावर आपोआप उमटते.'

वरील पहिला परिच्छेद आहे 'माझी वारी' या लेखातला. यात लेखक त्यांचा विठ्ठलवारीचा अनुभव कथन करतात. ही वारी नुसती विठ्ठलाची नाही. तर ते करत असलेल्या संशोधनाला तत्त्वचिंतनाची अनुभूती देण्यासाठीची उत्कटता आहे. लेखक आहेत रामचंद्र देखणे. तर वरील दुसरा परिच्छेद आहे डॉ. द.ता.भोसले यांच्या 'आषाढीचे पंढरपूर' या लेखातला. त्यांचे वास्तव्यच पंढरपुरी असल्याने विठ्ठलमय झालेले. पंढरपुरी येणाऱ्या वारीविषयी पंढरपूरकरांना वाटणाऱ्या अप्रूपाची ते भेट घडवतात. वाचकाला पुन्हा पुन्हा विठ्ठलाची डोळे भरून भेट घडवल्याची अनुभूती देतात, हे या दोन लेखांचे मोठेपण.

वृत्तपत्रात काम करताना रात्रीचा दिवस करावा लागणे हे सर्वानाच ठाऊक. परंतु त्यानंतर शेवटची गाडी नाही मिळाली तर पहिल्या गाडीपर्यंत थांबणे आलेच. अशावेळी दिसणारा दिवस किती उजळ आणि तितकाच उघड असतो याचे दर्शन घडते ते 'मध्यरात्रीचा सूर्य' वाचताना. पावभाजी, चहावाला बबन, बंगाली मैत्रीण, कोवळा पोरगा, डेड बॉडी, नामदेव ढसाळ यांच्याशी प्रदीप म्हापसेकरांसोबत आपणही परिचित होत जातो. अरुण शेवते हे तर या पुस्तकाचे संपादक. 'ऋतुरंग' दिवाळी अंकाच्या निमित्ताने लेखक, कलावंत, मित्र, हितचिंतक किती आणि कसे मिळाले, त्यांचे मैत्र कसे वृद्धिंगत होत गेले, याचा आत्मनिष्ठ आलेख मोकळ्या मनाने मांडतात. सुशीलकुमार शिंदे, यशवंतराव गडाख यांच्यासारख्या अनेकांची सहृदयता आणि मोठेपण प्रांजळपणे नमूद करतात. तीच गोष्ट बाबासाहेब पुरंदरे यांची. आयुष्यभर छत्रपतींची खांद्यावर घेतलेली पालखी देशोदेशी दिमाखात मिरवली. शिवशाहीर म्हणून लौकिकास पावले. मिळालेल्या अनुभवांची संख्या ही तर केलेल्या व्याख्यानाच्या संख्येइतकी. तरीही आपल्या घडणीवर संस्कार आहे तो वडिलांचा, हे ते आवर्जून नमूद करतात. जिल्हाधिकारी म्हणून वावरलेले लक्ष्मीकांत देशमुख आपल्या कारकिर्दीचे श्रेय देतात; परभणी आणि कोल्हापूर या दोन शहरांना.

कुलदीप नय्यर यांच्या सियालकोटच्या पीरसाहेबांवरची श्रद्धा, नाना पाटेकरांच्या आत्ममग्न ओल्या आठवणी, वृत्तपत्रातील बातमीचा चपखलपणे उपयोग करून दिल्लीतून महाराष्ट्रात जाणे रद्द करणारे सुशीलकुमार, पत्रकारिता आणि मद्यपान यांच्या सुरस कथा, अंतर्गत कलहाची राजकीय बातमी वाचून व्यथित झालेले प्रमोद महाजन, देवराई आणि आंब्यांची कलमे, असा मोठा लेखांचा खजिना म्हणजे 'मन पाहि मागे मागे' हे पुस्तक. शीर्षकाप्रमाणेच आपल्या गतस्मृतींना उजाळा देणारे चौदा लेख यात आहेत. लेखक आहेत – गुलजार, यशवंत गडाख, नाना पाटेकर, गिरीश कुबेर, मुकुंद कुळे, मिलिंद जोशी, राजीव खांडेकर, अरुण कायगावकर. ज्या प्रसंगांना, घटनांना, संस्कारांना, कडूगोड अनुभवांना आयुष्यातून वेगळे करणे कधीच शक्य नसते, अंगावरील सालीसारखे. उलट त्याना स्वीकारले जाते ते जीवनाचा एक भाग म्हणून. व्यक्तिमत्त्वाचा एक पैलू म्हणूनही त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांना उजाळा देणे म्हणजे स्वतःलाच पुन्हा त्या दिवसांत पाहण्यासारखे, दागिन्याला उजळून काढल्यासारखे. असा उजाळा या लेखकांनी लेखांमधून दिलेला आहे. त्याचे हे पुस्तक म्हणजे, 'मन पाहि मागे मागे.' आणि त्याचे संपादन केले आहे 'ऋतुरंग'चे संपादक अरुण शेवते यांनी.

गतस्मृती या फुलपाखरासारख्या असतात. त्यांच्या पंखांचा नाजूक आणि मुलायम स्पर्श त्यावरील रंगासारखाच हळुवार, मोहक. तोच संदर्भ जागोजागी रेखाटलेल्या मयूरछटातून व्यक्त होतो. मुखपृष्ठावरही याच पंखांचा संदर्भ आहे. लेखकांची रेखाचित्रेही हुबेहूब झाली आहेत.

- **मूल्य १८० रु. सवलतीत ११० रु.**


# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

‘अरे,वेंधळेपणा करू नका. ही इमर्जन्सी आहे. पटापट करा सगळं. मला मार्फिन व स्ट्रेप्टोकायजेन द्या. दान-तीन हिनस लाईन्स सुरू करा . इंटेन्सिव्ह केअरमध्ये हलवा. माझ्या हृदयाला सपोर्ट लावण्याची तयारी ठेवा. मला श्वास घ्यायला त्रास होणार आहे. रेस्पिरेटर तयार ठेवा.’

‘माझ्या सेक्रेटरीला एकटं सोडू नका. ती घाबरलीय. कार्डियाक कॅथेराईझेशन रूम तयार ठेवा. केव्हिनला बोलावा. तिथे काम करणाऱ्या नर्स व इतर स्टाफ यांना बोलावून घ्या.’




दिवसाला पाच पाच हृदय शस्त्र करणारे डॉ. नितू मांडके स्वतःच हृदय विकाराने ग्रस्त झाले. स्वतः हिंदूजा मध्ये गाडी चालवत दाखल झाले. आणि स्वतःच्या उपचाराची तयारी स्वतःच सांगितली. अखेरची. प्रत्येकाला हेलावून सोडणारी ही घटना होती. अद्‌भूतच! असंख रुग्णांना, ज्यात पंधरा दिवसाचं बाळ देखील होते, पुन्हा आयुष्यात ठणठणीत उभे राहण्याचे भाग्य ज्यांच्यामुळे मिळाले, तेच डॉ. नितू मांडके त्यांच्या कौशल्यावर मात करून निघून गेले. साडे पाचशे खाटांचे हॉस्पिटल उभारलेले पाहण्याचे स्वप्न डोळ्यातच ठेवून गेले. मंदार, जुई आणि चारुता यांचे फुललेले आयुष्य पाहण्याची हौस अचानक सुकून पडली, वादळाने वृक्ष उन्मळून पडावा तशी. उरल्या केवळ स्मृती! त्यानी दिलेला स्नेह, प्रेम, माया, जिव्हाळा, आधार, साहाय्य, आणि जगण्याची, कर्तव्याची जिद्द.

डॉ. नितू मांडके यांच्याविषयीचा हा स्मृतींचा ऐवज डॉ. अलका मांडके यांनी वाचकांच्यासाठी खुला केला. मोठ्या धिराने, संयमाने, हळूवारपणे आणि तितकाच तरलपणे. कुठेही स्तोमाचे अवडंबर नाही, उदो उदो नाही, की स्वतःकडे नेणेपण नाही. डॉक्टर, प्रेयसी, गृहिणी, माता, सल्लागार सहचर या भूमिकांना कुठेही अतिशयोक्तीचे सलाईन न लावता प्रांजळपणे आयुष्याचा पट उलगडून ठेवला, अवघड शस्त्रक्रियेसारखा. नितू हृदयावरील शस्त्रक्रिया शस्त्रक्रिया करण्यात पटाईत होते. स्वभावाने जिद्दी होते. बोलण्यात विनोद असायचा तशा फटकळ शिव्याही असायच्या. वागणे मनमोकळे असायचे पण प्रसंग आला तर मारामारी करायची ही तयारी असायची. माणसांवर प्रेम करायचे. माणसांच्या मोठेपणावर विश्वास ठेवायचे. आपल्याला जे मिळाले ते इतरांना वाटण्याची दानत ठेवायचे. मित्र आणि गरीब यांच्यासाठी सारेकाही मोफत! असा माणूस आयुष्याचा सहचर म्हणून मिळाला हे भाग्यच! त्याच्यामुळे खूप शिकता आले, स्वतःला पारखून घेता आले. पण अचानक सोडून गेल्याने सर्वच जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी त्यांच्यासारखेच खंबीर व्हावे लागले. त्यांचे अपूर्ण राहिलेली स्वप्ने पूर्ण करण्यासाठी ताठ कण्याने उभे राहावे लागले. हा सगळा पट डॉ. अलका माडके यांनी या चरित्रातून साकारला आहे. एखाद्या कसलेल्या लेखिकेच्या कसदार लेखणीप्रमाणे.

प्रसिद्ध व्यक्तीच्या सान्निध्यात इतर माणसे झाकली जातात, मोठ्या वृक्षाखाली उगवलेल्या रोपट्यांप्रमाणे. परंतु इथे तसे झालेले नाही. डॉ.अलका यांचे कर्तृत्व तितकेच ठळक आहे. त्यानी पेललेल्या जबाबदाऱ्या, आणि अनेस्थेशियाच्या बाबतीत केलेले संशोधन व प्रयोग तितकेच मोलाचे आहे. तरीही त्यांनी ते अतिशय संययाने नमूद केले आहे. मुलांची काळजी वाहताना त्यांच्यातली माता सदैव जागृत आहे. जिथे चुकले असे वाटले त्याचे विश्लेषण केले आहे. हा गुण नितूच्या बाबतीतही कायम ठेवला. त्यांचे चुकले तिथे ते चूक म्हटले.

डॉ. नितू मांडके यांच्यासोबत जगलेले आयुष्य, त्याची आई, स्वतःचे आईवडील, मुले, या सगळ्यांच्या वागण्याचे, स्वभावाचे तपशील यात आलेले आहेत. बाळासाहेब ठाकरे, राम शेवाळकर, नाना पाटेकर यांच्याप्रमाणेच अनेक मान्यवर मंडळींचा परिचय यात आलेला आहे. यशाच्या गुणासोबत कधीकधी ॅलर्जीसारखे अवगुणी प्रकार घडतात. तशा काही घटना नितूच्या आयुष्यात आल्या. त्यांचीही दखल आवर्जून घेण्यात आलेली आहे. इंग्लड-अमेरिका येथे जम बसत असतानाही भारतात आपल्या ज्ञानाचा उपयोग व्हावा ही नितूची भूमिका. परंतु परत आले म्हणून सगळेच मनासारखे घडले असे नाही. बराच काळ जावा लागला. चिकाटी, जिद्द, संयम आणि स्वतःचे कौशल्य यावर विश्वास असेल तर अवघड काहीच नाही. डॉ. नितू मांडके यांच्याकडे हा विश्वास होता. डॉ. अलका मांडके या देखील त्याच मुशीत तयार झालेल्या. त्यामुळेच हे चरित्र वाचत असताना मनाचा ठाव घेत राहते. स्वतःच्या आयुष्याविषयी नेटकेपणाने मांडता येते हे या चरित्रातून लक्षात येते. आतापर्यंत या चरित्रमय पुस्तकाची अठरा आवर्तने पुनर्मुद्रणरूपाने पार पडली आहेत. यातच सारे आले. काही मोजक्या प्रसंगाचे फोटो सोबत दिलेले आहेत. एक पान मजकुराची गरज एक फोटो भरून काढू शकतो. या फोटोंमुळे शब्दांवर साज चढला असे म्हटले तर वावगे ठरू नये.

- **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.**

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**
**संपर्क : ९८६९२०७४०३**




'ह्युमन लाईफ इज ॲबसर्ड. दी होल हुमॅनिटी इज स्टिंकींग अँड नो गॉड कॅन सेव्ह इट. नो सोशल सेटअप कॅन इम्प्रूव्ह इट.' अल्बेर कामू या फ्रेंच नाटकाराने व्यक्त केलेली ही जाणीव. 'ॲबसर्ड' हा शब्द प्रथम उपयोगात आणणाराही तोच. त्याची जन्मशताब्दी २०१३ साली साजरी झाली. नोबेल पुरस्काराने सन्मानित झालेला कामू हा नाटककार होता, तसा विचारवंत, चिंतक, कादंबरीकार, कथालेखक आणि वैचारिक निंबधकार म्हणून प्रसिद्धी पावलेला होता. लेखकाच्या मते कामूने वापरलेल्या 'ॲबसर्ड' या शब्दाचे मूळ जर्मन तत्त्ववेत्ता नित्सेच्या विचारात आहे. त्यासाठी नित्सेची चतुःसूत्री या पुस्तकात संदर्भ म्हणून दिलेली आहे. आणि त्याचवेळी 'ए फिलॉसॉफी डी ॲबसर्ड'चा संदर्भ देऊन कामूची 'ॲबसर्ड'विषयीची संकल्पना विषद केली आहे. 'ह्युमन लाईफ इज ॲबसर्ड'चा प्रत्यय त्याच्या नाटकातून येतो. त्याची काही नाटके त्यादृष्टीने पाहता येतात. 'मिथ ऑफ सिसीफस' या नाटकातला सिसीफस हा नायक. एक शिलाखंड पर्वताच्या शिखरावर नेऊन टोकावर ठेवण्याची शिक्षा त्याला सुनावलेली असते. परंतु शिला पर्वताच्या टोकावर स्थिर होत नाही. ती पायथ्याशी येऊन पडते. परंतु तिला टोकावर ठेवण्याचेच काम शिक्षा म्हणून त्याला पार पाडायचे आहे. त्यातून सुटका नाही, जगाच्या अंतापर्यंत किंवा ईश्वराची कृपा होऊन शापमुक्त होईपर्यंत.

'कॅलिगुला', 'क्रॉस परपज', 'द जस्ट असॅसिन्स', 'द पझेस्ड', 'द प्लेग' ही काही कामूची नाटके होत. त्यांची प्रायोगिकता, विसंगत व्यक्तिरेखेचा शोध आणि बोध, नाट्य विसंगतीत आंतरिक संगती, दर्पणनाट्य, विसंगतवादाचा तात्त्विक विचार, विरोधाभास, नाट्यशैली आणि 'ॲबसर्ड' या संकल्पनेचे शास्त्र, या विषयींचे विश्लेषण लेखकाने मर्मग्राहीवृत्तीने केलेले दिसून येते. त्यातून अल्बर्ट कामू आणि त्याची नाटके यांचा वेगळ्या अंगाने परिचय होतो.

आपल्याकडे ज्या नाटकांचा बराच बोलबाला झाला, आणि यांच्याविषयीची चर्चा अनेक काळ झडत राहिली, त्यापैकी एक आहे 'वेटिंग फॉर गोदो'. त्याचा मूळ लेखक सॅम्युअल बेकेट. आयरिश कवी, कादंबरीकार, नाटककार. ॲबसर्ड नाटकातून काहीच अर्थबोध होत नसल्याने त्याना 'न-नाट्य/अनर्थनाट्य' असे म्हणण्याचा प्रघात रूढ झाला. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'वेटिंग फॉर गोदो' होय. या नाटकाचा परिचय, त्यातले नाट्यदर्शन, नाटकातील प्रतिकात्मतेचा अन्वयार्थ, नाटकाचे यशापयश, समीक्षकांच्या परीक्षणाच्या लक्षणीय नोंदी, यांचाही वेध लेखकाने घेतलेला आहे. बेकेटच्या 'ऑल दॅट फेल', 'एंड गेम', 'एम्बर्स', 'क्रॅप्स लास्ट अेप', या नाटकांचा परिचय लेखकाने या पुस्तकात करून दिला आहे.

मराठीत दुसरे आलेले एक नाटक म्हणजे 'खुर्च्या'. त्याचा मूळ लेखक 'युरेन आयनेस्को'. त्याचे मूळ नाटक 'द चेअर्स'. आयनेस्कोचा 'ॲबसर्ड थिएटर'च्या निमित्ताने करून दिलेला परिचय, त्याची नाटके, आणि या चळवळीला दिलेली दिशा याचा तपशील लेखकाने दिलेला आहे. त्याचप्रमाणे नोबेल पुरस्काराने सन्मानित झालेल्या आणखी एका साहित्य सम्राटाची ओळख लेखकाने या पुस्तकात करून दिलेली आहे. त्याचे नाव आहे,'लुई पिरॅन्दलो'. याला प्रायोगिक नाट्य चळवळीचा भाष्यकार मानले जाते. जवळपास चाळीस नाटकांची संपदा त्याच्या नावावर आहे. 'नाटककाराच्या शोधात सहा पात्रे' या नाटकाची मराठी रंगभूमीवर बरीच चर्चा झाली. ते बेतलेले होते पिरॅन्दलोच्या 'सिक्स कॅरेक्टर्स इन सर्च ऑफ ॲन ऑथर' या नाटकावरून. या नाटकाची निर्मिती, पात्रांची कूळकथा, त्यांचा इतिहास, नाटकातील नाटक, नाटकाचा घाट, नाटकाचे वेगळेपण, या अंगांनी या नाटकाची ओळख लेखकाने करून दिलेली आहे. तशी पिरॅन्दलोच्या इतर नाटकांबरोबरच त्याचे नाट्यशास्त्रीय योगदान, सौंदर्यशास्त्रीय द्वैत, कलेतील आनंद आणि त्यातून मिळणारा आनंद यांचीही ओळख करून दिलेली आहे.

माणिक कानेड हे नाट्यचळवळीशी परिचित असलेल नाव. रंगभूमीशी असलेले त्यांचे नाते जसे रंगकर्मी म्हणून आहे तसे नाटककार, समीक्षक म्हणूनही आहे. या विषयी त्यांनी केलेले लेखनही विपुल आहे. त्यामुळे ॲबसर्ड थिएटर हा विषय त्यांच्या जिव्हाळ्याचा. अभ्यासाचा. त्याची ओळख करून देताना त्यांनी चार महान नाटककारांचा करून दिलेला परिचय तितकाच उत्कट आणि अभ्यासपूर्ण आहे. आपली भूमिका त्यानी पुस्तकाच्या सुरुवातीलाच प्रस्तावनेत स्पष्ट केली आहे.

अबसर्ड थिएटरचे तत्त्वज्ञान आणि रंगतंत्र मुळात समजून घेण्यासाठी हे पुस्तक नक्कीच उपयुक्त ठराव. प्रायेगिक रंगभूमी ही चळवळ काय आहे याचा शोध घ्यायचा तर तिची सुरुवात इथून व्हावी. नाटकाचे नेपथ्य आणि पात्रे म्हणून उभी असलेली प्रतिके यांचा चित्रकाराने सुरेख मेळ साधला आहे. त्यावरून ॲबसर्डची कल्पना मुखपृष्ठावरच येते.

- **मूल्य १२५ रु. सवलतीत ७५ रु.**



अलका धुपकर



श्रीरंग गोडबोले



शिल्पा तुळसकर



सौरभ करंदीकर



किरण खलप



अपर्णा चवाथे



गोपी कुकडे

## परिसंवाद : जाहिरात हाच धर्म वक्ते आणि क्षणचित्र




निवेदन
अस्मिता पांडे






**प्रख्यात गायक**
**संजीव चिम्मलगी यांचे**
**'स्वरमंथन'**
**बंदिश, नाट्यगीत व**
**भावगीतांची मैफल**
साथसंगत
**मनोज देसाई** (हार्मोनियम)
आणि
**रूपक खरवंडीकर** (तबला)

## सोलापूर जिल्हा संस्कृतिवेध (वाचकदिन) क्षणचित्रे

**प्रकाश चांदे लिखित 'चंदेरी सृष्टी, सोनेरी गोष्टी पुस्तकाचे प्रकाशन, प्रल्हाद जाधव लिखित 'आनंद नक्षत्र' पुस्तकाचे प्रकाशन, भाऊ गावंडे लिखित 'वाझुंठाव' पुस्तकाचे प्रकाशन, चंद्रशेखर सानेकर लिखित 'दीपदान' पुस्तकाचे प्रकाशन. सोबतच्या छायाचित्रात निवेदन करताना श्रीधर पाटील आणि विचार मांडताना अच्युत गोडबोले**

















RNI No. MAHMAR/2013/50137
Postal Registration No. MCW/310/2013-2015
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.